# सोलापूर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2011-2012

उप संचालक, उपविभाग - 2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे सोलापूर महानगरपालिका यांनी 2011-2012 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफारीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# सोलापूर महानगरपालिका या संस्थेचा 2011-2012 या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.:378/15.05.2014

उप संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा (म.न.पा.ले.प.),

7 वा मजला रायगड भवन,
सी.बी.डी. (बेलापूर) नवी मुंबई.
दिनांक :

प्रति,

आयुक्त,

सोलापूर महानगरपालिका,

सोलापूर.

सोलापूर महानगरपालिकेचे आर्थिक वर्ष 2011-2012 या वर्षाचे लेखा परीक्षण श्री.एस.बी.कैंबळे, सहा.संचालक (म.न.पा.ले.प.) नवी मुंबई यांनी दिनांक 08/07/2013 ते 15/02/2014 या कालावधीत पूर्ण केले. श्री. सिताराम काळे, उप संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा (म.न.पा.ले.प.) महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी दिनांक 29/04/2014 रोजी श्री. चंद्रकांत गुडेवार, आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे समवेत चर्चा करून अहवालाचे अंतिमीकरण केले. लेखा परीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**महापौर**

| अ.क्र. | नांव | कालावधी |
|---|---|---|
| 1 | श्री. आरिफ इस्माईल शेख | दिनांक 01/04/2011 ते 05/03/2012 |
| 2 | सौ. अलका दगडू राठोड | दिनांक 06/03/2012 ते 31/03/2012 |

आयुक्त

| अ.क्र. | नांव | कालावधी |
|---|---|---|
| 1 | श्री. सौरभ राव | दिनांक 01/04/2011 ते 30/05/2011 |
| 2 | श्री. अजित जाधव | दिनांक 31/05/2011 ते 05/10/2011 |
| 3 | श्री. अजय सावरीकर | दिनांक 06/10/2011 ते 31/03/2012 |

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....... 1

I PART I : भाग १ ....... 3

मागील लेखा परीक्षण अहवाल ....... 3

PART II ....... 4

कलम ९ अ खालील आक्षेप ....... 5

1 कर्ज विषयक वार्षिक विवरणपत्र सादर केले नसले बाबत. ....... 6

2 सर्वसाधारण रोकड वही विहित नमुन्यात ठेवली नसलेबाबत. ....... 6

3 नियमबाहयरित्या रोखीने रक्कमा प्रदान केल्या बाबत. ....... 7

4 भविष्य निर्वाह निधीच्या कपाती बँक खाते मध्ये भरणा केल्या नसलेबाबत. ....... 9

5 वेतनातून कपात केलेला आयकर शासनाकडे विहित वेळेत भरणा केला नसलेबाबत. ....... 10

6 विभाग प्रमुखांना कार्यालयीन कामासाठी दिलेले अग्रीम समायोजित केले नसलेबाबत. ....... 11

7 ठेकेदार यांचे देयकातून कपात केलेला आयकर (टी.डी.एस) शासनास भरणा केला नसलेबाबत. ....... 12

8 निवृत्ती वेतन अंशदान निधी न ठेवल्याबाबत. ....... 13

9 निलंबित कर्मचा-याच्या निलंबनाच्या चौकशीतील दिरंगाईबाबत. ....... 14

10 उपर्जित द्विनोंद पध्द्तीने लेखे व ताळेबंद ठेवणे. (ACRUAL BASED DOUBLE ENTRY SYSTEM) ....... 16

11 अंदाजपत्रक : अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानुसार जमेच्या अवास्तव रकमा वाढविण्यात आल्याबाबत ....... 17

12 रस्ते विकास शासन अनुदानामधून करणेत आलेल्या आर्थिक तरतुदीमधील अनियमिततेबाबत. ....... 21

13 तेराव्या वित्त आयोगाचा निधी नियमबाह्यरित्या खर्च केल्याबाबत. ....... 22

14 बांधकाम परवाना शुल्काची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसलेबाबत. ....... 23

15 महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनावरील अनुदान शासनाकडुन प्राप्त करुन घेतले नसलेबाबत. ....... 24

16 वार्षिक प्रशासन अहवाल व वार्षिक लेखे सादर केले नसले बाबत. ....... 25

17 निलंबित कर्मचा-याच्या निलंबनाच्या चौकशी करिता चौकशी अधिकारी यांची नियुक्ती न केल्याबाबत. ....... 26

18 वर्ग 'अ' व वर्ग 'ब' पदाकरिता बिंदू नामावली तयार करून शासनाची मान्यता न घेताच पदे भरण्याबाबत. . 28

19 कर्मचारी आकृतीबंधास शासनाची मान्यता न घेताच नियमबाह्यरित्या कर्मचारी भरती केल्या बाबत. ....... 29

20 सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडुन संकीर्ण या लेखाशिर्षाखालील बाबींच्या खरेदीतील अनियमिततांबाबत. ....... 31

21 नगर विकास विभागाने मंजुर केलेल्या आकृतीबंधाची अंमलबजावणी केली नसलेबाबत. ....... 32

22 नगर अभियंता विभागांतर्गत वाहनांवरील खर्चाचे अनियमिततेबाबत. ....... 33

23 कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून मिळणारे वेतन अनुदानाबाबत. ....36
24 वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवर करणेत आलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत. ....37
25 आरोग्य विभागाकडील वाहन दुरुस्तीवर करणेत आलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत. ....38
26 पाणीपुरवठा विभागाकडील वाहनांच्या लॉगबुकमधील त्रुटी व टँकर खरेदीच्या नस्ती तपासणीस उपलब्ध न झालेबाबत. ....41
27 एस्कॉर्ट विभागाची पावती पुस्तके लेखापरिक्षणास उपलबद्ध् केली नसलेबाबत. ....42
28 धर्मवीर संभाजी तलावामधील मस्त्य विक्रीच्या ठेक्यातील अनियमिततेबाबत. ....43
29 जन्म-मृत्यू विभागाचे जमा रक्कमांचे लेखापरीक्षणाबाबत. ....45

**कलम ९ ब खालील आक्षेप ....47**

30 सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन प्रकरणामधील अनियमितते बाबत. ....48
31 आरोग्य विभागाकडील साहित्य खरेदीमधील गंभीर अनियमितते बाबत. ....50
32 आरोग्य विभागाच्या सादीलवार साहित्याच्या खरेदीतील अनियमिततेबाबत. ....52
33 किटकनाशके, जंतुनाशके खरेदीमधील गंभीर अनियमिततेबाबत ....54
34 नागरी हिवताप योजना अंमलबजावणीतील अनियमिततेबाबत. ....56
35 मलेरिया विभागाकडील फवारणी / धुरावणी करणेकामी 67(3) क खाली नेमणूक दिलेल्या कर्मचा-याबाबत. ....57
36 मलेरिया विभागाकडे स्टॉकबूक मधील त्रुटीबाबत. ....58
37 आरोग्य विभाग औषध खरेदीमधील अनियमितते बाबत. ....59
38 अन्न व परवाने विभागांतर्गत असणा-या आस्थापनांकडील प्रलंबित वसुली बाबत. ....61
39 आरोग्य केंद्राकरिता आवश्यक असणारे साहित्य व उपकरणे खरेदी मधील अनियमितते बाबत. ....62
40 DIK-7 पाइप्स खरेदी कामातील अनियमिततेबाबत ....64
41 अक्कलकोट रोड येथे संप व पंपहाऊस येथे झालेल्या कामातील अनियमिततेबाबत. ....65
42 घरपट्टी करनिर्धारणा मधील त्रुटीमुळे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. ....67
43 मालमत्ता कर दप्तर व मालमत्ता कराची थकबाकी वसुली केली नसले बाबत. ....68
44 शिक्षण कर व नौकर शाश्वती कर शासन तिजोरीत विहित मुदतीत जमा केला नसले बाबत. ....70
45 अवैध इमारती वर शास्ती न बसविल्या बाबत. ....71
46 मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यातून नियमबाहयपणे 15 % वजावट केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत .72
47 शहरहद्दवाढ विभागाने अवैध इमारतीवर शास्ती न बसविल्या बाबत. ....73
48 शहरहद्दवाढ कर दप्तर व मालमत्ता कराची थकबाकी वसुल केली नसले बाबत. ....74
49 शहरहद्दवाढ विभागाने मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यातून 15 % वजावट नियमबाहयपणे केले बाबत. ..75
50 शहर हद्दवाढ विभागातील नविन कर निर्धारणामधील त्रुटी बाबत. ....76
51 घरपटटी विभागातील नवीन कर आकारणीमधील त्रुटी बाबत. ....77

52 मालमत्ता कराच्या थकीत रकमेवर 2% शास्ती लावली नसलेबाबत....78
53 शिक्षण कर व नौकर शाश्वती कर विहित मुदतीत जमा केला नसलेबाबत....79
54 मोबाइल टॉवर थकबाकीवर शास्ती आकारली नसलेबाबत....79
55 नवीन मालमत्ता कर आकारणी चुकीची केलेने झालेल्या नुकसानी बाबत....80
56 बसवेश्वर नगर येथे 0.6 दशलक्ष लिटरच्या दोन टाक्या बांधणे या कामातील अनियमितते बाबत....82
57 कुमठेगाव येथे टाकीजवळ 1 दशलक्ष लिटरची उंच टाकी बांधणेसाठी महानगरपालिका निधीमधुन रक्कम आदा केली नसलेबाबत....83
58 मजरेवाडी 2+2 दशलक्ष लिटरच्या उंचावरील पाण्याच्या टाक्या बांधणे या कामातील अनियमिततेबाबत....85
59 केगाव येथे 0.8 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम आदा केली नसलेबाबत....86
60 बाळेगाव येथे 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम आदा केली नसलेबाबत....87
61 कुमठानाका डीएसपी टाकीजवळ 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम आदा केली नसलेबाबत....89
62 जूळे सोलापुर एम.बी.आर. टाकीजवळ 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम आदा केली नसलेबाबत....90
63 हायलेव्हल टाकीजवळ (महानगरपालिका स्टोअर जवळ) 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे या कामातील अनियमिततेबाबत....91
64 हद्दवाढ भागात विविध ठिकाणी वितरण नलिका टाकणे या कामातील अनियमिततेबाबत....92
65 कस्तुरबा टाकीजवळ 2 दशलक्ष लिटर उंचावरील टाकी बांधणे या कामातील अनियमिततेबाबत....94
66 दहिटणे येथे 0.6 दशलक्ष लि.क्षमतेची उंचावरील टाकी बांधणे कामातील अनियमिततेबाबत....95
67 भद्रावती येथे 1 दशलक्ष लिटर व मित्रगोत्री येथे 2 दशलक्ष लिटरच्या दोन टाक्या बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम खर्च केली नसलेबाबत....96
68 कोंडी एम.बी.आर.ते जूना पुना नाकापर्यंत 1016 मि.मी.व्यासाची एम.एस.पाईपलाइन टाकणे....97
69 सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्र येथील पंपींग मशिनरी नुतनीकरण करणे या कामातील अनियमितते बाबत....99
70 ट्रक माउंटेड सेक्शन कम जेटींग मशिन चेसीससह खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत....101
71 सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र चालविणे कामामधील अनियमिततेबाबत....103
72 मुस्लिम कब्रस्तान सलगर वस्ती येथे कंपौंड वॉल बांधणे,रस्ता करणे या कामातील अनियमितते बाबत....105
73 गुडलक हॉटेल ते नॅशनल हायवे पर्यंतचा रस्ता डांबरी करणे या कामातील अनियमिततेबाबत....107
74 बलिदान चौक ते कौंतम चौक ते समाचार चौक पर्यंत रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत....108
75 अक्कलकोट रोड ते समाधान नगर रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत....109
76 शासन अनुदानातून केलेल्या रस्त्याचे कामातील अनियमितते बाबत....110

77 मुळे गांव रोड ते जवाहर टाकी ते 256 गाळे MSRDC रस्त्यापर्यंत रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत. ....114
78 वॉ.क्र.68 मुनशी बंगला ते धमाका ढोली बाजा ते सतनाम चौक रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत. ....116
79 पमाकोळी शॉपींग सेंटर ते घोंगडे वस्ती रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत. ....117
80 अक्कलकोट रोड, मल्लिकार्जून ते समाधान नगर रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत. ....118
81 समता नगर ते जयप्रकाश नगर या भागात रस्ते करणे या कामातील अनियमिततेबाबत. ....119
82 IHSDP अंतर्गत भगवाननगर झोपडपट्टी घरकुल बांधणे कामातील अनियमिततेबाबत. ....120
83 वॉ.क्र.92 अंबिका शिवगंगा नगर येथे सुधारणा करणे या कामातील अनियमिततेबाबत. ....123
84 बांधकाम वापर परवाना शुल्क वसुली बाबत. ....124
85 कामगार कल्याण निधी वसुल केला नसलेबाबत. ....126
86 अनुसुचित जाती नवबौद्ध घटकाच्या घरकुल योजनेमधील अनियमिततेबाबत. ....127
87 डॉ. कोटणीस स्मृती स्मारक उभारणे या कामातील अनियमितता ....130
88 नगर अभियंता, विद्युत भांडार विभागाकडील खरेदी, लेखे/ नोंदवह्यामधील आढळुन आलेल्या अनियमितता. 134
89 नगर अभियंता, विद्युत भांडार विभागाकडील रु. 41,02,017/- च्या विद्युत साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत. ....137
90 व्यापाऱ्यांनी भरलेल्या स्थानिक संस्था कराचे कर निर्धारण न केल्याबाबत. ....140
91 गजानन महिला मंडळ झुणका भाकर केंद्रास मोकळी जागा भाडयाने देण्यामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत. 144
92 कुंभार वेस शॉपींग सेंटर-मधील गाळा क्र.17 मधील अनियिमततेबाबत. ....145
93 मोतीबाग प्राणीसंग्रहालयाचे समोरील बाजूची 400 फु. इतकी खुली जागा भाड्याने देणेमधील अनियमिततेबाबत. ....146
94 राघवेंद्र क्रीडा व शैक्षणिक संस्थेस झुणका भाकर सुरू करणेस दिलेल्या मोकळ्या जागेबाबत ....148
95 महानगरपालिका शॉपींग सेंटर गाळा क्र.1 तुळजापूर वेस लगतची खुली जागा भाड्याने देणेबाबत. ....150
96 सोलापूर महानगरपालिकेच्या मेजर शॉपींग सेंटरमधील भाड्याच्या अनियमिततेबाबत. ....151
97 भद्रावती पाण्याच्या टाकी परिसरातील जागा झुणका भाकर केंद्रासाठी देण्यात झालेल्या अनियमिततेबाबत. 153
98 श्री.महालक्ष्मी मागासवर्गीय महिला विकास मंडळ यांना जागा भाड्याने देणेबाबत. ....154
99 महापालिकेच्या ताब्यात असलेल्या मिनी शॉपींग सेंटरचे भाडे वसुलीबाबत. ....155
100 महापालिका क्षेत्रातील खोक्यांची थकबाकी वसुल करणे बाबत. ....157
101 कुंभार वेस शॉपींग सेंटर मधील गाळा क्र.18 मधील अनियमिततेबाबत. ....158
102 जोडभावी पेठ सि.स.नं.9062 पैकी 550 चौ.फू. जागा भाड्याने देणेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत. ....160
103 महात्मा गांधी प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना बीफ पुरवठा करणे कामातील अनियमितते बाबत ....162

104 धर्मवीर संभाजी तलावातील नौका विहार मक्त्याधील अनियमितते बाबत. ....164
105 महात्मा गांधी प्राणीसंग्रहालयास दूधपुरवठा करण्याच्या ठेक्यातील अनियमितते बाबत. ....166
106 महात्मा गांधी प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना फळभाज्या, पालेभाज्या व फळफळावळ पुरविण्याच्या ठेक्यातील अनियमितते बाबत. ....167
107 उद्यान विभागांतर्गत जयभवानी बागेच्या खाजगीकरणातील अनियमिततेबाबत....170
108 मौलाना आझाद बागेच्या निविदा प्रक्रियेतील अनियमितते बाबत. ....173
109 सभापती, महिला व बालकल्याण आणि अधिकारी यांच्या वाहनांवरील खर्चाबाबत. ....176
110 महिला व बालकल्याण समितीने राबविलेल्या संगणक (एम.एस.सी.आय.टी) प्रशिक्षणाबाबत....177
111 इंदिरा गांधी स्टेडियममधील गाळ्यांच्या भाडे थकबाकीबाबत. ....178
112 झोपडपट्टीधारकांना ओळखपत्र वितरीत न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. ....181
113 घर तेथे शौचालय अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधणे(फेज-1)कामातील अनियमिततेबाबत....182
114 घर तेथे वैयक्तिक शौचालय बांधणे कामासाठी प्राप्त निधी व खर्चामधील तफावतीबाबत....186
115 घर तेथे शौचालय अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधणे (फेज-4) मधील अनियमिततेबाबत. ....187
116 कमी खर्चाचे शौचालय प्रकरणी निवड केलेले लाभार्थी व वैयक्तिक बांधलेल्या शौचालयाच्या कामामधील अनियमिततेबाबत. ....191
117 स्टेशनरी खरेदी निविदा प्रक्रिया न राबविता तूकडे पाडून केल्याने झालेली अनियमितता. ....194
118 जनन व मृत्युच्या नोंदीच्या कामामध्ये विलंब होवुनही दंडात्मक कार्यवाही केली नसलेबाबत....195
119 टॅबलेट पी.सी. खरेदीमधील अनियमितता. ....197
120 नगरसेवक,पदाधिकारी यांचे दुरध्वनी व लेटरपॅड छपाईवर करणेत आलेल्या नियमबाह्य खर्चा बाबत....199

**कलम ९ क खालील आक्षेप....200**

121 गलिच्छ वस्ती सूधारणा विभागाने वसुलीच्या रक्कमा कमी जमा केल्याने झालेल्या अपहाराबाबत व इतर अनियमितताबाबत. ....201
122 श्री.बी.बी.इंगळे - क.श्रे.लि. यांनी घरपट्टी विभागाकडे केलेल्या अपहाराबाबत. ....203

**कलम ९ ड खालील आक्षेप....206**

123 स्थायी समितीने विहीत केलेल्या लेख्यांचे नमुने सादर केले नसले बाबत. ....207
124 अग्रीमासंबंधी कागदपत्रे सादर न केल्याबाबत. ....207
125 मुदतबाह्य व न वटलेले धनादेशाची माहिती सादर केली नसलेबाबत. ....208
126 अदा बील नमुन्याप्रमाणे देयके सादर न करता प्रदान केल्याबाबत....209
127 भविष्य निर्वाह निधीमधील त्रुटीबाबत....211
128 सुरक्षा, अनामत व इसारा रक्कम नोंद वहीतील त्रुटीबाबत. ....212
129 वेतन राखीव निधीचे स्वतंत्र खाते न ठेवलेबाबत. ....213
130 जमानत / तारणठेव नोंदवही ठेवली नसल्याबाबत. ....214

131 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील त्रुटीबाबत. ....214
132 सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन विषयक लाभ वेळेत प्रदान केले नसल्याबाबत....215
133 रोखवही व बँकपासबुक ताळमेळ जुळत नसल्याबाबत. ....217
134 सर्वसाधारण सभेकडे प्रलंबित असलेल्या विषयावर निर्णय न घेतलेबाबत....218
135 सर्वसाधारण सभेकडे प्रलंबित असलेल्या विषयावर निर्णय न घेतलेबाबत....219
136 मलेरिया विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत. ....220
137 नगरसचिव विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत ....222
138 सोलापूर महानगरपालिका कर्मचा-याच्या सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत....223
139 अग्निशमन विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत. ....224
140 श्री.मल्लिकार्जून भिमा गजधाने, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकातील त्रुटीबाबत....226
141 श्रीमती सिध्दम्मा कोंडय्या येनमूल, सफाई कामगार यांच्या विनापरवाना गैरहजेरीबाबत....227
142 सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडील लेखे/नोंदवह्या नियमानुसार न ठेवणे. ....228
143 मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाचे मंजुर कर्मचारी आकृतीबंध व लेखापरिक्षण अहवालाबाबत ....229
144 अग्निशामन विभागाकडील जमा रक्कमांच्या तपासणीत आढळलेल्या त्रुटीबाबत. ....230
145 महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमांच्या उल्लंघनाबाबत. ....232
146 अन्न व परवाना विभागाच्या नर्सिंग होमच्या नोंद वहीतील त्रुटीबाबत. ....233
147 नगर अभियंता, भांडार (मुख्यालय) विभागाकडील सिमेंट खरेदीमधील अनियमितता. ....235
148 बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील अभियंत्यांनी मोजमाप पुस्तिकेमध्ये नियमानुसार मोजमापे नोंदविली नसलेबाबत....237
149 नगर अभियंता, भांडार विभागाकडील लेखे/ नोंदवह्या नियमातील तरतुदीनुसार न ठेवणे ....238
150 सुवर्ण जयंती रोजगार योजनेच्या रोकड वहीतील अनियमिततेबाबत. ....239
151 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमधील अनियमिततेबाबत. ....240
152 एस्कॉर्ट विभागाकरिता पावतीपुस्तकांच्या छपाई निविदेमधील अनियमिततेबाबत....242
153 महिला व बालकल्याण विभागाने अर्थसंकल्पीय तरतूद खर्च केली नसले बाबत. ....243
154 अतिक्रमण विभागाचे आस्थापनेवर झालेल्या अनावश्यक खर्चाबाबत. ....245
155 गलिच्छ वस्ती सूधारणा विभागाच्या थकबाकीबाबत ....247
156 महाराष्ट्र विद्युत महामंडळ यांना नाट्यगृहाच्या विद्युत देयकांचे जादा प्रदान होत असलेने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत....248
157 हुतात्मा स्मृतीमंदिर नाट्यगृहातील खुर्ची दुरुस्ती बाबतचे अभिलेख उपलब्ध केले नसलेबाबत. ....250
158 भाड्याने लावलेल्या जनरेटरची नस्ती उपलब्ध करुन न दिल्याबाबत. ....251

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....254

**विवरणपत्रे व जोडपत्रे....256**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| आयुक्तालय | | | | |
| सामान्य प्रशासन | 16, 17, 18, 19, 20, 21 | | | 136, 137, 138, 139, 140, 141, 142, 143 |
| नगर सचिव | | 120 | | 134, 135 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 22 | 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 84, 85, 86, 87 | | 147, 148, 149 |
| शहर अभियंता आणि विद्‌युत विभाग | | 88, 89 | | |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | | 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 71 | | |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15 | 30 | 122 | 123, 124, 125, 126, 127, 128, 129, 130, 131, 132, 133 |
| नगर रचना | | | | |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | 27 | 90 | | 152 |
| कर निर्धारण व संकलन | | 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55 | | |
| आरोग्य | 23, 24, 25, 26 | 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41 | | 146 |
| भूमी व मालमत्ता विभाग | | 91, 92, 93, 94, 95, 96, 97, 98, 99, 100, 101, | | 156, 157, 158 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 102 | | |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | | 117, 118, 119 | | |
| झोपडपट्टी सुधार | | 112, 113, 114, 115, 116 | 121 | 155 |
| नागरी समुदाय विकास प्रकल्प विभाग | | | | 150, 151 |
| महिला व बालकल्याण विभाग | | 109, 110 | | 153 |
| क्रिडा विभाग | | 111 | | |
| अग्निशमन विभाग | | | | 144 |
| अतिक्रमण विभाग | | | | 154 |
| उद्यान विभाग | 28 | 103, 104, 105, 106, 107, 108 | | 145 |
| जन्म मृत्यु नोंदणी विभाग | 29 | | | |

## I Part I : भाग १

***मागील लेखा परीक्षण अहवाल***

# भाग - एक

## मागील लेखापरीक्षण

**13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे लेखापरीक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : स्थानिले-1010/प्र.क्र.26 ब/विमा प्रशा, दिनांक 31 मार्च, 2011 अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांचेकडे सोपविण्यात आलेले आहे. त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेचे प्रथम लेखापरीक्षण 2011-2012 या आर्थिक वर्षापासुन सुरु करण्यात आल्यामुळे मागील प्रलंबित परिच्छेद भाग - एक निरंक आहे.**

# Part II

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

## *1 कर्ज विषयक वार्षिक विवरणपत्र सादर केले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 126 (1) अ, ब, क, ड नुसार आयुक्ताने महानगरपालिका ने घेतलेली कर्जे, त्यावर्षात फेडलेली कर्जे व वर्ष अखेरीस देणी असलेली बाकी रक्कम याची माहिती प्रत्येक वर्षाच्या शेवटी तयार करून महानगरपालिकेच्या बैठकीमध्ये ठेवणे आवश्यक आसता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

आयुक्ताने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 126 (1) अ, ब, क, ड नुसार महानगरपालिका ने घेतलेली कर्जे, त्यावर्षात फेडलेली कर्जे व वर्ष अखेरीस देणी असलेली बाकी रक्कम याची माहिती प्रत्येक वर्षाच्या शेवटी तयार करून महानगरपालिकेच्या बैठकीमध्ये ठेवणे आवश्यक आहे. तसेच ते शासकीय राजपत्रात प्रसिध्द करणेत आले पाहिजे आणि अशा विवरणपत्राची एक प्रत राज्यशासनाकडे व महालेखापाल मुंबई यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.अर्धसमासज्ञपनाचे उत्तर साडे तीन महिने विलंबाने दि.30/10/2013 रोजी देणेत आलेले आहे.कर्जविषयक विवरणपत्रावर मुख्यलेखापाल यांनी स्वाक्षरी केलेली नाही.2011/2012 या आर्थिक वर्षात महानगरपालिकाकडे एकुण कर्ज रु.37 कोटी व व्याजापोटी रु.3 कोटी 37 लाख थकीत असुन रु.5 कोटी 3 लाखाची परतफेड करणेत आलेली आहे.व कर्जापाटी एकुण रु.35 कोटी 14 लाख शिल्लक आहेत. कर्जाची परतफेड करणेसाठी केलेले नियोजन लेखापरीक्षणास दाखविण्यात आले नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.5 दि.10/07/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 2, Hmm No : 5)

## *2 सर्वसाधारण रोकड वही विहित नमुन्यात ठेवली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***महाराष्ट्र नगरपरिषद 1971 नियम 32 अन्वये नमुना क्र.11 नुसार सर्वसाधारण रोकडवही ठेवण्यात आलेली नाही.*** |

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 32 (1) प्रमाणे जमा झालेले अथवा संवितरित केलेले शासकीय अनुदानासहित सर्व पैसे त्वरित व हातचे कांहीही राखून न ठेवता नमुना क्र.11 प्रमाणे असलेल्या सर्वसाधारण रोकडवहीत ठेवणे आवश्यक आहे परंतु रोकडवही नमुना क्र.11प्रमाणे ठेवण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.51 (1 ते 3) नुसार रोकड वही रोजच्या रोज समतोलित करुन संबंधित अधिका-याच्या स्वाक्षरीने बंद करणे आवश्यक असता रोकडवहीवर कोणत्याही जबाबदार अधिकारी कर्मचारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.
अर्धसमास ज्ञापन क्र.9 दि.23/07/2013 चे उत्तर संयुक्तिक वाटत नाही.

DATASDM5602 (Ref No : 6, Hmm No : 9)

### *3 नियमबाहयरित्या रोखीने रक्कमा प्रदान केल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2098725.00/-

| |
|---|
| ***मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम84(2) नुसार शंभर रुपयापेक्षा अधिक किंवा स्थायी समिती सामान्यतः किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट प्रदानांच्या वर्गासाठी वेळोवेळी निश्चित करील अशी त्याहून अधिक रक्कम महानगरपालिकेकडून देय असेल तेव्हा ती पूर्वी म्हटल्याप्रमाणे सही केलेल्या धनादेशादवारे दिली पाहिजे ती अन्य कोणत्याही रितीने देता येत नसतानाही नियमबाहयरित्या रोखीने रक्कमा प्रदान केल्या आहेत.*** |

सोलापूर महानगरपालिकेच्या 2011-12 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करताना माहे मार्च 2012 महिन्याची रोकड वही तपासली असता, खालील नमुद करण्यात आलेल्या प्रमाणकांचे प्रदान रोखीने

करण्यात आल्याचे आढळून आले.

| दिनांक | प्रमाणक क्रमांक पासून | प्रमाणक क्रमांक पर्यंत | एकूण प्रमाणक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 2/3/12 | 19891 | 19907 | 16 | 101248 |
| 5/3/12 | 11968 (1) | 19968 | 30 | 117823 |
| 6/3/12 | 19974 | 19974 | 23 | 73675 |
| 9/3/12 | 20001 | 20013 | 13 | 37500 |
| 9/3/12 | 20081 | 20132 | 51 | 263860 |
| 9/3/12 | 20133 | 20174 | 42 | 162560 |
| 12/3/12 | 20175 | 20196 | 21 | 60144 |
| 13/3/12 | 20386 | 20433 | 47 | 133850 |
| 14/3/12 | 20551 | 20581 | 30 | 105990 |
| 15/3/12 | 20618 | 20643 | 25 | 82390 |
| 16/3/12 | 20644 | 20644 | 20 | 74500 |
| 17/3/12 | 20724 | 20737 | 13 | 67972 |
| 19/3/12 | 20738 | 20767 | 21 | 88178 |
| 20/3/12 | 20781 | 20808 | 27 | 90900 |
| 21/3/12 | 20809 | 20815 | 6 | 33984 |
| 21/3/12 | 20821 | 20853 | 32 | 113054 |
| 22/3/12 | 20854 | 20868 | 14 | 57500 |
| 26/3/12 | 21070 | 21101 | 31 | 122630 |
| 27/3/12 | 21235 | 21273 | 38 | 124758 |
| 28/3/12 | 21378 | 21405 | 27 | 75439 |
| 29/3/12 | 21406 | 21414 | 8 | 35000 |
| 30/3/12 | 21715 | 21735 | 20 | 52077 |
| 31/3/12 | 21736 | 21743 | 7 | 23693 |
| | | | 570 | 2098725 |

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 84(2) नुसार शंभर रुपयापेक्षा अधिक किंवा स्थायी समिती सामान्यत: किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट प्रदानांच्या वर्गासाठी वेळोवेळी निश्चित करील अशी त्याहून अधिक रक्कम महानगरपालिकेकडून देय असेल तेव्हा ती पूर्वी म्हटल्याप्रमाणे सही केलेल्या धनादेशादवारे दिली पाहिजे ती अन्य कोणत्याही रितीने देता कामा नये तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम

क्र.14 अन्वये नगरपरिषद निधीमधून कोणतेही प्रदान धनादेशाद्वारे देण्यात यावे. असे नमूद असताना वरील रक्कम रु. 2098725/- चे प्रदान रोखीने देणेबाबत कोणतेही निदेश दिलेले नसतानाही नियमबाहयपणे रोखीने रक्कमा देण्यात आलेल्या आहेत.

अर्धसमास ज्ञापन क्र.10 दि.23/07/2013 अन्वये मागणी करुनही अनुपालन दिलेले नसल्याने सदरची रक्कम रु. 2098725/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATASDM5602 (Ref No : 7, Hmm No : 10)

## *4 भविष्य निर्वाह निधीच्या कपाती बँक खाते मध्ये भरणा केल्या नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भ. नि. नि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 51695534.00/-

***महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार कर्मचा-याच्या वेतनातून कपात केलेली वर्गणी व परतावा पुढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत भविष्य निर्वाह निधीच्या बँक खातेमध्ये मध्ये जमा करणे क्रमप्राप्त आहे. परंतु 2011-2012 या आर्थिक वर्षात कपात केलेली कर्मचारी भविष्य निर्वाह वर्गणी रू.5,16,95,534/- बँकेमध्ये जमा केलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका भविष्य निर्वाह निधी सेवकांचे महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम 1998 नुसार लेखा परिक्षण केले असता, खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) भविष्य निर्वाह निधी नोंदवही महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता 1971मधील नियम क्र.134(5)नुसार भविष्यनिर्वाह निधीमधून घेतलेल्या आगावु रक्कमांची वसुली नमूना क्र. 98 प्रमाणे ठेवलेल्या नोंदवहीत व भविष्यनिर्वाह निधी रोकडवही नमुना क्र.100 प्रमाणे ठेवून त्यात भविष्यनिर्वाह निधी लेख्यामध्ये जमा असलेली रक्कम दर्शविणे आवश्यक आहे.परंतु भविष्यनिर्वाह निधी रोकडवही नमुना क्र.100 प्रमाणे ठेवण्यात आलेला नाही. कर्मचा-याच्या वार्षिक लेख्यांवर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच सदरची खाते वही कोणी अद्ययावत केली त्या लिपीकांची स्वाक्षरी नाही.

2) भविष्य निर्वाह निधी कर्मचारी खाते नोंदवही मधील वर्गणीदारांचा लेखा तपासला असता 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये कर्मचा-यांना 8% दराने व्याज देण्यात आल्याचे नमूद आहे. महाराष्ट्र शाअधिसूचना दि.26/5/2012 नुसार माहे डिसेंबर 2011 पासून मार्च 2012 अखेर व्याज दर 8.60% ठरविण्यात आला

आहे. तरी अधिसूचने नुसार माहे डिसेंबर 2011 पासून कर्मचा-याना 8.60% दराने व्याजाची परिगणना करून कर्मचा-याचा खाती व्याज जमा करण्यात आलेले नाही.

3) भविष्य निर्वाह निधी नोंदवहीची तपासणी केली असता कर्मचा-यांचे पद, कर्मचा-यांचे वेतन नमूद केलेले नाही. त्यामुळे कर्मचा-याची दरमहा कपात केलेली वर्गणी भ.नि.नि.नियम 10(1) अ.ब.नुसार दरमहा कमीत कमी 6%असल्याची लेखा परिक्षणास खात्री करता आलेली नाही.

4) सोलापूर महानगरपालिका कर्मचा-यांचे वेतनातून 2011-12 आर्थिक वर्षात भ.नि.निधी वर्गणी व परतावा कर्ज म्हणून रू.5,16,95,534/- एवढी रक्कम वसुल करण्यात आलेचे वेतन रोजकिर्दी वरुन दिसून आले. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार कर्मचा-यांच्या वेतनातून कपात केलेली वर्गणी व परतावा पुढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत बँक खातेमध्ये मध्ये जमा करणे क्रमप्राप्त आहे. परंतु 2011-12 या आर्थिक वर्षात कर्मचा-यांचे वेतनातून कपात केलेली वर्गणी व परताव्याची रक्कम रूपये 5,16,95,534/- बँक खातेमध्ये जमा केलेली नाही.

5) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नियम क्र.6, 8 तसेच नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 134 (3)(अ) नुसार भविष्य निर्वाह निधीत जमा वा नावे टाकणेत आलेल्या रक्कमांची खातेवहीत शक्य तो लवकर परंतु ज्या महिन्यात व्यवहार/देवघेव झाली असेल त्या महिन्याच्या आत नोंदविणे आवश्यक आहे व भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम 12 नुसार तसेच नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 134 (3)(ब) खातेवहीत व्याजाच्या नोंदी वर्षात फक्त एकदाच करणे आवश्यक आहे परंतु सोलापूर महानगरपालिका कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी खातेवही तपासली असता एकूण 1985 कर्मचा-याचा लेखा आजपर्यंत अद्ययावत केलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 6,8, व 12 चे उल्लघंन झालेले आहे.

अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये उपरोक्त वस्तुस्थिती मान्य केली आहे परंतु भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमा बँकखात्यामध्ये जमा केल्याबाबत व एकूण 1985 कर्मचा-याचा लेखा आजपर्यंत अद्ययावत केल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नाहीत.

DPSKGGM6001 (Ref No : 8, Hmm No : 11)

## *5 वेतनातून कपात केलेला आयकर शासनाकडे विहित वेळेत भरणा केला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : वेतन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***कर्मचा-याच्या वेतनातून वसुल केलेल्या आयकराचे, आयकर विभागास भरणा केलेल्या चलनावरुन लेखापरिक्षण केले असता, आयकर 1 ते 2 महिने उशिराने शासन तिजोरीत जमा केलेचे आहे. इन्कमटॅक्स अॅक्ट 1961, सेक्शन 192 नियम 30, चॅप्टर XVII A व B नुसार सात दिवसाच्या आत कपात रक्कमा शातिजारीत जमा करणे क्रमप्राप्त असता, एक ते पाच महिने उशीरा जमा केल्या आहेत.***

सोलापूर महानगरपालिका कर्मचा-याच्या वेतनातून कपात केलेला व्यवसायकर व आयकर याचे लेखापरिक्षण केले असता, खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)कर्मचा-यांचा व्यवसायकर प्रत्येक महिन्याला त्यांचे वेतनातून कपात करणेत आला आहे . परंतु सदरचा व्यवसायकर पुढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत शासन तिजोरीत जमा केलेला नाही. 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये एकूण र.रू.1,13,28,262/- एवढा व्यवसायकर कपात केलेला असून, तो 1 ते 5 महिने इतक्या उशिराने शातिजारीत जमा केलेला आहे. शाअधिसूचना पीएफटी-2011/एडीएम-29/एनटीएफ दि.13/7/2011 नुसार कार्यवाही केली नाही. सोबत व्यवसायकर उशिरा भरल्याचे परिशिष्ट क्र.() जोडण्यात आले आहे.

2)सोलापूर महानगरपालिका कर्मचा-याच्या वेतनातून 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये एकूण 29,66,361/- एवढा आयकर कपात करणेत आलेला आहे. सदर कपात केलेला आयकर पुढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत शातिजारीत जमा करणे क्रमप्राप्त आहे. कर्मचा-याकडून वसुलकेलेल्या आयकराचे लेखापरिक्षण केले असता, आयकर 1 ते 2 महिने उशिराने शासन तिजोरीत जमा केलेला आहे. इन्कमटॅक्स ऍक्ट 1961, सेक्शन 192 नियम 30, चॅप्टर XVII A & B नुसार सात दिवसाच्या आत शातिजारीत जमा करणे क्रमप्राप्त आहे. आणि जर उपरोक्त कालावधीमध्ये आयकर जमा केला नाही तर इन्कमटॅक्स ऍक्ट 2010 Amendment interest rate w.e.f. दि.1/7/2010 नुसार 18 टक्के व्याज शासनास भरावा लागेल. आयकर वेळेत न भरल्यामुळे दंडनीय व्याज भरावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.16 दि.26/07/2013 ला दिलेले उत्तर संयुक्तिक वाटत नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 11, Hmm No : 16)

## *6 विभाग प्रमुखांना कार्यालयीन कामासाठी दिलेले अग्रीम समायोजित केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 582131864.00/-

***सोलापूर महानगरपालिकेने 2011-12 या आर्थिक वर्षापर्यंत विभाग प्रमुखांना आयुक्तांच्या मान्यतेने एकूण रू 58,21,31,864/-/- एवढे अग्रीम दिलेले आहे. सदर अग्रीमाचे समायोजन लेखापरिक्षण तारखेपर्यंत केलेले नाही. मुंबई वित्तीय नियम 1959 नियम क्र.142 नुसार प्रथम घेतलेल्या अग्रीमाचे समायोजन केल्याशिवाय दुसरे अग्रीम मंजुर करता येत नसतानाही अगोदरच्या अग्रीमाचे समायोजन बाकी असताना नियमबाहयरित्या पुन्हा अग्रीम दिलेले आहे.***

सोलापूर महानगरपालिकेमधील कार्यरत विविध खात्यांचे विभाग प्रमुख यांना आयुक्तांच्या मान्यतेने देण्यात आलेल्या अग्रीमाचे लेखापरिक्षण केले असता, खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)सोलापूर महानगरपालिकेतील विभाग प्रमुखांना कार्यालयीन कामाकाजासाठी पालिकेकडून आयुक्तांच्या मान्यतेने वेळोवेळी अग्रीम देण्यात आले आहे . 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये एकूण तारखेपर्यंत केलेले नाही . मुंबई वित्तीय नियम 1959 नियम क्र .142 नुसार प्रथम घेतलेल्या अग्रीमाचे समायोजन केल्याशिवाय दुसरे अग्रीम मंजुर करू नये अशी तजवीज आहे . परंतु सदर नियमाचे उ ल्लंघन करण्यात आलेले आहे .सोलापूर महानगरपालिकेच्या अग्रीम नोंद वहीचे लेखापरिक्षण केले असता, 2003-04 पासून विभाग प्रमुख यांनी घेतलेल्या अग्रीमाचे समायोजन आजपर्यंत केलेले नाही . 2003-04 ते 2011-12 पर्यंत समायोजन करावयाची शिल्लक रक्कम रू.582131864/- एवढी आहे. सदरची बाब वित्तीय नियमाचे उल्लंघन करणारी आहे . सोबत परिशिष्ट क्रं() जोडणेत आलेले आहे. 2011-12 मध्ये मंजूर केलेले अग्रीम रू .10,86,63,483/- समायोजन न केल्यामुळे आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. सदर अग्रीमाचे समायोजन त्वरीत करावे. व यापुढे पहिल्या अग्रीमाचे समायोजन केल्याशिवाय दुसरे अग्रीम मंजूर न करणेची दक्षता घेण्यात यावी.

अर्धसमास ज्ञापनास उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 12, Hmm No : 17)

## *7 ठेकेदार यांचे देयकातून कपात केलेला आयकर (टी.डी.एस) शासनास भरणा केला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***ठेकेदारांच्या देयकातून 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये एकूण 34,60,583/- एवढा आयकर( टी.डी.एस.) कपात***

***केलेचे आयकर कपात नोंदवहीमध्ये नमुद आहे. सदर कपात केलेला आयकर पुढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत शातिजारीत जमा करणे आवश्यक असता त्या जमा न करता अन्यत्र वापरण्यात आल्या आहेत.व उशीरा जमा केल्या आहेत.***

सोलापूर महानगरपालिकेने ठेकेदार यांचे देयकातून कपात केलेल्या आयकर रक्कमांचे (टी.डी.एस.) लेखापरिक्षण केले असता, खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सोलापूर महानगरपालिकेने ठेकेदारांच्या देयकातून 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र.()नुसार एकूण 34,60,583/- एवढा आयकर(टी.डी.एस.) कपात केला आहे. सदर कपात केलेला आयकर पुढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत शासन तिजोरीत जमा करणे क्रमप्राप्त आहे. ठेकेदारांकडून वसुल केलेल्या आयकराचे लेखापरिक्षण केले असता, आयकर 1 ते 9 महिने उशिराने शासन तिजोरीत जमा केलेला आहे. इन्कमटॅक्स ॲक्ट 1961, सेक्शन 192 नियम 30, चॅप्टर XVII A & B नुसार सात दिवसाच्या आत शातिजारीत जमा करणे क्रमप्राप्त आहे. आणि जर उपरोक्त कालावधीमध्ये आयकर जमा केला नाही तर इन्कमटॅक्स ॲक्ट 2010, Amendment interest rate w.e.f. दि.1/7/2010 नुसार 18 टक्के व्याज शासन खाती भरावे लागेल.

अर्धसमास ज्ञापन क्र.19 दि.26/07/2013 ला दिलेले उत्तर संयुक्तिक वाटत नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 14, Hmm No : 19)

## *8 निवृत्ती वेतन अंशदान निधी न ठेवल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नि.वे.नि. महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.136 नुसार अंशदान निधी ठेवलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिका कर्मचारी अंशदान निधीचे लेखापरिक्षण केले असता, खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.136(1) नुसार महानगरपालिका कर्मचा-याना देय असणा-या निवृत्ती वेतनासाठी, पदाच्या सरासरी खर्चाच्या एकनवमांश एवढे अंशदान निवृत्ती वेतन

निधी मध्ये जमा करणे क्रमप्राप्त आहे. तसेच निवृत्ती वेतन अंशदान निधीचे कॅशबूक व बँक पासबूक लेखापरिक्षणास देण्यात आलेले नाही. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.136 नुसार अंशदान निधी स्थापन केलेला नाही व स्वतंत्र बँक खातेही ठेवलेले नाही. सदर बाब गंभीर असून, त्वरीत निवृत्ती वेतन अंशदान निधी स्थापन करून प्रत्येक महिन्याला निवृत्ती अंशदान रक्कम बँकेमध्ये जमा करण्यात यावी. सध्या सोलापूर महानगरपालिका निवृत्ती वेतन धारकांना देय असलेले निवृत्ती वेतन महापालिकेच्या सर्वसाधारण जमा खात्यामधून प्रत्येक महिन्याला आदा करीत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.21 दि.30/07/2013 ला अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 16, Hmm No : 21)

## *9 निलंबित कर्मचा-याच्या निलंबनाच्या चौकशीतील दिरंगाईबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महनगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शासन निर्णय सा.प्र.वि. क्र.सीडीआर-1307/प्र.क्र./3/07/11-अ दि.18/10/2007 अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला झालेल्या प्रकरणी शासकीय सेवकास निलंबनाधिन ठेवले असले तरी एक वर्षाच्या कालावधीत आढावा घेण्यात यावा. तसेच ज्या प्रकरणात शासना व्यतिरिक्त अन्य शिस्तभंग विषयक प्राधिकारी/ नियुक्ती प्राधिकारी असतील त्याबाबतीत संबंधीत शिस्तभंग विषयक प्राधिकारी/ नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधीत प्रशासकीय विभागाच्या सहमतीने वरील बाबी विचारात घेऊन निलंबनाबाबत निर्णय घ्यावेत असे स्पष्ट नमूद असताना प्रस्तुत प्रकरणी अ.क्र.1 ते 3 येथील कर्मचा- यांच्या बाबतीत अशी कार्यवाही झालेली नाही व अ.क्र. 4 ते 12 येथील कर्मचा- यांच्या बाबत प्रशासकीय विभागाची सहमती न घेता आयुक्तांच्या निर्णयान्वये संबंधीत कर्मचा- याना हजर करून घेण्यात आले आहे.***

आस्थापना शाखेतील प्राप्त झालेल्या निलंबित कर्मचा-याच्या माहितीनुसार खालील नमूद करण्यात आलेल्या निलंबित कर्मचा-याची खातेनिहाय चौकशी करणेकरिता चौकशी अधिका-याची नियुक्ती करणेत आलेली असून, त्यांनी वेळीच चौकशी पूर्ण करणे अपेक्षित असताना एक वर्षापेक्षा अधिकचा कालावधी झालेला असताना अद्याप चौकशी पूर्ण झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आलेले नाही.

| अ. नं. | निलंबित सेवकाचे नांव व पदनाम | निलंबन तारीख | चौकशी अधिकारी | कामावर घेतल्यचा |
|---|---|---|---|---|

| | | | | दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री.ए.एच.भाट - व. भूमापक | 8/5/09 | श्री.व्ही.बी.राठोड | - |
| 2. | श्री.ए.डब्ल्यु भाट- स.संघटक | 18/3/10 | श्री.ए.ए.पठाण | 28/9/11 |
| 3. | श्री.एम.ए.नराल - क.श्रे.लि. | 12/5/10 | सौ.टी.एन.कुलकर्णी | 28/12/10 |
| 4. | श्री.जे.एम.बनसोडे - वश्रेलि | 21/12/10 | श्री.एस.के.व्हटकर | 29/1/11 |
| 5. | श्री.व्ही.एस.लोखंडे - अवेक्षक | 13/5/11 | श्री.भादुले डी.आर. | 14/7/11 |
| 6. | श्री.एम.एम.धेंडे - क.श्रे.लि. | 19/7/11 | श्री.एस.ए.माने | 21/9/11 |
| 7. | श्री.ए.एस.गिरगैल - कश्रेलि | 19/7/11 | श्री.एस.ए.माने | 21/9/11 |
| 8. | श्री.व्ही.बी.राठोड - उ.अभि. | 12/8/11 | श्री.बी.एस.अहिरे | 26/8/11 |
| 9. | श्री.एम.जी.कंपली-वा.नि. | 21/1/12 | श्री.सी.के.पाणीभाते | 20/7/12 |
| 10. | डॉ.एस.सी.बासुतकर-वै.अ. | 21/1/12 | डॉ.एस.वाय.गायकवाड | 28/5/12 |
| 11. | श्री.एम.बी.गायकवाड- अवेक्षक | 23/1/12 | श्री.भादुले डी.आर. | 6/2/12 |
| 12. | श्री.सी.एल.दोंतूल - क.श्रे.लि. | 21/7/12 | सौ.मेलगेपाटील | 20/11/12 |

अ.नं.1 ते 12 कर्मचा-यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखालील खटला दाखल झालेल्या प्रकरणी निलंबित करण्यात आले होते. पैकी 1 ते 3 येथील कर्मचारी अद्याप निलंबित असुन त्यास 50% निर्वाह भत्ता देण्यात येत आहे. तसेच अ.क्र. 4 ते 12 मधील कर्मचा-याना कामावर घेतलेले आहे. परंतु शासन निर्णय सा.प्र.वि. क्र.सीडीआर-1307/प्र.क्र./3/07/11-अ दि.18/10/2007 अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला दाखल झालेल्या प्रकरणी शासकीय सेवकास निलंबनाधिन ठेवले असले तरी एक वर्षाच्या कालावधीत आढावा घेण्यात यावा असे नमुद आहे तथापि अ.क्र. 1 ते 3 येथील कर्मचा-यांबाबत आढावा घेण्यात आलेला नाही. तसेच ज्या प्रकरणात शासनाव्यतिरिक्त अन्य शिस्तभंग विषयक प्राधिकारी / नियुक्त प्राधिकारी असतील त्याबाबतीत संबंधीत शिस्तभंग विषयक प्राधिकारी / नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधीत प्रशासकीय विभागाच्या सहमतीने वरील बाबी विचारात घेऊन निलंबनाबाबत निर्णय घ्यावेत असे स्पष्ट नमूद असताना अ.क्र. 4 ते 12 येथील कर्मचा-यांच्या बाबत प्रशासकीय विभागाची सहमती न घेता आयुक्तांच्या निर्णयान्वये संबंधीत कर्मचा-याना नियमबाह्यरित्या हजर करून घेण्यात आले आहे. सा.प्र.वि. शा.नि.क्र.निप्रआ-2008/प्र.क्र.3/08/11अ दि.14/3/2008 अन्वये गट "क" व "ड" संवर्गातील सेवकांच्या निलंबन प्रकरणाचा आढावा व पुन:स्थापनेबाबतचे अधिकार त्या त्या महसुली

विभागातील विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आले असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही न करता निलंबित कर्मचा-यांना पदस्थापना देणेत आलेली आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.41दि.21/08/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 24, Hmm No : 41)

## ***10 उपर्जित द्विनोंद पध्द्तीने लेखे व ताळेबंद ठेवणे. (Acrual based double entry system)***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि. 6/7/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) प्रकरण क्र.2 ते 5 मधील तरतुदीनुसार उपर्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवण्यात आलेले नाहीत.***

शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि. 6/7/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील ( National Municipal Accounts Manual) प्रकरण क्र.2 ते 5 मधील तरतुदीनुसार सन 2005-06 या आर्थिक वर्षापासुन महनगरपालिकांनी उपर्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे क्रमप्राप्त आहे.

1) आर्थिक वर्ष 2005-06 पासुन या पध्दतीने लेखे ठेवणे अपेक्षित होते तथापि अद्याप तसे लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. असे निदर्शनास येते.
2) उपर्जित द्विनोंद पध्द्तीने लेखे व ताळेबंद अद्याप ठेवण्यात आलेले नाहीत तसेच असे लेखे ठेवणेबाबतची सद्यस्थिती लेखापरीक्षणास अवगत झाली नाही.

   अर्धसमास ज्ञापन क्रमांक 57, दिनांक 28.8.2013 चे उत्तर दिले नाही.

DATSCDM5901 (Ref No : 102, Hmm No : 57)

## *11 अंदाजपत्रक : अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानुसार जमेच्या अवास्तव रकमा वाढविण्यात आल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महनगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानंतर त्यानुसार जमेच्या रकमा अवास्तव वाढविण्यात आलेल्या आहेत. खालील विवरणपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अंदाजपत्रकीय जमा अंदाजाच्या 56.25% महसुल प्रत्यक्ष जमा झाला आहे व खर्च अंदाजाच्या 39.35% खर्च वर्ष अखेरीस करण्यात आला आहे. सुधारित अर्थसंकल्पात महसुली जमेचे अंदाज वर्तविताना 1. महानगरपालिका कर व दर, 2.अनुदाने व अंशदाने, 3. एकत्रित पाणीपुरवठा व मलनि:सारण इ. जमा बाबींवर सरासरीपेक्षा 50 ते 95% वाढ दर्शविण्यात आली आहे व त्यानुसार खर्चाच्या बाबींवरही अतिरिक्त वाढ दर्शविण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1949 नियम 26(8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढ-उतार होत असतील तर अशा चढ-उतारांच्या कारणांसह संक्षिप्त स्पष्टीकरण अर्थसंकल्पात देणे आवश्यक असताना ते देण्यात आलेले नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम1949चे कलम 95 नुसार 2011-12 या आर्थिक वर्षा चे अंदाजपत्रक आयुक्त यांनी दि. 28/02/2011रोजी स्थायी समितीकडे सादर केले असुन, स्थायी समितीने ठराव क्र.1509 दि. 21/3/2011ने फेरबदल करुन सादर केलेल्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा विषय क्र.470 ठराव क्र. 380 दि.31/3/2011ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम1949चे कलम 100 नुसार मान्यता दिली आहे. सुधारित अर्थसंकल्पात महसुली जमेचे अंदाज वर्तविताना 1. महानगरपालिका कर व दर 2.अनुदाने व अंशदाने 3. एकत्रित पाणीपुरवठा व मलनि:सारण इ. जमा बाबींवर मागील वर्षाच्या जमेच्या सरासरीपेक्षा 50 ते 95 टक्के वाढ दर्शविण्यात आली आहे व त्यानुसार खर्चाच्या बाबींवरही अतिरिक्त वाढ दर्शविण्यात आली आहे.

आयुक्त यांनी 2011-12 या अर्थिक वर्षासाठी रु.396.51 कोटी (महसुली जमा व खर्च रु.273.58 कोटी आणि भांडवली जमा व खर्च रु.122.90 कोटी) चे अंदाजपत्रक तयार केले आहे.

**रक्कम रु. कोटीत**

| लेखा शिर्ष | जमा | | लेखा शिर्ष | खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| | अंदाज | प्रत्यक्ष | | अंदाज | प्रत्यक्ष |
| नगरपालिका दर व कर | 139.48 | 111.85 | वेतन व भत्ते | 93.94 | 81.72 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हद्दवाढ व इतर जमा | 13.29 | 37.98 | दुरुस्ती व इतर कामे | 26.40 | 36.30 |
| मालमत्ता व सेवांपासुन उत्पन्न | 130.60 | 7.74 | संकीर्ण | 1.30 | 0.52 |
| | | | भांडवली कामाकरीत वर्ग | 111.34 | 9.24 |
| | | | परिवहनकरीता अर्थसहाय्य | 5.00 | 3.67 |
| अनुदाने व कर्जे | 119.33 | 87.37 | अनुदाने व कर्जे | 184.07 | 15.92 |
| भांडवली जमा | 72.53 | 9.24 | भांडवली खर्च | 25.09 | 28.57 |
| एकुण | 475.19 | 254.18 | | 447.14 | 175.94 |

अर्थसंकल्पात महसुली व भांडवली जमेचा अंदाज एकुण रु. 475.19 कोटी इतका वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु. 254.18 कोटी महसुल जमा झाला आहे. तसेच खर्च बाजुस रु. 447.14 कोटी महसुली व भांडवली खर्चाचा अंदाज वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात महसुली व भांडवली खर्च रु. 175.94 कोटी करण्यात आला आहे.

अंदाजपत्रकाच्या तपासणी अंती असे दिसते की, अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानुसार जमेच्या अवास्तव रकमा वाढविण्यात आल्या आहेत. वरील विवरणपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वर्षअखेरीस प्रत्यक्ष महसुल जमा हा अंदाजपत्रकीय जमा अंदाजाच्या 56.25% व प्रत्यक्ष खर्च हा अंदाजाच्या 39.35% करण्यात आला आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 च्या नियम 26(3) व 26(4) नुसार अर्थसंकल्प तयार करताना मागील तीन वर्षाच्या जमा व खर्चाच्या प्रत्यक्ष रकमा, दर व करात करण्यात आलेली वाढ, महानगरपालिकेच्या मालमत्तेत झालेली वाढ वा घट, पालिका हद्दीत जमीन व इमारतीत झालेली वाढ वा घट या अनुषंगाने जमेशी निगडीत खर्चाचे अंदाज वर्तविणे अपेक्षित आहे.

महानगरपालिकेचा मागील तीन वर्षाचा महसुली प्रत्यक्ष जमा व खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2008-09 | 144.45 कोटी | 144.45 कोटी |
| 2 | 2009-10 | 162.53 कोटी | 162.53 कोटी |
| 3 | 2010-11 | 200.38 कोटी | 200.38 कोटी |
| | एकुण | 507.36 कोटी | 507.36 कोटी |
| | सरासरी | 169.12 कोटी | 169.12 कोटी |

नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 26(3) नुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर आधारलेले असले पाहिजेत,तसेच नियम26(4) नुसार एकुण खर्चाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी अथवा अर्थसंकल्पीय वर्षाची अंदाजीत जमा या दोहोपैकी जी कमी असेल त्यापेक्षा अधिक असू नयेत परंतू महानगरपालिकेच्या 2008-09 ते 2010-11 या तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा व खर्चाची सरासरी रु. 169.12 कोटी असताना 2011-12 या अर्थिक वर्षासाठी आयुक्त यांनी रु.396.51

कोटी (महसुली जमा व खर्च रु.273.58 कोटी तसेच भांडवली जमा व खर्च रु.122.91 कोटी)चे अंदाजपत्रक तयार केले आहे. सर्वसाधारण सभेने त्यामध्ये वाढ करुन ते रु.475.19 कोटी केले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 26(3)नुसार करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी यापैकी जी कमी असेल तेवढे असणे आवश्यक आहेत.मागील तीन वर्षाचे करापासून मिळणारे उत्पन्न 2008-09 चे रु.109.97 कोटी, 2009-10 चे रू.122.84 कोटी व 2010-11 चे रू.152.77 कोटी असुन त्याची एकूण सरासरी रु.128.52 कोटी येते.परंतु आयुक्त यांनी 2011-12 करीता रु.184.56 कोटी अंदाज सुचविला आहे. तो वरील नियमाशी पूर्णपणे विसंगत आहे. आयुक्त यांनी 2011-12 चे अंदाजपत्रक रु. 396.51 कोटीचे केले आहे. म्हणजेच मागील तीन वर्षाच्या सरासरीच्या सुमारे दुपटीपेक्षा अधिकचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1949 नियम 26(8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढ-उतार होत असतील तर येथे अशा चढ-उतारांच्या कारणांसह संक्षिप्त स्पष्टीकरण देणे आवश्यक असताना ते देण्यात आलेले नाही.

नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 26 (2) प्रमाणे अंदाजपत्रकीय वर्षारंभापूर्वी जी विदयमान देणी फेडता येणे अशक्य असतील अशांची खत्री करुन घेवुन त्यांची तरतुद त्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये आवश्यक असता अंदाजपत्रकातील पान न.80 वरील अ(5)नुसार मागील भांडवली कामासाठी कमी पडणारी रक्कम या सदरी अर्थसंकल्पीय तरतुद केलेली नसलेने मागील एकूण किती रक्कमेची कामे प्रगतीपथावर आहेत व त्यासाठी किती रक्कमेची आवश्यकता आहे व ती कामे 2011-12 मध्ये कोणत्या अर्थसंकल्पीय शिर्षावर खर्च टाकणार आहे ते समजुन येत नाही.

महसूली निधीकडून भांडवलीकडे वर्ग(अ) या लेखाशिर्षाखाली आयुक्त यांनी रु.25 कोटी 86 लाखाचा अंदाज सुचविला आहे.स्थायी समितीने त्यामध्ये वाढ करुन तो रू.111 कोटी 33 लाख केला आहे.व सर्वसाधारण सभेने तो रू. 94.03 कोटी असा बदल केला आहे. 2011-12 मध्ये आयुक्तांनी सुचविलेल्या अंदाजामध्ये स्थायी समितीने 443% व मनपाने वाढ 374% वाढ केली आहे. तसेच महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 102 नुसार मागील दोन वर्षाची शिल्लक कामे रु.120.74 कोटी यामधील काही कामांची देयके 11-12 वर्षीच्या अर्थसंकल्पामधुन खर्ची टाकणेत आली आहेत. अधिनियम 1949 चे कलम 102 नुसार संपूर्ण अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याचा कोणताही भाग,ज्या वर्षासाठी ते अनुदान अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करणेत आले असेल त्या वर्षाचे अखेरीस खर्च न होता तसेच राहिले असेल व ते पुढील दोन वर्षापैकी कोणत्याही वर्षाचे अर्थसंकल्पात नमुद केलेल्या यथास्थिती नगरपालिका निधीच्या प्रारंभिक शिलकेत हिशेबात घेतले नसेल तर यथास्थिती स्थायी समिती किंवा परिवहन समितीस असे अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याची खर्च न झालेली रक्कम पुढील दोन वर्षाचे मुदतीत कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी किंवा उदिष्टासाठी नव्हे तर ज्यासाठी ते अर्थसंकल्पीय अनुदान मंजुर करणेत आले होते ते प्रयोजन किंवा उदिष्ट हे,मुळ उददेशाप्रमाणे किंवा मंजुरीप्रमाणे साध्य करणेसाठी खर्च करणेस मंजुरी देता येइल.या कलमानुसार मागील दोन वर्षाची शिल्लक

कामे रु.120.74 कोटी इतक्या रक्कमेची असल्याचे पान क्र. 82 वर नमुद आहे.परंतु त्या कामासाठी लागणारी आवश्यक रक्कम त्या त्या वर्षीचे अर्थसंकल्पात शिल्लक नसताना व त्या रक्कमेची तरतुद सन 11-12 चे अर्थसंकल्पात केली नसतानाही मागील कांही कामांची रक्कम सन 11-12 च्या अर्थसंकल्पामधुन खर्च करणेत आली आहे.त्यामुळे चालू आर्थिक वर्षातील विकासकामावर परिणाम झालेचे स्पष्ट होते.तसेच सदर रक्कमेची तरतुद जमा बाजूस करुन त्याप्रमाणे जमेचा अंदाज वाढविणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही. 20 13-14 च्या अर्थसंकल्पातील सन 2011-12 चे नक्की आकडे तपासले असता महसुलीतून भांडवली कामावर प्रत्यक्षात रु.28काटी56लाख इतकी रक्कम खर्च पडलेली आहे.त्यामुळे अर्थसंकल्प करताना वास्तववादी दृष्टीकोन बाळगला जात नसलेचे स्पष्ट होते.

आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये एकुण महसुली रक्कम रु. 157.57 कोटीपैकी रु. 81.72 कोटी इतकी रक्कम कर्मचा-यांच्या वेतन व भत्यांपोटी खर्च करण्यात आले आहेत.तसेच निवृत्तीवेतन व कुटूंब निवृत्तीवेतनावर रु.191744739/-, (3) क (1) प्राथ.शिक्षण वर 96437301/- खर्च करण्यात आले आहेत. म्हणजेच एकुण महसुलाच्या 70.14% इतकी रक्कम या बाबीवर खर्ची पडली आहे.

अधिनियम 1949 चे कलम 96 (ग) प्रकरण 12 नाल्या व जलनिःसारण व प्रकरण 13 पाणीपुरवठा यामध्ये समाविष्ठ असलेल्या बाबींचे संदर्भात या अधिनियमान्वये मनपा ज्यासाठी जबाबदार असेल त्या सर्व रक्कमा व मुददल व व्याज यांचे सर्व हप्ते,ते जसे जसे देय होतील तस तसे प्रदान करणेसाठी तरतुद केली पाहिजे. मनपाने पाणीपुरवठयासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून घेतलेल्या कर्जाची थकबाकी 09-10 अखेर एकूण रु.18.59 कोटी आहे. 11-12 च्या अर्थसंकल्पात रु. 8 कोटीची तरतुद अर्थसंकल्पात परतफेडीसाठी केली आहे.(पान न.104,15-यशवंत जलाशय खर्च -ज)मध्ये केली आहे. कर्जफेडीसाठी पुरेशी तरतुद केली नाही तसेच कर्ज फेडणेत आलेले नाही.त्यामुळे मनपास भविष्यामध्ये वित्तिय संस्थाकडून कर्ज मिळणेस अडचण निर्माण होणेची शक्यता नाकारता येत नाही.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 कलम 106 (3) अन्वये प्रत्येक आर्थिक वर्ष सुरु झालेनंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिका लेखा परीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील आर्थिक वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीसमोर सादर करुन वार्षिक लेखे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे तथापि महानगरपालिकेने 2011-12 आर्थिक वर्षाचा वार्षिक लेखा तयार करुन स्थायी समितीस सादर केलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष आर्थिक स्थितीवर भाष्य करता येत नाही.

लेखाविभागाने दिलेल्या माहितीनुसार 11-12 मध्ये रुपये 30379169/- ची देयके प्रलंबित असलेचे दिसुन येते. अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे प्रत्यक्ष निधीची तरतुद असलेशिवाय खर्च करणेत येवू नये असे सर्वसाधारण वित्तीय तत्व असताना देखील प्रत्यक्ष निधीची तरतुद नसताना कार्यादेश देऊन कामे करणेत आली असलेने इतक्या मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित राहिलेचे स्पष्ट होते. बजेट तरतुद आहे परंतु प्रत्यक्ष निधी उपलब्ध असलेबाबत लेखाविभागाने अभिप्राय न दिलेने प्रलंबित देयकांचे प्रमाण वाढलेने मनपाचे दायीत्वामध्ये वाढ झालेचे दिसुन येते. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण चार-अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे यामधील कलम 60 अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे (1) (3) (पाच) नुसार प्रत्येक तिमाही

नंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखा परिक्षीत ताळेबंद , जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (CASH FLOW) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती संबंधितांना समजु शकली नाही.

DATSCDM5901 (Ref No : 103, Hmm No : 60)

## *12 रस्ते विकास शासन अनुदानामधून करणेत आलेल्या आर्थिक तरतुदीमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शासन निर्णय क्र.जीईएन-2008/प्र.क्र.08/नवि-16 दि.29/08/2008 अन्वये अटी शर्ती 1 प्रमाणे 50 टक्के रक्कम महानगरपालिका हिश्श्यामधून खर्च करणे आवश्यक आहे परंतू 2011-12 मध्ये स्वनिधीमधून तरतुद न करता देयके शासन निधी मधुन अदा केली आहेत.***

सोलापूर महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनाकडुन रस्ते विकासा करिता खालील शासन निर्णय प्रमाणे अनुदान मंजुर करण्यात आलेले आहे.

संकिर्ण-1006/प्र.क्र.163/नवि-24 दि.28/01/2008 र. रु.5.00 कोटी.

क्र.जीईएन-2007/प्र.क्र.120/नवि-16 दि.15/01/2008 र. रु.0.87 कोटी.

क्र.जीईएन-2008/प्र.क्र.80/नवि-16 दि.20/09/2008 र. रु.0.88 कोटी.

क्र.जीईएन-2008/प्र.क्र.16/नवि-16 दि.06/10/2008 र. रु.1.25 कोटी.

एकूण र. रु.8.00 कोटी.

प्रशासकिय मान्यताः-क्र. निशा/कार्या-03/महानगरपालिका/विनि/2009/71.दि.12/05/2009

सर्वसाधारण सभा विषय क्र.293 ठराव क्र.69 दि.22/6/2009 ने मान्यता.

स्थायी समिती ठराव क्र.508 दि.02/07/2009 ने मान्यता.

खालील आक्षेप घेत आहे.

3) शा.नि.क्र.जीईएन-2008/प्र.क्र.08/नवि-16 दि.29/08/2008 अन्वये अटी शर्ती 1 प्रमाणे 50 % रक्कम महानगरपालिका हिश्श्यामधून खर्च करणे आवश्यक आहे. 2008-09 चे अंदाजपत्रकामध्ये पान नं.6 अ.नं.14 भांडवली काम, हद्दवाढ कॉमन रस्ते करणे, रस्ते बांधकाम करणे या सदरी रु.5.00 कोटीची

तरतुद आहे. तरी सदर तरतुद 2010-11 करिता उपलब्ध असलेबाबत फेर बजेट अभिप्राय बांधकाम विभागाकडून लेखा विभागाकडे जा.क्र.110 दि.16/04/2010 ने मागविणेत आला. त्यावर लेखा विभागाने 2009-10 चे नुतनीकरणाने तरतुद उपलब्ध झालेली असल्याने खर्च करणेत यावा. असा अभिप्राय दिला आहे. परंतु स्थायी समिती व सर्वसाधारण सभेचा ठराव सोबत नाही. तसेच 2009-10 व 2011-12 मध्ये बजेट मध्ये सदर कामासाठी तरतुद नसताना कोणत्या आधारे अभिप्राय देण्यात आला याचा खुलासा करणेत आलेला नाही.

4) 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये कोणत्या लेखा शिर्षकामधून खर्च करणेत आला आहे याचा खुलासा करणेत आलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 92, दिनांक 15.10.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 115, Hmm No : 92)

## ***13 तेराव्या वित्त आयोगाचा निधी नियमबाह्यरित्या खर्च केल्याबाबत.***

**तेरावा वित्त आयोग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 88041669.00/-

***महाराष्ट्र शासन क्र.तेबिआ-2011-प्र.क्र.164/नवि-4 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई 09 दि.21/10/2011 नुसार शा. नि.क्र.तेबिआ-2010,प्र.क्र.131/2010/नवि-4 दि.25/10/2010 या निर्णयातील परिच्छेद(II) मधील सहा(VII) ब येथे नमुद केल्याप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या थकित वेतनाचा खर्च भागविण्यासाठी तेराव्या वित्त आयोगातील वितरित केलेल्या रु.10.06 कोटी निधीपैकी 10.00 कोटी खर्च करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. परंतु महानगरपालिकेने त्यानंतर प्राप्त झालेला निधीतुन शासनाची मान्यता न घेता रु.88041669/- खर्च केला आहे.***

शासन निर्णय.क्र.तेविआ-2010,प्र.क्र.131/2010/नवि-4 दि.25/10/2010 मध्ये 13 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता पात्र अनुदानाच्या वितरण व विनियोगा बाबतची कार्यपद्धती निश्चित केली आहे. 2011-12 ह्या आर्थिक वर्षात सोलापुर महानगरपालिकेला 13 व्या वित्त आयोगांतर्गत एकूण रक्कम रु.309110598/- प्राप्त झाले. असून त्यापैकी खालील प्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

सोलापूर महानगरपालिका

आस्थापना खर्च रु.158364612/-

मक्तेदार पाणीपुरवठा रु.19669417/-

पाणी बील रु.5674251/-

वीज बील रु.33694461/-

यु.आय.डी.एस.एस.एम.टी. रु.5000000/-

मक्तेदार ड्रेनेज रु.10007640/-

एकूण खर्च रु232410381/-

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.तेविआ-2011-प्र.क्र.164/नवि-4 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई 09 दि.21/10/2011 नुसार शासन निर्णय.क्र.तेविआ-2010,प्र.क्र.131/2010/नवि-4 दि.25/10/2010 या निर्णयातील परिच्छेद(II) मधील सहा(VII)ब येथे नमुद केल्याप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या थकित वेतनाचा खर्च भागविण्यासाठी तेराव्या वित्त आयोगातील वितरित केलेल्या रु.10.06 कोटी निधीपैकी 10.00 कोटी खर्च करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

परंतु महानगरपालिकेने त्यानंतर शासनाची मान्यता न घेता खालील प्रमाणे खर्च केला आहे.

आस्थापना खर्च रु.58364612/-

मक्तेदार पा.पू. रु.19669417/-

मक्तेदार ड्रेनेज रु.10007640/-

**एकूण रु.88041669/-**

इतका खर्च शासनाच्या मंजुरी शिवाय नियमबाह्यरित्या करण्यात आलेला आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.166 दि.16/12/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 116, Hmm No : 166)

## *14 बांधकाम परवाना शुल्काची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 54476845.00/-

***बांधकाम परवाना विभागाच्या नोंदवहीमध्ये बांधकाम परवाना शुल्क व इतर जमेपोटी रक्कम रु.54476845/- जमा असलेची नोंद आहे. परंतु एकवट चलने, बँक स्टेटमेंटवरुन तपासण्या करीता रोख विभागाकडे वारंवार मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत,***

अर्धसमास क्र.158 दि.09/07/2013 नुसार सोलापुर महानगरपालिका बांधकाम परवाना विभागातील नोंदवहीवरुन निदर्शनास आलेली 2011-12 ची बांधकाम परवाना शुल्क व इतर जमा रक्कम रु.54476845/- ची एकवट चलने, बँक स्टेटमेंटवरुन तपासण्याकरीता रोख विभागाकडे वारंवार मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत, त्यामुळे उपरोक्त रक्कम महानगरपालिका फंडामध्ये जमा झाल्याची लेखापरिक्षणास खात्री करता आलेली नाही. त्यामुळे सदरची रक्कम रु.54476845/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 125, Hmm No : 158)

## *15 महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनावरील अनुदान शासनाकडुन प्राप्त करुन घेतले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3536668.00/-

***महानगरपालिके मार्फत चालविण्यात आलेल्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याचे प्रदान करणेसाठी शासनाकडून अनुदान दिले जाते. परंतू सेवानिवृत्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांचे निवृत्ती वेतनावरील व निवृत्तीच्या अनुषंगाने मिळणा-या लाभाचे प्रदानाची मागणी शासनाकडुन न करता महानगरपालिकाच्या निधीतून रक्कम प्रदान करणेत आली आहे.***

महानगरपालिका मार्फत चालविण्यात येत आसलेल्या एकुण 6 माध्यमिक शाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतन व भत्याचे प्रदान करण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते. परंतू सेवानिवृत्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे निवृत्ती वेतनावरील व निवृत्तीच्या अनुषंगाने मिळणा-या लाभाचे प्रदान हे महानगरपालिकेच्या निधीतून दिले आहे.

महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र. पीईएन 1089/191/ माशि-6, दि.06/11/1989 मधील तरतुदीनुसार निवृत्त झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतनावरील खर्चापोटी महानगरपालिका यांना प्रतिपूर्तीच्या स्वरुपात देण्यात येणारे अनुदान, प्रत्यक्ष खर्चाचा चारमाही,

आठमाही व आकरामाही आढावा घेऊन त्यानुसार खालील अटींच्या अधीन राहून अग्रीम अनुदान मंजुर करण्याची तरतूद आहे.

5) निवृत्तीवेतनावरील खर्चासाठी मंजुर करण्यात आलेली रक्कम संबंधित महानगरपालिका यांनी स्वतंत्र खाते काढून त्यामध्ये जमा करावी.

6) सदरहु खाते महानगरपालिकेच्या आयुक्त यांच्या नावे असावे. परंतू महानगरपालिकेने शासनाकडून अग्रिम अनुदानची मागणी न करता महानगरपालिका निधीमधुन खालीलप्रमाणे रुपये 3536668नियम/- नियमबाह्य खर्ची टाकल्याचे शाळांनी पुरविलेल्या कागदपत्रावरुन दिसुन आले आहे.

| अ.क्र. | प्रशालेचे नाव | निवृत्ती वेतनावरील खर्च रुपये |
|---|---|---|
| 1 | प्रशाला क्र.2, बाळीवेस | रु.322319/- |
| 2 | प्रशाला क्र.3, रविवार पेठ | रु.320096/- |
| 3 | उर्दू कॅम्प, सोलापूर | रु.210900/- |
| 4 | प्रशाला क्र.4, रामवाडी | रु.835610/- |
| 5 | प्रशाला क्र.1, कॅम्प | रु.912867/- |
| 6 | जयभवानी प्रशाला | रु.934816/- |
| एकूण | | रु.3536668/- |

निवृत्तीवेतन व अनुषंगिक लाभाचे प्रदानासाठी केलेल्या खर्चीची प्रतिपूर्ती शासनाकडुन अनुदान तात्काळ प्राप्त करुन घेऊन करण्यात यावी. तोपर्यंत सदर रक्कम रु. 3536668/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.195 दि.30/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATDDZM6901 (Ref No : 154, Hmm No : 195)

## *16 वार्षिक प्रशासन अहवाल व वार्षिक लेखे सादर केले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 94 (1) (2) (3) नुसार आयुक्तांनी प्रशासना संबंधी***

***तपशीलवार अहवाल व वार्षिक लेखे तयार करणे आवश्यक असता 2011-2012 या आर्थिक वर्षाबाबत कार्यवाही केलेली नाही.***

उपरोक्त विषयानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 94 (1) (2) (3) नुसार आयुक्तांनी प्रत्येक एप्रिल महिन्याचे पहिल्या तारखेनंतर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासनाव्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशीलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रक्कमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणा-या विवरणपत्रासहीत तयार करून स्थायी समितीस सादर करणे आवश्यक असता 2011-12 या आर्थिक वर्षाबाबत प्रशासनाने तो केलेला नाही व स्थायी समितीस सादरही केलेला नाही. सदर कृती अधिनियमाशी विसंगत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.4 दि.10/07/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 1, Hmm No : 4)

## *17 निलंबित कर्मचा-याच्या निलंबनाच्या चौकशी करिता चौकशी अधिकारी यांची नियुक्ती न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : साप्रवि महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील 12 नुसार निलंबित कर्मचा- याना दोषारोपपत्र तीन महिन्याचे आत बजावणेचे असून ते कर्मचा- यानी अमान्य केल्यास, चौकशी अधिका- याची नेमणूक करावी अशी नियमात तरतुद असताना तसे केल्याचे आढळून येत नाही.त्यामुळे प्रलंबित चौकशी अभावी निलंबित कर्मचा- याचे निर्वाह भत्त्यावर अनावश्यक खर्च होत आहे.***

आस्थापना शाखेकडून प्राप्त झालेल्या निलंबित कर्मचा-याच्या माहिती नुसार खालील नमुद करण्यात आलेल्या निलंबित कर्मचा-यांच्या बाबतीत अद्याप पर्यंत विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली नाही.

| अ. | निलंबित सेवकांचे नांव व | निलंबनाची | चौकशी | कामावर | आदा करणेत |
|---|---|---|---|---|---|

| नं. | पदनाम | तारीख | अधिकारी नियुक्ती | घेतल्याचे दिनांक | आलेला निर्वाह भत्ता |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.बी.बी.इंगळे -कश्रेलि | 20/3/02 | नाही | नाही | 50% |
| 2. | श्री.श्रीशैल चं. गायकवाड-क.श्रे.लि. | 13/2/09 | नाही | नाही | 50% |
| 3 | श्री.बी.बी.शिंदे - शिपाई | 6/9/11 | नाही | नाही | 50% |
| 4 | श्री.एम.पी.गायकवाड -कश्रेलि | 10/1/10 | नाही | 11/10/10 | - |
| 5 | श्री.ए.वाय.ताटीपामूल क.श्रे.लि. | 7/8/10 | नाही | 13/4/11 | - |
| 6 | श्री.एस.आर.मोटे - शिपाई | 18/10/10 | नाही. | 3/2/11 | - |
| 7 | श्री.एस.टी.हजारे - मजूर | 17/1/11 | नाही | 27/5/11 | - |
| 8 | श्री.डी.एम.पवार क.श्रे.लि. | 16/12/03 | नाही | 1/11/04 | - |
| 9 | श्री.एस.के.दासरी व.श्रे.लि. | 27/1/04 | नाही | 1/11/04 | - |
| 10 | श्री.आर.जी.गांगजी कश्रेलि | 27/1/04 | नाही | 1/11/04 | - |
| 11 | श्री.एम.एम.जंगम कश्रेलि | 2/6/04 | नाही | 1/4/05 | - |
| 12 | सौ.एस.एस.चपळगांवकर -प्रोग्रामर | 30/4/07 | नाही | 11/7/08 | - |
| 13 | श्री.एस.एस.शेख कश्रेलि | 21/7/07 | नाही | 16/4/09 | - |
| 14 | श्री.एस.बी.सदाफुले- आ.नि. | 30/5/08 | नाही | 28/5/09 | - |
| 15 | श्री.आर.आर.ढावरे कश्रेलि | 5/5/12 | नाही | नाही | 50% |
| 16 | श्री.एस.बी.चव्हाण - शिपाई | 18/10/10 | नाही | 3/2/11 | - |

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील 12 नुसार निलंबित कर्मचा-याना दोषारोप पत्र तीन महिन्याचे आत बजावणेचे असून, त्यास कर्मचा-यानी अमान्य केल्यास, चौकशी अधिका-याची नेमणूक करावी अशी नियमात तरतुद असताना तसे केल्याचे आढळून येत नाही.

अ.नं.1 ते 16 कर्मचा-याना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखालील खटला दाखल झालेल्या प्रकरणी निलंबनाधिन ठेवण्यात आलेले आहे. पैकी 1 ते 3 व 15 कर्मचा-याना 50% निर्वाह भत्ता देण्यात येत आहे. तसेच 4 ते 14 व 16 मधील कर्मचा-याना कामावर घेतलेले आहे. परंतु शासन निर्णय सा.प्र.वि. क्र.सीडीआर-1307/प्र.क्र./3/07/11-अ दि.18/10/2007 अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला झालेल्या प्रकरणी शासकीय सेवकास निलंबनाधिन ठेवले असले तरी एक वर्षाच्या कालावधीत आढावा घेण्यात यावा. तसेच ज्या प्रकरणात शासना व्यतिरिक्त अन्य शिस्तभंग विषयक प्राधिकारी / नियुक्त

प्राधिकारी असतील त्याबाबतीत संबंधीत शिस्तभंग विषयक प्राधिकारी / नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधीत प्रशासकीय विभागाच्या सहमतीने वरील बाबी विचारात घेऊन निलंबनाबाबत निर्णय घ्यावेत असे स्पष्ट नमूद आहे.आयुक्तांच्या निर्णयान्वये संबंधीत कर्मचा-याना नियमबाहयरित्या हजर करून घेण्यात आले आहे.

तसेच सा.प्र.वि. शा.नि.क्र.निप्रआ-2008/प्र.क्र.3/08/11अ दि.14/3/2008 अन्वये गट क व ड संवर्गातील सेवकांच्या निलंबन प्रकरणाचा आढावा व पुन:स्थापनेबाबतचे अधिकार त्या त्या महसुली विभागातील विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आले असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक असता, कार्यवाही करणेत आलेली नाही .तसेच नियमबाह्यरित्या निलंबित कर्मचा-याना पदस्थापना दिलेल्या कर्मचारी / अधिका-यावर जबाबदारी निश्चित करून आदा केलेल्या वेतन व भत्त्याची रक्कम वसुल करण्यात यावी.

तसेच संबंधीत कर्मचा-यांच्या बाबतीत दोषारोप पत्र बजावण्यात आलेले नसल्याने त्यांच्या वरील आरोप सिध्द होण्यास विलंब लागत असून, भविष्यात त्यांच्यावरील आरोप सिध्द झाल्यास त्यांना आदा करणेत येत असलेल्या वेतन व भत्त्याच्या रक्कमेचे आर्थिक नुकसान महापालिकेस होईल.

अशा कर्मचा-याच्या बाबतीत विभागीय चौकशी चालु राहिल्यास कोर्टात आवश्यक असलेले दस्तऐवज वेळीच दाखल करणे सुलभ होऊन दावा मजबूत होण्यास मदत होईल. अन्यथा दस्तऐवज वेळीच उपलब्ध न झाल्याने दाव्याचा निकाल विरूध्द लागण्याचा संभव असतो, याची नोंद घेण्यात आल्याचे आढळून येत नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.38 दि.21/08/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 22, Hmm No : 38)

## *18 वर्ग 'अ' व वर्ग 'ब' पदाकरिता बिंदू नामावली तयार करून शासनाची मान्यता न घेताच पदे भरण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महापालिकेत कार्यरत असलेल्या वर्ग 'अ' व वर्ग 'ब' च्या पदाकरिता बिंदू नामावली नोंदवही तयार करण्यात आलेली नाही. अनुशेष शासनाकडून तपासून घेण्यात आलेला नाही.***

महानगरपालिकेतील वर्ग 'क़' व वर्ग 'ड' पदांकरिता ठेवण्यात आलेली बिंदू नामावली नोंदवही सहा.आयुक्त (मागासवर्ग कक्ष), पुणे विभाग, पुणे यांचेकडून तपासून घेण्यात आली असता, त्यांनी दि.9/3/2012 रोजी देण्यात आलेल्या अहवालातील आक्षेपांची पुर्तता केल्याबाबत मागासवर्ग कक्ष यांचा मान्य अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आला नाही.

सामान्य प्रशाविभाग निर्णय क्र.बी.सी.सी.1097/प्र.क्र.2/97/16-ब दि.29-3-1997नूसार सरळसेवा प्रवेशासाठी 100 बिंदू नामावली व पदोन्नतीसाठी 50 बिंदू नामावली तयार करणेत आली आहे.परंतु महापालिकेत कार्यरत असलेल्या वर्ग 'अ' व वर्ग 'ब' च्या पदांकरिता बिंदू नामावली नोंदवही तयार करण्यात आलेली नाही. भरण्यात आलेल्या पदास असलेला अनुशेष शासनाकडून तपासून घेण्यात आलेला नाही. परंतु महापालिकेने लेखापरिक्षणास दिलेल्या कागदपत्रावरून महानगरपालिका कडे वर्ग 'अ' ची एकूण 35 पदे असून त्यापैकी 29 पदे कार्यरत आहेत व 6 पदे रिक्त आहेत. वर्ग 'ब' ची एकूण 190 पदे असून, त्यापैकी 121 पदे कार्यरत आहेत व 69 पदे रिक्त आहेत.बिंदूनामावली शासनाकडून तपासून घेतली नसल्याचे दिसुन आले आहे. त्यामुळे कार्यरत पदे बिंदूनामावली नुसार योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.55 दि.29/08/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 35, Hmm No : 55)

## *19 कर्मचारी आकृतीबंधास शासनाची मान्यता न घेताच नियमबाह्यरित्या कर्मचारी भरती केल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 7114300.00/-

***मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 51 (4) प्रमाणे महानगरपालिकास कोणतेही नवीन पद शासनाची मान्यता घेतले शिवाय निर्माण करता येणार नाही अशी तरतुद असताना महानगरपालिकेने ठराविक अंतराने स्थायी व अस्थायी पदे निर्माण करून शासनाची मान्यता न घेताच भरलेली आहेत. या नियमबाह्यतेमुळे 2011-12 या आर्थिक वर्षात महानगरपालिकाचा आस्थापना,निवृत्ती वेतन व अनुषंगिक भत्त्यांचा खर्च रु.81.72 कोटी म्हणजेच एकूण महसूलाच्या 52% एवढा खर्च झाला आहे.त्यामुळे शासनाच्या 35% पर्यंत आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याच्या अटीचे उल्लंघन झाले आहे.***

## सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकाची 1 मे 1964 ला स्थापना झाल्यानंतर महानगरपालिका ठराव क्र.31 दि.25/8/1964 रोजी कर्मचारी आस्थापना सुचीस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर मुंबई प्रांतिक अधिनियम1949 चे कलम 51 प्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.70 दि.20/2/1981 व महानगरपालिका ठराव क्र.4 दि.2/4/1981 नुसार नवीन कर्मचारी अस्थापना सुची तयार केली आहे. व 113 पदे स्थायी स्वरूपात निर्माण केली आहेत.

मा.आयुक्त कार्यालय आवक क्र.3/13 दि.1/3/1995 चे पत्राचे अवलोकन केले असता महानगरपालिकेने वेगवेगळ्या ठरावान्वये 1981 ते 1994 पर्यंत एकूण 1231 स्थायी पदे व 769 अस्थायी पदे हे अधिनियम 1949 चे कलम 53 (1) व 53 (3) अन्वये स्थायी व महानगरपालिकाच्या मंजुरीने निर्माण करून भरती केल्याचे दिसून येते. तसेच 2001 ते 2008 पर्यंत विविध संवर्गातील 2308 भरती केलेल्या पदांना शासनाची कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागाने लेखापरिक्षणास पुरविलेल्या कागदपत्रात वर्ग अ ची एकूण 35 पदे, वर्ग ब ची 190 पदे, वर्ग क 1675 व वर्ग ड ची 3485 पदे अशी एकूण 5385 पदे महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असल्याचे नमूद केले आहे.

मागासवर्ग कक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी दि.9/3/2012 रोजी अद्ययावत कर्मचारी बिंदू नामावलीची तपासणी करून दिली आहे. त्यामध्ये क व ड संवर्गाची एकूण मंजूर पदे 3666 दर्शविणेत आली आहेत. परंतु सामान्य प्रशासन विभागाने पुरविलेल्या माहितीमध्ये क व ड ची एकूण 5160 पदे कार्यरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे क व ड च्या मंजुर पदापेक्षा 1494 कार्यरत पदे जास्त आहेत.या पदांची बिंदू नामावली तपासणी करून घेणेत आली नसल्याचे स्पष्ट होते.

सामान्य प्रशासन विभागाचे पत्र जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-1/1413 दि.18/02/2011ने नगरसचिव विभागाकडे महानगरपालिका आस्थापनेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 51(2)अन्वये एकूण 881 पदे निर्माण करणेस व सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून 51(4) अन्वये शासनाची मान्यता घेणेसाठी ठराव करणेसाठी प्रस्ताव पाठविणेत आला आहे.परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 51(4) अन्वये महानगरपालिकेस कोणतेही नवीन पद शासनाची मान्यता घेतले शिवाय निर्माण करता येणार नाही अशी तरतुद असताना महानगरपालिकेने नियमबाह्यरित्या ठरावीक अंतराने अस्थायी पदे निर्माण करून शासनाची मान्यता न घेताच भरलेली आहेत. अस्थायी कर्मचाऱ्यांच्या पदाची माहिती परिशिष्ट क्र.(2) मध्ये नमुद आहे.11/12 या वर्षात **वेतन व ग्रेड पे वर रु.7114300/-** झालेला खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. वित्तिय वर्ष 2011/12 मध्ये महानगरपालिकेचा महसुल रु.157.54 कोटी असल्याने सेवकांच्या वेतनावर 35 % च्या मर्यादेत म्हणजे रु.55.14कोटी खर्च होणे आवश्यक होते.तथापि 13-14 चे अंदाजपत्रकात 11-12 मध्ये प्रत्यक्षात रु.81.72 कोटी म्हणजेच एकूण महसूलाच्या 52% एवढा खर्च झाला आहे.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 36, Hmm No : 58)

## *20 सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडुन संकीर्ण या लेखाशिर्षाखालील बार्बीच्या खरेदीतील अनियमिततांबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भांडार खरेदी महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1105884.00/-

***शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-1093/(2635)/उद्योग-6 दि. 16 जुलै 1993 मधील परिच्छेद क्र. 8.3(फ) नुसार राजपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन व वार्षिक दरकरार करुन आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये खरेदी प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही व भांडार साहित्याची खरेदी बाजार भावानुसार स्थानिकरित्या करण्यात आली आहे. वार्षिक खरेदी रु. 50 लक्षांपेक्षाही अधिक होत असल्याने महानगरपालिकेचे सध्या वापरात असलेल्या खरेदी प्रक्रियेमुळे मोठे नुकसान झाले आहे.***

सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडील नोंदवह्या व नस्त्या तसेच रोख शाखेकडील विभागनिहाय दैनंदिन खर्च नोंदवही व लेखाशिर्षनिहाय खर्च नोंदवही तपासली असता खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

7) विभागनिहाय दैनंदिन खर्च नोंदवहीनुसार सन 2011-12 मध्ये संकीर्ण या लेखाशिर्षाखाली एकुण नोंद झालेल्या देयकान्वये रु. 6278907/- खर्च झाल्याचे दिसते. परंतु लेखाशिर्षनिहाय खर्च नोंदवहीनुसार नोंद झालेल्या प्रमाणकांन्वये रु. 5173023/- इतका प्रत्यक्ष खर्च झाल्याचे दिसते. या तफावतीबाबत खुलासा झाला नाही. करीता तफावतीची रक्कम रु.11,05,884/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

8) संकीर्ण या लेखाशिर्षाखाली गणवेष, झेरॉक्स कागद, लेखन सामग्री इ. खरेदी मुख्यालयातील विभाग व विभागीय कार्यालयांच्या मागणीनुसार भांडार शाखेकडुन करण्यात येते. असे करताना गणवेश वगळता इतर बाबींची खरेदी सहाय्यक आयुक्त (सर्वसाधारण) यांना खरेदी करण्याच्या असलेल्या रु.3000/- खर्च अधिकाराच्या मर्यादेत ठेवुन बाजार भावानुसार मागणीचे तुकडे करुन रु. 62,78,907/- इतक्या रकमेची संगणक लेखन सामग्री व इतर लेखन सामग्री खरेदी करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-1093/(2635)/उद्योग-6 दि. 16 जुलै 1993 मधील परिच्छेद क्र. 8.3(फ) नुसार एखाद्या वस्तुची

वार्षिक खरेदी रु. 50000/- पेक्षा अधिक होत असल्यास राजपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन व वार्षिक दरकरार करुन खरेदी प्रक्रिया राबविणे बंधनकारक असताना दरपत्रके मागवुन नियमबाह्य खरेदी करण्यात आली त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा न मिळाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

DATSCDM5901 (Ref No : 104, Hmm No : 61)

## *21 नगर विकास विभागाने मंजुर केलेल्या आकृतीबंधाची अंमलबजावणी केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय संकिर्ण-1005/वर्गीकरण/ प्र.क्र.397/05/नवि24 दि.04/05/2006 ने महाराष्ट्र राज्यातील मनपांचे वर्गीकरण आणि त्या अधारे महानगरपालिका सेवांची तीन विभागात विभागनी करून 38 अधिका-यांच्या पदासाठी आकृतीबंध निश्चित केला आहे.त्याची अंमलबजावणी करणेत आली नाही***

1. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय संकिर्ण-1005/वर्गीकरण/प्र.क्र.397/05/नवि24 दि.04/05/2006ने महाराष्ट्र राज्यातील मनपांचे वर्गीकरण आणि त्या आधारे महानगरपालिका सेवांची तीन विभागात विभागणी करून 38 अधिका-यांच्या पदासाठी आकृतीबंध निश्चित केला आहे.त्याची अंमलबजावणी करणेत आलेली नाही.

2.सोलापूर महानगरपालिका कार्यक्रमपत्रिका- 5 जुलै 2009 विषय क्र.101 वर सदर शासन निर्णय निर्णयासाठी महासभेकडे सादर करणेत आला होता त्यावर काय कार्यवाही करणेत आली याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.82 दि.07/10/2013 ने मागविला असता त्याचे उत्तर दिलेले नाही.

3. आकृतीबंध निश्चित केला नसलेने सध्या महानगरपालिकाकडे दोनच सहा.आयुक्त कार्यरत असलेने प्रशासकीय कामकाजावर तसेच वसुलीचे कामकाजावर प्रभावी नियंत्रण राहत नसलेचे महानगरपालिकेच्या एकुण आर्थिक स्थितीवरुन दिसून येते.

DATSBKM7201 (Ref No : 108, Hmm No : 82)

## *22 नगर अभियंता विभागांतर्गत वाहनांवरील खर्चाचे अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : वाहन महानगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नगर अभियंता विभागातील वाहनांच्या सुट्या भागांच्या खरेदीसाठी शासनाच्या उद्योग,उर्जा व कामगार विभागाच्या दि.16/7/93 च्या आदेशानुसार निविदा प्रक्रिया राबविली नाही. अनेक लॉगबुक मधे केलेल्या नोंदी अपुर्ण असून केलेल्या नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत. 24 वाहनांवरील दुरुस्तीचा खर्च शासनाने घालून दिलेल्या विहित मर्यादेपेक्षा जास्त केल्याचे दिसून येते.***

सोलापुर महानगरपालिकेच्या नगर अभियंता यांच्या अधिनस्त असलेल्या वाहनांवरील 2011-12 या आर्थिक वर्षा मधील खर्चाचे लेखापरिक्षणासाठी मशिनरी विभागातील उपलब्ध अभिलेख्याची पडताळणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

9) नगर अभियंता विभागाच्या मशिनरी विभागामार्फत वाहनांवरील खर्चाबाबत देखरेख ठेवली जाते. 2011-12 या आर्थिक वर्षात सदर विभागाकडे एकूण 24 वाहने कार्यरत आणि 13 वाहने नादुरुस्त अवस्थेत होती. वरील कार्यरत वाहने पालिकेच्या तत्कालिन 6 विभागीय कार्यालयाच्या मागणीनुसार त्यांना पुरविली गेली व वाहनांची लॉग-बुक संबंधित विभागीय कार्यालयाकडेच ठेवली जातात. सदर वाहनांच्या ठिकठिकाणच्या खेपा, त्यांचे मायलेज, त्यांच्यावरील डिझेलचा खर्च यावर संबंधित विभागीय अधिका-यांचे नियंत्रण असणे आवश्यक असल्याने त्यांनी सदरचा अभिलेख वेळच्या वेळी प्रमाणित करुन मशिनरी विभागाकडे सादर केलेला नाही.

10) 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये वरील वाहनांच्या सुट्या भागांच्या खरेदीसाठी एकूण रु.317355/- एवढा खर्च झाल्याचे मशिनरी विभागातील वाहनांच्या खर्चाच्या नोंदवहीवरुन दिसून येते. (परिशिष्ट क्र. 18 सोबत जोडले आहे) परंतु सदर खरेदी ही शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस-1093/2635/उद्योग/6, दि.16 जुलै 1993 अन्वये रु.50 हजाराच्या वरील खरेदी असल्याने निविदा प्रक्रिया राबवून करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणी अशा प्रकारची प्रक्रिया राबविली गेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर खरेदीची रक्कम रु.317355/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

11) मशिनरी विभागाकडे रोड रोलर तसेच पिच रोड रोलर या वाहनांच्या लॉग-बुक मधील नोंदी संबंधित आवेक्षक अथवा संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी रोजच्या रोज प्रमाणित करणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी तसे प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही. सदर लॉग बुक मधील शेवटचे पान देखील सक्षम

प्राधिकारी यांनी प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही.

12) विभागीय कार्यालय क्र.1 कडे वाहन क्र.MH 13R3548 आणि 3550 हे डंपर दिलेले आहेत. त्यांचे माहे मार्च 2012 मधील लॉग-बुकची तपासणी केली असता लॉग-बुक मध्ये कामाच्या सुरुवातीचे मायलेज, काम संपल्यानंतरचे मायलेज, एकूण मायलेज, डिझेलची सुरुवातीची शिल्लक, आवक, एकूण डिझेल खर्च आणि अखेरची शिल्लक या बाबींची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामध्ये फक्त खेपांचा तपशिल लिहिलेला आहे. सदर गाडीमध्ये दि.10/3/12 रोजी रिक्वीझिशन नं.1861 नुसार 50 लि.व दि.21/3/12 रोजी रिक्वीझीशन नं.1863 नुसार 50 लि. डिझेल वाहनात भरलेले आहे, परंतु मायलेज लिहिलेले नसल्याने डिझेलचा वापर किती झाला ते समजून येत नाही. महिन्याच्या शेवटी एकूण मायलेज, वापरलेले डिझेल, प्रती कि.मी. वाहनांचा इंधन वापर यांचा गोषवारा काढलेला नाही. झोन क्र.1 च्या ज्या आवेक्षकाच्या भागात काम झाले आहे, त्याने काम झाल्याच्या नोंदी लॉग-बुकात प्रमाणित केलेल्या नाहीत. परंतु महिन्याच्या शेवटी विभागीय अधिकारी क्र.1 यांनी लॉग-बुक नियमबाहयरित्या प्रमाणित केले आहे. 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये डिझेलवरील खर्च रु.1983246/- एवढा झाल्याचे डिझेल नोंदवही वरुन दिसून येते. परंतु महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 153 प्रमाणे नियंत्रण अधिका-यास पेट्रोल/डिझेलच्या वापरावर होणा-या खर्चाचे परिनिरिक्षण करता यावे म्हणुन नमुना क्र.127 प्रमाणे मोटार वाहन लेखापुस्तक ठेवणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. त्यामुळे डिझेल वरील खर्च रु.19,83,246/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

13) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण 2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008/ नवि-26, दि.18/2/2008 अन्वये मा.उच्च न्यायालयाने दि.27 जून 2007 ला दिलेल्या आदेशान्वये पालिकेकडे असलेली वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या दुरुस्तीच्या खर्चाबाबत पेट्रोलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.25000/- आणि डिझेलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.30000/- पर्यंत खर्च करण्याची मर्यादा आहे. महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 चे नियम 153 प्रमाणे मोटारीची उपसाधने, सुट्या भागांची खरेदी इ. निराळा हिशोब ठेवला पाहिजे व नमुना क्र.116 प्रमाणे अशा बाबी प्रत्येक मोटार वाहनासाठी वेगळ्या लेखांकित करणे आवश्यक असता नमुना क्र.116 प्रमाणे नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत.

14) प्रस्तुत प्रकरणी मशिनरी विभागातील वाहनांचे बिल रजिस्टर तपासले असता, वाहन क्र.MH13 AH-184,MH13-TR-001, रोलर क्र.1443 यावर अनुक्रमे रु.35260/-रु.71095/- आणि रु.35095/- एवढा मर्यादेपेक्षा जास्त खर्च झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचा एकत्रित खर्च रक्कम रु.1,41,450/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

15) विभागातील सर्व वाहनांचा विमा शासनाच्या विमा संचालनालयामार्फत न उतरविता तो युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि.या कंपनीकडून उतरविल्याचे विमा रजिस्टरवरुन दिसून येते. विभागाकडील एकूण कार्यरत 24 वाहनांपैकी 3 रोड रोलर, 2 कोल्ड मिक्चर मशिन, तसेच MH13P0072 सुमो आणि MH13AH183 JCB अशा 7 वाहनांचा विमा न उतरविता केवळ 17 वाहनांच्या विम्याची रक्कम

रु.273366/- भरण्यात आली आहे. त्यामुळे रक्कम रु.2,73,366/- ही आक्षेपाधिन म्हणून ठेवण्यांत येत आहे.

16) मशिनरी विभागातील डिझेलच्या खर्चाची नोंदवही तपासली असता, दि.18/11/2011 रोजी रिक्वीझिशन स्लीप क्र.8583, 8584 आणि 8585 अन्वये 60 लि.डिझेलचा खर्च रु.3057/- आणि दि.14/02/2012 रोजी रिक्वीझिशन स्लीप क्र.73103, 73104 आणि 73105 अन्वये 60 लि. डिझेलचा खर्च रु.3057/- असे एकूण रु.6114/- एवढा खर्च झाला आहे. सदर रिक्वीझिशन स्लीपची मागणी सहा. अभियंता, रस्ते विभाग यांनी केल्यामुळे सदरचा खर्च रस्ते दुरुस्ती लेखाशिर्षामध्ये खर्ची टाकणे आवश्यक होते, परंतु तसे न करता सदरचा खर्च नगर अभियंता( मशिनरी विभाग) यांच्या लेखाशिर्षामध्ये खर्ची टाकण्यात आल्याचे दिसून येते. सदर चुकीच्या लेखा वर्गीकरणाची दुरुस्ती करण्यांत यावी.

17) मशिनरी विभागातील वाहन क्र.MH13-4-6802 हे वाहन पोलिस हेडक्वॉर्टर्स वरुन प्रत्येक विभागीय कार्यालय आणि इतरत्र अनेकदा खेपा करीत असल्याचे सदर वाहनाच्या लॉग-बुकवरुन दिसून येते, परंतु सदर खेपा किती वाजता सुरु झाल्या, त्या कधी संपल्या, त्यांचे सुरुवातीचे मायलेज, काम संपल्यानंतरचे मायलेज, एकूण मायलेज, तसेच डिझेलची सुरुवातीची शिल्लक, आवक, एकूण डिझेल, त्यापैकी रोज किती खर्ची पडले आणि शिल्लक या सर्व बाबी लॉग-बुक मध्ये रोजच्या रोज नोंदविल्याचे दिसून येत नाही.

18) तसेच वाहनांच्या लॉगबुकातील डिझेलच्या वापराबाबतच्या नोंदी तपासण्यासाठी सर्व विभागीय अधिका-यांशी मशिनरी विभागाने वारंवार दुरध्वनीवरुन संपर्क साधून तसेच लेखी मागणी करुनही विभागीय कार्यालय क्र.1, 2 आणि 5 वगळून इतर विभागीय कार्यालयाने त्यांचेकडील लॉगबुके लेखापरिक्षणासाठी सादर केली नाहीत. त्यामुळे विभागीय कार्यालय क्र.3, 4 आणि 6 मधील डिझेलच्या वापराच्या नोंदी तपासता आल्या नाहीत.

19) प्रस्तुत प्रकरणी नगर अभियंता विभागास अर्धसमास ज्ञापन क्र.171 दि.8/1/2014 अन्वये 1. वाहनाच्या लॉगबुक मधिल सर्व नोंदी रोजच्या रोज घेवून त्या सक्षम प्राधिका-याकडून प्रामाणित करुन घेणे बाबत, 2 उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि.16 जुलै 1993 अन्वये रु.50000/- च्या वरील खरेदी करीता प्रक्रिया राबविणे बाबत, 3. नगरविकास विभागाच्या दि,18/2/2008 च्या शासन निर्णयानुसार वाहनाच्या दुरुस्तीचा खर्च रु.25000/- (पेट्रोलवर चालणा-या वाहनांसाठी) आणि रु.30000/- (डिझेलवर चालणा-या वाहनांसाठी) पर्यंत मर्यादित असणे आवश्यक आहे, 4. वाहनांचा विमा शासनाच्या विमा सचालनालयातर्फे न उतरविल्याबाबत, आणि 4. खर्चाची रककम योग्य त्या लेखाशिर्षात खर्ची न टाकल्याबाबत विचारणा करण्यात आली आहे. परंतू त्यांचा अनुपालन अहवाल अप्राप्त आहे.

DATRADM5901 (Ref No : 121, Hmm No : 171)

## *23 कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून मिळणारे वेतन अनुदानाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 12586202.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12586202.00/-

***कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून कर्मचारी वेतनापोटी 100% अनुदान प्राप्त होते. परंतु 2004-05 पासून ते 2012 पर्यंत वेतन अनुदान प्रलंबित आहे.***

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमा अंतर्गत केंद्र व राज्यशासनाचे मार्गदर्शक सूचने नुसार कार्यरत नागरी कुटुंब कल्याण केंद्र, नागरी आरोग्य केंद्रांना सहाय्यक अनुदान राज्य शासनाकडुन वितरीत करणेत येते.सदर योजना 100 % केंद्रशापुरस्कृत योजना असुन केंद्र व राज्यशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सहायक अनुदान स्वरुपात सर्व संबंधित स्वायत्त व स्वयंसेवी संस्थांना अनुदान देणेत येते.सहसंचालक,आरोग्यसेवा,कुटुंबकल्याण,MCH and SB पुणे यांचे No.FW/GIA/City FW/Solapur/G/I/Puna दि.13/08/1979 नुसार वैद्यकिय अधिकारी-1,को-ऑर्डीनेटर,क्लार्क,प्रोजेक्शनिस्ट व शिपाई अशी 5 पदे निर्माण करणेत आली.तसेच महाराष्ट्र शासन , सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्रमांक बीयुडी1284/779/सी.आर.-161/एफडब्लु 2 दि.9 सप्टे.1985 नुसार विविध संवर्गातील 82 अशी एकुण 87 पदे निर्माण करणेत आली आहेत.

अतिरिक्त संचालक, अरोग्य सेवा व कुटुंब कल्याण, पुणे यांचे पत्र जा.क्र.राकुकवि/अनुदान/कक्ष-5/जी-1/सोलापूर महानगरपालिका/ 461-65/पुणे दि.2/1/2006 चे अ.क्र. 7 (फ) नुसार आर्थिक वर्ष संपलेनंतर अनुदानाचे लगेच लेखापरिक्षण करून घेणे गरजेचे आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय,पुणे यांचे जा.क्र.राकुकवि/कक्ष-5ड/सोलापूरमहानगरपालिका/प्रलं.अनु./न.क्र.18/44401-403/2010दि.03/07/2010 चे पत्रान्वये 2004-05 पासून ते 2011 पर्यंतचे वेतन अनुदान महानगरपालिकेने लेखापरीक्षण करुन त्याचा अहवाल सादर न केल्याने प्रलंबित असलेचे कळविले आहे. 11/12 या आर्थिक वर्षामध्ये कुटुंब कल्याण विभागात खालील प्रमाणे कर्मचारी कार्यरत होते.

| अ.क्र. | तपशील | वार्षिक वेतन | एकुण संख्या | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकिय अधिकारी | 415872 | 09 | 3742848 |
| 2 | सांख्यिकी सहाय्यक | 393324 | 01 | 393324 |
| 3 | समन्वयक | 304815 | 01 | 304815 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | पी.एच.एन. | 311373 | 07 | 2179611 |
| 5 | कनिष्ठश्रेणी लिपिक | 144242 | 10 | 1442420 |
| 6 | शिपाई | 70077 | 08 | 560616 |
| 7 | एएनएम | 144242 | 24 | 3461808 |
| 8 | एमपीडब्लु | 250380 | 02 | 500760 |
| | | | एकुण | 12586202 |

11/12 या आर्थिक वर्षात वेतनावर महानगरपालिका निधीमधून एकुण रु.12586202/ खर्च करणेत आलेला असल्याने व शासनाकडुन अनुदानाची मागणी केली नसल्याने महानगरपालिकेने वेतनावर केलेला खर्च गुंतुन पडलेला आहे. 2004/2005 पासून वेतनावर झालेला खर्च परिगणित करुन वेतनाचे सहाय्यक अनुदान प्राप्त करुन घेण्यात यावे.

अर्धसमास ज्ञापन क्र.27 दि.07/08/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 20, Hmm No : 27)

## *24 वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवर करणेत आलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पथांची झाडलोट व कचरा वाहतूक महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3350146.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखसं-1093/2635/ उद्योग/6 दि.16 जुलै 1993 नुसार 50 हजाराचे वरील कामाच्या खरेदीची निविदा मागविणे आवश्यक असता, निविदा प्रक्रिया न राबविता खाजगी व्यावसायिकांकडून वाहनांच्या सुट्या भागांची रु. 33,50,146/- नियमबाह्य खरेदी केली आहे.***

सोलापुर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत " पथांची झाडलोट व कचरा वाहतूक" या लेखाशिर्षांतर्गत सन 2011-12 या कालावधीत झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण केले असता खालील बाबी दिसून आल्या.

आरोग्य विभागाकडे एकूण 48 वाहने असून सन 2011-12 मध्ये त्यांच्या सुट्या भागावर झालेल्या खर्चाच्या

नोंदी स्पेअरपार्ट नोंदवहीवरुन तपासल्या असता सदर विभागाने वाहनांच्या सुट्या भागांची रु.3350146/- ची खरेदी खालीलप्रमाणे खाजगी व्यवसायिकांकडून केली आहे.

| अ.क्र. | खाजगी व्यवसायिकाचे नाव | एकूण खरेदी |
|---|---|---|
| 1 | पाटील ऑटोमोबाईल्स | 17,45,652/- |
| 2 | न्यु कोयना ऑटो इलेक्ट्रिक | 5,64,585/- |
| 3 | श्रीदत्त ऑटो पार्टस् | 4,41,389/- |
| 4 | नॅशनल सेल्स कार्पोरेशन | 1,36,087/- |
| 5 | अथर्व ऑटो स्पेअर्स अँड इंजि.वर्क्स | 1,31,274/- |
| 6 | कार्तिक एंटरप्रायजेस | 1,08,872/- |
| 7 | स्वस्तिक ऑटोमोबाईल्स | 89,737/- |
| 8 | शिवंम बेअरींग वर्क्स | 47,009/- |
| 9 | सूदर्शन टायर्स | 41,224/- |
| 10 | पायोनियर्स डिझेल्स | 28,225/- |
| 11 | देवी फायर्स | 10,112/- |
| 12 | न्यु विलास टायर्स | 5,980/- |
| एकूण खरेदी | | 33,50,146/- |

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र.भाखंस-1093/2635/उद्योग 6,दि.16 जुलै 1993 अन्वये रु.50000/- चे वरिल कामाच्या खरेदीची निविदा मागवुन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि.2 जाने.1992 मधील परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभर आवश्यतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी संख्याकरारापेक्षा दर करार करणे आवश्यक असता बाजारभावाने नियमबाह्यपणे खरेदी करणेत आली आहे.

सबब सदर खरेदीची रक्कम रु.33,50,146/- ही आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.33,50,146/-

DATRADM5901 (Ref No : 111, Hmm No : 154)

## *25 आरोग्य विभागाकडील वाहन दुरुस्तीवर करणेत आलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : आरोग्य महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 11146108.00/-

***आरोग्य विभागाच्या वाहनांवर नगरविकास विभागाच्या दि.18/2/2008 च्या शासन निर्णयान्वये वाहनांच्या दुरुस्तीवरील खर्च करण्याची मर्यादा आरोग्य विभागाच्या वाहनांनी ओलांडलेली आहे. सुट्या भागांच्या खरेदीवर तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला असून शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.16 जुलै 93 च्या निर्णयानुसार रु.50000 पेक्षा जास्त खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविली नाही. तसेच सार्व.बांध.विभागाच्या नियम क्र.415 नुसार दरवर्षी 15% घसारा निधीचे तरतुद करणे आवश्यक असताना ती केलेली नाही.***

सोलापुर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने 2011-12 या कालावधीतील त्यांच्या अधिकारात असलेल्या वाहनांचे हिस्ट्री रजिस्टर लेखापरिक्षणास सादर केले असता त्यानुसार सदर विभागाकडे एकूण 54 वाहने कार्यरत असल्याचे दिसून येते. सदर 54 वाहनांपैकी 3 वाहने मलेरिया विभागाकडे आणि 3 वाहने कुटुंब कल्याण विभागाकडे वर्ग केल्याने उर्वरित 48 वाहनांवर झालेल्या खर्चाची तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

20) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या महानगरपालिकांच्या वाहन देखभाल दुरुस्तीवरील खर्चाच्या नियंत्रणाबाबतचा शासन निर्णय क्र. संकिर्ण 2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008/नवि.26.दि.18 फेब्रुवारी 2008 अन्वये वाहने सुरक्षित ठेवणे आणि त्यांच्या दुरुस्तीसाठी पेट्रोलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.25000/- आणि डिझेलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.30000/- खर्च करण्याची मर्यादा आहे. सदर दुरुस्ती करण्यापुर्वी स्पर्धात्मक 3 दरपत्रके मागवुन यामधून सर्वात कमी खर्चाची दरपत्रके स्विकारुन सदर वाहन दुरुस्ती करावी. यामध्ये टायर, ट्युब, बॅटरी इ.बदली करण्यासाठी येणा-या खर्चाचा देखिल अंतर्भाव राहील. तसेच सदरचा खर्च वाजवी असल्याबाबत महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी अभियंत्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती महानगरपालिकेच्या कार्यशाळेतून करण्यात येते, परंतू जर मोठ्या मशिनरीचे दुरुस्तीचे काम निघाल्यास कार्यशाळेत दुरुस्तीच्या साधनांच्या अनुपलब्धतेमुळे खाजगी व्यावसायिकांकडून करण्यात येत असल्याचे हिस्ट्रीबुक वरुन दिसून येते.प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त वाहनांच्या हिस्ट्री रजिस्टर वरुन असे दिसून येते कि,महानगरपालिकेतील आरोग्य विभागाची सर्व वाहने डिझेलवर चालणारी आहेत. त्यांच्या सन 2011-12 मधील देखभाल आणि दुरुस्तीसाठी झालेला खर्च पाहता विभागाने शासनाने घालून दिलेली रु.30000/-ची वार्षिक मर्यादा (वाहन क्र.एमएच-13/आर-3593 आणि एमएच-13/जी-1648 वगळून) ओलांडल्याचे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. 17 वरुन दिसून येते.

21) महानगरपालिकेने आरोग्य विभागाकडील वाहनांच्या सुट्या भागांच्या खरेदीचा आणि दुरुस्तीच्या खर्चासाठी रक्कम रु.30 लाख एवढी रक्कम 2011-12 या आर्थिक वर्षाच्या लेखाशिर्षामध्ये तरतूद केलेली असताना सदर विभागाने रु.4862122/- एवढी रक्कम खर्च केल्याचे हिस्ट्री रजिस्टर वरुन

दिसून येते. प्रस्तूत प्रकरणी सदर खरेदी हि शासनाच्या उद्योग,उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र.भाखंस-1093/2635/उद्योग-6,दि.16 जुलै 1993 अन्वये रु.50000/- च्या वरील खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबवून करणे आवश्यक होते, परंतू निविदा प्रक्रिया राबविली गेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे निविदा प्रक्रिया न राबविल्यामुळे खाजगी व्यावसायींकडून केलेली खरेदी रु.48,62,122/- ही आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

22) वाहन क्र.MH.3/G/648 या वाहनाचा (ऑटो रिक्क्षा) सन 2011-12 मध्ये दुरुस्तीवर रु.2736/- एवढा खर्च करण्यात आला असून सदर वाहन हिस्ट्री रजिस्टर वर वापरात नसल्याने निरुपयोगी ठरविण्यात आल्याचे दिसून येते. उपरोक्त 18फेब्रु.2008 चे शासन निर्णया मधील अनु.क्र.2 अन्वये, एखादे वाहन निरुपयोगी ठरवावयाचे असेल तर शासकिय परिवहन सेवा किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून "वाहन दुरुस्ती करुन यापुढे उपयोगात आणणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर राहणार नाही." असे प्रमाणपत्र मिळाल्यावरच ते वाहन निरुपयोगी ठरविण्यात यावे असे नमूद केलेले असतानाही याप्रकारची कुठलीही कार्यवाही सदर वाहनाच्या बाबतीत न करता ते नियमबाह्यरित्या निरुपयोगी ठरविण्यात आले आहे. त्यामुळे सदर वाहनाच्या दुरुस्तीवर झालेला खर्च रु.2736/- हा आक्षेपाधिन म्हणून ठेवण्यांत येत आहे.

23) प्रत्येक वाहनाच्या मुळ खरेदी रकमेवर सार्व.बांधकाम विभागाची नियमपुस्तिकातील नियम क्र.415 नुसार दरवर्षी 15 % निधी " घसारा निधी" म्हणून अर्धसंकल्पात तरतूद करणे आवश्यक आहे, याबाबत आरोग्य विभागातील उपलब्ध डेड स्टॉक रजिस्टर मधील नोंदी नुसार 1) वाहन क्र.एम.एच.13-आर-3356, 3357, 3358 या माहे फेब्रु/2008 मध्ये खरेदी केलेल्या 3 वाहनांच्या मुळ किमतीवर 15% प्रमाणे गत 4 वर्षाची घसारा रक्कम रु.714600/- आणि 2) वाहन क्र.एम.एच.13 आर-3374, 3375, 3394, 3395, 3363 आणि 3364 या माहे मार्च/2005 मध्ये खरेदी केलेल्या 6 वाहनांच्या मूळ खरेदीवरील मागील 4 वर्षाची घसारा रक्कम रु.5025000/- अशा एकूण 9 वाहनांची एकत्रित रक्कम रु.6281250/- एवढी रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करणे आवश्यक होती. अशाच प्रकारे सर्व वाहनांच्या मूळ खरेदीच्या 15% घसारा रकमेची तरतूद अर्थसंकल्पात करणे आवश्यक होते. परंतु अशा प्रकारची तरतूद 2011-12 मध्ये केलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणी आरोग्य विभागास अर्धसमास ज्ञापन क्र.170 दि.8/1/2014 अन्वये 1. वाहनांच्या दुरुस्तीच्या खर्चाची मर्यादा ओलांडल्याबाबत, 2. निविदा प्रक्रिया विना वाहनांच्या सुटया भागांची खरेदी खाजगी व्यावसायींकडून केल्या बाबत, 3. शासकिय विभागांचे प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय वाहन निरुपयोगी ठरविल्याबाबत,तसेच 4. वाहनांच्या घसारा रकमेची अर्थसंकल्पात तरतूद न केल्याबाबत विचारणा करण्यात आली आहे. परंतू त्यांचा अनुपालन अहवाल अप्राप्त आहे.

आक्षेपाधिन रककम **रु.1,11,46,108/-**

DATRADM5901 (Ref No : 120, Hmm No : 170)

## *26 पाणीपुरवठा विभागाकडील वाहनांच्या लॉगबुकमधील त्रुटी व टँकर खरेदीच्या नस्ती तपासणीस उपलब्ध न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : वाहन महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1115292.00/-

***नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 153 प्रमाणे नियंत्रण अधिका-यास इंधन वापरावर होणा-या खर्चाचे परिनिरिक्षण करता यावे म्हणून नमुना क्र.127 प्रमाणे मोटार वाहन लेखापुस्तक ठेवणे आवश्यक असता त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही न केल्याचे दिसून येते.***

सोलापूर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील वाहन क्र.एम.एच.13-पी.167 ( सुमो) या वाहनाचे 2011-12 मधील लॉगबुकची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळून आल्या.

24) 2011-12 मध्ये विभागाकडे एकूण 6 वाहने कार्यरत होती. त्यांचे क्र.पुढीलप्रमाणे 1) सुमो-एम.एच. 13पी.167, 2) सुमो एम.एच.13पी.0061, 3) सुमो-एम.एच.13पी.0361, 4) बोलेरो जीप क्र.एम.एच.13आर.0238, 5)टेंपो क्र.एम.एच.13 आर.3575 आणि 6) टेंपो क्र.एम.एच.13जी.0361. या वाहनांपैकी सुमो क्र.एम.एच.13पी.0361 हे वाहन दि.1/6/211 ते 20/7/2011 या कालावधीपर्यंत या विभागात कार्यरत होते, त्यानंतर ते नगर सचिव विभागास हस्तांतरित करण्यात आले. याबाबतच्या आदेशाची प्रत लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाही तसेच अर्थसंकल्पात दर्शविलेल्या रु.1115292/- च्या टँकर खरेदीच्या नस्त्या लेखापरिक्षणास सादर करण्यात आल्या नाहीत. करीता रु.1115292/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

25) वाहन क्र.एम.एच 13-167 ( सुमो) हे वाहन 27/07/2011 पासून पाणी पुरवठा विभागास जकात विभागाकडून हस्तांतरित करण्यात आले. याबाबतचे आदेश दाखविण्यात आलेले नाहीत. सदर वाहनाच्या लॉगबुकमध्ये नगरसचिव विभागास दि.21/7/2011 रोजी हस्तांतरित करण्यात आलेल्या वाहनाच्या देखील नोंदी आढळून आल्या.

26) सदर लॉगबुकमध्ये वाहन चालकाच्या स्वाक्षरी व्यतिरिक्त वाहन वापरणा-या सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत. वाहनासाठी रोज किती डिझेलचा वापर झाला, वाहनाने किती कि.मी. चा प्रवास केला याच्या नोंदी दिसून येत नाहीत. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 153 प्रमाणे नियंत्रण अधिका-यास इंधन वापरावर होणा-या खर्चाचे परिनिरिक्षण करता यावे म्हणून नमुना क्र.127 प्रमाणे मोटार वाहन लेखापुस्तक ठेवणे आवश्यक असता ते ठेवले नसल्याने इंधनावर झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र. 178 दि. 15/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 129, Hmm No : 178)

## *27 एस्कॉर्ट विभागाची पावती पुस्तके लेखापरिक्षणास उपलबद्ध केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पथ कर महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***एस्कॉर्ट विभागाची पावती पुस्तके लेखापरिक्षणास उपलब्ध करणेत आलेली नाहीत.***

सोलापूर शहर हद्दीत बाहेर गावाहून आलेला माल शहरात उपभोग विक्री अथवा खप यासाठी आयात न होता महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मार्गाने व देखरेखीखाली ठराविक वेळेच्या आत शहर हद्दीतून बाहेर जात असलेल्या वाहनावर मार्गस्थ फी वसुल करुन वाहन मार्गस्थ करणेस परवानगी दिली जाते. सदरची मार्गस्थ फी स्थायी समिती ठराव क्र.138 दि.23/4/2010 अन्वये एस्कॉर्ट फी रु.148/- व फॉर्म फी रु.12/-आकारण्यात येत आहे. अशाप्रकारे सोलापूर शहरहद्दीत एकूण 14 जकात नाक्यावर मार्गस्थ फी आकारण्यात येते.

2011-12 या आर्थिक वर्षात वसुल करण्यात आलेल्या एस्कॉर्ट फी ची तपासणी करणे करिता माहे मार्च 2012 हा निवड महिना असून ह्या महिन्यात नाका निहाय पावती पुस्तके व जमा किर्द तपासणी करता उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.80 दि.7/10/13 अन्वये कळविण्यात आले होते.

दि.26/11/13 रोजी प्रत्यक्ष तपासणी करिता संबंधित विभागात जाऊन माहे मार्च 2012 चे दस्तऐवज तपासणीस उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधितास सांगण्यात आले, वारंवार विचारणा केली असता दोन दिवसात दप्तर उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगण्यात येत होते. परंतु कोणत्याही नाक्याची पावती पुस्तके तपासणीस उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. विजापुर , हैद्राबाद, तुळजापुर व अक्कलकोट ह्या नाक्यांच्या किर्दी तपासणीस उपलब्ध करुन देण्यात आल्या. पावतीपुस्तकांची मागणी केली असता टाळाटाळ करण्यात येत असून प्रत्येक वेळेस वेगवेगळे कारण देण्यात आले. सेवकवर्ग अपुरा आहे, सध्या रेकॉर्ड नवीन ठिकाणी हलविण्यात आले आहे, रेकॉर्ड उपलब्ध झाल्यावर तपासणीस उपलब्ध करुन देऊ, अशा प्रकारची कारणे एक महिन्याच्या कालावधीनंतरही देण्यात येत होती.

संबंधित नाक्यावर जमा झालेली एस्कॉर्ट वसुली वेळीच किर्दीत नोंदविणे, किर्दीत नोंदविलेली जमा रक्कम महानगरपालिकेच्या लेखाविभागात विहित मर्यादेत जमा करणे व अशी जमा करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेच्या बॅक खात्यात जमा होणे आवश्यक आहे. अशी जमा करण्यात आलेली रक्कम बॅकस्क्रोल

बरोबर तपासून योग्य अयोग्य असल्याची शहानिशा करण्याकरिता पावती पुस्तके तपासणे आवश्यक असताना ती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याने एस्कॉर्ट विभागाचे 2011-12 ह्या कालावधीचे लेखापरिक्षण करता आलेले नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.80 दि.07/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 112, Hmm No : 80)

## *28 धर्मवीर संभाजी तलावामधील मस्त्य विक्रीच्या ठेक्यातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : संभाजी तलाव महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 51050.00/-

***संभाजी तलावामधील मस्त्य विक्रीचा ठेका मंजुरीनंतर कामाची वर्क ऑर्डर दि.10/8/2009 रोजी निर्गमित केल्यावर त्यातील अटीनुसार 8 दिवसांच्या आत रु.100/-च्या महसुली मुद्रांकावर करारपत्र करणे आवश्यक असताना 5 वर्षासाठीचे करारपत्र तब्बल 1 वर्षाने म्हणजे दि.5/8/2010 रोजी केले आहे. तसेच मक्त्याची पहिल्या वर्षाची रक्कम रु. 70000/- पंधरा दिवसांच्या आत भरणे आवश्यक असताना दि.26/10/2009 रोजी भरले. म्हणजे ती एकूण 76 दिवस उशिराने भरली आहे. स्थायी समिती ठराव क्र.114, दि.29/6/13 अन्वये सदर मक्तेदाराची मुदत सन 2014 मध्ये संपुष्टात येत असताना देखील त्यास पुढील 11 वर्षासाठी विनानिविदा प्रक्रिया मुदतवाढ दिलेली आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या नियंत्रणाखालील धर्मवीर संभाजी तलावामधील मस्त्यविक्रीचा ठेका निविदा प्रक्रिये मार्फत देण्यात आला आहे. त्याबाबतची नस्ती तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

धर्मवीर संभाजी तलावामधील मस्त्यविक्रीसाठी सन 2009 ते सन 2014 पर्यंत 5 वर्षासाठी ठेका देण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्र दै.संचार मध्ये दि.11/07/2009 रोजी जाहिरात देण्यात आली. सदर जाहिरातीस 1) इच्छा भगवंताची कंन्स्ट्रक्शन आणि 2) दत्त समर्थ कंन्स्ट्रक्शन अशा दोन ठेकेदारांनी प्रतिसाद दिला. त्यातील 'इच्छा भगवंताची कंन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने सन 2009-10 करिता रु.70000/- सन 2010-11 करिता रु.72000/- सन 2011-12 करिता रु.74000/- सन 2012-13 करिता रु.76000/- आणि सन 2013-14 करिता रु.78000/- महानगरपालिकेस जादा दराने देण्याचे मान्य केल्याने त्याची निविदा स्थायी समिती ठराव क्र.714

दि.31/7/2009 अन्वये मान्य करुन त्यानंतर वर्क ऑर्डर क्र.उप्र/3ब/524 दि.10/8/2009 रोजी करुन दि.5/8/2010 रोजी करारपत्र तयार करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

27) टेंडर अटी शर्तीनुसार 5 टक्के सुरक्षित ठेव रक्कम आकारणे आवश्यक होते. सदर ठेव रक्कम आकारण्याबाबतची पावती नस्ती मध्ये आढळली नाही, त्यामुळे सुरक्षित ठेव रक्कम वसूल झाली किंवा नाही हे नस्तीमधील उपलब्ध कागदपत्रावरुन समजून येत नाही.

28) वर्क ऑर्डर दि.10/8/2009 रोजी निर्गमित केल्यावर त्यातील अटीनुसार 8 दिवसांच्या आत रु.100/-च्या महसुली मुद्रांकावर करारपत्र करणे आवश्यक असताना 5 वर्षासाठीचे करारपत्र तब्बल 1 वर्षाने म्हणजे दि.5/8/2010 रोजी केले. तसेच मक्त्याची पहिल्या वर्षाची रक्कम रु. 70000/- 15 दिवसांच्या आत भरणे आवश्यक असताना ती चलन क्र.0019487 दि.26/10/2009 (रोख शाखेतील पावती क्र.140034) रोजी भरले. म्हणजे ती एकूण 76 दिवसांनी उशिरा भरली. त्यामुळे करारपत्रातील अट क्र.14 अन्वये त्यावर 18 %प्रमाणे व्याज आकारणे आवश्यक असताना मक्तेदाराकडून कुठल्याही प्रकारचे व्याज आकारले नसलेने रु.1050/-वसुल करणेत यावेत.

29) करारपत्राच्या प्रत्येक पानावर मक्तेदाराला आणि सहा.आयुक्त (म) यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

30) करारपत्रातील अट क्र.10 अन्वये तलावातील पाण्याची पातळी कमी/जास्त झाल्याने, तसेच नैसर्गिक आपत्ती व अतिवृष्टीमुळे मासळीचे किंवा मासेमारी साधनांचे नुकसान झाल्यास त्याबद्दल महानगरपालिकेस जबाबदार धरता येणार नाही किंवा कुठलीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही. तसेच **अट क्र.12 अन्वये देखील नुकसान भरपाई देय नसताना देखील संबंधित मक्तेदारास स्थायी समिती ठराव क्र.1086 दि.18/12/10 अन्वये रु.50000/- नुकसान भरपाई दिली आहे.** सदर बाब करारपत्रातील अटींचा भंग करणारी असल्याने रु.50000/- मक्तेदाराकडून वसुल करणेत यावेत.

31) करारपत्रातील अट क्र.5 अन्वये मक्तेदाराने कोणत्याही अटीचा भंग केल्यास वर्षाकाठी भरलेली ठेका रक्कम आणि सुरक्षित ठेव रक्कम म.न.पा.कडे जमा केल्याबाबतची कुठलीही नोंद अथवा कागदपत्रे नस्तीमध्ये आढळली नाहीत.

32) अट क्र.18 अन्वये मक्तेदाराने मासेमारीच्या वेळा पाळण्याबाबतची कुठलीही नोंदवही उपलब्ध अभिलेखामध्ये आढळून आली नाही.

33) मक्तेदाराकडून अनेक अटी व शर्तीचा भंग झालेला असतानाही त्याचा करार रद्द करणे अथवा त्यांचे नाव काळ्या यादीत टाकण्याऐवजी स्थायी समिती ठराव क्र.114,दि.29/6/13 अन्वये सदर मक्तेदाराची मुदत सन 2014 मध्ये संपुष्टात येत असताना देखील त्यास पुढील 11 वर्षासाठी विनानिविदा मुदतवाढ दिलेली आहे.

34) मक्तेदार इच्छा भगवंताची कंन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिकेशी केलेल्या करारातील अनेक अटींचा भंग केलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-05/06/प्र.क्र.53/इमा-2,दि.2/9/2006 अन्वये ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्याच्या कार्यपध्दती

बाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार, ठेकेदाराने निविदा करारातील अटी व शर्तींचे पालन न केल्यास तसेच कामाचा गुणात्मक दर्जा न राखल्यास कामामध्ये गैरप्रकार केल्यास ठेकेदाराला प्रथम ताकिद देणे, पदावनत करणे, नोंद रद्द करणे, दंड लावणे, काळ्या यादीत टाकणे आणि अंतिमतः त्याचे विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे नोंदणी प्राधिका-याला अधिकार देण्यात आलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणी अशा प्रकारची कार्यवाही झाल्याचे नस्तीमधील कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 114, दिनांक 12.11.2013 चे उत्तर दिलेले नाही.

वसुलपात्र रक्कम रु. 51050/-

DATRADM5901 (Ref No : 48, Hmm No : 114)

## *29 जन्म-मृत्यू विभागाचे जमा रक्कमांचे लेखापरीक्षणाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : इतर जमा महानगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 21 कलम 364 (1)(2) व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.117(1) नमुना 86 नुसार प्रतिलीपी शुल्काची नोंद वही ठेवण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका जन्म-मृत्यू विभागाचे लेखापरिक्षण केले असता, खालील त्रुटी निदर्शनास आली आहेत.

35) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम1949 प्रकरण 21 कलम 364 (1)(2) व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.117(1) नमुना 86 नुसार प्रतिलीपी शुल्काची नोंद वही ठेवण्यात आलेली नाही.

36) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.12 नमुना क्र.2 नुसार सर्वसाधारण पावती ठेवण्यात आलेली नाही.

   a. सोलापूर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.110 दि.3/7/2003 व कार्यालयीन आदेश क्र.विकाअ/हद्दवाढ/अभिले/ 376 दि.7/7/2003 नुसार जन्म दाखला व मृत्यू दाखला साठी पहिल्या प्रतीला 30 रूपये व दुसऱ्या व पुढील प्रतीला 20 रूपये असा दर ठरविणेत आलेला आहे. जन्ममृत्यू दाखला पावत्यांचे लेखापरिक्षण केले असता, पहिल्या प्रतीला 30 रूपये व दुसऱ्या व पुढील प्रतीला 30 रूपये आकारणी करणेत आलेली आहे. म्हणजे

नागरीकांकडून दुसऱ्या व पुढील प्रतीसाठी 10 रूपये जादा नियमबाह्य आकारण्यात आली आहे.

b. राज्य आयोग माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग, पुणे यांचे पत्र क्र. आमाजीआ / कक्ष-83 / कायदा / 10244 - 10331 दि.29/12/2012 नुसार जन्म मृत्यू नोंद वही तपासली असता, निंबंधक अथवा उपनिंबंधक यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

37) राज्य आयोग माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग, पुणे यांचे पत्र क्र. आमाजीआ / कक्ष-83 / कायदा / 10244 - 10331 दि.29/12/2012 अ.नं.4 नुसार नागरीकांना घटना घडल्यापासून 21 दिवसाचे आत नोंदणी झाल्यास कायद्यानुसार प्रमाणपत्राची प्रथम प्रत नागरीकांना मोफत देण्याचे सुचीत केलेले असताना सोलापूर महानगरपालिका प्रथम प्रतीसाठी रू.30/- आकारणी करीत आहे.

38) सोलापूर महानगरपालिकेतील जन्म-मृत्यू विभागातील नस्तीचे लेखापरिक्षण केले असता, राज्य आयोग माहिती कार्यालय यांनी त्यांचे पत्रातील अ.नं.17 नुसार बाळाच्या नावाची नोंदी संदर्भात प्राप्त झालेले अर्ज कायदेशीर भागासोबत जतन करणेत यावे, असे सुचीत करणेत आलेले असताना सोलापूर महानगरपालिका जन्म-मृत्यू विभागाने सदरचे अर्ज नागरीकांना प्रमाणपत्र दिल्यानंतर जतन करुन ठेवलेले नाहीत.

5. जन्म-मृत्यू अधिनियम 1969 मधील कलम 14 नुसार नागरीक महानगरपालिकेकडे जन्मांची नोंद करणेसाठी अर्ज सादर करतात. सदर अर्ज तपासले असता, अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी नाही. तसेच नांव नोंदणी पोहोच पावतीवर लिपीक आरोग्य विभाग स्वाक्षरी करू सदर पोहोच नागरीकांना देत नाही. नागरीकांचे अर्जावर स्वाक्षरी नसताना सदर अर्ज ग्राह्य धरून त्यांना प्रमाणपत्र दिले जाते. तसेच लिपीक आरोग्य विभाग हे नागरीकांना नांव नोंदणी पोहोच पावतीवर स्वाक्षरी करून पोहोच देत नाहीत .

6. राज्य आरोग्य माहिती व जीवन विषयक आकडेवारी, पुणे यांच्या पत्रातील अ.नं.1 ते 21 नुसार यापुढे जन्म-मृत्यू नोंदीबाबतची कारवाई करणेत यावी.

7. खालील नमूद केलेल्या पावत्या लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

| पावती क्रमांक | दिनांक |
|---|---|
| 63901 ते 64000 | दि.6/3/2012 |
| 65101 ते 65300 | दि.14/3/2012. |
| 66101 ते 66200 | दि.17/3/2012 |
| 68301 ते 68400 | दि.27/3/2012 |
| 68601 ते 68700 | दि.28/3/2012 |
| 69701 ते 70200 | दि.30/3/2012. |

अर्धसमास ज्ञापन क्र.70 दि.18/09/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 78, Hmm No : 70)

# कलम ९ ब खालील आक्षेप

## ***30 सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन प्रकरणामधील अनियमितते बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नि.वे.नि. महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 217140.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 72229.00/-

***शासन निर्णय सुजयो/2001/690 /प्र.क्र.28/नवि/33 दि.10/5/2002 नुसार समुह संघटक हे पद मानधन तत्वावर रू.3000/- प्रमाणे भरणे क्रमप्राप्त होते. वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही न करता महापालिकेचा एक लिपीक समुह संघटक म्हणून सुवर्ण जयंती रोजगार योजनेकडे वर्ग करणेत आलेला आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.***

सोलापूर महानगरपालिकेमधील 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये सेवानिवृत्त झालेल्या 138 पैकी 47 कर्मचा-यांची सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे तपासणेत आली त्यापैकी खालील प्रकरणामध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1. श्री.यल्लप्पा मुथेल्ली स्वाके - सफाई कामगार हे दि.31/3/11 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. ते राहत असलेले महानगरपालिकेचे निवासस्थान कार्यालयीन आदेश क्र.एसजीसी/11/स्टोअर दि.26/4/2011 नुसार त्यांची पत्नी सौ.गौरम्मा स्वाके यांचे नांवे दि.1/4/2011 पासून करण्यात आलेले आहे. त्यांची पत्नी सौ.गौरम्मा यल्लप्पा स्वाके हे दि.5/5/2000 पासून सोलापूर महानगरपालिकेमध्ये सफाई कामगार म्हणून कार्यरत आहे. शासन निर्णयानुसार पती-पत्नी एकाच शासकीय निवासस्थानामध्ये राहत असतील तर दोघांना ही घरभाडे भत्ता देय नाही. सौ.गौरम्मा यल्लप्पा स्वाके यांचे वेतन देयक तपासले असता, त्यांना घरभाडे भत्ता नियुक्तीच्या तारखेपासून देण्यात आलेला आहे. सदर घरभाडे भत्ता रू.72,229/- सौ.गौरम्मा यल्लप्पा स्वाके यांचेकडून वसुल करून अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

2. श्री.उत्तम अंबादास गायकवाड - क.श्रे.लि. यांचे सेवानिवृत्ती प्रकरण तपासले असता, श्री.गायकवाड यांना कार्यालयीन आदेश क्र.1/आस्था2/858 दि.15/11/1996 नुसार समुह संघटक म्हणून नेमणूक केलेली आहे. नेमणूकीतील अटी शर्ती क्र.2 नुसार गायकवाड यांना मूळ वेतनाच्या 15% किंवा रू.500/- एवढे विशेष वेतन देण्यात आलेले आहे. श्री.गायकवाड यांचे दि.1/1/1996 चे मूळवेतन रू.3500/- एवढे असताना त्यांना रू.500/- प्रति महिना विशेष वेतन देण्यात आलेले आहे. सदर विशेष वेतन कोणत्या नियमानुसार देण्यात आले तो नियम लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात यावा. तो पर्यंत

दि.1/1/1996 ते 31/5/2005 या कालावधीमधील श्री.गायकवाड यांना दिलेले विशेष वेतन रू.67500/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय सुजयो/2001/690 /प्र.क्र.28/नवि/33 दि.10/5/2002 नुसार समुह संघटक हे पद मानधन तत्वावर रू.3000/- प्रमाणे भरणे क्रमप्राप्त होते. वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही न करता महापालिकेचा एक लिपीक समुह संघटक म्हणून वर्ग करणेत आलेला आहे. सदर बाब नियमबाह्य आहे. तसेच सदर कर्मचा-याच्या वेतनावर झालेला खर्च नियुक्ती आदेशातील अट क्र.5 नुसार लेखाशिर्षक 2217, नगर विकास 80 सर्वसाधारण 182 स्थानिक संस्था या योजनेतून भागविणेत आला आहे किंवा नाही याचा तपशील लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आला नाही.

3. श्रीमती विमल अर्जून जाधव - आया, ह्या नियत वयोमानानुसार दि.31/1/2012 रोजी निवृत्त झालेल्या आहेत. त्यांची नियुक्तीची तारीख दि.18/7/1990 सेवापुस्तकाप्रमाणे आहे. त्यांचा एकूण अर्हतकारी सेवा कालावधी हा 21 वर्ष 6 महिने 13 दिवस होत आहे. त्यांना उपदान देतेवेळी अर्हतकारी सेवा 20 वर्ष 6 महिने धरण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना तीन सहामाही महिन्याचे उपदान कमी आदा करणेत आलेले आहे.

| | |
|---|---|
| देय उपदान | रू.9380 x 43 / 4 = 100835/- |
| दिलेले उपदान | रू.9380 x 41 / 4 = 96145/- |
| फरक | रू.4690/- |

सदरचे रू.4690/- उपदान श्रीमती विमल अर्जून जाधव यांना आदा करणेत यावे.

4. श्रीमती विमल अर्जून जाधव यांची जन्म तारीख दि.20/1/1952 असून, त्यांची नेमणूक सोलापूर महानगरपालिकेमध्ये दि.18/7/1990 रोजी करण्यात आलेली आहे. नेमणूकीच्या वेळी त्यांचे वय 38 वर्षे 5 महिने 28 दिवस होते. सदर नेमणूकीच्या वेळी वयाची अट शिथील करणेबाबत शानिर्णयाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नसलेने श्रीमती विमल अर्जून जाधव यांची नेमणूक नियमानुसार झाली नसलेचे स्पष्ट होते.

5. श्रीमती चनमा कि.पेदोल सेवानिवृत्त दि.28/2/2011, श्रीमती सुकमा ह करसूकर सेवानिवृत्त दि.31/8/2011, श्री.हरी बचुवार सेवानिवृत्त दि.30/4/2011, श्रीमती किष्टम्मा संगेपागूल सेवानिवृत्त दि.31/12/2011 सदर चार ही कर्मचारी सोलापूर महानगरपालिकेचे सेवेतून निवृत्त झालेले आहेत. सदर कर्मचारी हे सोलापूर महानगरपालिकेच्या निवासस्थानामध्ये राहत होते. सदर कर्मचा-याना ज्या निवासस्थानात राहत होते. तेच निवासस्थान पुनश्चः भाडे तत्वावर देण्यात आलेले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 4 कलम 60 अन्वये सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना महापालिकेतील निवासस्थान रिकामे करणे क्रमप्राप्त आहे. परंतु तसे न करता वरील चार ही कर्मचारी आजपर्यंत महापालिकेच्या निवासस्थानामध्ये राहत आहेत. सदरची बाब नियमाबाह्य आहे. तसेच आरोग्य अधिकारी यांचे आज्ञापत्र क्र.एस.जी.सी./11 दि.27/4/2011 मधील शर्ती व अटी क्र.11 नुसार कार्यवाही केल्याचे लेखापरिक्षणास तपशील सादर केला नाही.

6. महापालिकेतील कर्मचा-यांना महापालिकेमार्फत निवासस्थान पुरविण्यात येते. परंतु कर्मचा-याना निवासस्थान कधी दिले याची नोंद वही ठेवलेली नाही.

7. श्रीमती विमल अर्जून जाधव यांचा रजा लेखा तपासला असता, महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 नियम क्र.25 नुसार ठेवलेला नाही. सदर सेवकाचे रजा लेखा हा स्वतंत्र रजिष्टरमध्ये ठेवण्यात आलेला आहे. सदर रजिष्टर तपासले असता दि.31/12/2008 रोजी 259 दिवस अर्जित रजा शिल्लक दर्शविणेत आलेली आहे. परंतु 1996 ते 2007 पर्यंत रजेचा लेखा लेखापरिक्षणास तपासणी करिता उपलब्ध झालेला नाही. दि.21/12/2008 पासून रजा लेखा अद्ययावत आहे. परंतु सदर लेख्यामध्ये दुरूस्ती जास्त प्रमाणात केलेली लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आलेली आहे. 1996 ते 2007 पर्यंतचा रजा लेखा अद्ययावत नसताना अंतर्गत लेखापरिक्षक यांनी सदर कर्मचा-याच्या खाती 300 दिवस अर्जित रजा शिल्लक असल्याचे प्रमाणित केले आहे. तसेच श्रीमती विमल अर्जून जाधव यांना 300 दिवस शिल्लक रजेचे रोखीकरण करून र.रू.149640/- आदा केलेले आहे. सदर रक्कम रजा लेखा अद्ययावत नसल्याने आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

8. श्रीमती विमल अर्जून जाधव यांच्या सेवापुस्तकामध्ये त्यांची जात महार (एस.सी.) अशी नोंद तहसिलदार कार्यालयाने दिलेल्या दाखल्यावरून नोंदविण्यात आलेली आहे. परंतु सदर प्रमाणपत्राची सत्यता जातपडताळणी कार्यालयाकडून करून न घेता श्रीमती जाधव यांना निवृत्ती वेतन व निवृत्ती वेतनाचे इतर लाभ देण्यात आले आहेत. अर्धसमास ज्ञापनामधील मुद्दा क्रं.6 चे उत्तर दि.18/10/13रोजी दिलेले आहे.

वसूलपात्र रक्कम रु.72,229/-

आक्षेपाधिन रक्कम रु.217140/-

DPSKGGM6001 (Ref No : 25, Hmm No : 42)

## ***31 आरोग्य विभागाकडील साहित्य खरेदीमधील गंभीर अनियमितते बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : साहित्य खरेदी महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 87545.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 113998.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दि.2 जाने.1992 मधील परिशिष्ट 7, परिच्छेद 8.3 (ह) नुसार वस्तु खरेदीचे फेर आदेश सहा महिन्याकरिता देणे आवश्यक असता, 2008-09 च्या मंजूर ठेकेदाराकडून 11-12***

***या आर्थिक वर्षात नियमबाह्यरित्या साहित्य खरेदी करणेत आलेले आहे.***

आरोग्य विभागाचे सादीलवार स्टॉक बूक तपासले असता, खालील गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत.

39) उद्योग उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दि.2 जाने.1992 मधील परिशिष्ट 7, परिच्छेद 8.3 (ह) नुसार वस्तु खरेदीचे फेर आदेश सहा महिन्याकरिता देणे आवश्यक असताना, 2008-09 चे मंजूर ठेकेदाराकडून साहित्याची नियमबाह्यरित्या खरेदी करणेत आलेली आहे.

40) नगर अभियंता कार्यालयाचे जा.क्र.नअ/भांडार/22 दि.27/6/2011 चे टिपणीनुसार 2011-12 या आर्थिक वर्षासाठी 2008-09 च्या मंजूर दराने बांधकाम विभागाकरिता साहित्य खरेदी निविदा न मागविता 2008-09 चे मंजूर ठेकेदाराकडून करून घेणेस आयुक्त यांची मान्यता घेणेत आलेली आहे.त्या टिपणीचा आधार घेवून आरोग्य विभागाने आयुक्तांची मंजूरी न घेताच 2008-09चे मंजूर ठेकेदाराकडून मूळ मंजूर किंमतीपेक्षा जास्त दराने खरेदी केली आहे. आरोग्य विभागाने सदर ठेका मंजुर करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क)अन्वये आवश्यक असणारी आयुक्तांची मंजुरी तसेच अधिनियम 1949 चे कलम 73(ग)अन्वये स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक होते. तशा प्रकारची मंजुरी न घेताच परस्पर मागील मंजूर ठेकेदार 'समर्थ एंटरप्रायजेस' यांचा ठेका आरोग्य विभागाने नियमबाह्यपणे मंजुर केल्याचे नस्तीवरुन दिसुन येते.

41) संदर्भीय शासन निर्णय परिशिष्ट 7, परिच्छेद 8.3 (ह) पुन:प्रत्ययी आदेशातील (1) नुसार फेर आदेश हे मूळ दरापेक्षा जास्त दराने देता येत नसल्याने आरोग्य विभागाने जादा दराने साहित्य खरेदी केलेने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.

42) औषध भांडारमध्ये शिल्लक राहिलेल्या धुण्याचा साबणावर (501 बार) 2011-12 मधील छापील किंमत रू.14/- प्रति नग असल्याने व 08/09ची खरेदी नस्ती पाहता ठेकेदाराने MRP वर 3 % सुट दिली असलेने सूट वजा जाता रू.13.58/- प्रती नग प्रमाणे साबण खरेदी न करता रू.26.75 प्रति नग खरेदी केली आहे. त्यामुळे 487 नगx रू.13.17/- प्रती नग प्रमाणे रू.6414/- ठेकेदारास जादा आदा केल्याचे स्पष्ट होते. तसेच स्टॉकबूक मध्ये साबणाचे वजन, बॅच नंबर नमूद केलेला नाही.

43) लाईफबॉय साबण: स्टॉकबुक पान क्र.01 ते 09व पान क्र.280ते 283वर एकूण 4780 नग खरेदी पैकी दि.31/3/2012 अखेर वाटप 3677 नग दिसून येते. वर्ष अखेरीस एकूण 1103 नग शिल्लक राहिल्याने अनावश्यक खरेदी केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे 4780 नग x रू.18.31/नग प्रमाणे रू.87545/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. स्टॉक बूक मध्ये किती ग्रॅमचा साबण, बॅच नंबर, मूळ किंमत नमूद नाही.

44) त्याचप्रमाणे खालील साहित्य जादा दराने खरेदी केल्याचे दिसून येते.

| साहित्याचे नाव | मंजुर किंमत/नग | खरेदी/नग | एकूण खरेदी | फरक | जादा रक्कम |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गवतीझाडू | 18 | 66.44 | 824 | 48.64 | 40079 |
| नारळी खराटे | 9 | 45.08 | 1871 | 36.08 | 67505 |
| धुण्याचा साबण् | 14 | 26.75 | 487 | 13.17 | 6414 |
| | | | | एकूण | 113998 |

7. स्टॉकबूक मध्ये साहित्य वाटप केल्याच्या नोंदी आहेत. परंतु साहित्य घेणा-याची स्वाक्षरी घेतली नसल्याने साहित्याचे वाटप झाल्याची खात्री करता येत नाही. 11-12 या आर्थिक वर्षामध्ये औषध भांडार विभागाच्या बिल नोंदवहीवर एकूण रु.1141647/-चे साहित्य घेतल्याच्या नोंदी आहेत.परंतु ठेकेदारास देयक आदा केल्याची प्रमाणके दाखविणेत आलेली नाहीत.

उपरोक्त खरेदी आरोग्य विभागाने नियमबाहयरित्या केल्याने संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करून जादा रक्कम वसुल करणेत यावी. अर्धसमास ज्ञापन क्र.36 दि.13/08/2013 चे उत्तर दि.26/11/2013रोजी तीन महिने विलंबाने प्राप्त झाले आहे.दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

DATSBKM7201 (Ref No : 21, Hmm No : 36)

## *32 आरोग्य विभागाच्या सादीलवार साहित्याच्या खरेदीतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :औषध खरेदी महनगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2098166.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 56935.00/-

***2011-12 चे आरोग्य विभागाचे सदर ठेकेदाराने साहित्य पुरविल्याचा नोंदी असलेली साठा नोंदवही (Stock Register) क्र.3 ची पडताळणी केली असता, सदर ठेकेदाराने अनेक साहित्य यापूर्वी मान्य केल्याप्रमाणे 2008-09 या आर्थिक वर्षाच्या मंजूर दरानुसार न पुरविता वाढीव दराने पुरविलेले आहे. त्यामुळे वाढीव दराची रक्कम रू56935/- ही सदर ठेकेदाराकडून वसुलपात्र ठरते. तसेच नियमबाहय पध्दतीने खरेदी झाली असल्याने सदर ठेकेदाराने पुरविलेल्या सर्व साहित्याची एकूण र.रू2098166/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या औषध भांडाराचे लेखापरिक्षण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

45) आरोग्य विभागातील औषध भांडारातून महानगरपालिकेच्या एकूण 8 प्रसुतीगृहे, 5 दवाखाने

आणि 9 नागरी आरोग्य केंद्रासाठी सादीलवार साहित्य पुरविले जाते. याबाबतच्या 2011-12 या आर्थिक वर्षा मध्ये सदर साहित्याच्या खरेदीची नस्ती तपासली असता खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

46) 2008-09 चे मंजूर ठेकेदार "समर्थ एंटरप्रायझेस, द.कसबा, सोलापूर" यांना 2011-12 मध्ये निविदा न मागविता नियमबाह्य पध्दतीने ठेका देण्यात आला आहे.

47) नगरअभियंता कार्यालयाने जा. क्र. नअ/भांडार/22 दि.27/6/2011 चे टिपणीनुसार 2011-12 या आर्थिक वर्षात 2008-09 चे मंजूर दराने बांधकाम विभागाकरिता साहित्य खरेदी निविदा न मागविता 2008-09 चे मंजूर ठेकेदाराकडून करून घेणेस आयुक्त यांची मान्यता घेणेत आलेली आहे. त्या टिपणीचा आधार घेवून आरोग्य विभागाने आयुक्तांची मंजूरी न घेताच 2008-09 चे मंजूर ठेकेदाराकडून मूळ मंजूर किंमतीपेक्षा जास्त दराने खरेदी केली आहे. आरोग्य विभागाने सदर ठेका मंजुर करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क)अन्वये आवश्यक असणारी आयुक्तांची मंजुरी तसेच अधिनियम 1949 चे कलम 73 (ग)अन्वये स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक होते. तशा प्रकारची मंजुरी न घेताच परस्पर मागील मंजूर ठेकेदार 'समर्थ एंटरप्रायजेस' यांचा ठेका आरोग्य विभागाने नियमबाह्यपणे मंजुर केल्याचे नस्तीवरुन दिसुन येते.

48) ठेकेदाराबरोबर वाढीव मुदतीचा मुद्रांकित करार करणे आवश्यक असताना तसा करार न करताच सादीलवार साहित्य खरेदी केलेली आहे.

49) 2011-12 चे आरोग्य विभागाचे सदर ठेकेदाराने साहित्य पुरविल्याचा नोंदी असलेली साठा नोंदवही (Stock Register) क्र.3 ची पडताळणी केली असता, सदर ठेकेदाराने 2008-09 च्या मंजूर दरानुसार साहित्य न पुरविता वाढीव दराने पुरविलेले आहे. त्यामुळे वाढीव दराची रक्कम रू.56935/- ही सदर ठेकेदाराकडून वसुलपात्र ठरते. तसेच नियमबाह्य पध्दतीने खरेदी झाली असल्याने सदर ठेकेदाराने पुरविलेल्या सर्व साहित्याची एकूण रक्कम रू.2098166/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

50) ठेकेदारास प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेच्या देयकांची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करणेत आली नाही.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर साडे तीन महिने विलंबाने दि.29/11/2013रोजी दिलेले आहे. स्थायी समितीची मान्यता न घेता निविदा प्रक्रीया राबविलेचे मान्य केले आहे.

एकूण वसूलपात्र **र.रू.56,935/-**

एकूण आक्षेपाधीन **र.रू.20,98,166/-**

DATRADM5901 (Ref No : 27, Hmm No : 30)

## *33 किटकनाशके, जंतुनाशके खरेदीमधील गंभीर अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : किटकनाशके खरेदी महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1013040.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2113160.00/-

***आरोग्य विभागाने सफाई कामासाठी लागणारी किटकनाशके व जंतुनाशके यांची खरेदी मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे प्रकरण 7 कलम 73(ग) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेने निविदा मागवून करणे आवश्यक असता, खरेदीचे रू3000/- चे आत तुकडे पाडून आरोग्याधिकारी यांचे मान्यतेने रु.21,13,160/-ची औषधे नियमबाह्यरित्या खरेदी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.***

| अ.क्र | प्रमाणक क्र. | एकूण प्रमाणके | रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | 20898 ते 20941 | 43xरु.2940 | रु.126420/- |
| 2 . | 21500 ते 21543 | 43xरु.2940 | रु.126420/- |

| जंतुनाशकाचे नाव | खरेदी / लि | किमत/लि | एकूण | वापर | शिल्लक | स्टॉकबुक पान क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| सुपरमॅक्स A | 2030 | 588 | 1193640 | 910 | 1120 | 230 ते 233, 278 |
| सुगंधी फिनैल | 1058 | ---- | ---- | 1402 | ----- | 83 |
| ब्लॅक क्लिनर | 2080 | 119 | 247520 | 1400 | 680 | 140,146 ते 149 |
| सुपरमॅक्स C | 2400 | 280 | 672000 | 1423 | 973 | 220 ते 227 |

सदर औषध खरेदी पूरवठादार श्री.समर्थ ऑरगेनिक्स लि. सोलापूर यांचेकडून करणेत आलेली आहे. सदर खरेदीबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

51) उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखसं-1093/2635/ उद्योग/6 दि.16 जुलै 1993 नुसार 50 हजाराचे वरील कामाची खरेदीची निविदा मागविणे आवश्यक असता, त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आली नाही. 2011-12 या आर्थिक वर्षात सदर किटकनाशके, जंतुनाशके खरेदी टेंडर न मागविता बाजार भावाने वर्षभर टप्प्या-टप्प्याने नियमबाह्यरित्या करणेत आलेली आहे.

52) उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि.2 जाने.1992 मधील परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभर आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी दर करार करणे आवश्यक असता बाजारभावाने खरेदी करणेत आली आहे.

53) पुरवठादार श्री.समर्थ ऑरगेनिक्स लि., सोलापूर यांचा मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948

संस्थेच्या नोंदणीचा दाखला नसल्याने धंद्याचे स्वरूप धंद्याचे ठिकाणचा पत्ता समजून येत नाही. पुरवठादार सदर किटकनाशकांचे अधिकृत विक्रेते असल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये नाहीत.

54) स्टॉकबूक वर साहित्य दिल्याच्या नोंदी आहेत. परंतु औषधे घेणा-याची सही नसल्याने औषधे दिलेबाबत खात्री करता येत नाही.

55) आरोग्याधिकारी यांनी औषधे घेतलेल्या नोंदीवर स्वाक्षरी केलेली आहे. परंतु औषधे दिलेल्या नोंदीवर स्वाक्षरी केलेली नाही.

56) वर्षाच्या शेवटी भांडारातील प्रत्यक्ष शिल्लक व स्टॉकबूक मधील शिल्लक याचा ताळमेळ आरोग्याधिकारी यांनी प्रमाणित केलेला नाही.

57) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 7 चे कलम 73(ग) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेने निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक असता, खरेदीचे रू.3000/- चे आत तुकडे पाडून आरोग्याधिकारी यांचे मान्यतेने औषधे नियमबाह्यरित्या खरेदी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

58) सदर औषधे कोणत्या उत्पादीत कंपन्यांची आहेत, त्यामध्ये कोणते किटकनाशक, जंतुनाशक आहे याबाबत कोणतीही माहिती नस्तीमध्ये देण्यात आलेली नाही. तसेच औषधाचा बॅच नंबर, उत्पादीत तारीख, मुदतबाह्य तारीख याबाबत काही ही माहिती नमूद नाही.

59) महानगरपालिका कडे शासकीय हिवताप निर्मूलन योजना चालु असून, त्यासाठी शासनाचे प्रशिक्षित जीवशास्त्रज्ञ व किटकनाशक अधिकारी असून त्यांच्या मान्यतेने औषध खरेदी शासकीय दरपत्रकानुसार शासन मान्य संस्थेकडून करणे आवश्यक असता आरोग्याधिकारी यांनी नियमबाह्यरित्या बाजारभावाने औषध खरेदी केल्याने महानगरपालिका चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

60) पुरवठा केलेले औषध वापरणेस योग्य असलेबाबत शासकीय प्रयोग शाळेचा दाखला न घेताच देयक पारीत करणेत आलेली आहेत. 11-12 या आर्थिक वर्षातील खरेदीची देयके व प्रमाणके लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाहीत.

औषध खरेदी प्रमाणापेक्षा जास्त केल्याने वर्षाअखेरीस जास्त प्रमाणात औषधे शिल्लक राहिल्याने रू.10,13,040/- अनावश्यकरित्या गुंतून पडल्याचे स्पष्ट होते. अर्धसमास ज्ञापन क्र.46 दि.26/08/2013 चे उत्तर साडे तीन महिने विलंबाने दि.29/11/2013 रोजी दिलेले आहे. स्थायी समितीची मान्यता न घेता बाजारभावाने जंतूनाशके खरेदी केलेचे मान्य केले आहे.

उपरोक्त आक्षेपाच्या पुर्ततेस्तव रू.21,13,160/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATSBKM7201 (Ref No : 28, Hmm No : 46)

## *34    नागरी हिवताप योजना अंमलबजावणीतील अनियमिततेबाबत.*

**नागरी हिवताप योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : आरोग्य   राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 7706501.00/-

***2011-12 या आर्थिक वर्षातील शासनाकडून वेतनापोटी 100% प्राप्त होणारे अनुदान रक्कम रू.7706501/- 2013 पर्यंत प्रलंबित आहे. शासनाकडे वेतन अनुदान प्रलंबित असलेने सदर मंजूर कर्मचा-याचा पगार महानगरपालिका निधीतून केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयी सुविधांवर करावयाचा खर्च वेतनावर होत असलेचे स्पष्ट होते.***

नागरी हिवताप योजनेकरीता शासनाने एकूण 44 पदे मंजूर केली असून, त्यापैकी 04 पदे रिक्त् आहेत. त्यापैकी जिवशास्त्रज्ञ पद 01 मार्च 11 पासून रिक्त आहे. तसेच क्षेत्र कार्यकर्ता 03 पदे ही 2011-12 मध्ये रिक्त झालेली आहेत. सदर पदांना शासनाकडून 100 टक्के अनुदान मंजूर असताना ती पदे 2013 अखेर भरणेत आलेली नाहीत.

2011-12 या आर्थिक वर्षातील शासनाकडून वेतनापोटी प्राप्त होणारे अनुदान रू.77,06,501/- 2013 पर्यंत प्रलंबित आहे. शासनाकडे वेतन अनुदान प्रलंबित असुन सदर मंजूर कर्मचा-याचा पगार महानगरपालिका निधीतून होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयी सुविधांवर करावयाचा खर्च वेतनावर होत असलेचे स्पष्ट होते.

मलेरिया विभागाकडील शासनमान्य एकूण 8 वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता झोन ऑफीसकडे कार्यरत असल्याचे हजेरीपत्रकातील नोंदीवरुन तसेच विभागाने दिलेल्या माहितीवरुन दिसून येते. झोन ऑफीसकडे कार्यरत असलेल्या मलेरिया विभागाकडील शासनमान्य एकूण 8 वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्त्यांची मागणी जीवशास्त्रज्ञांनी सहा.आयुक्तांकडे केली आहे.परंतु अद्‌याप पदे वर्ग करणेत आलेली नाही. सदर कर्मचा-याची नेमणूक शासनाने मलेरिया निर्मूलनाचे कामाकरिता केली असुन व त्यासाठी शासन महानगरपालिकास वेतन अनुदान देत असल्याने त्यांचा वापर शासनाची मान्यता न घेता अन्य विभागासाठी नियमबाहयरित्या करीत असल्याचे स्पष्ट होते. तसेच वरील नियमबाहयते बाबत सदर कर्मचा-यावर 2011-12 मध्ये वेतनावर करणेत आलेल्या एकूण खर्चाची रक्कम रू.20,21,580/- शासनास भरणा करणेत यावी.

वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता व क्षेत्र कार्यकर्ता ही भागामध्ये फिरतीची पदे असलेने त्यांनी केलेल्या कामाची दैनंदिनी ठेवणे आवश्यक असता ती ठेवण्यात आली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.47 दि.26/08/2013 चे उत्तर दि.25/09/2013 रोजी प्राप्त झालेले आहे.

DATSBKM7201 (Ref No : 29, Hmm No : 47)

## *35 मलेरिया विभागाकडील फवारणी / धुरावणी करणेकामी 67(3) क खाली नेमणूक दिलेल्या कर्मचा-याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मलेरिया महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1333000.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे 67(3) क अन्वये कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीतीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही आयुक्तांना कोणत्याही सक्षम प्राधिका-याच्या मान्यते शिवाय करणेचा अधिकार आहे. परंतु सदर नेमणूकांना दि.13/10/97 पासुन आयुक्ताने स्थायी समितीच्या पूर्वमान्यते शिवाय आजपर्यंत कोणतीही आणीबाणीची स्थिती नसताना नियमबाह्यरित्या मुदतवाढ देणेत आली आहे.***

मलेरिया विभागाकडे मा.आयुक्त यांचे मान्यतेने दि.13/10/1997 पासून एकूण 12 वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता व 22 क्षेत्र कार्यकर्ता (बिगारी) पदे भरण्यात आलेली आहेत. सदर पदांना तीन महिन्यानंतर दोन दिवसांचा तांत्रिक खंड दरवर्षी देणेत येऊन आजपर्यंत नियुक्ती देणेत येत आहे. याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे 67 (3) क अन्वये कोणत्याही आणीबाणीच्या स्थितीत सदर कार्यवाही आयुक्तांना कोणत्याही सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेशिवाय करणेचा अधिकार आहे. परंतु सदर नेमणूकांना दि.13/10/97 पासुन आयुक्ताने स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेशिवाय आजपर्यंत कोणतीही आणीबाणीची स्थिती नसताना नियमबाह्यरित्या मुदतवाढ दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे 67(3) (ग) परंतु प्रमाणे, आयुक्ताने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे व त्यावर झालेला खर्च किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांचेकडे ताबडतोब पाठविणे आवश्यक आहे. ती पाठविलेची कागदपत्रे लेखापरिक्षणास दाखविणेत आलेली नाहीत.

त्यामुळे 12 वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता यांची रोजंदारी वेतनावर दररोज रू.132/- प्रमाणे झालेला एकुण वार्षिक खर्च रू.4,75,200/- व 22 क्षेत्र कार्यकर्ता यांचे रोजंदारी वेतनावर 22 कर्मचारी X रु.130/ दिन = रू.2860/ दिन x 25 दिवस = रू.71500/- प्रमाणे वार्षिक खर्च रू.8,58,000/- असे एकूण 13,33,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.48 दि.26/08/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 30, Hmm No : 48)

## *36 मलेरिया विभागाकडे स्टॉकबूक मधील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मलेरिया महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***मलेरिया विभागाने स्टॉकबूक पान क्र.12 वर पायरेथ्रम हे किटकनाशक दि.11/4/2011 रोजी सहा.संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचेकडून 125 लि. आल्याची नोंद आहे. परंतु डिलेव्हरी चलन सोबत जोडलेले नाही. तसेच स्टॉक बुक मध्ये किटकनाशकाचा बॅच नंबर, उत्पादनाची तारीख व मुदतबाह्य तारीख लिहिण्यात आलेली नसल्याने किटकनाशक वापरणेस योग्य असलेबाबतची खात्री करता येत नाही.***

मलेरिया विभागाच्या स्टॉकबुक मध्ये पान क्र.12 वर पायरेथ्रम हे किटकनाशक 125 लि. दि.11/4/2011 रोजी सहा.संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचेकडून आल्याची नोंद आहे. परंतु डिलेव्हरी चलन सोबत जोडलेले नाही. तसेच स्टॉकबुक मध्ये किटकनाशकाचा बॅच नंबर, उत्पादनाची तारीख व मुदतबाह्य तारीख लिहिण्यात आलेली नसल्याने किटकनाशक वापरणेस योग्य असले बाबतची खात्री करता येत नाही. दि.5/9/2011 ते जुलै 12 अखेर महानगरपालिकेच्या डी.एस. विभागाने (निर्जंतूकीकरण पर्यवेक्षक कार्यालयाने ) एकूण 120 लि. किटकनाशक मलेरिया विभागाकडून घेतलेची नोंद आहे. परंतु साहित्य नेल्याची पोहोच घेण्यात आलेली नाही.

व्हेक्टोबॅक लार्वीसाईड हे डासअळीनाशक मलेरिया विभागाचे स्टॉकबुक पान क्र.22 वर व पान नं. 52 ते 55 वर सहा.संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचेकडून 270 लि. मिळाल्याची नोंद आहे. परंतु डिलेव्हरी चलन सोबत जोडलेले नाही. तसेच डासअळीनाशकाचा बॅच नंबर, उत्पादनाची तारीख व मुदतबाह्य तारीख याची नोंद घेण्यात आलेली नसल्याने किटकनाशक वापरणेस योग्य असलेबाबतची खात्री करता येत नाही. दि.1/5/2011 ते मार्च 12 अखेर बॅच नंबर 1 ते 6 व हद्दवाढ बॅच क्र.7 व 8 तसेच झोन क्र.1 ते 6 ने

एकूण 270 लि. किटकनाशक वापरल्याची नोंदी आहेत. परंतु प्रत्येक बॅचने दररोज किती लार्वीसाईड वापरले व कोणत्या ठिकाणी वापरले याच्या दैनंदिनी ठेवण्यात आलेल्या नाहीत. तसेच स्टॉकबूक सक्षम प्राधिकारी जीवशास्त्रज्ञ यांनी प्रमाणित केलेले नाही.

आबेट लार्वीसाईड हे डासआळीनाशक एकुण 260 लि. दि.21/4/2011 रोजी मलेरिया विभागाच्या स्टॉकबूक पान क्र.27, 38 ते 40 व पान नं.52 वर सहा.संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचेकडून मिळाल्याची नोंद आहे. परंतु डिलिव्हरी चलन सोबत जोडलेले नाही. तसेच बॅच नंबर, उत्पादनाची तारीख व मुदतबाहय तारीख लिहिण्यात आलेली नसल्याने किटकनाशक वापरणेस योग्य असलेबाबतची खात्री करता येत नाही. दि.24/4/2011 ते मार्च 12 अखेर बॅच नं.1 ते 10 तसेच झोन क्र.1 ते 6 ला वाटप करणेत आलेले आहे.परंतु प्रत्येक बॅचने दररोज किती लार्वीसाईड वापरले व कोणत्या ठिकाणी वापरले याच्या दैनंदिनी ठेवण्यात आलेल्या नाहीत. तसेच स्टॉकबूक सक्षम प्राधिकारी जीवशास्त्रज्ञ यांनी प्रमाणित केलेले नाही.

डेडस्टॉक बूक रजिस्टर : स्टॉकबूक पान नं.19 वर स्टीअरअप पंप एकूण 125 नग दि.16/6/2011 रोजी सहा.संचालक,आरोग्य सेवा, पुणे यांचेकडून मिळाल्याची नोंद आहे. परंतु डिलेव्हरी चलन, माल मिळाल्याची पोहोच ठेवण्यात आलेली नाही. दि.19/3/2012 मध्ये 14 पंपांचे वाटप झोन क्र.4, 5, 6 व 8 ला केल्याचे नोंदवहीमध्ये नमुद आहे.तसेच एकूण 111 नग वापराविना पडून आहेत. त्याचा वापर का केला नाही याचा खुलासा करणेत आलेला नाही.

नॅपसॅक पंप : औषध फवारणीसाठी सहा.संचालक, पुणे यांचेकडून दि.16/6/2011 रोजी 40 पंप मोफत देण्यात आले आहेत. सदर पंप स्विकारण्यापुर्वी ते सुस्थितीत व वापरण्यायोग्य असल्याची खात्री करुन स्विकारणे आवश्यक होते तथापि तशी कार्यवाही न करताच ते स्विकारण्यात आले असुन त्याची नोंद स्टॉकबूक पान नं.20 वर घेण्यात आलेली आहे. परंतु सर्व पंप खराब निघाल्याने त्याचे वाटप करणेत आलेले नाही.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दि.25/09/2013रोजी प्राप्त झाले आहे. उत्तर संयुक्तिक नाही.

DATSBKM7201 (Ref No : 31, Hmm No : 49)

## *37 आरोग्य विभाग औषध खरेदीमधील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :औषध खरेदी महनगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1864421.00/-

***स्थायी समितीने प्रशासकीय मंजुरी दिलेले ठेकेदार अनुक्रमे विशाल एंटरप्रायजेस आणि मेडिफ़ार्मा यांचे कडूनच औषधांची/साहित्याची खरेदी होणे आवश्यक असताना यांचे व्यतिरिक्त निविदाबाहय पुरवठादारांकडून खरेदी केल्याचे साठा नोंदवही क्र.1 वरुन दिसुन येते. अशी एकूण खरेदी रु.82,893/- ची करण्यात आली आहे.***

आरोग्य खात्याच्या औषध भांडार विभागामार्फ़त महानगरपालिकेच्या दवाखाने, प्रसुतिगृहे आणि नागरी आरोग्य केंद्रासाठी औषधे उपकरणे आणि सर्जिकल साहित्याची खरेदी करुन त्यांच्या नोंदी साठा नोंदवही क्र.1 मध्ये नोंदविल्या जातात.सदर नोंदवहीची पडताळणी केली असता असे दिसून आले कि, आरोग्य खात्याकडून निविदा मागवून मेडिफ़ार्मा या ठेकेदाराच्या 60 औषधांच्या दरांना तर विशाल एंटरप्रायजेस या ठेकेदाराच्या 45 औषधांच्या दरांना मेडिकल बोडाने मंजुरी दिली. सदर खरेदीचे अंदाजपत्रक रु.25 लाख असल्याने औषधांच्या खरेदिच्या वार्षिक तरतूदीमधून शिल्लक रु.7768422/- च्या 24 टक्के म्हणजे रु.1864421/- इतक्या रकमेस ती अंदाजपत्रकाच्या मर्यादेत असल्याने मेडिकल बोर्डाने दि.21/11/2011 रोजी मंजुरी देऊन सदरचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे प्रशासकीय मान्यतेस्तर सादर करण्यात आला. वरील खरेदी ही शासकिय दराने करण्यात आलेली नसल्याचे नस्तीवरुन दिसून येते. त्यामुळे सदर खरेदीची रककम आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

61) आरोग्य खात्याची उपरोल्लेखित साहित्याची खरेदी ही त्यांच्या विभागांतर्गत असणा-या प्रसुतिगृहे, दवाखाने आणि नागरी आरोग्य कैंद्रासाठी केली जात असल्याने त्यांच्या मागणीपत्रानुसार करणे आवश्यक आहे. परंतू या बाबतची साठा नोंदवही पडताळली असता मागणीपत्रांपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात अनावश्यक खरेदी केल्याचे दिसून येते. सदर अनावश्यक खरेदीची परिगणना केली असता एकूण रु.4,56,969/- इतकी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर रक्कम आक्षेपाधिन म्हणून ठेवण्यात आली आहे.

62) साठा नोंदवहीतील पृष्ठ क्र.72 वरील नोंदीनुसार 2011-12 मध्ये दर महिन्याला ए.आर.व्ही इंजेक्शनची मागणी गरजेपुरतीच असल्याचे साठा नोंदवहीवरुन दिसून येते, मात्र मार्च/2012 मध्ये ए.आर.व्ही. इंजेक्शनची 3500 एवढ्या मोठ्या प्रमाणात खरेदी केल्याचे दिसून येते, त्यावरुन केवळ अर्थसंकल्पित तरतूद संपवण्याचे प्रयोजन अधोरेखित होते.

63) स्थायी समितीने प्रशासकीय मंजुरी दिलेले ठेकेदार अनुक्रमे विशाल एंटरप्रायजेस आणि मेडिफ़ार्मा यांचे कडूनच औषधांची/साहित्याची खरेदी होणे आवश्यक असताना यांचे व्यतिरिक्त निविदाबाहय पुरवठादारांकडून खरेदी केल्याचे साठा नोंदवही क्र.1 वरुन दिसुन येते. अशी एकूण खरेदी रु.82,893/- ची खरेदी केली आहे. सोबत परिशिष्ट क्र. ( 1) जोडले आहे. (प्रमाणक क्र. दिनांक तसेच पुरवठा आदेशाचा तपशिल उपलब्ध होऊ शकला नाही). तसेच सदर औषधसाठा नोंदवहयामधील खरेदी किती केली, वापर किती केला, शिल्लक किती याच्या अनेक नोंदी अपूर्ण असून त्या आरोग्य अधिकारी यांनी प्रमाणित न केल्यामुळे प्रत्यक्ष किती औषधे खरेदी झाली कितीचे वाटप झाले आणि किती शिल्लक साठा आहे याचा योग्य तो ताळमेळ साधला जात नाही.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 54, दिनांक 27.8.2014 चे उत्तर साडे तीन महिने विलंबाने दि.29/11/2013 रोजी दिलेले आहे. औषध खरेदी विलंबाने तसेच कांही औषधांची खरेदी निविदाबाह्य विक्रेत्याकडून केल्याचे मान्य केले आहे.

DATRADM5901 (Ref No : 34, Hmm No : 54)

## *38 अन्न व परवाने विभागांतर्गत असणा-या आस्थापनांकडील प्रलंबित वसुली बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : परवाना शुल्क महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 517486.00/-

***अन्न व परवाना विभागामार्फत एकूण 194 प्रकारच्या व्यवसायांच्या परवाना शुल्काची आकारणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 376 व 386(1)(2) अन्वये केली जाते. व्यवसायिकांकडून सन 2011/12 मध्ये सुधारित दराने परवाना शुल्काची रु.5,17,486/- थकबाकी वसुली प्रलंबित आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यातील अन्न व परवाने विभागाने लेखापरिक्षणास सादर केलेल्या व्यवसाय नोंदणी नूतनीकरणाच्या नोंदवह्या तपासल्या असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

सोलापूर महानगरपालिकेच्या अन्न व परवाना विभागामार्फत एकूण 194 प्रकारच्या व्यवसायांच्या परवाना शुल्काची आकारणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 376 व 386(1)(2) अन्वये केली जाते. व्यवसायिकांकडून 2011-12 या आर्थिक वर्षात सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. (5) नुसार स्थायी समिती विषय क्र.132 व ठराव क्र.132 दि.23/4/2010 तसेच सर्वसाधारण सभा विषय क्र.50 ठराव क्र.55 दि.07/06/2010 अन्वये मान्यता मिळालेल्या सुधारित दराने परवाना शुल्काची रु.5,17,486/- थकबाकी वसुली प्रलंबित आहे. त्यासाठी संबंधितांविरुद्ध कोर्टात केसेस दाखल केलेल्या आहेत.

प्रलंबित थकबाकीसाठी व नोंदणीसाठी ज्या व्यापा-यांना कोर्टाकडून दंड ठोठावला जातो त्याबाबत वसुली साठी काय कारवाई केली याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.112, दि.11/11/2013 अन्वये अन्न व परवाना विभागास विचारणा करण्यांत आली परंतू सदर विभागाकडून याची माहिती लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 46, Hmm No : 112)

## *39 आरोग्य केंद्राकरिता आवश्यक असणारे साहित्य व उपकरणे खरेदी मधील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : साहित्य व उपकरणे खरेदी महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1524160.00/-

***शा.नि.क्र.भांखस-1094/(2679)/उद्योग-6 दि.30 मार्च 1994 मधील 1.9 नुसार तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर आणि किमान तीन ग्राह्य निविदा प्राप्त झालेले असतील तरच व्यापारी लिफाफे उघडणेत यावे असे नमूद आहे. परंतू आरोग्य विभागाने दोन निविदा प्राप्त असताना व मनिषा एंटरप्रायझेस यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या अपात्र असताना नियमबाह्यरित्या निविदा उघडणेत आल्या. आरोग्य विभागाकरीता साहित्य खरेदी करावयाच्या वस्तुंची किंमत बाजारातून तीन कोटेशन मागवून निश्चित करुन त्यानंतर निविदा मागविणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेचे नस्ती तपासली असता दिसुन आले नाही. परंतु निविदेमध्ये वस्तुंची किंमत नमूद करणेत आली आहे. साहित्याचे तपशील, दर्जा व मोजमापे नमूद न करताच निविदा मागविणेत आलेली आहे. वैद्यकीय उपकरणे ISI मानांकित उत्पादीत कंपनीची असणे आवश्यक असता तशी अट टेंडर मध्ये नमूद न करताच साहित्य घेण्यात आले आहे.***

आरोग्य केंद्राकरिता आवश्यक असणारे साहित्य व उपकरणे खरेदी करणेसाठी सर्वसाधारण सभा विषय क्र.427, ठराव क्र.338 दि.19/2/2011 ने खरेदीस मान्यता दिली आहे. परंतू खरेदीपुर्वी मागील शिल्लक साहित्य किती, कोणत्या वर्षी खरेदी करणेत आले, डेडस्टॉक रजिस्टर नोंदी यांचा अहवाल आरोग्य विभागास सादर करणेस सांगितलेचे ठरावात नमुद असताना त्याप्रमाणे आरोग्य विभागाने सर्वसाधारण सभेकडे अहवाल सादर न करता स्थायी समिती ठराव क्र.385 दि.8/7/2011 ने मेडिकल बोर्डाच्या प्रस्तावानुसार कमीचे निविदा धारक सोलापुर सर्जिकल यांचेकडून 40 बाबी व मनिषा एंटरप्रायझेस, बीड यांचेकडून 2 बाबी घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

64) 2011-12 चे अंदाजपत्रकामध्ये सदर साहित्य खरेदीस तरतूद नसताना 2010-11 च्या मंजूर तरतूदीनुसार 11-12 या आर्थिक वर्षात कोणत्या नियमान्वये बजेट तरतूद खर्ची टाकणेत आली आहे याचा खुलासा करणेत आलेला नाही.

65) निविदा प्रक्रिया 2010-11 मध्ये करणेत आली असून, निविदा दि.22/9/2010 ने मागवून दि.5/10/2010 ने आरोग्य विभागाने मंजूर केली आहे. टेंडर उघडल्यानंतर आरोग्य कार्यालयाने जा.क्र.114 दि.10/8/2011 ने म्हणजेच वर्षभराने पुढील आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतूद न करता नियमबाह्यरित्या ठेकेदारास वर्कऑर्डर देणेत आलेली आहे.

66) निविदा दै.लोकमत या वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्याची झेरॉक्स प्रत आहे. परंतू मूळ प्रत नस्तीमध्ये समाविष्ट नाही.

67) खरेदी करावयाच्या वस्तुंची किंमत बाजारातून तीन कोटेशन मागवून निश्चित करणे आवश्यक असता, त्याप्रमाणे कार्यवाही केलेचे नस्तीचे लेखापरीक्षण केले असता दिसुन आले नाही. निविदेमध्ये वस्तुंची किंमत कशाच्या आधारे नमूद करणेत आली आहे याचा खुलासा आरोग्य विभागाने केलेला नाही.

68) साहित्याचे तपशील व दर्जा व मोजमापे नमूद न करताच निविदा मागविणेत आलेली आहे.

69) वैद्यकीय उपकरणे ISI मानांकित उत्पादीत कंपनीची असणे आवश्यक आहे त्याबाबत अट निविदेमध्ये नमूद न करताच निविदा मागवून साहित्य घेण्यात आले आहे.

70) एकूण दोन निविदा प्राप्त आहेत. निविदे सोबत जोडलेली कागदपत्रे पाहता सोलापुर सर्जिकल्स यांचा मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 चा वैद्यकीय उपकरणे विक्रीचा नोंदणी दाखला आहे. परंतू मनिष एंटरप्रायझेस यांचा दूध उत्पादन साहित्याचा दाखला असतानाही त्यांची निविदा पात्र ठरवली आहे.शा.नि.क्र.भांखस-1094/(2679)/उद्योग-6 दि.30 मार्च 1994 मधील 1.9 नुसार तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर आणि किमान तीन ग्राहय निविदा प्राप्त झालेले असतील तरच व्यापारी लिफाफे उघडणेत यावे असे नमूद आहे. परंतू आरोग्य विभागाने दोन निविदा प्राप्त असताना व मनिषा एंटरप्रायझेस यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या अपात्र असताना नियमबाह्यरित्या निविदा उघडणेत आल्या.

71) मनिषा एंटरप्रायझेस यांचा वैद्यकीय उपकरणे पुरविणेचा कोणता ही पुर्वानुभव दाखला नसताना तसेच त्यांचेकडे कोणत्याही उत्पादीत कंपनीची डिलरशिप नसताना त्यांचे दराबरोबर अन्य ठेकेदाराचे दराची नियमबाह्यरित्या तूलना करणेत आलेली आहे.

72) नियमानुसार एकच निविदा ग्राहय असल्याने पुन्हा निविदा मागविणे आवश्यक असता, सोलापुर सर्जिकल्सची निविदा नियमबाह्यरित्या मान्य करणेत आली आहे.

73) डिलेव्हरी टेबल 8 नग, लोखंडी कॉट 66 नग, लॉकर्स स्टील 40 नग, स्टूल लोखंडी 15 नग, बाकडे लोखंडी 17 नग, खुर्ची फायबर 22 नग, रिव्हालव्हींग चेअर्स 6 नग, टेबल 3 नग, ऑपरेशन टेबल 6 नग, लोखंडी कपाट 18 नग खरेदी करणेत आली आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भाखस-1088/(2512)/उद्योग-6 दि.2 जाने.1992 नुसार सदर साहित्य महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांचेकडून घेणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता नियमबाह्यपणे निविदा मागवून खरेदी करणेत आली आहे.

74) आरोग्य विभागाच्या भांडार विभागाकडील स्टॉक बुकमध्ये साहित्य महानगरपालिकेच्या अन्य दवाखान्यांना दिलेची नोंद आहे.परंतु साहित्य घेणा-यांच्या स्वाक्षरी नसलेने तसेच घेतलेल्या दवाखान्यांचे स्टॉकबुक लेखापरीक्षणास दाखविले नसलेने साहित्य मिळालेचे समजुन येत नाही. मागील खरेदी केलेल्या तसेच शिल्लक साहित्याची काय विल्हेवाट लावली याची माहिती

लेखापरीक्षणास देणेत आलेली नाही.

75) प्राप्त साहित्य विहीत नमुन्यात व दर्जाचे असलेबाबत शासकीय प्रयोगशाळेचा गुणवत्ता अहवाल न घेताच साहित्याचे देयक आदा करणेत आले आहे.

76) निविदा अटी शर्तीनुसार सर्व करासहीत निविदा भरणे आवश्यक असल्याने स्थानिक संस्था कर भरणा केल्याच्या पावत्या लेखापरिक्षणास दाखविणेत आल्या नसल्याने नियमानुसार कर वसुल करणेत यावा.

77) सोलापुर सर्जिकल्सचे 763/ दि.24/3/2012 बिल क्र.2304 ने 2307 दि.2/12/2011 ने रू.15,24,160/- चे देयक लेखा विभागाला पाठविणेत आली आहे.परंतु लेखापरिक्षणास ठेकेदारास देयक आदा केल्याची प्रमाणके दाखविणेत आलेली नाहीत.

अर्धसमास ज्ञापन क्र.160 दि.12/12/2013 चे दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

DATRADM5901 (Ref No : 138, Hmm No : 160)

## *40 DIK-7 पाइप्स खरेदी कामातील अनियमिततेबाबत.*

**UIDSSMT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा महानगरपालिका निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 253800.00/-

***UIDSSMT योजने अंतर्गत महानगरपालिकेने थेट उत्पादक कंपन्या लँको इंडीया लिमिटेड व जिंदाल सॉ लिमिटेड यांचे कडुन 200mm ते 800mm व्यासाच्या DIK-7 पाइप्स खरेदी करणेसाठी करारपत्र केले आहे.सदर करारपत्र करणेसाठी मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम क्र.12/2006 मधील कलम 4(8) अनुच्छेद 63 अन्वये आवश्यक किमतीचे मुद्रांक न वापरलेने मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे रु.253800/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

UIDSSMT योजने अंतर्गत महानगरपालिकेने थेट उत्पादक लँको इंडीया लिमिटेड व जिंदाल सॉ लिमिटेड या दोन कंपन्या कडुन 200mm ते 800mm व्यासाच्या DIK-7 पाइप्स खरेदी करणेसाठी करारपत्र केले आहे.सदर करारपत्र करणेसाठी आवश्यक किमतीचे मुद्रांक न वापरलेने मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रू.25 कोटी 58 लाख.

स्थायी समिती ठराव क्र.800 दि.122/8/2009

मोजमाप पुस्तक क्र. 194         पान क्र.3,7,9

मक्तेदारांचे नांव :जिंदाल सॉ लिमिटेड व लँको इंडीया लिमिटेड

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

1. लँको इंडीया लिमिटेड यांचेकडून रु.12.73 कोटी किमतीच्या 450 mm ते 800 mm व्यासाच्या DIK-7 पाइप खरेदी करणेचे करारपत्र महानगरपालिका व कंपनी यांनी रु.200/- च्या मुद्रांकावर दि.22/8/2009 रोजी केले आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम क्र.12/2006 मधील कलम 4(8) अनुच्छेद 63 अन्वये रु.10 लाखापर्यंत 100 व रु.10 लाखावरील प्रत्येकी 1 लाखासाठी रु.100 प्रमाणे मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक असलेने मुद्रांक शुल्का पोटीची उर्वरित रक्कम रु.126300/- कंपनी कडुन वसुल करुन शासन खाती भरणा करावी.तसेच जिंदाल सॉ लिमिटेड यांचेकडून रु.12.85 कोटी किमतीच्या 200 mm ते 400 mm व्यासाच्या DIK-7 पाइप खरेदी करणेचे करारपत्र महानगरपालिका व कंपनी यांनी रु.200/-च्या मुद्रांकावर दि.22/8/2009 रोजी केले आहे.उपरोक्त नियमानुसार मुद्रांक शुल्का पोटीची उर्वरित रक्कम रु.127500/- कंपनी कडुन वसुल करुन शासन खाती जमा करावेत.

अर्धसमास ज्ञापन क्र.177 दि.15/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 140, Hmm No : 177)

## *41 अक्कलकोट रोड येथे संप व पंपहाऊस येथे झालेल्या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :MIDC भागात विविध सुधारणा करणे   महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1500000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 11369.00/-

***11/12 चे अर्थसंकल्पात संप व पंपहाऊस येथे झालेल्या कामाच्या रक्कमेची तरतुद न करता 09/10 ची रक्कम 11/12 च्या बजेटमधुन तरतुद न करता नियमबाह्यपणे खर्ची घालणेत आली आहे. ड्रेनेज विभागाने पंपीग मशिनरीचे ड्रॉइंग व डिझाईन विहित वेळेत मंजुर न केलेने काम पुर्ण होणेस विलंब लागला असलेचे स्पष्ट होते.***

| प्रमाणक क्रं. | दिनांक | रक्कम | एम.बी.क्र./पानक्र. |
|---|---|---|---|
| 20586/87 | 14/03/12 | 2306669/- | 142/51ते62 |

अक्कलकोट रोड MIDC सेक्टर येथे राईझिंग मेन, ग्रॅव्हीटी मेन, पंप व संप हाऊस व इतर अनुषंगीक कामे करणे हे काम करणेत आले आहे.

मक्त्याची एकूण रक्कम रु.6919985/-

प्रगती कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमीची निविदा 14.71% ने जास्तीची असुन सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी मार्केट दराशी तुलना करुन दरपृथ:करण केले असता निविदा 12.24% जादाने येते. स्थायी समिती ठराव क्र.43, दि.17/04/2006 ने आयुक्त यांचे दि.20/3/2006 चे शिफारशीनुसार 10.50% जास्त दराने काम करणेस मंजुरी देणेत आलेली आहे.

कार्यादेश:-सार्व.आरोग्य अभियंता/363 दि.1/6/2006, कामाची मुदत 105 दिवस.

मुदतवाढ: जा.क्र./साआअ/जनि/614 दि.7/10/2008 ने जानेवारी 2009 आखेर आयुक्त यांचे मंजुरीने देणेत आली आहे.त्यानंतर वेळोवेळी आयुक्तांनी मुदतवाढीस मान्यता दिलेल्या आहेत.

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1) ठेकेदाराशी करारपत्र दि.31/5/2006 रोजी रु.100 चे स्टँप पेपरवर करणेत आली आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958चे कलम 34 नुसार सुरक्षा अनामत रक्कम 5% च्या 3% प्रमाणे मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक असलेने निविदा रक्कम रु.6919985/-+10.50%=रु.7646553 वर 5% प्रमाणे सुरक्षा अनामत रु.382327/-येत असुन त्याच्या 3% प्रमाणे मुद्रांक शुल्क रु.11469/- घेणे आवश्यक असलेने उर्वरित रक्कम रु.11369/- वसुल करुन शासन खाती भरणेत यावेत.

2) मे.प्रगती कन्स्ट्रक्शन यांचे दि.22/2/11 चे पत्रामध्ये त्यांनी यापुर्वी दि.2/11/2006 रोजी दिलेल्या पत्रानुसार सदर निविदेमध्ये सांडपाणी(Sewage)खेचण्याचे पंपाएवजी प्युअर वॉटर सबमर्सिबल पंपाची बाब समाविष्ट असलेचे निदर्शनास आणुन दिलेले असतानासुद्धा ड्रेनेज विभागाने पंपीग मशिनरीचे ड्रॉइंग व डिझाईन विलंबाने मंजुर करुन पंप उभारणी करणेस दि.6/1/2010 रोजी लेखी आदेश दिलेले आहेत. व त्यानंतर ठेकेदाराने काम पुर्ण केले आहे. ड्रेनेज विभागाने पंपीग मशिनरीचे ड्रॉइंग व डिझाईन विहित वेळेत मंजुर न केलेने काम पुर्ण होणेस विलंब लागला असलेचे स्पष्ट होते.त्यामुळे पंप व संप हाउस चालु करणेस विलंब लागला आहे. परंतु विलंबास जबाबदार असणारे कर्मचा-यावर कोणतीही प्रशासकीय कार्यवाही केली नसलेचे निदर्शनास येते.

3) जा.क्र.मु.ले.6/अंदाज/मुख्य लेखापाल कार्यालय यांनी दि.14/6/2011 रोजी 09/10 भांडवली कामे MIDC भागात विविध सुधारणा करणे या लेखाशिर्षामधुन 15 लाखाची तरतुद असलेचा अंदाजपत्रकीय अभिप्राय दिलेला आहे. परंतु 11/12 चे अर्थसंकल्पात सदर रक्कमेची तरतुद न करता 09/10 ची रक्कम 11/12 मध्ये नियमबाह्यपणे खर्ची घालणेत आली आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.191 दि.24/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 149, Hmm No : 191)

## ***42 घरपट्टी करनिर्धारणा मधील त्रुटीमुळे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 133861.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) (ड) नुसार या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेताच किंवा अशा परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन जमिनीवर बांधकाम केले असलेने अशा अवैध बांधकामावर बसवणे योग्य मालमत्ता कराचे दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असलेने तसेच अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र न घेताच इमारतीचा वापर करणेत आला असलेने मालमत्ता कराची दुप्पटदराने वसुली करणेत यावी.***

सोलापूर महानगरपालिका, कर संकलन विभागाचे 2011-12 नवीन मालमत्ता कर आकारणी नस्ती तपासल्या असता, खालील त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

78) डॉ.गिरिष विजय सावस्कर, मिळकत क्र.290722, स. नं.17 यांची मार्च 2011 अखेर थकबाकी रु. 53665/- एवढी शिल्लक होती. बांधकाम विभाग वापर परवाना क्र. 528 दि. 13/07/2010 नुसार नवीन बांधकामासाठी परवानगी देण्यात आली. तसेच वापर परवाना क्र.95 दि.17/09/2011 ने मालमत्ता धारकाला देण्यात आला आहे. कर निर्धारणाच्या अन्य नस्ती तपासल्या असता मालमत्ता विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्या शिवाय बांधकाम परवाना व वापर परवाना, बांधकाम परवाना विभाग देत नसलेचे दिसुन आले.परंतु संबंधित मालमत्ता धारकाकडे थकबाकी असतानाही बांधकाम परवाना दिला असलेने थकबाकी रु. 53665/- वसुल करण्यात यावी.

79) चेअरमन, बालाजी सह. संस्था मिळकत क्र.290001 यांना बांधकाम परवाना क्र. 511 दि.14/10/2008 नुसार देण्यात आला आहे. नस्ती तपासली असता भोगवटा प्रमाणपत्र घेतलेचे दिसुन येत नाही. सदर मालमत्तेला कर आकारणी ही दि.01/04/2011 पासून करण्यात आली आहे. दि.01/04/2011 पासून सदर मालमत्तेला मालमत्ता कर रु.26313/- आकारण्यात आलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) ( ड) नुसार या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेताच किंवा अशा परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन जमिनीवर बांधकाम केले असलेने अशा अवैध बांधकामावर बसवणे योग्य मालमत्ता कराचे दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असलेने तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) ( ड) नुसार या

अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेताच किंवा अशा परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन जमिनीवर बांधकाम केले असलेने अशा अवैध बांधकामावर बसवणे योग्य मालमत्ता कराचे दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असलेने तसेच अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र न घेताच इमारतीचा वापर करणेत आला आहे.बांधकाम परवानगीचे शर्तीनुसार बांधकाम परवानगीची मुदत एक वर्षासाठीच अनुज्ञेय असल्याने सुधारित बांधकाम परवानगी घेणे आवश्यक होते. ती घेतल्याचे आढळुन येत नसल्याने दि.14/10/2009 पासून घरपट्टी आकारणी दुप्पट दराने रु.52626/- प्रमाणे करण्यात यावी. नस्ती तपासली असता बांधकाम परवानगी नकाशामध्ये पहिला, दुसरा व तिसरा मजला प्रत्येकी 86.84चौ.मि. प्रमाणे एकुण 260.52 चौ.मि. बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. परंतू घरपट्टी विभागाने केलेल्या कर निर्धारणामध्ये तळ मजला व प्रत्येक मजला 115.94 चौ.मि. प्रमाणे कर आकारणी केलेली आहे. एकुण क्षेत्रफळ 435.62 चौ.मि.आहे परंतु प्रत्यक्ष बांधकाम 635.62 चौ.मि. केले आहे. अनधिकृत बांधकाम केले असल्याने मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 नियम 267 अ प्रमाणे सदर इमारतीला दुप्पट दराने रु.52626/- वसुली करणेत यावी.

80) संजीवकुमार शिवकृपा सिंदगी, मिळकत क्र.303543 सदर मिळकतीला सोलापूर महानगरपालिका, बांधकाम विभाग यांनी बांधकाम परवाना क्र.819 दि.17/01/2008 ने देण्यात आलेला आहे. सदर नस्ती तपासली असता भोगवटा प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.मालमत्ता धारक यांनी स्वतः लिहुन दिले कि,दि.11/06/2011 पासून मी मिळकतीचा वापर केलेला आहे. व त्यानुसार दि. 12/09/2011 रोजी मालमत्ता कराची आकारणी करणेत आलेली आहे. कोणत्याही वापर पूरावा नसताना व मालमत्ता धारक यांनी स्वतः लिहुन दिल्यानुसार कर आकारणी नियमबाहयरित्या केली आहे. अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र न घेताच इमारतीचा वापर करणेत आला असलेने कर आकारणी रु.9190 दुप्पट दराने कर आकारणी रु.18380 x 2 वर्षाप्रमाणे रु.36760 - रु.9190 = रु.27570/- सदर रक्कम वसुलपात्र ठरविण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.87 दि.08/10/2013 ला दि.24/10/13 रोजी उत्तर दिलेले आहे.दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 41, Hmm No : 87)

## *43 मालमत्ता कर दप्तर व मालमत्ता कराची थकबाकी वसुली केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 651100000.00/-

***2011-12 या आर्थिक वर्षात मालमात्ता कराची थकबाकीसह मागणी 104.24 कोटी आहे. त्यापैकी मार्च 12 अखेर थकबाकीसह एकूण वसुली रु.35.97 कोटी झाली असुन वसुली 34.50 % एवढी कमी प्रमाणात झाली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 8 नियम क्र.42 नुसार कर न भरलेल्या कसूरदाराची जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करुन मालमत्ता कराची थकबाकी वसुल करणे आवश्यक असता महानगरपालिकेने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका, कर संकलन विभागातील नोंदी रजिस्टर तपासले असता, खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.74 नमुना क्र.43 नुसार कर निर्धारण सूची रजिस्टर ठेवलेले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.75/5 नमुना क्र.44 आकारणी करासंबंधी आक्षेप नोंद वही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.75/7 नमुना क्र.46 नुसार करातील वाढ व घट यांची नोंद वही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.76/1 नमुना 47 आकारलेल्या कर मागणीची नोंद वही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.78/3 नमुना क्र.50 कराची दैनिक वसुली नोंद वही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.81/2 नमुना क्र.51 नुसार नोटीस व वारंट फ़ी नोंद वही ठेवलेली नाही.

उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नमुन्या नुसार कर संकलन विभागाने नोंद वह्या न ठेवता स्वतःच्या नमुन्याप्रमाणे ठेवण्यात आलेल्या आहेत.

सोलापूर महानगरपालिका कर संकलन विभागातील मागणी रजिस्टर तपासले असता, 2011-12 ची थकबाकीसह मागणी 104.24 कोटी आहे. त्यापैकी मार्च 12 अखेर थकबाकीसह एकूण वसुली रु.35.97 कोटी झाल्याने वसुली ची टक्केवारी फक्त 34.50% असल्याचे दिसून येते. दि. 31 मार्च 2012 पर्यंत थकबाकी रु.65.11 कोटी एवढी आहे. सदर थकबाकी वसुली बाबत महानगरपालिकेने ठोस कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. थकबाकीची वसुली विहित वेळेत न झाल्यामुळे महानगरपालिकेच्या विकास कामावर परिणाम झाल्याचे दिसून येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनसूची ड प्रकरण 8 नियम क्र.42 नुसार कर न भरलेल्या कसूरदाराची जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करुन मालमत्ता कराची थकबाकी वसुल करणे आवश्यक

असता महानगरपालिकेने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. ज्या मालमत्ता कर धारकाने मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर थकवलेला आहे त्याची परिशिष्ट क्र.(3) जोडण्यात आले आहे.

तरी थकबाकीची रक्कम रु.65.11कोटी वसुल करण्यात यावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.88 दि.08/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 42, Hmm No : 88)

## ***44 शिक्षण कर व नौकर शाश्वती कर शासन तिजोरीत विहित मुदतीत जमा केला नसले बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4726168.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 182920.00/-

***महानगरपालिकेने डिसेंबर 2011 ते मार्च 2012 या कालावधीचा शिक्षण कर दि.27/12/2012 व दि.08/03/2013 रोजी शासन तिजोरीत जमा केलेला आहे. माहे डिसेंबर 2011 ते मार्च 2012 एकूण शिक्षण कर रु.91,46,000/- शासन तिजोरीत 2% सवलत न घेता जमा करणेत आलेला आहे. त्यामुळे शासनास रु. 1,82,920/- एवढी जास्तीची रक्कम आदा झालेली आहे.***

सोलापूर महानगरपालिका, कर संकलन विभाग यांनी 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता करदात्याकडून शिक्षण कर रु.3,67,91,963/- व नौकर शास्वती कर रु.46,25,229/- जमा केला आहे. शिक्षणकर व नौकरशास्वती कर वसुल केलेल्या महिन्यापासून पुढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत शासन तिजोरीत जमा करणे क्रमप्राप्त असताना माहे एप्रिल 2011 ते सप्टेंबर 2011 या कालावधीचा शिक्षण कर दि.27/03/2012 रोजी शासन तिजोरीत जमा केलेला आहे. म्हणजेच उशिरात उशिरा 1 वर्षांनी शिक्षण कर शासन तिजोरीत जमा केलेला आहे. शिक्षण कर उशिरा शासन तिजोरीत जमा करणेबाबत खुलासा करणेत आला नाही.

तसेच माहे डिसेंबर 2011 ते मार्च 2012 या कालावधीचा शिक्षण कर दि.27/12/2012 व दि.08/03/2013 रोजी शासन तिजोरीत जमा केलेला आहे. माहे डिसेंबर 2011 ते मार्च 2012 एकूण शिक्षण कर रु.91,46,000/- शासन तिजोरीत 2% सवलत न घेता जमा करणेत आलेला आहे. त्यामुळे शासनास रु.1,82,920/- एवढी जास्तीची रक्कम जमा झालेली आहे.

माहे आक्टोंबर 2011 व नोव्हेंबर 2011 मध्ये शिक्षण कर रु.47,26,168/- संगणक विभागाने जमा केलेला आहे. परंतू नस्ती तपासली असता शासन तिजोरीत कर जमा केल्याचे चलन निदर्शनास आलेले नसलेने रु.47,26,168/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

नौकर शास्वती कर 2011-12 मध्ये एकूण रु.46,25,229/- जमा करणेत आला व तो शासन तिजोरीमध्ये दि.10/12/2012 रोजी विलंबाने भरणेत आलेला आहे.

कर संकलन विभागाने दि.01/04/2011 ते 31/03/2012 पर्यंत रु.3,67,91,963/- एवढा शिक्षण कर जमा झाल्याचे दर्शविलेले आहे. संगणक विभागाने दि.01/04/2011 ते 31/03/2012 या कालावधीतील शिक्षण कर रु.3,41,23,156/- एवढा दर्शविलेला आहे. महानगरपालिकेच्या 2012-13 या अंदाजपत्रकामध्ये नक्की आकडेमध्ये शिक्षण कर रु.3,21,68,119/- एवढा जमा दर्शविलेला आहे.सदर तिन्ही रकमांपैकी कोणती रक्कम निश्चित आहे या तफावतीबाबत लेखापरिक्षणास खुलासा करणेत आलेला नाही.

नौकर शास्वती कर संगणक विभाग यांनी रु.47,44,678/- एवढा जमा झाल्याचे दर्शविलेला आहे. कर संकलन विभाग यांनी रु.46,25,229/- एवढा दर्शविलेला आहे. महानगरपालिकेच्या 2012-13 च्या अंदाजपत्रकामध्ये नौकर शास्वती कर रु.44,23,819/- इतका दर्शविणेत आलेला आहे. सदर तिन्ही रकमांपैकी कोणती रक्कम निश्चित आहे या तफावतीबाबत लेखापरिक्षणास खुलासा करणेत आलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.89 दि.08/10/2013 चे दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 43, Hmm No : 89)

## *45 अवैध इमारती वर शास्ती न बसविल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महनगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 520679.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) (ड) नुसार या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेताच किंवा अशा परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन जमिनीवर बांधकाम केले असलेने अशा अवैध बांधकामावर बसवण्या योग्य मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असल्याने त्याप्रमाणे वसुली करणेत आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका, कर संकलन विभागाच्या 2011-12 च्या काही करनिर्धारण नस्ती तपासल्या असता, खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत. परिशिष्ट क्र.(22 )मध्ये नमुद कर निर्धारण नस्ती तपासल्या असता मालमत्ता धारकाने बांधकाम परवान्यामध्ये घेतलेल्या मंजूर मोजमापा पेक्षा जास्तीचे बांधकाम केलेले आहे त्यामुळे मुळ नकाशा मध्ये बदल झालेला दिसून येतो. काही कर निर्धारण नस्ती तपासल्या असता इमारतीचे जेवढे अवैध बांधकाम केले जाते तेवढ्याच बांधकामाला शास्ती लावण्यात आली आहे. म्हणुन सदर इमारत ही अधिनियमा नुसार विनापरवाना ठरत असल्याने सदर इमारतीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 नियम 267 अ नुसार अवैध केलेल्या बांधकामाला शास्ती न लावता पूर्ण बांधकामाला शास्ती लावणे आवश्यक आहे.तसेच 2011/12 मध्ये कर निर्धारण झालेल्या सर्व नस्ती तपासुन मालमत्ताधारकाकडुन शास्तीची रक्कम वसुल करावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.96 दि.28/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 44, Hmm No : 96)

## *46 मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यातून नियमबाहयपणे 15 % वजावट केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत .*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 130800000.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 8 नियम 7 प्रमाणे कर योग्य मूल्य ठरविण्यासाठी ज्या वार्षिक भाड्याने जमीन किंवा इमारत वर्षावर्षाने वाजवी रित्या भाड्याने देता येईल अशी अपेक्षा असेल अशा वर्षिक भाड्याच्या रकमेतून उक्त वार्षिक भाड्याच्या 10 % इतकी रक्कम वजा केली पाहीजे. परंतू सोलापूर महानगरपालिका वार्षिक भाड्याच्या 15 % एवढी रक्कम भाड्यातून महानगरपालिका ठरावानुसार वजा करत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे 13.08 कोटी एवढ्या रकमेचे नुकसान झालेले आहे.***

सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागातील करयोग्य मूल्य नस्ती तपासले असता, खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 नियम 7 प्रमाणे कर योग्य मूल्य ठरविण्यासाठी ज्या वार्षिक भाड्याने जमीन किंवा इमारत वर्षावर्षाने वाजवी रित्या भाड्याने देता येईल अशी अपेक्षा असेल

अशा वर्षिक भाड्याच्या रकमेतून उक्त वार्षिक भाड्याच्या 10 % इतकी रक्कम वजा केली पाहीजे. परंतू सोलापूर महानगरपालिका वार्षिक भाड्याच्या 15 % एवढी रक्कम भाड्यातून महानगरपालिका ठरावानुसार वजा करत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे 13.08 कोटी एवढ्या रकमेचे नुकसान झालेले आहे. 2005 ते 2011 पर्यंतचा तपशील परिशिष्ट क्र.(4)मध्ये दिलेला आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 नियम 7 नुसार करयोग्य मुल्य ठरविण्यात येवुन वसुली करण्यात यावी.

2009-10 आर्थिक वर्षा मध्ये 32.33 कोटी मालमत्ताकराची मागणी होती. 2011-12 मध्ये कर निर्धारण धरुन मागणी मध्ये वाढ होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात 30.03 कोटी एवढी कमी मागणी नोंदविण्यात आलेली दिसते. 2011-12 मध्ये कमी मागणी का झाली याबाबत लेखापरिक्षणास खुलासा देण्यात आलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.97 दि.28/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 45, Hmm No : 97)

## *47 शहरहद्दवाढ विभागाने अवैध इमारतीवर शास्ती न बसविल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 286209.00/-

***बांधकाम परवाना मध्ये घेतलेल्या मंजूर मोजमापा पेक्षा जास्तीचे बांधकाम केलेली इमारत ही अधिनियमानुसार विनापरवाना ठरत असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 नियम 267 अ नुसार शास्ती लावणे आवश्यक त्याप्रमाणे कार्यवाही शहरहद्दवाढ विभागाकडून केली जात नसलेचे सोबत जोडलेल्या परिशिष्टावरुन स्पष्ट होते.***

सोलापूर महानगरपालिका, शहरहद्दवाढ विभागाचा 2011-12 च्या काही कर निर्धारण नस्ती तपासले असता, खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

81) करनिर्धारण नस्ती तपासली असता मालमत्ता धारकाने बांधकाम परवाना मध्ये घेतलेल्या मंजूर मोजमापा पेक्षा जास्तीचे बांधकाम केलेले आहे त्यामुळे मुळ नकाशा मध्ये बदल झालेला दिसून येतो. म्हणुन सदर इमारत ही अधिनियमानुसार विनापरवाना ठरत असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 15 नियम 267 अ नुसार शास्ती लावणे क्रमप्राप्त आहे, परंतू सदरची कार्यवाही शहरहद्दवाढ विभागाकडून केली नाही.

82) परिशिष्ट क्र.(6) मधील करनिर्धारण प्रकरणांच्या नस्ती तपासल्या असता इमारतीचे जेवढे अवैध बांधकाम केले जाते तेवढ्याच बांधकामाला शास्ती लावण्यात येते. सदर शास्ती अवैध केलेल्या बांधकामाला न लावता पूर्ण बांधकामाला लावणे आवश्यक आहे.

83) परिशिष्टामधील करनिर्धारण नस्ती तपासल्या असता खालील दर्शविलेल्या तक्त्यामधील मालमत्ता धारकानी बांधकाम परवानगीप्रमाणे बांधकाम न केल्याने त्यांचे कडून शास्तीची रक्कम रु.286209/- वसुल करणेत यावी. तसेच 2011-12 मध्ये करनिर्धारण झालेल्या सर्व नस्ती पुन्हा तपासून त्यानुसार मालमत्ताधारक यांचे कडून शास्तीची रक्कम वसुल करणेत यावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.127 दि.20/11/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 52, Hmm No : 127)

## ***48 शहरहद्दवाढ कर दप्तर व मालमत्ता कराची थकबाकी वसुल केली नसले बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 489000000.00/-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.76/1 नमुना 47 आकारलेल्या कर मागणीची नोंद वही, नियम क्र.78/3 नमुना क्र.50 कराची दैनिक वसुली नोंद वही, नियम क्र.81/2 नमुना क्र.51 नुसार नोटीस व वारंट फी नोंद वही ठेवलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका, कर संकलन विभागातील नोंदी रजिस्टर तपासले असता, खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

84) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.74 नमुना क्र.43 नुसार कर निर्धारण सूची रजिस्टर ठेवलेले नाही.

85) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.75/5 नमुना क्र.44 आकारणी करासंबंधी आक्षेप नोंद वही ठेवलेली नाही.

86) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.75/7 नमुना क्र.46 नुसार करातील वाढ व घट यांची नोंद वही ठेवलेली नाही.

87) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.76/1 नमुना 47 आकारलेल्या कर मागणीची नोंद

वही ठेवलेली नाही.

88) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.78/3 नमुना क्र.50 कराची दैनिक वसुली नोंद वही ठेवलेली नाही.

89) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.81/2 नमुना क्र.51 नुसार नोटीस व वारंट फी नोंद वही ठेवलेली नाही.

90) उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नमुन्यानुसार कर संकलन विभागाने दप्तर ठेवलेले नाही.

91) सोलापूर महानगरपालिका शहरहद्दवाढ विभागातील मागणी रजिस्टर तपासले असता, 2011-12 ची थकबाकीसह मागणी 68.35 कोटी आहे. पैकी 2011-12 मध्ये थकबाकीसह एकूण वसुली रु.19.45 कोटी झाल्याने वसुली ची टक्केवारी फक्त 28.46 % असल्याचे दिसून येते. दि.31 मार्च 2012 पर्यंत थकबाकी रु.48.90 कोटी एवढी आहे. सदर थकबाकी वसुली बाबत शहरहद्दवाढ विभागाने ठोस कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड मधील प्रकरण 8 नियम क्र.41 प्रमाणे नोटीस देणे आवश्यक आहे. व 15 दिवसाचे आत रक्कम भरली नाही तर नियम क्र.42 नुसार वसुलीच्या खर्चासह आयुक्ताने नमुना ह मध्ये काढावयाच्या अधिपत्रान्वये कसूरदाराची जंगम व स्थावर मालमत्ता आटकावणी करुन तिची विक्री करुन तो कर वसुल करणे आवश्यक असता म.न.पाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. प्रलंबीत मालमत्ता कराचे परिशिष्ट क्र. (7) सोबत जोडण्यात आले आहे. या परिशिष्टानुसार असलेली प्रलंबित मालमत्ता कर थकबाकी रु.48,90,00,000/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.128 दि.18/11/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 53, Hmm No : 128)

## *49 शहरहद्दवाढ विभागाने मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यातून 15 % वजावट नियमबाहयपणे केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 72400000.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 नियम 7 प्रमाणे कर योग्य मूल्य ठरविण्यासाठी ज्या वार्षिक भाड्याने जमीन किंवा इमारत वर्षावर्षाने वाजवी रित्या भाड्याने देता येईल अशी अपेक्षा असेल***

***अशा वर्षिक भाड्याच्या रकमेतून उक्त वार्षिक भाड्याच्या 10 % इतकी रक्कम वजा केली पाहीजे. परंतू महानगरपालिकेने वार्षिक भाड्याच्या 15 % एवढी रक्कम करमुल्य भाड्यातून महानगरपालिका ठरावानुसार वजा केलेने 7.24 कोटी एवढ्या रकमेचे नुकसान झालेले आहे***

सोलापूर महानगरपालिका शहरहद्दवाढ विभागातील करयोग्य मूल्य नस्ती तपासले असता, खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 नियम 7 प्रमाणे कर योग्य मूल्य ठरविण्यासाठी ज्या वार्षिक भाड्याने जमीन किंवा इमारत वर्षावर्षाने वाजवी रित्या भाड्याने देता येईल अशी अपेक्षा असेल अशा वर्षिक भाड्याच्या रकमेतून उक्त वार्षिक भाड्याच्या 10 % इतकी रक्कम वजा केली पाहीजे. परंतू सोलापूर महानगरपालिका वार्षिक भाड्याच्या 15 % एवढी रक्कम करमुल्य भाड्यातून महानगरपालिका ठरावानुसार वजा करत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे 7.24 कोटी एवढ्या रकमेचे नुकसान झालेले आहे. 2005 ते 2011 पर्यंतचा तपशिलाचे परिशिष्ट क्र.(8)जोडणेत आले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.129 दि.20/11/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 54, Hmm No : 129)

## *50 शहर हद्दवाढ विभागातील नविन कर निर्धारणामधील त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 28428.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) (ड) नुसार या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेताच किंवा अशा परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन जमिनीवर बांधकाम केले असलेने अशा अवैध बांधकामावर बसवणे योग्य मालमत्ता कराचे दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असलेने त्यांचेकडून शास्तीची रक्कम वसुल करणेत यावी.***

कुमठे पेठ क्र. 54 मधील नवीन कर आकारणी नस्ती तपासल्या असता नस्ती सोबत मालमत्ता धारक यानी रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, तसेच 100/-रु.मुद्रांक शुल्कावर प्रतिज्ञा पत्र दिलेले आहे. व त्यानुसार मालमत्ता

कर आकारणी केलेली आहे. मालमत्ता धारक यांनी सदरचे बांधकाम कधी केले याचा नस्ती मध्ये कोणताही पूरावा नाही. वरील तिन्ही पूरावे तपासले असता 2009-10, 2010-11 या वर्षाचे आहेत. त्यामुळे सदर इमारतीला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) (ड) नुसार वार्षिक मालमत्ता कर रु. 4738/- च्या दुप्पट दराने शास्ती रु.9476/- x 3वर्षे = रु. 28428/- वसुल करणेत यावी. सोबत परिशिष्ट क्र.(9) जोडले आहे. तसेच 11/12 मध्ये करनिर्धारण झालेल्या अन्य मालमत्ताधारकांचा शोध घेवुन त्यांना मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 नियम क्र. 267(3) नुसार दुप्पट दराने शास्ती लावण्यात यावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.130 दि.21/11/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 55, Hmm No : 130)

## *51 घरपटटी विभागातील नवीन कर आकारणीमधील त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 52241.00/-

***साहिल कॉम्प्लेक्स या इमारतीमधील मालमत्ता धारकाकडून मागील थकबाकी पोटी एकुण रु.52,241 वसुल करणेत यावी.***

सोलापूर महानगरपालिका शहरहद्दवाढ विभागातील 2011-12 ची नवीन कर आकारणी नस्ती तपासली असता, खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

साहिलनगर, मजरेवाडी क्र.22/51 मधील साहिल कॉम्प्लेक्स या इमारतीची नवीन कर आकारणी नस्ती तपासली असता सदर इमारतीसाठी बांधकाम परवाना क्र.597 दि.26/7/2007 ने दिला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना कायदा 1966 कलम 48 नुसार तसेच बांधकाम परवानगी अर्जामधील अट क्र.13 नुसार हा दाखला एक वर्षापर्यंत अस्तित्वात राहिल व काम पूर्ण न झालेस परवानगीची मुदत वाढवून घेणे आवश्यक आहे.त्यामुळे बांधकामाची मुदत ही दिलेल्या तारखेपासून एक वर्षापर्यंत आहे. म्हणजे सदर इमारतीला 1/8/2008 पासून कर आकारणी करणे आवश्यक होते. प्रत्यक्ष सदर इमारतीतील मिळकत क्र.60 ची आकारणी नस्ती तपासली असता मिळकत दाराने ज्या दिवशी सदर मिळकत विकत घेतलेली आहे. त्या दिवसापासून कर आकारणी केलेली आहे. म्हणजे 20/8/2009 पासून कर आकारणी केलेली आहे. म्हणुन सदर मालमत्ता धारक यांचे कडून मागील एक वर्षाची थकबाकी रु.3073 एवढी वसुलपात्र होत आहे. सदर इमारती मध्ये एकूण 17 मालमत्ता असून त्यांचे

कडून मागील थकबाकी पोटी एकुण रु.52,241/- वसुल करावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि.22/11/2013 चे उत्तर दिलेले नाही.

वसूलपात्र रक्कम रु.52241.00

DPSKGGM6001 (Ref No : 56, Hmm No : 131)

## ***52 मालमत्ता कराच्या थकीत रकमेवर 2% शास्ती लावली नसलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 208563009.00/-

***मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 नियम क्र.41 नुसार थकबाकीवर शास्ती वसुल करणे आवश्यक असता ती न केलेने महानगरपालिकेचे रु.208562969/- आर्थिक नुकसान झालेले आहे.***

सोलापूर महानगरपालिका कर संकलन विभागातील 2011-12 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर थकबाकीची नस्ती तपासली असता एकूण थकबाकी 81,01,43,109 एवढी आहे. तसेच शहर हद्दवाढ विभागाची थकबाकी रु.348540280/- एवढी आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 नियम क्र.41 नुसार अधिनियम 2009 च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी या अधिनियमान्वये ज्यासाठी बिल देण्यात आले आहे. असा कोणताही मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशतः अदत्त राहीला असेल, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती उक्त 2009 च्या सूधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व दिनांकापासून, या कलमान्वये तरतूद केल्या प्रमाणे, अशा करा वरील शास्ती भरण्यास जबाबदार असेल.त्याप्रमाणे उपरोक्त थकबाकीवर दरमहा 2 % प्रमाणे 9 महीन्याचे 18 % व्याज धरुन करसंकलन विभागाच्या थकबाकीवर रु. 14,58,25,759/- इतकी शास्ती होत आहे. तसेच शहर हद्दवाढ विभागाच्या थकबाकीवर रु.6,27,37,250/- इतकी शास्ती होत असुन सदर रक्कम मालमत्ता धारक यांचे कडून वसुल करण्यात यावी तोपर्यंत सदरची रक्कम वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

वसूलपात्र रक्कम: कर संकलन विभाग- रु.14,58,25,759/- ,

शहर हद्दवाढ विभाग- रु.6,27,37,250/-

अर्धसमास ज्ञापन क्र.133 दि.22/11/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 57, Hmm No : 133)

## ***53 शिक्षण कर व नौकर शाश्वती कर विहित मुदतीत जमा केला नसलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महनगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***शिक्षण कर व नौकर शास्वती कर वसुल केलेल्या महिन्यापासून पूढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत शासन तिजोरीत जमा करणे क्रमप्राप्त असताना हद्दवाढ विभागातील माहे एप्रिल 2011 ते ऑक्टोंबर 2011 या कालावधीचा शिक्षण कर दि.30/03/2012 रोजी म्हणजे 7 महिने विलंबाने शासन तिजोरीत जमा केलेला आहे.***

शहर हद्दवाढ विभागाने 2011-12 या आर्थिक वर्षात शिक्षण कर व नौकर शास्वती कर खालील प्रमाणे जमा केलेला आहे.

शिक्षण कर रु.1,80,91,354/-

नौकर शास्वती कर रु.1832342/-

शिक्षण कर व नौकर शास्वती कर वसुल केलेल्या महिन्यापासून पूढील महिन्याच्या 10 तारखेच्या आत शासन तिजोरीत जमा करणे क्रमप्राप्त असताना माहे एप्रिल 2011 ते ऑक्टोंबर 2011 या कालावधीचा शिक्षण कर दि.30/03/2012 रोजी शासन तिजोरीत जमा केलेला आहे. म्हणजेच उशिरात उशिरा 7 महिने शिक्षण कर शासन तिजोरीत जमा केलेला आहे. तसेच माहे नोंव्हेंबर 2011 ते डिसेंबर 2012 या कालावधीचा शिक्षण कर दि.04/01/2013 रोजी शासन तिजोरीत जमा केलेला आहे.

तसेच माहे जाने.2012 चा शिक्षण कर रु.53,26671 व रोजगार हमी कर रु.553391, दि.8/3/2013 रोजी शासन तिजोरीत भरणा केलेला आहे. सबब शासनाच्या रकमा शासन तिजोरीत वेळेवर भरणा न केल्याचे स्पष्ट होते.

अर्धसमास ज्ञापन क्र.136 दि.26/11/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 60, Hmm No : 136)

## ***54 मोबाइल टॉवर थकबाकीवर शास्ती आकारली नसलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मालमत्ता कर महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 117651.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण 8 कराधान नियम 41 अन्वये मोबाईल टॉवर थकबाकीवर वार्षिक 18% प्रमाणे शास्ती वसुल करणे आवश्यक असता, ती करणेत आलेली नाही.***

मोबाईल टॉवरचे कर निर्धारण प्रपत्र व भोगवटाधारकांना देण्यात आलेल्या बिलांचे लेखापरीक्षण केले असता, सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. (10) मध्ये नमूद भोगवटाधारकांचे कडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम 41 अन्वये थकबाकीवर वार्षिक 18% प्रमाणे शास्ती वसुल करणे आवश्यक असता, ती करणेत आलेली नाही. तरी भोगवटाधारकांच्या थकबाकी वरील रू.1,17,651/- इतकी शास्तीची रक्कम वसुल करणेत यावी.

अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये वसुलीची बाब मान्य केलेली नाही व त्याचे समर्पक कारणही दिलेले नाही.नियमानुसार शास्तीची रक्कम वसुल करणेत यावी.

DATSBKM7201 (Ref No : 91, Hmm No : 108)

## 55 नवीन मालमत्ता कर आकारणी चुकीची केलेने झालेल्या नुकसानी बाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करसंकलन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 25853.00/-

***अनधिकृत बांधकाम केल्याने अवैध इमारतीना मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 नियम 267 प्रमाणे दुप्पट दराने शास्ती लावणे आवश्यक होते, परंतु तशी रु.25853/-शास्ती लावुन वसुल केली नाही.***

सोलापूर महानगरपालिका कर विभागातील 2011-12 मधील नवीन मालमत्ता कर आकारणी नस्ती तपासली असता,खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

92) ज्या वर्षी मालमत्ता तयार झाली त्या वर्षी त्या इमारतीला मालमत्ता कर आकारणी केलेली नसून बहुतांश मालमत्ता यांना उशिराने कर आकारणी करणेत आलेली आहे. परिशिष्टामधील मालमत्तांना

15 वर्षांनी कर आकारणी केलेली आहे. मालमत्ता कराची आकारणी उशिराने केल्यामुळे मालमत्ता कर महानगरपालिकेला उशिराने प्राप्त झाला आहे. उशिरा कर आकारणी केलेले परिशिष्ट क्र. (13) जोडलेले आहे.

93) महानगरपालिकेची बांधकाम करण्यासाठी परवानगी न घेता काही मालमत्ता धारक यांनी इमारतीचा काही भाग अनधिकृत बांधला आहे. मुं.प्रा. अधि.1949 नियम 267 ( अ) अन्वये इमारतीच्या काही भागाचे अवैधरित्या बांधकाम केले असल्यास , ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम राहील तोपर्यंत प्रतीवर्षी , अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता करा च्या दुपटीइतकी शास्ती भरण्यास पात्र असेल . सदर अनधिकृत बांधकामावर दुप्पट दराने शास्ती लावणे क्रमप्राप्त असताना तसे न करता फक्त परवानगी न घेतलेल्या अवैध बांधकामाला शास्ती लावलेली आहेत. त्यामुळे मुं.प्रा. अधि.1949 नियम 267 ( अ) चे उल्लंघन झालेले आहे. तसेच यापुढे अशा इमारतीचा शोध घेऊन दुप्पट दराने शास्ती लावून वसुल करावी. खालील प्रमाणे दोन उदाहरणे अनधिकृत बांधकाम केलेबाबत देण्यात येत आहे.

94) शैलेश छगनलाल पोरवाला, मिळकत क्र.51045, बांधकाम परवाना क्र.395 दि.17/06/2010 नुसार तळमजला व पहिल्या मजल्यासाठी बांधकाम परवानगी देण्यात आली होती. परंतु सदर मालमत्ता धारकांनी दुस-या मजल्यावर अनधिकृत बांधकाम केल्याने सदर इमारतीला मुं.प्रा. अधि.1949 नियम 267 प्रमाणे दुप्पट दराने शास्ती लावणे आवश्यक होते, परंतु तशी शास्ती लावण्यात आलेली नाही.

95) कर आकारणी केलेली रक्कम:- एकूण क्षेत्रफळ 1916 x 300 = 574800 x 6 %=34488 च्या 15% कमी कर आकारणी मुल्य रु.29315/- च्या 48% एकूण मालमत्ता कर 14071/- येत असुन अनधिकृत बांधकाम असल्याने दुप्पट दराने रु.28142/- कर आकारणी करणे आवश्यक होते.

96) एकूण क्षेत्रफळ 1916 x 600 =1149600 x 6 % =68976 च्या 15 % कमी कर आकारणी मुल्य रु.58630 x48% एकूण वार्षिक मालमत्ता कर रु.28142/- आकारणे आवश्य्क असल्याने दि. 01/09/2011 ते मार्च 2012 या सात महिन्यांकरीता रु.16416/- मालमत्त कर वसुलपात्र आहे.

97) विजयकुमार कल्याण पाटील, मिळकत क्र.303370, बांधकाम परवानगी क्र.196 दि.30/05/2009 तळमजला व पहिला मजल्यासाठी बांधकाम परवानगी देण्यात आलेली होती. परंतु सदर मालमत्ता धारकांनी दुस-या मजल्यावर अनधिकृत बांधकाम केल्याने सदर इमारतीला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नियम 267 प्रमाणे दुप्पट दराने शास्ती लावणे आवश्यक होते. परंतु तशी शास्ती लावण्यात आलेली नाही. कर आकारणी केलेली रक्कम एकूण क्षेत्रफळ 1285 चौ.फु. xरु.300 = रु.385500 x 6% = 23130 च्या 15% कमी कर आकारणी मुल्य रु.19660/- च्या 48% एकूण मालमत्ता कर रु.9437/- लागु आहे. अनधिकृत बांधकाम असल्याने खालील प्रमाणे कर आकारणी करणे आवश्यक होते.

98) एकूण क्षेत्रफळ 1285 चौ.फु. x रु.600 = 771000 x 6% = 46260 च्या 15% कमी कर आकारणी मुल्यावर रु.39321 x 48% एकूण वार्षिक मालमत्ता कर रु.18874/- होत असलेने रक्कम रु.9437/-

वसुल करणेत यावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.77 दि.07/10/2013 ला दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 139, Hmm No : 77)

## *56 बसवेश्वर नगर येथे 0.6 दशलक्ष लिटरच्या दोन टाक्या बांधणे या कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4465282.00/-

***बसवेश्वर नगर येथील उंच पाण्याच्या टाकीवर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.1,48,84,274/- झालेला आहे. निविदा 22.30% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 44,65,282/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.***

कामाची किंमत :- रु.12674500/- पुर्वगणन पत्रकः-रु.12674500/-

विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.12/4/2008.

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.257, दि.01/12/2007 .

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007 .

ठेकेदाराचे नावः-असोशिएटेड इंजिनियर्स

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/250 दि.10/07/09

कामाची मुदत :- 18 महिने (दि.09/01/11) मुदतवाढः- मार्च 2012 अखेर

स्थायी समिती ठराव क्र .1774 दि.21/02/2009 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार पाइपची बाब वगळून फक्त उंच टाकीचे काम रु .4736901/-चे 22.30% जास्त दराने मंजूर करणेत आले आहे . 06/07 चे DSR प्रमाणे टाकीचे पुर्वगणनपत्रक रू .4736901/- होत असून 08/09 चे DSR प्रमाणे कामाची किंमत रु .5796192/- होते. रु.4736901/- चे 22.30%प्रमाणे रु.5793930/- ची तुलना 08/09 चे DSR शी केलेस एस्टीमेट दराने निविदा मंजूर करणेत आली आहे.

प्रमाणक/ धनादेश क्र. दिनांक रक्कम मोजमाप क्र. पा. नं. धावते बील क्र.

सोलापूर महानगरपालिका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4961/62 | 04/07/11 | 258535 | 108 | 41 ते 44 | 3 |
| 10252/2 | 06/10/11 | 452436 | 108 | 45 ते 49 | 4 |
| 19530/31 | 17/02/12 | 485222 | 143 | 58 ते 60 | 5 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

टाकी बांधणेचे कामावर 2011-12 पर्यंत एकूण खर्च रु. 1,48,84,274/- झालेला आहे. निविदा 22.30% जादाने आलेने जादाची रक्कम रु . 44,65,282/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे. शासन निधीतून खर्च केलेली रक्कम रु. 44,65,282/-आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापनास दि .13/01/2014रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 /नवि-33 दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50% पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून व 50% रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु. 44,65,282/-

DATSBKM7201 (Ref No : 61, Hmm No : 138)

## *57 कुमठेगाव येथे टाकीजवळ 1 दशलक्ष लिटरची उंच टाकी बांधणेसाठी महानगरपालिका निधीमधुन रक्कम आदा केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1504510.00/-

***कुमठेगाव येथे टाकीजवळ 1 दशलक्ष लिटरची उंच टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु. 3761277/- झालेला आहे. निविदा 40% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 1504510/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आलेली आहे.***

UIDSSMT योजनेसाठी केंद्र शासनाकडुन दि.26/05/2009 रोजी रु.28.79 कोटी अनुदान प्राप्त असून राज्य शासनाकडुन दि.04/09/10 रोजी रु.3.59 कोटी पहिल्या हप्त्या पोटी प्राप्त झालेले आहे. एकुण योजनेचा

मंजूर खर्च रु.71.99 कोटी इतका आहे.सदर अनुदानामधुन कुमठेगाव येथे टाकीजवळ 1 दशलक्ष लिटरची उंच टाकी बांधणेचे काम करणेत येत आहे.

कामाची किंमत :- रु.3922755/- पुर्वगणन पत्रकः-रु.4667500/-

विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.12/4/2008

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.257, दि.01/12/2007

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007

स्थायी समिती ठराव क्र.777 दि.22/08/2008 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 40% जादा दराने मंजूर करणेत आली आहे. 07/08 चे DSR नुसार कामाची किंमत 41% ने वाढलेने 07/08 चे DSR शी तुलना केली असता 07/08 चे एस्टीमेट दराने निविदा मंजूर करणेत आली आहे.

ठेकेदाराचे नावः- एल.के.कंन्स्ट्रक्शन

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/846 दि.12/12/08

कामाची मुदत :- 18 महिने (दि.12/06/10) मुदतवाढः- 11/10/12 अखेर

2011-12 या आर्थिक वर्षात कामावर झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

| प्रमाणक/ धनादेश क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी.क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 6565/66 | 23/05/11 | 409236 | ---- | 115 ते 118 | 3 |
| 153315/16 | 01/06/11 | 158403 | ---- | 109 ते 111 | 4 |
| 19522/23 | 17/02/12 | 154355 | ---- | 117 ते 119 | 5 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु. 3761277/- झालेला आहे. निविदा 40% जादाने आलेने जादाची रक्कम रु.1504510/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे. शासन निधीतून खर्च केलेली रक्कम रु.1504510/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.139 दि.4/12/2013 च्या दि.13/01/2014 रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 / नवि-33 दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50 % पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे. परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु. 1504510/-

DATSBKM7201 (Ref No : 62, Hmm No : 139)

## *58 मजरेवाडी 2+2 दशलक्ष लिटरच्या उंचावरील पाण्याच्या टाक्या बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4841368.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 35585.00/-

***मजरेवाडी येथे उंचावरील पाण्याच्या टाक्यांच्या बांधकामाकरीता M 250 सिमेंट कॉंक्रिट करण्याचे एकुण काम 1122.44 घन मि.केले असून महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना गौणखनि-10/2006/पी.के.-57/के.एच.(1) दि.15/12/2006 नुसार रॉयल्टी रु.35.67 प्रति घन मि. प्रमाणे रु.35585.34/- वसुल केली नसल्याने वसुल करण्यात यावी.***

कामाची किंमत :- रु.25466290/-

विभागीय दरसूची 07-08, जाहीर प्रसिध्दीकरण दि.17/07/2009

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.2, दि.20/05/2009

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणेपत्र क्र.2210 दि.21/8/2007

स्थायी समिती ठराव क्र.944 दि.21/08/2009 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 30%जादा दराने मंजूर करणेत आली आहे.पुर्वगणनपत्रकाची सन 08/09चे DSRशी तुलना केली असता निविदा 32.86%जादाने येते.परंतु ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 30%जादा दराने निविदा मंजूर करणेत आली आहे.

ठेकेदाराचे नावः- दास ऑफशोअर

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/425 दि.24/08/09

कामाची मुदत :- 20 महिने (दि.20/04/11) मुदतवाढः- मार्च 2013 अखेर

| प्रमाणक | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1572/73 | 06/05/11 | 3422917 | 139 | 50 ते 60 | 5 |
| 15350/51 | 23/09/11 | 1150258 | 139 | 61 ते 66 | 6 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

99) टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु. 11041626/- झालेला आहे. निविदा 30% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 4841368/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आलेली आहे. शासन निधीतून खर्च केलेली रक्कम रु. 4841368/-

आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

100) M 250 सिमेंट कॉंक्रिट करणे एकुण काम 1122.44 घन मि.केले असून महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना गौणखनि-10/2006/पी.के.-57/के.एच.(1) दि.15/12/2006 नुसार रॉयल्टी रु.35.67 प्रति घन मि. प्रमाणे रु.35585.34/- वसुल केली नसल्याने वसुल करण्यात यावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.139 दि.4/12/2013 च्या दि.09/01/2014 रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र.127/09/नवि-33 दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50 %पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही.

अंदाजपत्रक तयार करताना रॉयल्टीची रक्कम गृहीत धरणेत आली नसल्याने वसुल केलेली नसल्याचे नमुद आहे. रॉयल्टी हा राज्य शासनाचा महसुल असलेने महानगरपालिका निधीतुन भरणेत यावा.

वसुल पात्र रक्कम रु.35585.34/-

आक्षेपाधिन रक्कम रु. 4841368/-

DATSBKM7201 (Ref No : 63, Hmm No : 140)

## *59 केगाव येथे 0.8 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम आदा केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 964597.00/-

***केगाव येथे 0.8 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी 2011-2012 पर्यंत एकूण खर्च रु. 2893792/- झालेला आहे. निविदा 50% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 964597/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.***

कामाची किंमत :- रु.5121722/- पुर्वगणन पत्रकः-रु.6090500/-

विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.12/04/2008

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.164, दि.12/10/2006

सर्वसाधारण सभा ठराव क्र.255, दि.01/12/2007 ने कामाचे निविदा मागवणेस मान्यता

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007

स्थायी समिती ठराव क्र.715 दि.14/08/2008 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 69 % ऐवजी 50 % जादा दराने मंजूर करणेत आली. पुर्वगणनपत्रकाची सन 07/08 चे DSR शी तुलना केली असता निविदा 53%जादाने येते.परंतु ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 50% जादा दराने निविदा मंजूर करणेत आली आहे.

ठेकेदाराचे नावः- आसोशिएटेड इंजिनियर्स

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/799 दि.01/12/08

कामाची मुदत :- 18 महिने (दि.30/06/10) मुदतवाढः- डिसेंबर 2012 अखेर

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 19546/47 | 17/02/12 | 293577 | 35 | 51 ते 59 | 7 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु. 2893792/- झालेला आहे. निविदा 50% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 964597/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.

अर्धसमास ज्ञापनास दि.09/01/2014रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 / नवि-33दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50 % पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही.

DATSBKM7201 (Ref No : 64, Hmm No : 141)

## ***60 बाळेगाव येथे 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम आदा केली नसलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 974160.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4851.00/-

***बाळेगाव येथे 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.***

***3359175/- झालेला आहे. निविदा 29% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 974160/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.***

कामाची किंमत :- रु.16871473/- पुर्वगणन पत्रकः-रु.20071500/-

विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.12/04/2008

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.164, दि.12/10/2006

सर्वसाधारण सभा ठराव क्र.255, दि.01/12/2007 ने कामाचे निविदा मागवणेस मान्यता दिली आहे.

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007

स्थायी समिती ठराव क्र.1740 दि.13/02/2009 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार पाइपचे दर कमी झालेने पाइप महानगरपालिकेने खरेदी करुन पुरविणेचे मान्य करणेत आले व पाण्याच्या टाकीचे कामाची 08/09 चे DSR शी तुलना केली असता 07/08 चा DSR 29.21% वाढल्याने निविदा 72% ऐवजी 29% जादा दराने मंजूर करणेत आली आहे.

ठेकेदाराचे नावः- एल.के. कंन्स्ट्रक्शन

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/266 दि.12/06/09

कामाची मुदत :- 18 महिने (दि.11/12/10) मुदतवाढः- मार्च 2013 अखेर

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी.क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 6544/47 | 30/10/12 | 610789/- | 147 | 19 ते 26 | 5 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

1. टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु. 3359175/- झालेला आहे. निविदा 29% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 974160/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.

2. M 250 सिमेंट कॉक्रिट करणे एकुण काम 140.5 घन मि.केले असून महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना गौणखनि-10/2006/पी.के.-57/के.एच.(1) दि.15/12/2006 नुसार रॉयल्टी रु.35.67 प्रति घन मि. प्रमाणे रु.4851/- वसुल केली नसल्याने वसुल करण्यात यावी.

अर्धसमास ज्ञापनास दि.09/01/2014रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 / नवि-33 दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50 %पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही.

अंदाजपत्रक तयार करताना रॉयल्टीची रक्कम गृहीत धरणेत आली नसल्याने वसुल केलेली नसल्याचे नमुद आहे. रॉयल्टी हा राज्य शासनाचा महसुल असलेने महानगरपालिका निधीतुन भरणेत यावा.

DATSBKM7201 (Ref No : 65, Hmm No : 142)

## *61 कुमठानाका डीएसपी टाकीजवळ 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम आदा केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3452562.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 15000.00/-

***कुमठानाका डीएसपी टाकीजवळ 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे या कामाचा करारनामा रु.100 चे मुद्रांकावर केलेला आहे. महसूल व वनविभाग अधिसुचना दि.23/4/2006अन्वये मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34,नुसार 15100/- मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक होते. त्यामुळे रु.15000/- वसुल करण्यात यावे.***

कामाची किंमत :- रु.11625534/- पुर्वगणन पत्रकः-रु.13830500/-

विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.19/05/2007

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.5, दि.16/04/2007 कामाची निविदा मागवणेस मान्यता

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007 .

स्थायी समिती ठराव क्र.322 दि.31/05/2008 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 38% जादा दराने मंजूर करणेत आली आहे. पुर्वगणनपत्रकाची 07/08 चे DSR शी तुलना केली असता निविदा 38% जादाने येते.

ठेकेदाराचे नावः- प्रगति कंन्स्ट्रक्शन

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/307 दि.30/06/08

कामाची मुदत :- 18 महिने (दि.11/12/10) मुदतवाढः- मार्च 2013 अखेर

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ---- | ---- | 3295003/- | 554 | 77 ते 83 | 9 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

1. टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु. 9085689/- झालेला आहे. निविदा 38% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 3452562/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून

खर्च करण्यात आली आहे.

2. कामाचा करार रु.100 चे मुद्रांकावर केलेला असून मुद्रांक शुल्क अधिनियम 2006 नुसार 15100/- मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक होते. त्यामुळे रु.15000/- वसुल करण्यात यावे.

3.प्रमाणके लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाहीत.

अर्धसमास ज्ञापन क्र.143, 5.12.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 66, Hmm No : 143)

## *62 जूळे सोलापुर एम.बी.आर. टाकीजवळ 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम आदा केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5714029.00/-

***जूळे सोलापुर एम.बी.आर. टाकीजवळ 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.146513571/- झालेला आहे. निविदा 39% जादाने आलेने जादाची रक्कम रु.5714029/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.***

कामाची किंमत :- रु.13056617/- पुर्वगणन पत्रकः-रु.15533000/-

विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.19/05/2007

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.164, दि.12/10/2006कामाचे निविदा मागवणेस मान्यता

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007

स्थायी समिती ठराव क्र.224 दि.31/05/2008ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 39 % जादा दराने मंजूर करणेत आली आहे.कामाच्या नस्तीमधील पान क्र.127वर निविदादराची तुलना मार्केट दराशी दरपृथःकरण करणेत आली असुन त्याप्रमाणे निविदा39.66% जादाने येते.

ठेकेदाराचे नावः- व्ही.आर.महाजन

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/308 दि.30/06/08

कामाची मुदत :- 18 महिने (दि.30/12/09) मुदतवाढः- मार्च 2013 अखेर

| धनादेश क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी.क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 9614/15 | 17/09/11 | 636215 | ----- | 115ते 117 | 13 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु. 146513571/- झालेला आहे. निविदा 39% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 5714029/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 67, Hmm No : 144)

## *63 हायलेव्हल टाकीजवळ (महानगरपालिका स्टोअर जवळ) 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3062762.00/-

***हायलेव्हल टाकीजवळ (महानगरपालिका स्टोअर जवळ) 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.8007222/- झालेला आहे. निविदा 38.25% जादाने आलेने जादाची रक्कम रु. 3062762/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.***

कामाची किंमत :- रु.8919301/- पुर्वगणन पत्रकः-रु.10611000/-

विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.12/04/2008

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.256, दि.01/12/2007

कामाचे निविदा मागवणेस मान्यता

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे

पत्र क्र.2210 दि.21/8/2007

स्थायी समिती ठराव क्र.1158 दि.23/10/2008 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 07-08

ची दरसूची व मार्केट दराशी तूलना करुन 72% एवजी 38.25% जादा दराने मंजूर

ठेकेदाराचे नावः-

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/864 दि.05/01/09

कामाची मुदत :- 18 महिने (दि.31/12/10) मुदतवाढः- 01/01/12 अखेर

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी.क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 19932/33 | 17/02/12 | 953780 | 197 | 36 ते 40 | 9 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु. 8007222/- झालेला आहे. निविदा 38.25% जादाने आलेने जादाची रक्कम रु.3062762/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे. अर्धसमास ज्ञापन क्र.145 दि.5/12/2013 ला दि.16/01/2014 रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 /नवि-33दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50 % पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही. शासनाकडुन सदर रक्कम उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

आक्षेपाधिन रक्कम रु.3062762/-

DATSBKM7201 (Ref No : 68, Hmm No : 145)

## *64 हद्दवाढ भागात विविध ठिकाणी वितरण नलिका टाकणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 125836.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5660.00/-

***हद्दवाढ भागात विविध ठिकाणी वितरण नलिका टाकणे या कामाची निविदा 14% जादा दराने आलेने रु.46961160/- मुद्रांक शुल्क रु.45960/- घेणे आवश्यक असता रु.40300/-घेतल्याने रु.5660/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत.***

कामाची किंमत :- रु.41194000/- पुर्वगणन पत्रकः- रु. 1280.35/- लाख
विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.19/12/2009
प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.2, दि.20/05/2009 ने निविदा मागवणेस मान्यता दिली आहे. तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007.
स्थायी समिती ठराव क्र.2538 दि.20/02/2010 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार निविदा दराची तूलना 08-09 चे दरसूचीशी केली असता 27.82% जादाने येते. परंतू मक्तेदारास 14% जादा दराने टेंडर मंजूर करणेत आले आहे.
ठेकेदाराचे नावः- परफेक्ट इंजिनिअरिंग असोशिएटेड प्रा.लि.
कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/7 दि.06/04/10
कामाची मुदत :- 15 महिने (दि.05/07/11) मुदतवाढः- 31/03/12 अखेर

2011-12 या आर्थिक वर्षात कामावर झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 1646/47 | 13/05/11 | 502925/- | 197 | 1 ते 10 |
| 8710/52 | 30/8/11 | 419271/- | 197 | 11 ते 16 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

1. वितरण नलिकेच्या कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.922196/- झालेला आहे. निविदा 14% जादाने आलेने जादाची रक्कम रु.125836/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे. शासन निधीतून केलेला खर्च रु.125836/-आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
2. निविदा 14% जादा दराने आल्याने स्वीकृत निविदा रक्कम रु.46961160 /- वर मुद्रांक शुल्क रु. 45960/- घेणे आवश्यक असता रु.40300/- घेतल्याने रु.5660/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत.

अर्धसमास ज्ञापन क्र.146 दि.05/12/2013 ला दि.09/01/2014 रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 / नवि-33दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50 % पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त घेतलेली नाही.शासनाकडुन सदर रक्कम उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

वसुलपात्र रक्कम रु.5660/-
आक्षेपाधिन रक्कम रु.125836/-

DATSBKM7201 (Ref No : 69, Hmm No : 146)

## *65 कस्तुरबा टाकीजवळ 2 दशलक्ष लिटर उंचावरील टाकी बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2385498.00/-

***कस्तुरबा टाकीजवळ 2 दशलक्ष लिटर उंचावरील टाकी बांधणे या कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.6626385/- झालेला आहे. निविदा 36% जादाने आलेने जादाची रक्कम रु.2385498/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.***

कामाची किंमत :- रु.8944036/- पुर्वगणन पत्रकः-रु.10640500/-
विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.19/05/2007
प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.6, दि.16/04/2007 कामाचे निविदा मागवणेस मान्यता
तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007
स्थायी समिती ठराव क्र.325 दि.31/05/2008 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 36% जादा दराने टेंडर मंजूर करणेत आले आहे.निविदा दराचे मार्केट दराशी दरपृथःकरण करुन तुलना केली असता निविदा 36% जादाने येते.
ठेकेदाराचे नावः- असोशिएट इजिनिअर्स
कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/310 दि.30/06/08
कामाची मुदत :- 18 महिने (दि.31/12/09) मुदतवाढः-28/2/11अखेर

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 10022/23 | 01/10/11 | 979871/- | 475 | 146ते 149 | 10 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

टाकीचे कामावर 10 व्या धावत्या देयका अखेर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.6626385/- झालेला आहे. निविदा 36% जादाने आलेने जादाची रक्कम रु.2385498/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आलेला आहे. शासन निधीतून खर्च केलेली रक्कम रु.2385498/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.147 दि.05/12/2013 ला दि.09/01/2014 रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 / नवि-33दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची

होणारी वाढ 50 % पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही. शासनाकडुन सदर रक्कम उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

आक्षेपाधिन रक्कम रु.2385498/-

DATSBKM7201 (Ref No : 70, Hmm No : 147)

## *66 दहिटणे येथे 0.6 दशलक्ष लि.क्षमतेची उंचावरील टाकी बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1142828.00/-

***दहिटणे येथे 0.6 दशलक्ष लि.क्षमतेची उंचावरील टाकीच्या बांधकामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.3100458/- झालेला आहे. निविदा 36.86% जादाने आलेने जादाची रक्कम रु.1142828/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आलेला आहे.***

कामाची किंमत :- रु.2735292/- पुर्वगणन पत्रकः-रु.3254500/-

विभागीय दरसूची 06-07, जाहीर प्रसिध्दीकरण दि.12/04/2008

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.25, दि.01/12/2007 कामाचे निविदा मागवणेस मान्यता

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे ,पत्र क्र.2210 दि.21/8/2007

स्थायी समिती ठराव क्र.738 दि.22/08/2008 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 60 % जादा ऐवजी 07-08 ची दरसूची व मार्केट दराची तुलना करुन दर पृथ्थकरणाने 36.86 % जादा दराने टेंडर मंजूर करणेत आले आहे.

ठेकेदाराचे नावः- एल.के.कंस्ट्रक्शन

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/696 दि.16/10/09

कामाची मुदत :- 18 महिने (दि.15/04/10) मुदतवाढः-जानेवारी 12 अखेर

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 19524/25 | 17/02/12 | 580570/- | 197 | 41 ते 43 | 8 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

टाकीचे कामावर 8 व्या धावत्या देयका अखेर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.3100458/- झालेला आहे. निविदा 36.86% जादाने आलेने जादाची रक्कम रु.1142828/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आलेला आहे.

अर्धसमास ज्ञापनास दि.16/01/2014रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 / नवि-33दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50 %पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही.

DATSBKM7201 (Ref No : 71, Hmm No : 148)

## *67 भद्रावती येथे 1 दशलक्ष लिटर व मित्रगोत्री येथे 2 दशलक्ष लिटरच्या दोन टाक्या बांधणेसाठी स्वनिधीतुन रक्कम खर्च केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4465282.00/-

***भद्रावती येथे 1 दशलक्ष लिटर व मित्रगोत्री येथे 2 दशलक्ष लिटरच्या दोन टाक्या बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.1,48,84,274/- झालेला आहे. निविदा 30% जादाने आलेने जादाची रक्कम रु.44,65,282/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आली आहे.***

कामाची किंमत :- रु.2,62,55,775/- कामाची मुदत :- 20 महिने

विभागीय दरसूची 07-08, जाहीर प्रसिध्दीकरण दि.17/7/2009

प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.2, दि.20/05/2009

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007

स्थायी समिती ठराव क्र.945 दि.21/08/2009 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 55% जादा ऐवजी 30% जास्तीने टेंडर मंजूर करण्यात आले.सन 08/09च्या DSR शी तुलना करता कामाची किंमत रु.36045434/-येत असुन ती एस्टीमेट दराच्या 37.28 % जास्त येते.परंतु निविदा 30 % जादाने मंजुर करणेत

आली आहे.

ठेकेदाराचे नावः- दास ऑफशोअर

कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/426 दि.24/08/09

कामाची मुदत :- 20 महिने (दि.23/4/11),मुदतवाढ :-मार्च 12 अखेर

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1574/75 | 06/05/11 | 2195149 | 141 | 36 ते 39 | 8 |
| 6560/61 | 31/07/11 | 6,28058 | 141 | 40 ते 46 | 9 |
| 7164/65 | 01/08/11 | 3,89,633 | ---- | 50 ते 53 | 10 |
| 19520/21 | 17/02/11 | 13,59,987 | 141 | 51 ते 61 | 11 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

टाकी बांधणेचे कामावर 11-12 पर्यंत एकूण खर्च रु.1,48,84,274/- झालेला आहे. निविदा 30% जादाने आलेने जादाची रक्कम रु.44,65,282/- महानगरपालिका निधीतून खर्च करणे आवश्यक असता शासन निधीतून खर्च करण्यात आलेली आहे.

M 250 सिमेंट कॉंक्रिट करणेचे एकुण काम 273.10 घन मि.केले असून महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना गौणखनि-10/2006/पी.के.-57/के.एच.(1) दि.15/12/2006 नुसार रॉयल्टी रु.35.67 प्रति घन मि. प्रमाणे रु.9700 वसुल केली नसल्याने वसुल करण्यात यावी.

अर्धसमास ज्ञापनास दि.09/01/2014रोजी दिलेल्या उत्तरामध्ये नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एन.यु.आर.2009/प्र.क्र./09 / नवि-33दि.31/08/2009 ने निविदा दरापेक्षा जादाची होणारी वाढ 50 %पुरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून व 50 % रक्कम कर्ज स्वरुपात उपलब्ध करणार असलेचे नमुद आहे.परंतु त्याप्रमाणे शासनाकडून रक्कम प्राप्त झालेली नाही.

अंदाजपत्रक तयार करताना रॉयल्टीची रक्कम गृहीत धरणेत आली नसलेने वसुल केलेली नसलेचे नमुद आहे. रॉयल्टी हा राज्य शासनाचा महसुल असलेने महानगरपालिका निधीतुन भरणेत यावा.

DATSBKM7201 (Ref No : 72, Hmm No : 150)

### *68 कोंडी एम.बी.आर.ते जूना पुना नाकापर्यंत 1016 मि.मी.व्यासाची एम.एस.पाईपलाइन टाकणे.*

**सूजल निर्माण अभियान**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 369769.00/-

***कोंडी एम.बी.आर.ते जूना पुना नाकापर्यंत 1016 मि.मी.व्यासाची एम.एस.पाईपलाइन टाकणे कामाच्या दरपृथःकरणामध्ये 1 % विमा रकमेचा समावेश आहे, परंतू देयकामधुन विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/ फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विमा कपात केला नसल्याने रु.36976965/- चे 1% प्रमाणे रु.369769/- कपात करणेत यावी.***

कामाची किंमत :- रु.36976965/- पुर्वगणन पत्रकः-रु.39961000/-
विभागीय दरसूची 09-10, जाहीर प्रसिध्दीकरण दि.20/05/2010
प्रशासकिय मान्यता :- सर्वसाधारण सभा ठराव क्र.108, दि.18/06/2010 कामाचे निविदा मागवणेस मान्यता
तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,पत्र क्र.2210 दि.21/8/2007
स्थायी समिती ठराव क्र.396 दि.02/07/2010 ने आयुक्त यांनी ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनुसार 13% जादा दराने टेंडर मंजूर करणेत आली आहे.सर्वात कमीचे ठेकेदाराची 25.20% जादा दराची निविदा मंजुर करणेत आली असुन पाणीपुरवठा विभागाने मार्केट दराशी केलेल्या दरपृथःकरणानुसार 22.72% जादाने येते. ठेकेदाराशी केलेल्या वाटाघाटीनुसार 13% जादा दराने काम करणेस मान्यता दिली आहे.
ठेकेदाराचे नावः- शेठ आणि सूरा कंपनी
कार्यादेश दिनांक :- सार्व.आरोग्य अभि.जा क्र/साआअ/204 दि.13/07/10
कामाची मुदत :- 06 महिने (दि.13/01/11) मुदतवाढः- मार्च 12अखेर

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमापक्र. | पा. नं. | धावते बील क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 126/9,10 | 24/03/11 | 6462970/- | --- | 20 ते 31 | 6 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

सर्वात कमीच्या निविदाधारकाने निविदा 25.20% जादा दराने भरली असून पाणी पुरवठा विभागाने केलेल्या दरपृथःकरणानुसार सदर निविदा दर 22.72% जादाने आला आहे.ठेकेदाराशी केलेल्या वाटाघाटीनुसार 13 % जास्तीने काम करणेस मान्यता दिली आहे. दरपृथःकरणामध्ये 1 % विमा रकमेचा समावेश आहे, परंतू देयकामधुन 1 % विमा कपात केला नसल्याने रु.36976965/-चे 1% प्रमाणे रु.369769/- कपात करणेत यावी. अर्धसमास ज्ञापन क्र.151 दि.5/12/2013 ला दि.13/01/2014 रोजी दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

DATSBKM7201 (Ref No : 73, Hmm No : 151)

## *69 सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्र येथील पंपींग मशिनरी नुतनीकरण करणे या कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सोरेगाव जल शुध्दीकरण राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 43196532.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 949384.00/-

***सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्र येथे वापरलेल्या पंपींग मशिनरी साहित्याचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्याचे आहे. परंतु लेखापरिक्षण करुन न घेताच देयके अदा केली आहेत. 2011-12 वर्षामध्ये ठेकेदारास रु.43196532/- ची देयके देणेत आलेली आहेत. 2013-14 वर्षाचे अर्थसंकल्प पुस्तक पान क्र.88 अनु.क्र.21 वर सोरेगाव जलशुद्धिकरण केंद्र नुतनीकरण करणे या लेखाशिर्षाखाली 2011-12 वर्षाच्या नक्की आकडे मध्ये तसेच वर्गीकरण नोंदवहीमध्ये सदर खर्च अंतर्भुत केलेला नाही. म.न.पा वर्गीकरण नोंदवहीवरुनच पुढील वर्षाचा अर्थसंकल्प तयार करण्यासाठी जमा खर्चाचे नक्की आकडे घेत असल्याने सदर बाबीचे लेखांकन परिपूर्ण करणे आवश्यक असता लेखाशाखा योग्य ती खबरदारी घेत नसल्याचे दिसून येते.***

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी.क्र./पान.क्र. |
|---|---|---|---|---|
| 4 | 14826/27 | 30/11/2011 | 6481078 | 1/31ते32 |
| 2 | 14040/50,51 | 22/11/2011 | 1481644 | 1/31ते32 |
| 3 | 14828/29 | 30/11/2011 | 5759594 | 1/32ते35 |
| 4 | 14040/52 | 22/11/2011 | 3347919 | 1/35ते39 |
| 5 | 16184/85 | 08/12/2011 | 2503075 | 1/39ते44 |
| 6 | 19725/26 | 24/02/2012 | 8604139 | 1/44ते54 |
| 7 | 19727/28 | 24/02/2012 | 903582 | 1/49 |
| 8 | 21340/41 | 27/03/2012 | 553871 | 1/53 |
| 9 | 21548/49 | 29/03/2012 | 2972453 | 1/54ते49 |

सोलापूर शहरातील काही भागात उद्भवलेल्या गॅस्ट्रो व कॉलरा साथीच्या रोगाच्या अनुषंगाने सोरेगाव ट्रिटमेंट प्लांटची 1968 मधील अत्यंत जुनी झालेली मशीनरी नुतनीकरण करण्यासाठी म.शा.क्र. सो.म.पा.2010/प्रक्र.86/नवि-19 नगर विकास विभाग दि.26 एप्रिल 2010 ने रु.4 कोटी मंजुर झालेले आहेत. तसेच शासन निर्णय क्र.जीईएन-2010/प्रक्र51/नवि-16 दि.31/03/2010 अन्वये रु.10 कोटी मंजुर केले आहेत.

प्रशासकीय मान्यताः-क्र नि.शा./कार्या.-03/महानगरपालिका/विनि/प्रशा.मा./318/10, विभागीय आयुक्त कार्यालय, नियोजन शाखा पुणे. दि.02/11/2010 ने मान्यता.

कामाचा कार्यादेश जावक क्र./साआअ/पाकणी/196, दि.23/03/2011.

मुदतवाढः 1) मा.आयुक्त यांचे मान्यतेने दि.22/12/2011 पर्यंत

2) मा.आयुक्त यांचे मान्यतेने दि.22/06/2012 अखेर

सर्वसाधारण सभा ठराव क्र.192, दि.20/09/2010 ने पुर्व गणन पत्रक रु.57966004/- ने मान्यता.

स्थायी समिती ठराव क्र.1243,दि.24/01/2011 नुसार कामास मंजुरी.

एकूण 6 निविदा आलेल्या असून आयुक्त यांनी दि.22/12/2010 रोजी किर्लोस्कर ब्रदर्स यांचे बरोबर झालेले वाटाघाटीनुसार 0.25% कमी दराने काम करणेस मान्यता दिली आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

101) निविदा जाहिरात प्रसिद्ध केलेची वर्तमानपत्राची छायांकित प्रत नस्तीमध्ये आहे. परंतु मुळ प्रत दिसून येत नाही.

102) बी.1 टेंडर मधील पान नं.167 ते 171 वर कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्याचे आहे. परंतु लेखापरीक्षण करुन न घेताच रु.29668258/- ची देयके अदा केली आहेत.

103) नस्तीमध्ये पान नं.47 ते 52 कामाचे अंदाजपत्रक दिलेले आहे त्यामध्ये MJP चा 2009-10 चा DSR तसेच मेकॅनिक विभागाचा DSR वापरण्यात आलेचे नमुद आहे. परंतु मुळ DSR लेखापरिक्षणासाठी उपलब्ध केले नसल्याने दराबाबत पडताळणी करता आली नाही.

104) बी.1 अनुसुचित पान नं 59 वर रिसर्क्युलेशन वेलचे रु.1742170/-चे पुर्वगणन पत्रक तयार केले आहे परंतु DSR/मार्केट दर नमुद केलेले नाहीत तसेच बाबवार दर पृथ्थकरण न करता पुर्वगणनपत्रक तयार केलेले आहे.

105) धावते देयक क्र.5 दि.24/02/2012 ने व्हॉल्व्ह ऍक्च्युलेटर्स एकूण 62 नग X रु.125206= रु.7762772/- चे साहित्य प्राप्त झाले आहे. परंतु लेखापरिक्षण तारखेपर्यंत (दि.20/01/14पर्यंत) सदर साहित्याचा वापर न केल्याने शासनाचा निधी दोन वर्ष नाहक गुंतुन पडला आहे.

106) रिसर्क्युलेशन वेलचे बांधकाम न करताच इलेक्ट्रिक साहित्य बसवून प्लांट चालू केला आहे. पाणी पुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार 1 MLD पाणी उचलण्यासाठी पाटबंधारे विभागास पाणीपट्टी रु.971/- व विज आकारणी रु.1763/- असा एकूण रु.2734/- खर्च येत आहे. शुद्धिकरणासाठी वापरण्यात येणारे बेड धुण्यासाठी दररोज 1 MLD पाण्याचा वापर होत असल्याने व रिसर्क्युलेशन वेलचे बांधकाम न केलेने रु.2734/ प्रति MLD X 365 दिवस = रु.998029/- चा खर्च वाया गेला आहे.

107) निविदा अटी शर्तीमधील पान क्र.14 अट क्र.18 नुसार ठेकेदाराने निविदा दर सर्व करासहित भरणेचे आहेत. 2011-12 आर्थिक वर्षामध्ये मशिनरीची देयके रु.29668258/- ची देण्यात आली असून त्यावर 3.20 % प्रमाणे रु.949384/- स्थानिक संस्था कर वसुल करण्यात आला नसल्याने वसुल

करण्यात यावा.

108) 2011-12 मध्ये ठेकेदारास रु.43196532/- ची देयके देणेत आली आहेत. 2013-14 चे अर्थसंकल्प पुस्तक पान क्र.88 अनु.क्र.21 वर सोरेगाव जलशुद्धिकरण केंद्र नुतनीकरण करणे या लेखाशिर्षाखाली 2011-12 नक्की आकडे मध्ये तसेच वर्गीकरण नोंदवहीमध्ये सदरचा खर्च अंतर्भुत केलेला नाही. महानगरपालिकेने वर्गीकरण नोंदवहीवरुनच पुढील वर्षाचा अर्थसंकल्प तयार करण्यासाठी जमा खर्चाचे नक्की आकडे घेतले असल्याने सदर बाबीचे लेखांकन परिपूर्ण करणे आवश्यक असता लेखाशाखा योग्य ती खबरदारी घेत नसल्याचे दिसून येते. महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.56 अन्वये प्रशासनाचे सोयीसाठी रोकडवहीमध्ये नोंदलेल्या जमा व खर्चाच्या बाबींचे,नमुना क्र.25 प्रमाणे दुय्यम वर्गीकृत गोषवा-यामध्ये वर्गीकरण करणे आवश्यक असता त्याप्रमाणे लेखाशाखेकडून अचूक लेखांकन केले जात नसलेचे स्पष्ट होते. न.पा.लेखासंहिता 1971 चे नियम क्र.58अन्वये मासिक लेखे पूर्ण वा बंद केल्यानंतर लेखापालाने संकलन/जमा पुस्तकामध्ये दर्शविलेले एकूण संकलन/जमा,वर्गीकृत पुस्तकात दर्शविलेल्या एकूण जमेशी पडताळून कांही विसंगती आढळल्यास ती दूर केली पाहिजे अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नाही तसेच वर्गीकरण नोंदवहीतील आकडेवारीवरुन पुढील आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये प्रत्यक्ष खर्चाचे नक्की आकडे घेतले असलेने जमा व खर्चाचे लेखांकन चुकीचे होउन अंदाजपत्रक चुकलेचे दिसून येते.

अर्धसमास ज्ञापन क्र.185 दि.20/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

वसुलपात्र रक्कम रु.949384/-

आक्षेपाधिन रक्कम रु.43196532/-

DATSBKM7201 (Ref No : 145, Hmm No : 185)

## *70 ट्रक माउंटेड सेक्शन कम जेटींग मशिन चेसीससह खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.*

**12 वा वित्त आयोग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मलनिःसारण केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5159292.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5159292.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 232500.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखस-1094/2679/उद्योग-6 दि.30 मार्च 1994 मधील परिच्छेद 1.9***

***नुसार तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर आणि किमान 3 ग्राहय निविदा प्राप्त झालेल्या असतील तरच व्यापारी लिफाफे उघडणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता एकच निविदा ग्राहय असताना नियमबाहयरित्या स्विकारण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रिया नियमबाहयरित्या राबविण्यात आली. करार अटी शर्तीमध्ये ठेकेदारास अग्रीम देणेची तरतुद नसताना रु.5159292/- चा अग्रीम देण्यात आला आहे. करारपत्रातील अट क्र.4 नुसार विहित मुदतीत गाड्या पोहोच न दिल्यास प्रतीदिन विहित दरानुसार दंड आकारणी करणे आवश्यक असताना दंडाची आकारणी करुन वसुली करण्यात आलेली नाही.***

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 19924 | 06/03/2012 | 5159292/- |

प्रशासकिय मान्यताः- नविवि-शानिक्र.बाविअ-2010/प्र.क्र.62,नवि-4,दि.26 मार्च 2010,

स्थायी समिती ठराव क्रः-201, दि.10/06/2011 ने मान्यता.

यापुर्वी निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. एकच पात्र निविदा आलेने आयुक्त यांचे बरोबर 10/01/2011 रोजी झालेल्या बैठकीप्रमाणे अल्पमुदतीची निविदा मागविणेत आली.

सोलापूर शहरातील ड्रेनेज व्यवस्था सुरळीत करणे व ड्रेनेज लाईन साफसफाईसाठी 6 ट्रक माउंटेड सेक्शन कम जेटींग मशिन खरेदी करणेबाबत दोन लिफाफा पध्दतीने अल्प मुदतीची फेर निविदा जाहीर प्रसिध्दिकरण करुन मुल्यनिविदा मागविल्या असता, तीन निविदा प्राप्त झाल्या असून कॅम अविदा इन व्हिरो इंजि.प्रा.लि.पुणे यांचे एकूण रु.12892800/- (6 मशिनकरिता रु.7492500/- + 6 चेसिस करिता रु 5404000/-) म्हणजेच एका मशिनकरिता रु.2074882/- ( मशिन 1215000/- + चेसिस रु.859882/-) वाटाघाटीने रु.12449292/- या किमतीस काम करणेस मान्यता देणेत आली आहे.

कार्यादेशः- सार्व. आरोग्य अभियंता जलनिसाःरण विभाग, जा.क्र.795, दि.28/09/2011

कामाची मुदतः- 30 दिवस दि.28/10/2011 पर्यंत.

मुदतवाढः- 29/01/2013

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

109) ठेकेदारास कामाची मुदत दि.28/10/11पर्यंत देण्यात आली असुन कामाची मुदत संपल्यानंतर ठेकेदारास काम पुर्ण करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी दि.11/4/12 ते दि. 28/6/12 अखेर तीन नोटीसा दिल्या आहेत व ठेकेदाराने दि.21/9/12 ने मुदतवाढीचा अर्ज सादर केल्यानंतर सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी जा.क्र./साआअ/जनि/866,दि.12/11/2012 व जा.क्र.887, दि.19/11/2012 ने दि.30/11/12 अखेर मुदतवाढीसाठी आयुक्त यांचेकडे मागणी केली असून आयुक्त यांनी दि.29/01/2013 अखेर मुदतवाढी साठी मान्यता दिली आहे. साहित्य देणेची मुदत दि.28/10/2011 रोजी संपल्यानंतर सदर बाब आयुक्त यांचे निदर्शनास तात्काळ आणणे आवश्यक असता मुदतवाढीचा प्रस्ताव दंड न आकारता सुमारे 1 वर्ष विलंबाने आयुक्त यांचेकडे सादर केला आहे. व त्यानंतर आयुक्त यांनी मुदतवाढ दिली आहे.

110) करारपत्रातील अट क्र.4 नुसार विहित मुदतीत गाड्या पोहोच न दिल्यास प्रतीदिन रु.1000/- ते रु.1500/- दंड लावणेची तरतुद आहे. त्यानुसार मार्च 2012 अखेर एकूण 155 दिवस X रु.1500/ दिन प्रमाणे रु.232500/- ठेकेदाराच्या देयकामधून वसुल करण्यात यावेत.

111) करार अटी शर्तीमध्ये ठेकेदारास आगाऊ अग्रीम देणेची तरतुद नसताना रु.5159292 चा आगाऊ अग्रीम मोजमाप पुस्तीका क्र. 143 पान नं.90 वर दिले असल्याचे नमुद आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.

112) नस्तीमधील टी-1 पान नं-530 वरील टिपणीमध्ये टेंडर अटी शर्ती नुसार संबंधित कंपन्यांनी मागील तीन वर्षात एकूण 15 मशिनचा पुरवठा करणे आवश्यक असलेने व कॅम इव्हीडा कंपनीने 15 मशिनचा पुरवठा केल्याने फक्त त्यांची निविदा ग्राह्य धरुन दराचा लखोटा उघडण्यात आला आहे व त्यांचेशी वाटाघाटी करुन निविदा मंजुर करणेत आली आहे. परंतु उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखस-1094/2679/उद्योग-6 दि.30 मार्च 1994 मधील परिच्छेद 1.9 नुसार तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर किमान 3 निविदा प्राप्त ग्राह्य असतील तरच व्यापारी लिफाफे उघडणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता एकच निविदा ग्राह्य असताना नियमबाह्यरित्या स्विकारण्यात आलेली आहे.

113) 2011-12 या आर्थिक वर्षात जेटींग मशिनचा पुरवठा संबंधित कंपनीने केला नसलेने महानगरपालिकेने आगाऊ अग्रीम पोटी दिलेली रक्कम रु.5159292/- नाहक गुंतुन पडलेचे दिसून येते.

अर्धसमास ज्ञापन क्र.187 दि.21/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.5159292/-

वसुलपात्र रक्कम रु.232500/-

DATSBKM7201 (Ref No : 146, Hmm No : 187)

## *71 सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र चालविणे कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3300000.00/-

***त्रिपक्षिय करारातील अट क्रं.IV नुसार उद्योजकांनी प्रक्रिया केंद्रावर पाठविलेल्या सांडपाण्याचा आकार त्यांनी वापरलेल्या पाण्याच्या आधारावर ठरविणेचा आहे. प्रक्रिया केंद्र चालू होण्याचे अगोदर प्रत्येक उद्योजकाच्या पाणी वापरावर आधारित दर मनपाने ठरवून त्याप्रमाणे करार करणे आवश्यक असता मनपाने प्रक्रिया केंद्र चालू***

| |
|---|
| ***होवूनही दर ठरविलेले नाहीत व उद्योजकांकडून रक्कम वसूल न करता मनपाचे निधीतून नियमबाह्यरित्या खर्च केला आहे. उद्योजकांना मनपाने जे नळाद्वारे पाणी पुरविले आहे त्या बीलामध्ये सांडपाणी प्रक्रिया खर्च भागविणेसाठीची रक्कम अंतर्भुत करणे व सांडपाणी प्रक्रिया अधिभार लावणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.*** |

एम.आय.डी.सी. अक्कलकोट रोड येथील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र देखभाल दुरुस्तीसह पाच वर्षाकरिता चालविणेस देणे कामाची निविदा दि.12/12/2010 रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. व सदर काम ठेकेदार मे.व्ही.ए.टेक. वॅबॅग लिमिटेड यांना देण्यात आले आहे.

सर्वसाधारण ठराव क्रः-178 दि. 20/09/2010 ने कामास मंजुरी.

स्थायी समिती ठराव क्रः-1424 दि.28/02/2011 ने निविदेस मंजुरी.

मक्तेदारः- व्ही.ए.टेक. वॅबॅग लिमिटेड

वर्क ऑर्डरः- सा.आ. अ.जा.क्रं.02 दि.01/04/2011

प्रकल्प चालविणेची मुदतः-5 वर्ष.

पहिले वर्षीः- 9900000/-, दुसरे वर्षीः-10395000/- , तिसरे वर्षीः- 10914750/-, चौथे वर्षीः- 11460487/-, पाचवे वर्षीः-12033511/- एकूण रु.54703749/-रु.ठेकेदारास अदा करणेचे आहेत.

| प्रमाणक क्र. | दि. | रक्कम |
|---|---|---|
| 18194 | 24/01/2012 | 1650000/- |
| 17928 | 13/01/2012 | 500000/- |
| 17929 | 13/01/2012 | 500000/- |
| 17930 | 13/01/2012 | 551000/- |
| कपात व्हॅट, आयकर, सुरक्षा अनामत | | 99000/- |
| एकूण रक्कम रु. | | 3300000/- |

1.महानगरपालिका, 2.एम.आय.डी.सी., 3.उद्योजक/यंत्रमागधारक, सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघ व उद्योजक अक्कलकोट इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्यामध्ये दि.10/7/2008 रोजी त्रिपक्षीय करार झालेला असून त्यानुसार तीन दशलक्ष क्षमतेचा सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र एम.आय.डी.सी. ने बांधून मनपाकडे चालविणेसाठी हस्तांतरित केला आहे.व तो चालविणेचा खर्च उद्योजकाकडून वसूल करणेचा आहे

1) त्रिपक्षिय करारातील अट क्रं.IV नुसार उद्योजकांनी प्रक्रिया केंद्रावर पाठविलेल्या सांडपाण्याचा आकार त्यांनी वापरलेल्या पाण्याच्या आधारावर ठरविणेचा आहे. प्रक्रिया केंद्र चालू होण्याचे आगोदर प्रत्येक उद्योजकाच्या पाणी वापरावर आधारित दर मनपाने ठरवून त्याप्रमाणे करार करणे आवश्यक असता मनपाने प्रक्रिया केंद्र चालू होवूनही दर ठरविलेले नाहीत व उद्योजकांकडून रक्कम वसूल न करता मनपाचे निधीतून सांडपाणी प्रक्रियेवर नियमबाह्यरित्या रु. 33,00,000/- खर्च केला आहे.

2) अट क्र.V नुसार उद्योजकांनी सांडपाणी प्रक्रिया खर्चाची रक्कम मनपाकडे त्यांनी वापर केलेल्या एकूण पाण्याच्या आधारावर जमा करावयाची आहे. व मनपाने 2 % सर्व्हिस चार्ज वजा करुन ऑपरेटरला खर्चाची

रक्कम कराराप्रमाणे द्यावयाची आहे. परंतु मनपाने रक्कम उद्योजकाकडून वसूल न करताच बील रजि. नोंद वही बील क्रं. 15/12-7-11 ने रु.1650000/- माहे एप्रिल व मे 11 बील क्रं.24/1-10-11 रु.1650000/- (माहे जून ते जुलै 11), बील क्रं.26/31-3-12 रु.33,000/- लाख (ऑगस्ट ते नोव्हें.11) पर्यंत असे एकूण 66 लाख ठेकेदारास अदा केले आहेत.

3) सांडपाणी प्रक्रिया खर्च भागविणेसाठी उद्योजकांना मनपाने जे नळाद्वारे पाणी पुरविले जाते. त्याचे बीलामध्ये प्रक्रिया केंद्राचा खर्च भागविणेसाठीची रक्कम अंतर्भुत करणे व सांडपाणी प्रक्रिया अधिभार लावणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

4) निविदेमधील सेक्शन 6 , स्कोप ऑफ वर्क पान नं.49 वरील ( R) नुसार ठेकेदारांने सांडपाणी नमुने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार वेळोवेळी तपासून घ्यावयाचे आहे, परंतु प्रदुषण नियंत्रण मंडळाने तपासलेल्या नमुन्याचे अहवाल लेखापरिक्षणास दाखविणेत आलेले नाही.

5) पूर्व अर्हता सभा दि.28/12/2010 रोजी झालेली असून त्यामधील अट क्र. 14 नुसार नियंत्रण मंडळाने तपासणीसाठी आलेल्या सांडपाण्याचा एखादा नमुना नाकारला असेल तर त्याचे पेमेंट थांबविणेत येईल आणि त्यामध्ये सुधारणा झाल्यावरच देयक अदा करणेचे नमुद आहे. परंतु मंडळाकडे तपासणी केलेल्या नमुन्याचे अहवाल न पाहताच देयक अदा करणेत आले आहे.

6) 2011-12 चे अंदाजपत्रकामध्ये अ महसुली निधीतून भांडवलीकडे करावयाची कामे या सदरा खाली पान क्र.14, अनु.क्र.6 नुसार रु.12000000/- ची तरतुद करणेत आलेली आहे. परंतु 2013-14 या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये खर्च बाजू, (अ) महसुली निधीतुन करावयाची कामे( भांडवली) पान नं 86 अनु.क्र.51 सन 2011-12 चे नक्की खर्च आकड्यामध्ये रु. 33 लाख या रकमेचा सामावेश नाही. तसेच वर्गीकरण नोंदवहीमध्ये सुद्धा हा खर्च नोंद नाही. त्यामुळे सदर रक्कम कोणत्या लेखाशिर्षामधून खर्च टाकण्यात आले ते समजून येत नाही.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रक्कम रु.3300000/- खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे..

DATSBKM7201 (Ref No : 158, Hmm No : 176)

## *72 मुस्लिम कब्रस्तान सलगर वस्ती येथे कंपौंड वॉल बांधणे,रस्ता करणे या कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 82178.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 89769.00/-

***महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रू.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल वसुल करणे आवश्यक असता रू.35.94 घ.मि. ने वसुल केली असुन 1121.03 घन मिटरची उर्वरीत रॉयल्टी x 35.34 प्रति.घ.मी. प्रमाणे रू.50,229/- वसुल केलेली नाही.***

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी.क्र. | पान.न. | धावतेदेयकक्र |
|---|---|---|---|---|---|
| 6201 | 25/7/11 | 356363 | 53 | 53ते60 | 1 |
| ---- | ----- | 676074 | 53 | 61ते66 | 2 |
| ----- | ---- | 658757 | 53 | 67ते73 | 3 |

अनुदान रक्कम रू. 20,00,000/- अनुदान प्राप्त दिनांक 21/4/2010

प्रशासकीय मान्यता : जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.सावि/9/नपा/ आरआर/1448/सोलापूर दि.26/5/2010.

तांत्रिक मान्यता : नगरअभियंता यांचेकडील पत्र क्र.नअ/गवसू/ तांत्रिक/671 दि.19/12/2009.

स्थायी समिती ठराव क्र.1057 दि.4/12/10 ने कामास मान्यता देणेत आलेली आहे.

टेंडर रक्कम : रू.15,78,102/-

मक्तेदार : लक्ष्मण नारायण टेळे (अंदाजपत्रकीय दराने)

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

1) कब्रस्तान कमिटी, सलगरवाडी, डोणगांव रोड यांचे दि.26/4/2011 च्या अर्जान्वये कंपौंड कामाऐवजी ईदगाह मैदान कॉंक्रीटीकरण करणे कामामध्ये बदल करणेत येऊन कंपौंड वॉल रू.9,06,290/- ऐवजी कॉंक्रीटचे काम करणेस नगर अभियंता यांनी मान्यता दिली आहे. सुधारीत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेऊन सुधारीत पूर्वगणनपत्रक तयार करून टेंडर काढणे आवश्यक असताना त्याच मक्तेदाराकडून काम करणेत आले आहे.

2) कॉंक्रीटचे काम पूर्ण झालेनंतर खुदाईतून निघालेला माल एकूण 923.46 घ.मि. x रू.88.99 प्रति घ.मि. प्रमाणे वाहतुकीसाठी रू.82,178/- इतका खर्च करणेत आला आहे. सदर ठिकाण शहराबाहेर असल्याने व सर्व परिसर रिकामा असल्याने तो माल तेथेच पसरणे आवश्यक असता वाहतुक खर्च दाखविण्यात आलेला असल्याने रू.82,178/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

3) वाळू, खडी एकूण परिमाण 402.02 घ.मि. ऐवजी 289.03 घ.मि. घेतल्याने उर्वरीत 112.09 घ.मि. x रू.70.67 प्रति घ.मि.प्रमाणे रू.7978/- रॉयल्टी पोटी वसुली करण्यात यावी. अर्धसमास ज्ञापन क्र.90 दि.15/10/2013 ला दिलेल्या उत्तरामध्ये रॉयल्टी वसुलीचा मुद्दा मान्य केला आहे परंतु वसुली करणेत आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3)

दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असता रू.35.34 घ.मि. ने वसुल केल्याने उर्वरीत रॉयल्टी 1121.03 घ.मी. x रु.35.34 प्रति.घ.मी. प्रमाणे रू.50,229/- कपात करण्यात यावी. अर्धसमासपत्रास दिलेल्या उत्तरामध्ये मुद्दा अमान्य केला आहे. पुर्वगणनपत्रकामध्ये रॉयल्टी रू.35.34/ घ.मी.प्रमाणे धरली असलेने त्याप्रमाणे वसुल केलेचे नमुद आहे.त्यामुळे उर्वरित रॉयल्टी वसुल करून शासनास जमा करणेत यावी.

5) उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1% व विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा अशी एकूण रक्कम रु.31562/- वसुल करणेचे अर्धसमासपत्रास दिलेल्या उत्तरामध्ये मान्य केले आहे.परंतु वसुली केलेली नाही.

वसूलपात्र रक्कम रु.89769/-

आक्षेपाधिन रक्कम रु.82178/-

DATSBKM7201 (Ref No : 81, Hmm No : 90)

## *73 गुडलक हॉटेल ते नॅशनल हायवे पर्यंतचा रस्ता डांबरी करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 5558.00/-

***गुडलक हॉटेल ते नॅशनल हायवे पर्यंतचा रस्ता डांबरी करणे या कामाची महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना गौणखनिज-10/2006/पी.के.-57/के.एच.(1) दि.15/12/2006 नुसार रॉयल्टी रु.35.67 प्रति घन मिटर किंवा रु100/ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसूल करणे आवश्यक असता वसुल करणेत आलेली नाही. काम झालेनंतर देयकाचे प्रदान दोन वर्ष विलंबाने आलेले करण्यात आले आहे.***

शहरातील भाग अ मधील 9 रस्ते डांबरीकरण करणे या कामाची निविदा काढली असुन निविदा रक्कम रू.3,75,04,323/- (DSR 2008-09) इतकी होती.

कार्यादेश जा.क्र./नअ/100 दि.19/7/2009

कामाची मुदत : 4 महिने.

निविदा रक्कम : रू.41,81,773/-

2011-12 मध्ये पडलेला खर्च रू.1231483/-

मक्तेदार : मेहूल कन्स्ट्रक्शन

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 8710/53,54 | 06/05/11 | 1231483 | 10 | 90 ते 106 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

कार्यादेश दि.19/7/2009 ला देण्यात आलेला आहे. काम सुरू दि.25/10/2009 रोजी करणेत आले असून, पूर्ण दि.15/11/2009 रोजी करणेत आले आहे. परंतु देयक दि.14/7/2011 जवळपास 2 वर्षे विलंबाने देण्यात आले आहे. तसेच देयक कोणत्या लेखाशिर्षकाखाली देण्यात आले याचा खुलासा करणेत आलेला नाही.

रॉयल्टी 157.27 घ.मि.x रू.35.34 प्रति घ.मि. प्रमाणे रू.5,558/- देयकातून वसुल केली नसलेचे वसुल करण्यात यावी. अर्धसमासपत्रास दिलेल्या उत्तरामध्ये मान्य केले आहे.परंतु वसुली केलेली नाही.

वसुलपात्र रक्कम रू.5,558/-

DATSBKM7201 (Ref No : 82, Hmm No : 93)

## *74 बलिदान चौक ते कौंतम चौक ते समाचार चौक पर्यंत रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 49582.00/-

***महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना गौणखनिज-10/2006/पी.के.-57/के.एच.(1) दि.15/12/2006 नुसार रॉयल्टी रू.35.67 प्रति घन मिटर किंवा रु100/ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसूल करणे आवश्यक असता ती देयकातुन वसुल करणेत आलेली नाही.***

शहरातील भाग अ मधील 9 रस्ते डांबरीकरण करणे

निविदा रक्कम रू.1,33,06,660/- (DSR 2008-09)

कार्यादेश जा.क्र./नअ/100 दि.19/7/2009

कामाची मुदत : 4 महिने.

2011-12 मध्ये पडलेला खर्च रू.18,03,472/-

मक्तेदार : मेहूल कन्स्ट्रक्शन

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 126/3,4 | 07/04/11 | 2026372 | 31 | 117 ते 122 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

कार्यादेश दि.19/7/2009 ला देण्यात आलेला आहे. दि.20/5/2010 रोजी काम पूर्ण करणेत आले आहे. परंतु देयक दि.7/4/2011 म्हणजे जवळपास 1 वर्षे विलंबाने देण्यात आले आहे. देयक कोणत्या लेखाशिर्षाखाली देण्यात आले याचा खुलसा करणेत आलेला नाही.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना गौणखनिज-10/2006/पी.के.-57/के.एच.(1) दि.15/12/2006 नुसार हार्ड मुरूम 54 घ.मि. + सॉफ्ट मुरूम 24 घ.मि. + 60 एम.एम. खडी 72 घ.मि. + 40 एम.एम.खडी 36 घ.मि. प्रमाणे एकूण 186 घ.मि. x रू.35.67 प्रति घ.मि. प्रमाणे रॉयल्टी रू.6,635/- बिलातून कपात केली नसल्याने वसुल करण्यात यावी. तसेच डांबरी रस्त्याचे कामास लागणारी खडीची रॉयल्टी खालील प्रमाणे वसुल करावी.

| तपशील | खडीचे परिमाण घ.मि. | झालेले कामाचे घ.मि. | रॉयल्टी/ घ.मि | एकूण रू. |
|---|---|---|---|---|
| बीएम 561.01 | 1.415 | 739.92 | 35.34 | 28057/- |
| एस.बी.सी. 284.69 | 1.480 | 421.34 | 35.34 | 14890/- |
| एकूण | | | | 42947/- |

अशी रू.42947/- + रू.6635/- याप्रमाणे एकूण रू.49582/- रॉयल्टी देयकातुन वसुल करणेत आलेली नाही. अर्धसमास ज्ञापन क्र.94 दि.15/10/2013 ला दिलेल्या उत्तरामध्ये रॉयल्टी वसुल करणेचे मान्य केले आहे.परंतु वसुली केलेली नाही.तरी रॉयल्टी वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

DATSBKM7201 (Ref No : 83, Hmm No : 94)

## *75 अक्कलकोट रोड ते समाधान नगर रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

सोलापूर महानगरपालिका

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 18418.00/-

***महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना गौणखनिज-10/2006/पी.के.-57/के.एच.(1) दि:15/12/2006 नुसार रू.35.67 प्रति घन मिटर किंवा रु100/ब्रास प्रमाणे देयकामधुन रॉयल्टी वसुल केली नसलेने रु.18418/- ची वसुली करणेत यावी.***

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 126/5,6, | 07/04/11 | 750328 | 29 | 75 ते 81 |

रस्त्याच्या कामास 40 एम.एम.खडी 256 घ.मि. + मलमा 84 घ.मि. असे एकूण 340 घ.मि. खडी वापरलेचे मोजमाप पुस्तकाची तपासणी केली असता दिसुन आले.देयकाची तपासणी केली असता रॉयल्टी वसुल केली नसलेने रॉयल्टीची रक्कम 340 घ.मि. खडी x रू.35.34 प्रति घ.मि. प्रमाणे रू.12,016/- वसुल करण्यात यावी.

50 एम.एम.बी.एम. करणे एकूण 83.88 घ.मि. x लागलेली खडी 1.415 घ.मि. प्रमाणे 118.69 घ.मि. x रू.35.34 प्रमाणे रू.4194/- रॉयल्टी देयकातुन वसुल केली नसलेने वसुल करण्यात यावी.

25 एम.एम. एस.बी.सी. करणे झालेले काम 42.22 घ.मि. x लागलेली खडी 1.480 घ.मि. एकूण 62.48 घ.मि. x 35.34 प्रति घ.मि. प्रमाणे रू.2208/- रॉयल्टी देयकातुन वसुल केली नसलेने वसुल करण्यात यावी. अर्धसमास ज्ञापन क्र.95 दि.15/10/2013 ला दिलेल्या उत्तरामध्ये वसुली मान्य केली आहे.परंतु वसुली केलेली नाही.

एकुण वसुलपात्र रक्कम रु.18418/-

DATSBKM7201 (Ref No : 84, Hmm No : 95)

## *76 शासन अनुदानातून केलेल्या रस्त्याचे कामातील अनियमितते बाबत.*

**शासन अनुदानातुन रस्ते विकसित करणे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : रस्ते बांधणे राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 343073.00/-

| |
|---|
| ***शासनाकडुन प्राप्त झालेल्या रस्ते विकास अनुदानातुन केलेल्या कामांची नस्ती,मोजमाप पुस्तके व देयके तपासली असता,महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असताना ती देयकामधुन वसुल केली नसलेने वसुल करणेत यावी.*** |

1. कामाचे नाव -उत्तर कसबा बुधवार पेठ परिसरात रस्ता करणे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 19540/41,42 | 17/02/12 | 986870 | 111 | 120 ते 128 |

काम सुरू दि.30/11/2011 काम पूर्ण दि.8/11/2011.

टेंडर रक्कम रू.9,56,200/- पुर्वगणनपत्र रक्कम रू.986870/-

खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहे.

114) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 221.86 घ.मि. वापरली आहे व रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयलटी रक्कम रू.7840/- वसुल करण्यात यावी.

2.कामाचे नांव : अक्कलकोट रोड विनय हॉटेल ते गोंधळी वस्ती पर्यंत रस्ता करणे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 2133/34 | 21/05/11 | 2542406 | 111 | 106 ते 119 |

काम सुरू दि.27/1/2011 मोजमाप पुस्तक क्र.111

काम पूर्ण दि.4/3/2011. पान नं.106 ते 119

टेंडर रक्कम रू.30,05,111/-

खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहे.

1) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 1948.73 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.70140/-ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

3.कामाचे नांव : मरिआई चौक ते डोणगांव नाका रस्ता करणे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5313/14 | 14/07/11 | 1932111 | 112 | 108 ते 129 |

काम सुरू दि.17/10/2011 मोजमाप पुस्तक क्र.112

काम पूर्ण दि.17/11/2011. पान नं.108 ते 129

टेंडर रक्कम रू.42,87,790/-

खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहे.

1) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 1769.44 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.62532/-ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

4.कामाचे नांव : राघवेंद्र नगर जुनी पोलीस लाईन येथे रस्ता करणे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 155096/ | 02/01/12 | 1259820 | 112 | 90 ते 107 |

काम सुरू दि.2/5/2011 मोजमाप पुस्तक क्र.112

काम पूर्ण दि.7/11/2011. पान नं.90 ते 107

टेंडर रक्कम रू.18,24,268/-

खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहे.

1) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 1073.47 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.37936/-ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

5.कामाचे नांव : वॉ.क्र.41 जोडभावी पेठ विजया बँक ते जैन मंदिर रस्ता करणे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 19543/44,45 | 17/02/12 | 802005 | 01 | 59 ते 65 |

काम सुरू दि.9/11/2011 मोजमाप पुस्तक क्र.01

काम पूर्ण दि.18/11/2011. पान नं.59 ते 65

टेंडर रक्कम रू.9,24,136/-

खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहे.

1) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 534.60 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे

देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.18892/-ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

6.कामाचे नांव : भिमाई चौक ते प्रियंका हॉटेल ते शाहीर वस्ती रस्ता करणे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 1613/19 | 06/05/11 | 3852311 | 65 | 29 ते 57 |

काम सुरू दि.25/10/2010 मोजमाप पुस्तक क्र.65
काम पूर्ण दि.16/12/2010. पान नं.29 ते 57
टेंडर रक्कम रू.38,52,311

खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहे.

1) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 1630.85 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.115269/-ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

7.कामाचे नांव : पोलीस हेडक्वार्टर ते सोलापूर सहकारी रूग्णालय रस्ता करणे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 1613/19,2 | 06/05/11 | 4149462 | 44 | 36 ते 47 |

काम सुरू दि.15/7/2010 मोजमाप पुस्तक क्र.44
काम पूर्ण दि.2/11/2010. पान नं.36 ते 47
टेंडर रक्कम रू.45,87,833/-

खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहे.

1) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 862.04 घ.मि. वापरली असुन, असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.30464/-ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

अर्धसमासपत्रास दिलेल्या उत्तरामध्ये रॉयल्टीची रक्कम वसुल करणेचे मान्य केले आहे.परंतु विमा रक्कमेची तरतुद पुर्वगणनपत्रकामध्ये केली नसलेने विमा वसुलीचा मुद्दा अमान्य केला आहे. विमा

संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विम्याची तरतुद विभागिय दरसुचीमध्ये केली जात नसलेने प्राकलन/पुर्वगणनपत्रक तयार करताना त्याची तरतुद करणेत यावी व ठेकेदाराने विम्याची रक्कम संचालनायकडे भरलेचे प्रमाणपत्र दाखविलेनंतर परत करणेत यावी असे नमुद आहे.त्याप्रमाणे महानगरपालिकेने विमा रक्कमेची तरतुद पुर्वगणनपत्रक तयार करताना करणे आवश्यक होते.यापुढे विमा रक्कमेची तरतुद पुर्वगणनपत्रकामध्ये करणेची दक्षता घेण्यात यावी.

DATSBKM7201 (Ref No : 94, Hmm No : 119)

## *77 मुळे गांव रोड ते जवाहर टाकी ते 256 गाळे MSRDC रस्त्यापर्यंत रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**शासन अनुदानातुन रस्ते विकसित करणे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : रस्ते बांधणे राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 90328.00/-

***मोजमाप पुस्तकेमधील बाब क्र.9 प्रमाणे 75 मि.मि. बी.बी.एम. करणेचे एकूण काम 2650 चौ.मि. झाले असून,रू.174/-प्रति.चौ.मि. प्रमाणे एकूण रू.4,61,100/- ठेकेदारास आदा केले आहेत. सदर बाब पूर्वगणनपत्रकामध्ये नमूद नसताना तसेच कोणती ही सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी न घेता करणेत आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (24) (ब) एखाद्या स्वतंत्र अतिरिक्त बाबीची रक्कम रुपये 10,000/- पेक्षा अधिक होत असेल तर अशा दरासाठी अधिक्षक अभियंत्याची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण सात-संविदा,73(क) नुसार संविदा करणेचा अधिकार असलेने आयुक्तांची मान्यता न घेताच स्वतंत्र अतिरिक्त बाब करुन घेणेत आली आहे.***

अंदाजपत्रकीय रक्कम रू.55,64,201/-

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 8710/55,56 | 30/08/11 | 3521729 | 157 | 80 ते 96 |

सोलापूर महानगरपालिका

मोजमाप पुस्तक क्र. 157 पान क्र.80 ते 96

काम सुरू दि.20/4/2010 काम पूर्ण दि.1/5/2010.

मक्तेदारांचे नांव : मेहुल कन्स्ट्रक्शन

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

115) मोजमाप पुस्तकेमधील बाब क्र.9 प्रमाणे 75 मि.मि. बी.बी.एम. करणे या अंतर्गत एकूण काम 2650 चौ.मि. झाले असून, र.रू.174/- प्रति.चौ.मि. प्रमाणे एकूण र.रू.4,61,100/- ठेकेदारास आदा केले आहेत. सदर बाब पूर्वगणनपत्रकामध्ये नमूद नसताना तसेच कोणती ही सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी न घेता करणेत आलेली आहे.

116) बाब क्र.3 नुसार रस्त्याचे कामासाठी हार्ड मुरूम 40 एम.एम. खडी तसेच सॉफ्ट मुरूम एकूण 1002 घ.मि. वापरणेत आलेला आहे.परंतु देयकामधुन रॉयल्टी वसुलकेलेली नाही. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने रॉयल्टी रक्कम रू.70821/-ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

117) बाब क्र.6, 7 व 8 ने 50 एम.एम. जाडीने बी.एम. करणे व 25 एम.एम. जाडीने सेमीडेन्स ब्युटीमीन कॉंक्रीट करणे (SBC) साठी एकूण 276 घ.मि. खडी वापरल्याने एकूण रॉयल्टी रू.19507/- वसुल करण्यात यावी.

118) सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत कामाची नोटीस जा.क्र.न.अ./मु.का./823 दि.6/7/2010 व दि.12/7/2010 रोजी देऊन बिल प्रलंबित ठेवण्यात आले आहे सदर नोटीसीमध्ये दुरूस्तीचे काम पूर्ण केल्याशिवाय कामाचे बिल देण्यात येणार नाही असे नमूद आहे. परंतु याबाबत पुढे काय कार्यवाही करणेत आली याची नोंद नस्तीमध्ये घेण्यात आलेली नाही. तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांची पूर्व परवानगी न घेताच देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे पाठविले आहे.

119) मोजमाप पुस्तिकेमध्ये काम दि.10/5/2010 ला पूर्ण झालेचे नमुद आहे.काम पुर्ण झालेनंतर ठेकेदारास काम निकृष्ट झालेबाबत नोटीस दि06/7/2010 ला दिल्याने काम सुरू असताना सक्षम प्राधिकाऱ्याने रस्त्यचे कामास भेट दिली नसल्याचे व नियमानुसार काम करून घेतले नसल्याचे स्पष्ट होते. तसेच कामाचे देयक दि.14/7/2011 रोजी म्हणजेच काम पूर्ण झालेनंतर एक वर्ष विलंबाने बांधकाम विभागाने लेखा विभागाकडे पाठविले आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (24) ( ब) एखाद्या स्वतंत्र अतिरिक्त बाबीची रक्कम रुपये 10,000/- पेक्षा अधिक होत असेल तर अशा दरासाठी अधिक्षक अभियंत्याची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण सात-संविदा,73(क)नुसार संविदा करणेचा अधिकार असलेने आयुक्तांची मान्यता न घेताच स्वतंत्र अतिरिक्त बाब करुन घेणेत आली आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 118, दिनांक 12.11.2013 चे उत्तर अप्राप्त आहे.

वसुलपात्र रक्कमरु.90328/-

DATSBKM7201 (Ref No : 95, Hmm No : 118)

### *78 वॉ.क्र.68 मुनशी बंगला ते धमाका ढोली बाजा ते सतनाम चौक रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**शासन अनुदानातुन रस्ते विकसित करणे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : रस्ते बांधणे राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 28686.00/-

***शासनाकडुन प्राप्त झालेल्या रस्ते विकास अनुदानातुन केलेल्या कामांची नस्ती, मोजमाप पुस्तके व देयके तपासली असता, महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं. गौण खनिज-10/1009/ पी. के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असताना देयकामधुन वसुल केली नसलेने रक्कम रु. 28686 वसूल करणेत यावी.***

अंदाजपत्रकीय रक्कम रू.20,57,080/-

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 2338/39,40 | 30/08/11 | 2340779 | 156 | 32 ते 46 |

मोजमाप पुस्तक क्र. 156 पान क्र.32 ते 46

काम सुरू दि.1/12/2010 काम पूर्ण दि.3/3/2011.

मक्तेदारांचे नांव : एस.एस.अवताडे कन्स्ट्रक्शन

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विमा रू.20570/- देयका मधून वसुल केला नसल्याने वसुल करण्यात यावा.

रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 811.70 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमीटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.28686/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

DATSBKM7201 (Ref No : 96, Hmm No : 117)

## *79 पमाकोळी शॉपींग सेंटर ते घोंगडे वस्ती रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**शासन अनुदानातुन रस्ते विकसित करणे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : रस्ते बांधणे राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 39332.00/-

***शासनाकडुन प्राप्त झालेल्या रस्ते विकास अनुदानातुन केलेल्या कामांची नस्ती,मोजमाप पुस्तके व देयके तपासली असता,महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/ पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असताना देयकामधुन कमी दराने वसुल केलेली आहे तरी उर्वरीत रक्कम वसुल करणेत यावी.***

कामाचे नांव - पमाकोळी शॉपींग सेंटर ते घोंगडे वस्ती रस्ता करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम रू.43,58,510/-

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 1633/21,22 | 06/05/2011 | 1564651 | 1 | 37ते42/59ते63 |

मोजमाप पुस्तक क्र. 1 पान क्र.37 ते 42 व 59 ते 63

काम सुरू दि.5/11/2010 काम पूर्ण दि.2/12/2011.

मक्तेदारांचे नांव : मेहुल कन्स्ट्रक्शन

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

120) विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विमा रू.15647/- देयका मधून वसुल केला नसल्याने वसुल करण्यात यावा.

121) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 670.39 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु. 35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं. गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमीटर प्रमाणे रॉयल्टी रु. 47376/- वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू. 23685/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

122) शासन अनुदान रु. 8कोटी सन 08/09मध्ये प्राप्त असुन,नगर विकास विभाग,शासन निर्णय

क्रमांक जीइएन-2008/प्र.क्र.08/नवि-16दि.29/08/2008 मधील अट क्र.1प्रमाणे 50 %रक्कम महानगरपालिका हिश्शातुन खर्च करणेची अट नमुद आहे. त्यानुसार महानगरपालिकेने रु.5 कोटीची तरतुद 08/09च्या वार्षिक अर्थसंकल्पात केली आहे. सदर काम हे 11/12मध्ये केले आहे.परंतु 11/12चे अर्थसंकल्पात महानगरपालिका निधीमधुन या लेखाशिर्षाखाली तरतुद न करता देयक शासन निधीमधुन खर्ची टाकले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 121, दिनांक 19.11.2013 उत्तर अप्राप्त आहे.

DATSBKM7201 (Ref No : 97, Hmm No : 121)

## *80 अक्कलकोट रोड, मल्लिकार्जून ते समाधान नगर रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**शासन अनुदानातुन रस्ते विकसित करणे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : रस्ते बांधणे राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 48283.00/-

***शासनाकडुन प्राप्त झालेल्या रस्ते विकास अनुदानातुन केलेल्या कामांची नस्ती,मोजमाप पुस्तके व देयके तपासली असता,महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं. गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असताना देयकामधुन वसुल केली नसलेने रक्कम रु. 28860/- वसुल करणेत यावी.***

अंदाजपत्रकीय रक्कम रू.1942398/-

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|
| 8710/57,58 | 14/07/2011 | 2038045 | 65 | 58ते59 |

मक्तेदारांचे नांव : संजय बिल्डर्स

मोजमाप पुस्तक क्र. 65 पान क्र.58 ते 69

काम सुरू दि.1/5/2011 काम पूर्ण दि.28/5/2011.

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

123) 1% विमा र.रू.19423/- देयकातून वसुल केली नसल्याने वसुल करण्यात यावी.

124) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 816.60 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमीटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.28860/-ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

125) शासन अनुदान रु. 8 कोटी 2008-09 मध्ये प्राप्त असुन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-2008/प्र.क्र. 08/ नवि-16 दि. 29/08/2008 मधील अट क्र.1 प्रमाणे 50 % रक्कम महानगरपालिका हिश्यामधुन खर्च करण्याची अट नमुद आहे. त्यानुसार महानगरपालिकेने रु. 5 कोटींची तरतुद 2008-09 चे वार्षिक अर्थसंकल्पात केली आहे. परंतु सदर काम हे 2011-12 मध्ये केलेले असल्याने 2011-12 च्या अर्थसंकल्पात उपरोक्त योजनेमधील प्रलंबित कामासाठी महानगरपालिका निधीतुन तरतुद करणे आवश्यक असता ती न करताच शासन अनुदानातुन रक्कम खर्ची टाकण्यात आलेली आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र. 122 दि. 28/08/2013 अन्वये कळविण्यात आले होते तथापि उत्तर अप्राप्त आहे.

DATSBKM7201 (Ref No : 98, Hmm No : 122)

## *81 समता नगर ते जयप्रकाश नगर या भागात रस्ते करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**शासन अनुदानातुन रस्ते विकसित करणे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : रस्ते बांधणे राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 41221.00/-

***शासनाकडुन प्राप्त झालेल्या रस्ते विकास अनुदानातुन केलेल्या कामांची नस्ती,मोजमाप पुस्तके व देयके तपासली असता,महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/ पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असताना ती देयकामधुन वसुल केली नसलेने वसुल करणेत यावी.***

अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,32,111/-

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. क्र. | पा. नं. |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5313/14 | 14/07/2011 | 193211 | 134 | 88ते97 |

मोजमाप पुस्तक क्र. 134 पान क्र.88 ते 97

काम सुरू दि.29/1/2011 काम पूर्ण दि.5/3/2011.

मक्तेदारांचे नांव : अवताडे कन्स्ट्रक्शन

अर्धसमासपत्र क्र. 123 दि. 19/11/13 ला दिलेल्या उत्तरामध्ये रॉयल्टी वसुल करणेचे मान्य करणेत आले आहे. परंतु रॉयल्टी वसुल केलेली नाही. तसेच विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1 % विमा रू.19321/- देयका मधून वसुल केला नसल्याने वसुल करण्यात यावा. या आक्षेपास दिलेल्या उत्तरामध्ये पुर्वगणन पत्रकामध्ये विमा रक्कम धरली नसल्याचे नमुद असल्याने विमा वसुलीचा मुद्दा वगळण्यात आला आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

126) रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 1166.40 घ.मि. वापरली असून रॉयल्टी रु.35.34/घ.मी.प्रमाणे देयकातून कपात केली आहे. महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमीटर प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने उर्वरीत रॉयल्टी रक्कम रू.41221/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

127) शासन अनुदान रु.5.42कोटी सन 09/10मध्ये प्राप्त असुन,नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक जीइएन-2009/प्र.क्र.140/नवि-16दि.18/08/2009 ने प्राप्त झाले असुन,त्यामध्ये महानगरपालिका हिस्सा 1.50 कोटी अशी एकुण रू.6.92 ची तरतुद व 09/10 च्या अर्थसंकल्पात करणेत आली आहे. सदर काम हे 11/12 मध्ये केले आहे.परंतु 11/12 चे अर्थसंकल्पात महानगरपालिका निधीमधुन या लेखाशिर्षाखाली तरतुद न करता देयक शासन निधीमधुन खर्ची टाकले आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 41221/-

DATSBKM7201 (Ref No : 99, Hmm No : 123)

## *82 IHSDP अंतर्गत भगवाननगर झोपडपट्टी घरकुल बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**IHSDP**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4756732.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 36630485.00/-

***ठेकेदारास एक कोटी मोबिलायझेशन ॲडव्हान्स मुख्यलेखापाल यांचेकडील क्र.2077 दि.6/6/2011अन्वये व सळी खरेदीपोटी रु.37 लाख मुख्यलेखापाल यांचेकडील जा.क्र.1507 दि .10/2/2011ने दिला आहे. महाराष्ट्र पब्लिक अकौंट कोड नियम 10.1.21 नुसार मक्तेदारास ॲडव्हान्स देता येत नसलेने रु.13700000/- नियमबाहयरित्या दिलेचे स्पष्ट होते.सदर रक्कम 12% व्याजासहित वसुल करावी .***

एकात्मिक झोपडपट्टी विकास कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाकडुन मिळालेल्या निधीमधुन सोलापुर महानगरपालिकेकडुन झोपडपट्टी विकासाची कामे सुरु आहेत. IHSDP योजनेअंतर्गत भगवाननगर झोपडपट्टी घरकुलाचे बांधकाम दि.23/10/11पासून पूर्णपणे बंद असलेने काम चालू करणेबाबत नोटीस देवूनही काम चालू न केलेने स्थायी समिती ठराव क्र.08 दि.27/4/12 ने मक्ता रद्द करणेत आला आहे.

1. IHSDP योजनेअंतर्गत भगवाननगर झोपडपट्टी घरकुल बांधणे या कामास केंद्र शासनाकडून योजनेस मंजूरी दि.22/12/2006 रोजी मिळाली आहे.परंतु निविदा सुचना दि. 21/11/2007 रोजी विलंबाने प्रसिदध् करणेत आली आहे.

2.नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम171(6) नुसार निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत त्या निकाली काढण्यात आल्या पाहिजेत आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी एक महीन्यापेक्षा जास्त होता कामा नये असे नमुद असता टेंडर दि.21/12/2007ला उघडले नंतर ठेकेदारास कामाचा कार्यादेश जा.क्र./ नअ/झोसु 3348 दि.13/6/08रोजी सहा महिने विलंबाने देणेत आला आहे.

3.जागा ताब्यात मिळाली नसलेने माहे ऑगस्ट 2010 अखेर ठेकेदारास मुदतवाढ देणेत आली आहे. जागा ताब्यात नसताना कोणत्या नियमाने टेंडर प्रक्रिया राबविण्यात आली आहे याचा खुलासा करणेत आलेला नाही. .तसेच जागा मुदतीत ताब्यात दिली नसलेने ठेकेदाराने काम करणेस नकार दिलेने पुन्हा फेर निविदा मागविणेत आली आहे. त्यामुळे टेंडर प्रक्रियेवर करणेत आलेला खर्च वाया गेलेने तो वसुल करणेत यावा.

4.फेरनिविदा दि.21/7/2010चे वर्तमानपत्रामध्ये प्रसिदध् करणेत आल्याचे नस्तीमध्ये नमुद आहे.परंतु त्याच्या मुळ प्रती दाखविणेत आलेल्या नाहीत.

5.मंजुर विकास आराखडयानुसार नियोजित जागा शासनाचे मालकीची असून जागेवर प्राथमिक शाळेचे आरक्षण आहे.ते शासनाकडून न उठविताच नियमबाहयरित्या काम सुरू करणेत आले आहे.

6.शासन निर्णय क्रमांक जनेयो-2006/प्रक्र46/गृनिधो-2/दि .25/6/2007 मधील अट क्र.12(2) नुसार लाभार्थी अंशदान घेणे बंधनकारक असताना 371 लाभार्थ्यांकडुन रु.8000/- प्रमाणे रु.2968000/- हिस्सा महानगरपालिकेने भरणा केला असल्याने लाभार्थी हिस्सा प्राप्त होई पर्यंत रु.2968000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

7.लाभार्थ्याचा मागणी अर्ज घेवून लाभार्थ्याची संमती घेणे आवश्यक असता लाभार्थी संमती न घेताच योजना राबविलेचे स्पष्ट होते.

8.जा.क्र./न.अ./झोसु/583झोपडपटटी सुधारणा दि.2/12/2010नुसार ठेकेदारा बरोबर वाटाघाटी मध्ये सळी खरेदीपोटी ॲडव्हान्स तसेच बँक ॲडव्हान्स अगेन्स्ट मोबिलायझेशन ॲडव्हान्स देणे या अटीवर 14.40%ऐवजी

7.14%जास्तीच्या दराने टेंडर मंजुर करणेत आले आहे.टेंडर मान्य केलेनंतर अटी/शर्ती मध्ये बदल केलेने अन्य ठेकेदारांना टेंडर भरणेपूर्वी सदर अटी/शर्तीचा लाभ न मिळालेने महानगरपालिकास स्पर्धात्मक दराचा लाभ न मिळालेचे स्पष्ट होते.

9.ठेकेदारास एक कोटी मोबिलायझेशन ॲडव्हान्स मुख्यलेखापाल यांचेकडील जा.क्र.2077दि.6/6/2011अन्वये व सळी खरेदीपोटी रु.37 लाख मुख्यलेखापाल यांचेकडील जा.क्र.1507 दि .10/2/2011 ने दिला आहे. महाराष्ट्र पब्लिक अकौंट कोड नियम 10.1.21 नुसार मक्तेदारास ॲडव्हान्स देता येत नसलेने रु.13700000/ नियमबाहयरित्या दिलेचे स्पष्ट होते.सदर रक्कम 12 % व्याजासहित रु.13700000+व्याज रु.1644000/-असे एकुण रु.15344000/- वसुल करावी.

10.शासनाने परीपत्रक क्र .जनियो/2009/प्र.क्र128./गृनियो-2 दि 01.12.2009.नुसार मनपाने वितरीत झालेल्या निधीचा 3 महिन्यात विनियोग न केलेस त्यावर पी.एल.आर.नुसार व्याज आकारणेत येईल असे नमुद आहे .परिशिष्ठ क्र.- 19 नुसार स्टेट बँक ऑफ इंडियाचे PLR देण्यात आलेले आहे.महाराष्ट्र बँक चालू खाते क्र.20063202541 पासबुक नुसार दि. 26/12/07 ते दि.05/04/11पर्यत रु 18742088 बॅकेंत गुंतून पडले आहेत. स्टेट बँक ऑफ इंडियाचे दि. 27/2/08 ते दि.14/2/11 पर्यत सरासरी PLR 11.47% असलेने रु. 18742088 x 11.47% = 2149717 x 3 वर्ष = 6449152 शासनाकडे जमा करण्यात यावेत.तसेच दि.01/7/2009 पासून दि 14/2/11 पर्यंत रु.40680100 गुंतून पडलेने सरासरी PLR 11.47 % असलेने रु. 40680100 x 11.47% = 4666007 x 3 वर्ष = 13998022 शासनाकडे जमा करण्यात यावेत.

11.06/07 चे DSR प्रमाणे घरकूल किंमत रु. 91881/ होती.परंतू योजना वेळेत न राबविलेने 10/11 चे DSR प्रमाणे प्रती घरकूल किंमत रू.130085/ झालेली आहे.शासनाने प्रती घरकूल रू.80000/मंजूर केली असलेने उर्वरित रक्कम रू.50000X1190 घरकूल = रू.59550000/ व मुलभूत सोयी सवलतीची रक्कम रू. 22093902/ अशी एकूण रू. 81593902/ स्वनिधीची तरतूद न करताच टेंडर काढणेत आले आहे.

12.निविदेमध्ये ETP चार्जेसचा समावेश नसताना देयकामधुन 8 % प्रमाणे रु.239803/ नियमबाहयरित्या कपात केली आहे.

13. उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र .बीसीए 2009-प्रक्र/108कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 ,नुसार कामगार कल्याण उपकर रू.2997540/ चे1% प्रमाणे रू.299754/ वसुल केलेला नसलेने वसुल करावा.

14. विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% प्रमाणे विमा रु.299754/ वसुल केलेला नसलेने वसुल करावा.

15.11-12 या वर्षामध्ये एकूण रू.4756732/ इतका खर्च करणेत आला आहे परंतू त्याची प्रमाणके लेखापरिक्षणास दाखविणेत आलेली नाहीत.

अर्धसमास ज्ञापन क्र.81 दि.07/10/2013 चे उत्तर दिलेले नाही

आक्षेपाधिन रक्कम रु.4756732/-

वसुलपात्र रक्कम रु. 36630485/-

## *83 वॉ.क्र.92 अंबिका शिवगंगा नगर येथे सुधारणा करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1748597.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 42556.00/-

***महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असलेने, या कामामधील गौण खनिजावरील एकूण रॉयल्टी 138.97 घ.मि. ऐवजी 104.13 घ.मि. ची कपात केल्याने उर्वरित 34.84 घ.मि. x रु.70.67 प्रति घ.मि. ने रु.2462.14/- वसुल करणेत यावेत.तसेच विमा व कामगार कल्याण उपकर वसुल करावा.***

सोलापूर महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनाकडुन अल्पसंख्यांक क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी रु.2000000/- इतके अनुदान दिनांक 28/04/2011 रोजी प्राप्त झालेले आहे. सदर शासकीय अनुदानामधुन वॉ.क्र.92 अंबिका शिवगंगा नगर येथे सुधारणा करणे हे काम करण्यात आले आहे.

शासकीय मान्यताः- जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.सावि/9/नपा/आरआर/801/सोलापूर दि.28/03/2011.

तांत्रिक मान्यताः- नगरअभियंता यांचेकडिल पत्र क्र. नअ/गवसू/तांत्रिक/25/26 दि.24/06/2010.

टेंडर रक्कमः- रु.1748597/-

मक्तेदारः- एम.आर.चौधरी(0.46% कमी दराने)

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

128) नस्तीमध्ये सदर रस्ता गुंठेवारी क्षेत्रामध्ये असल्याचे नमूद आहे. परंतु गुंठेवारी क्षेत्र नियमित केल्याची व सदर रस्ता महानगरपालिकेने ताब्यात घेतल्याची कागदपत्रे लेखापरिक्षणास दाखविणेत आलेली नाही. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नसताना नियमबाह्यपणे काम करणेत आले आहे.नस्तीमध्ये पान नं.टी/17 दि.02/05/2011 ने कामाचे जाहिर प्रसिद्धिकरण दोन स्थानिक व एका राज्य पातळीवरील दैनिकामधून देणे आवश्यक असता फक्त एकाच दैनिकामध्ये जाहिरात देण्यात आलेचे दिसून आले आहे.

129) महाराष्ट्र शासन , महसूल आणि वन विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करणे आवश्यक

असलेने, या कामामधील गौण खनिजा वरील एकूण रॉयल्टी 138.97 घ.मि.ऐवजी 104.13 घ.मि. ची कपात केल्याने उर्वरित 34.84 घ.मि. x रु.70.67 प्रति घ.मि. ने रु.2462.14/- वसुल करणेत यावेत.

130) उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार कामगार कल्याण उपकराची तरतुद पुर्वगणनपत्रकात करुन रु.1748597/- x 1 % प्रमाणे रु.17486/- वसुल करणे आवश्यक असता पुर्वगणनपत्रकामध्ये कामगार कल्याण उपकराची तरतुद केली नसलेने निधीचे रु.17486/- नुकसान झालेले आहे.

131) विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विम्याची तरतुद करुन विमा वसुल करणे आवश्यक असता विम्याची तरतुद न केलेने शासनाचे रु. 17486/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

132) देयक क्र.2 मधून रॉयल्टी 134.73 घ.मि. ऐवजी 97.39 घ.मि.वर कपात केल्याने उर्वरित 37.34 घ.मि. x रु.70.67 प्रति घ.मि.प्रमाणे रु.2639/- वसुल करणेत यावी.

133) देयक क्र.3 मधून रॉयल्टी 135 घ.मी. ऐवजी 100.44 घ.मी.ची कपात केल्याने उर्वरित 35.14 घ.मी. x रु.70.67 प्रति.घ.मी.प्रमाणे रु.2483/- वसुल करणेत यावी.

वसुलपात्र रक्कम रु 42556/-

आक्षेपाधिन रक्कम रु. 1748597/-

अर्धसमास ज्ञापनास दि.14/11/2013रोजी दिलेले आहे. परंतु वसुलपात्र रक्कमांची वसुली केलेली नाही.

DATSBKM7201 (Ref No : 114, Hmm No : 91)

## *84 बांधकाम वापर परवाना शुल्क वसुली बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 32500.00/-

***बांधकाम परवाना विभागाने महानगरपालिका ठराव क्र.44 दि.31/05/2011 नुसार बांधकाम परवानगी देताना बांधकाम वापर परवाना शुल्क प्रति 100 चौ.मी. पर्यंत रु.5000/- ठेव म्हणुन संबंधितांकडून वसुल करणे क्रमप्राप्त असताना काही बांधकाम परवाना धारकांकडून फक्त रु.2500/- एवढी रक्कम वसुल केलेली आहे. त्यामुळे प्रत्येक बांधकाम परवान्यामागे रु.2500/- प्रमाणे एकुण रु.32500/- कमी वसुल केलेली आहे.***

सोलापुर महानगरपालिका बांधकाम परवाना नस्ती तपासल्या असता खालील नमुद केलेल्या त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

134) बांधकाम परवाना विभागाने महानगरपालिका ठराव क्र.44 दि.31/05/2011 नुसार बांधकाम परवानगी देताना बांधकाम वापर परवाना शुल्क प्रति 100 चौ.मी. पर्यंत रु.5000/- ठेव म्हणुन संबंधितांकडून वसुल करणे क्रमप्राप्त असताना परिशिष्ट क्र. (12) मध्ये नमुद बांधकाम परवाना धारकांकडून फक्त रु.2500/- एवढी रक्कम वसुल केलेली आहे. तरी परिशिष्टा मध्ये नमुद केलेली एकूण रक्कम रु.32500/- वसुल करण्यात यावी.

135) महानगरपालिका ठराव क्र.183 दि.16/09/2011 नुसार 100 चौ,मी.पर्यंत बांधकाम परवाना धारकाकडून वापर परवान्या पोटी शुल्क वसुल करु नये असे निर्देश असताना बांधकाम परवाना विभाग सबंधित बांधकाम परवाना धारकांकडून रु.2500/- वसुल केली आहे. सदर शुल्क कोणत्या नियमानुसार वसुल करण्यात येते याबाबतची माहिती अर्धसमास ज्ञापन क्रं.157 दि.12/12/2013 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नाही. तसेच नगर अभियंता यांची दि.15/10/2011 ची टिपणी मध्ये 100 चौ.मी.पर्यंतच्या बांधकामावर बांधकाम वापर परवाना शुल्क घेऊ नये असे नमुद आहे. परंतु मा. आयुक्त यानी सदरच्या टिपणीवर रु.5000/- शुल्क ऐवजी रु.2500/- वसुल करण्याबाबत सुचित केलेले आहे. त्यानुसार पुनश्च महानगरपालिकेचा ठराव घेणे आवश्यक होते. परंतु तसा पुन्हा ठराव केल्याचे दिसुन येत नाही तसेच आयुक्तांचे आदेशानुसार उर्वरित शुल्क वसुल केलेले नाही.

136) बांधकाम परवाना देते वेळी बांधकाम परवाना मधील अट क्र.19 नुसार बांधकाम पुर्ण झालेल्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आत वापर परवाना घेणे आवश्यक असताना नस्ती तपासल्या असता एकही भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही.

137) बांधकाम परवाना अट क्र.29 नुसार बांधकाम सुरु केल्यानंतर महापालिकेला सुचित करणे क्रमप्राप्त आहे. बांधकाम परवाना नस्ती तपासल्या असता तसे केल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे सामान वसुली फी बांधकाम परवाना धारकांकडून वसुल झाली नाही.

138) बांधकाम सुरु करण्यापुर्वी रस्त्याचे हद्दीचे लाईन-औट महानगरपालिकेच्या अधिका-याकडून तपासून घ्यावी अशी अट असताना तसे केल्याबाबतचे नस्ती तपासणी करतेवेळी लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले नाही.

139) जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर सिटी सर्व्हेच्या मोजणी उता-यासह महानगरपालिका कडे अर्ज करुन तपासून घेऊन मगच पुढील बांधकाम चालू करावे, अशी अट असताना तसे केल्याचे नस्ती तपासताना लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आले नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.157 दि.12/12/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 124, Hmm No : 157)

## *85 कामगार कल्याण निधी वसुल केला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नगरअभियंता महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 45165530.00/-

***शासन निर्णय क्र.बीसीए/2009/प्र.क्र.108 कामगार-7 अ दि.17/06/2010 नुसार प्रति चौ.मी. शासन दरा नुसार गणती करुन 1% कामगार कल्याण निधी सबंधित बांधकाम परवानाधारकांकडून वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कामगार कल्याण निधी बांधकाम परवानाधारका कडुन वसुल केला नसल्याने 2011-12 मध्ये बांधकाम परवाना दिलेले एकुण क्षेत्र 422250.77 चौ.मी.X 2011-12 चा दर रु.8500/- = रु.3589131545/ च्या 1% प्रमाणे रु.35891315/ वसुल करणेत यावेत.***

सोलापुर शहर महानगरपालिका बांधकाम परवाना नस्ती तपासल्या असता खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

140) सोलापुर शहर महानगरपालिका बांधकाम परवाना विभाग यांनी 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये एकूण 1638 बांधकाम परवाने महानगरपालिका हद्दीमध्ये बांधकामासाठी देण्यात आले आहेत. सदर बांधकाम परवान्याचे एकूण क्षेत्रफळ 422250.77 चौ.मी. एवढे आहे. सोलापुर शहर महानगरपालिका बांधकाम परवाना विभागाने शासन निर्णय क्र.बीसीए/2009/प्र.क्र.108 कामगार-7 अ दि.17/06/2010 नुसार प्रति चौ.मी.शादरा नुसार गणती करुन 1% कामगार कल्याण निधी सबंधित बांधकाम परवानाधारकांकडून वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक असताना तसे केल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आलेले नाही. तरी खालील दर्शविल्या प्रमाणे कामगार कल्याण निधी वसुल करुन शासन तिजोरीत जमा करण्यात यावा. एकूण क्षेत्रफळ 422250.77 चौ.मी.Xसन 2011-12चा दर रु.8500/-=3589131545/-च्या 1% प्रमाणे रु.35891315/ वसुल करणेत यावा.

141) शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्रक्र.108 कामगार-7अ दि.17/06/2010 परिशिष्ट 1 अनुक्रमांक 13 नुसार वसुलपात्र रक्कम 35891315/- शासन तिजोरीत जमा न केल्याने उपरोक्त कलमानुसार 2% प्रति महाप्रमाणे वर्षाचे 24% प्रमाणे व्याज रु.8613915/- सबंधित बांधकाम परवाना धारक यांचे कडून वसुल करुन शासन तिजोरीत जमा करण्यात यावे, तो पर्यंत रु.8613915/- वसुल पात्र ठेवणेत येत आहेत.

142) बांधकाम परवाना क्र. 1491,1485,1489 दि.07/03/2012 ने मे.अभिजित अजित टाकळीकर यांना बांधकाम परवानगी देण्यात आला आहे. सदर परवाने देते वेळी सर्वे नं.101/2 येथील अंतर्गत ड्रेनेजचे पुर्वगणन करिता रु.936528/- एवढी रक्कम महानगरपालिकेकडे जमा करण्याविषयी नगर

अभियंता यांचे पत्र क्र. नअ/एचओ/2359 दि.15/02/2011 नुसार मे.टाकळीकर यांना कळविलेले आहे. मे.टाकळीकर यांनी पावती क्र.0030757 दि.01/02/2011 रु.239028 व पावती क्र.0819 दि.13/09/2011 रु.232000/- एकूण रु.471528/- महानगरपालिकेमध्ये जमा केलेले आहेत. उर्वरित रक्कम रु.465000/- दि.09/12/2013 पर्यंत महानगरपालिकेमध्ये जमा केलेली नाही. तरी सदरची रक्कम ठेकेदार यांचे कडून वसुल करण्यात यावी. सदर रकमेला दि.09/12/13 पर्यंत 1 वर्ष 9 महीने कालावधी झाला असल्याने दरमहा 2 % प्रमाणे व्याज रु.195300/- अशी एकूण रक्कम रु. 660300/-वसुल करण्यात यावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.159 दि.12/12/2013 चे उत्तर दिलेले नाही.

एकूण वसुल पात्र रक्कम रु.45165530/-

DPSKGGM6001 (Ref No : 126, Hmm No : 159)

## *86 अनुसुचित जाती नवबौद्ध घटकाच्या घरकुल योजनेमधील अनियमिततेबाबत.*

**अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : घरकुल योजना राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 47103490.00/-

***ब्रँड विस्टा यांनी तयार केलेली लाभार्थ्यांची सर्व्हेक्षण यादी सदोष असतानाही सदर यादीनुसार लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार लाभार्थ्याची पात्रता,सादर करावयाची कागदपत्रे, लाभार्थ्यांनी अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे व सर्व अटींची पुर्तता झाले नंतरच लाभ देणे आवश्यक आहे परंतु परिशिष्ट क्र.(14) मधील नमुद लाभार्थ्यांचे अर्जामध्ये त्रुटी असतानाही त्यांना अनुदान देणेत आलेले आहे.***

| अ.क्र. | दिनांक | धनादेश क्र. | रक्कम | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 24/01/12 | 122344ते60 | 1700000 | 17 |
| 2 | 24/01/12 | 124221ते42 | 2300000 | 23 |
| 3 | 27/01/12 | 124444ते63 | 1900000 | 19 |
| 4 | 01/02/12 | 124265ते4320 | 5600000 | 56 |
| 5 | 06/02/12 | 124401ते04 | 4000000 | 40 |
| 6 | 06/02/12 | 124405 | 700000 | 7 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | 17/02/12 | 124406ते12 | 6800000 | 68 |
| 8 | 09/03/12 | 124416ते34 | 18800000 | 188 |
| 9 | 22/03/12 | 124435ते38 | 3400000 | 34 |
| 10 | 22/03/12 | 124439 | 640000 | 08 |
| 11 | 22/03/12 | 124440 | 480000 | 06 |

विशेष समाज कल्याण अधिकारी सोलापूर यांचे जा.क्र.विजिसकअ-सो/घरकुल/उद्दिष्टे/11-12/2332 दि.29/07/2011 नुसार सोलापूर महानगरपालिका क्षेत्रासाठी 10/11 व 11/12 साठी एकूण 3690 घरकुलाचे उद्दिष्ट देणेत आले आहे. त्याकरिता (10/11 साठी 590 व 2011-12 साठी 3100 घरकुले) एकूण रु.1496.00 लक्ष इतकी रक्कम महानगरपालिकास शासनाकडून मिळाली आहे. अनु.जाती व नवबौद्ध घटकासाठी घरकुल योजना, महानगरपालिका क्षेत्र घरकुल निर्माण समिती बैठक दि.4/11/2011 चे इतिवृत्ताप्रमाणे,मे.ब्रँडविस्टा मास कम्युनिकेशन कनेक्टीव्हीटी, सोलापूर या संस्थेने केलेल्या लाभार्थी सर्वेक्षण अहवालानुसार नगर अभियंता यांनी निवड समिती समोर सादर केलेल्या 1131 दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी प्रस्तावास मंजुरी देणेत आली. त्यापैकी शासन निर्णय दि.15/11/2008 कलम 6 व शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.बी.सी.एच.2009/प्र.क्र./159/मावक 2 दि.09 मार्च 2010 मधील परि. 09 नुसार प्राधान्य क्षेत्रातील एकूण 154 लाभार्थी आणि दारिद्र्य रेषेखालील एकूण 556 लाभार्थी असे एकूण 710 लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी 2 लाख प्रमाणे रु.1420 लाख एवढी रक्कम बांधकाम अनुदान म्हणून मंजुर करणेत आली व उपरोक्त शा. नि.मधील कलम 11 अन्वये 5% रक्कम घरकुल योजना आराखडे तयार करणेच्या प्रशासकीय कामकाजासाठी म्हणजेच मंजुर अनुदान रु.1496.00 लाख चे 5% प्रमाणे रु.7480000/- रक्कम राखून उर्वरित रु.1421.20 लाख लाभार्थ्यांना घरकुल अनुदानासाठी मंजुर करणेत आली.

वर्क ऑर्डरः- ब्रँड विस्टा मास कम्युनिकेशन, विजापूर रोड,जा.क्र.285, नगर अभियंता दि.03/08/2011 ने 30 दिवसांचे आत सर्वेक्षणाचे काम करण्याचा कार्यादेश देणेत आलेला आहे.व त्यांनी एकूण दारिद्र्य रेषेखाली असलेले 1942 लाभार्थी प्रस्ताव महानगरपालिकास दिलेले आहेत.

नगर अभियंता यांचे जाक्र. न. अ./गवसु/338 दि.12/7/2011 चे टिपणी मध्ये शहरातील एकूण 98 वॉर्डातील दारिद्र्य रेषेखालील यादीत अंदाजे 40 हजार लाभार्थी असलेचे नमुद आहे.महानगरपालिकेच्या नागरी विकास प्रकल्प यांनी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत मा.शासनाकडून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची एकूण संख्या 40052 इतकी नमुद केली आहे.

143) ब्रँड विस्टा यांचे दि.14/10/2011 चे पत्र न. अ.आवक क्र.4556 दि.14/10/2011 नुसार एकूण 1270 परिपूर्ण प्रस्ताव दिलेचे नमूद आहे परंतु नगर अभियंता यांचे जा. क्र.1073 दि.17/03/2012 चे पत्रानुसार एकूण 18 लाभार्थीचे अर्ज चुकीचे असलेने पुन्हा फेरतपासणी करणेच्या दिलेल्या आदेशाप्रमाणे ठेकेदाराने 9 नावे वगळून,झोपडपट्टी सुधारणा आवक क्र.1890 दि.22/03/2012ला पत्र दिले आहे.त्यामुळे सर्वेक्षण यादी सदोष असलेचे स्पष्ट होते.

144) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शा.नि.क्र.बी.सी.एच.2009/प्र.क्र. 159/मावक 2 दि.9

मार्च 2010 मधील परि.3 नुसार लाभार्थ्यास शासनाचे एकाच योजनेचा लाभ देणेचा आहे. त्यामुळे लाभार्थ्यास आय.एच.एस.डी.पी,म्हाडामार्फत बांधलेल्या घरांचा लाभ घेतला नसलेचे प्रमाणित करणे आवश्यक असता तसे प्रमाणित केलेले नाही.

145) शासन निर्णय क्रमांक बी.सी.एच.-2008/प्र.क्र.36/मावक-2 दि.15 नोव्हें 2008 परिशिष्ठ अ.परिच्छेद 7 नुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये व्यापक प्रसिद्धी देवून परिशिष्ठ क मध्ये असलेल्या विहित नमुन्यात अर्ज मागवुन घेणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही न करता ब्रँड विस्टा मास कम्युनिकेशन या खाजगी संस्थेस लाभार्थी सर्वेक्षण अहवाल तयार करणेचे काम देणेत आले आहे.

146) जा.क्र.न.अ.झो.सु/950 दि.23/02/2012 नुसार मक्तेदार यांनी एकूण 1732 दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी यादी दिलेचा दाखला दिला आहे. परंतु ब्रँड विस्टा मास कम्युनिकेशन यांचे दि.21/12/2011 चे पत्रामध्ये एकूण 1130 दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी अर्ज प्राप्त झालेचे नमुद आहे, व त्यास अनुसरुन महानगरपालिका क्षेत्र घरकुल निर्माण समिती बैठक दि.04/11/2011 चे इतिवृत्तामध्ये 1131 दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी प्रस्तावास मंजुरी देणेत आली आहे. त्यामुळे शहरातील संपुर्ण लाभार्थ्यांचे सर्वेक्षण न करताच यादी मंजुर केलेचे दिसून येते. त्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग पुरकपत्र क्र.बी.सी.एच.-2009/प्र.क्र.159/मावक-2 दि.6 ऑगस्ट 2010 मधील परिच्छेद क्र.4 टिपनुसार प्रस्तुत घरकुल योजनेस अनुसरुन शासनाकडे प्राप्त झालेल्या अर्जामधील पात्र अर्जदारापैकी ज्यांची नावे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये सामाविष्ट आहेत, त्या लाभार्थींना प्रथम सर्वोच्च प्राधान्य देणेत येईल या अटींचा भंग झालेचे स्पष्ट होते.

147) सदर कामासाठी महानगरपालिका बांधकाम परवानगी विभागाकडील नोंदणीकृत इंजिनियर यांची नेमणूक करुन लाभार्थ्यांच्या घराचे जागेवर जावून तांत्रिक सर्वेक्षण करणे, मोजमापे घेणे व स्टेजवाईज वेळोवळी पाहणी करणे करिता दरपत्रके मागविणेत आली. एकूण सहा नोंदणीकृत इंजि. 1) अभिजित कुलकर्णी, 2) राजकिरण वडनाला सोलापूर, 3) रमेश कोमटी, 4) विशाल भताड, 8) प्रभाकर कोनपुरे, 6) लक्ष्मीनारायण उल्ल्या. जा.क्र.झो.सु/794/दि.28/12/2011 प्रमाणे या नोंदणीकृत मक्तेदाराशी वाटाघाटी करुन 26/12/2011 रु.2950/- लाभार्थी इतक्या दराने सुपरव्हिजन करणेचे पत्र दिले आहे.त्याप्रमाणे लाभार्थ्यांनी बांधलेल्या घरांचे हप्त्यापोटीची रक्कम नोंदणीकृत अभियंता यांनी तांत्रिक तपासणी अहवाल दिल्यानंतर आदा केली आहे.परंतु सदर तांत्रिक अहवालावर प्रत्यक्ष जागेवर जावुन मोजमापे घेवून प्रत्यक्षात झालेले बांधकाम महानगरपालिकेचे सक्षम तांत्रिक अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता देयके नियमबाहयरित्या आदा करणेत आली आहेत.

148) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शा.नि.क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2,मुंबई दि 9 मार्च 2010 परिच्छेद 4 अ)लाभार्थ्याची पात्रता व 4 ब)लाभार्थ्याने सादर करावयाची कागदपत्रे लाभार्थ्यांनी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे व सर्व अटींची पुर्तता झालेनंतरच लाभ देणे आवश्यक

आहे परंतु परिशिष्ट क्र.(14) मधील नमुद लाभार्थ्याचे अर्जामध्ये त्रुटी असतानाही त्यांना अनुदान देणेत आले आहे.

149) शा.नि.दि.9 मार्च 2010 मधील परिच्छेद 24 नुसार बांधकामाचा दर्जा तपासणेसाठी संचालक समाजकल्याण,पुणे यांनी जिल्हानिहाय पथक तयार करुन एका जिल्हयातील पथकाकडून दुस-या जिल्हयातील कामांची तपासणी करणे आवश्यक आहे.तसेच संचालक स्तरावर कांही बांधकामांची तपासणी करणे आवश्यक आहे.परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेचे नस्तीवरुन दिसून आलेले नाही.

150) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम1949 चे कलम 253 अन्वये लाभार्थ्याने बांधकाम परवानगी घेणे आवश्यक आहे व महानगरपालिकेने कलम 258 अन्वये बांधकाम परवानगी देणे आवश्यक आहे.परंतु नियमाप्रमाणे बांधकाम परवानगी न घेताच घरकुले बांधणेत आलेली आहेत.

151) 2011-2012 मध्ये रोजकिर्द व धनादेश नोंदवहीनुसार योजनेवर एकुण रु.47103490/- इतका खर्च झालेला आहे परंतु 2013-14 चे अर्थसंकल्पामध्ये पान क्र.88,अ.क्र.15 नुसार नक्की आकडेमध्ये तसेच वर्गीकरण नोंदवहीमध्ये रु.8384570/- खर्च झालेचे नमुद आहे.नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.56 अन्वये प्रशासनाचे सोयीसाठी रोकडवहीमध्ये नोंदलेल्या जमा व खर्चाच्या बाबींचे,नमुना क्र.25 प्रमाणे दुय्यम वर्गीकृत गोषवा-यामध्ये वर्गीकरण करणे आवश्यक असता त्याप्रमाणे लेखा शाखेकडून अचूक लेखांकन केले गेले नसल्याचे स्पष्ट होते. न.पा.लेखासंहिता 1971 चे नियम क्र.58 अन्वये मासिक लेखे पूर्ण वा बंद केल्यानंतर लेखापालाने संकलन/जमा पुस्तकामध्ये दर्शविलेले एकूण संकलन/जमा,वर्गीकृतपुस्तकात दर्शविलेल्या एकूण् जमेशी पडताळून कांही विसंगती आढळल्यास ती दूर केली पाहिजे अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली गेलेली नाही तसेच वर्गीकरण नोंदवहीतील आकडेवारीवरुनच लेखा शाखेने पुढील आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये प्रत्यक्ष खर्चाचे नक्की आकडे घेतलेने जमा व खर्चाचे लेखांकन चुकीचे होउन अंदाजपत्रक चुकलेचे दिसून येते.

अर्धसमास ज्ञापन क्र.181 दि.16/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 141, Hmm No : 181)

## *87 डॉ. कोटणीस स्मृती स्मारक उभारणे या कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : स्मारक मंदीर उभारणे राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 69802.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 14600.00/-

***विशेष समितीच्या दि. 17/01/2009 च्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये तसेच शासन निर्णयान्वये बाधित रहिवाशांना 400 चौ. फुटांचे गाळे असलेल्या तीन इमारती बांधण्यास मंजुरी आहे. असे असताना रो - हाऊसेस बांधुन देण्यात आली आहेत. महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 165 अन्वये नगर अभियंता यांनी अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्यापुर्वी जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण केले पाहिजे. प्रस्तुत प्रकरणी अशी कार्यवाही नगर अभियंता यांचेकडुन झालेली नसल्याने पुर्वगणन पत्रक वारंवार फेर तयार करावे लागले आहे तसेच त्यामुळे काम पुर्ण होणेमध्ये विलंब होत असल्याचे व कामाची किंमत वाढली असलेचे स्पष्ट होते.***

मुख्य सचिव यांचे दालनात दि . 12.02.2008 रोजी झालेल्या बैठकीत डॉ . कोटणीस पुर्वी वास्तव्यास असलेल्या घराचे स्मृती स्मारकात रुपांतर करण्याचे ठरविण्यात आले . त्यामध्ये भुमी सं पादित करणे, तेथे वास्तव्यास असणा-या रहिवाशांचे पुनर्वसन करणे व स्मारकाच्या जागेचे अंतर्बाह्य सुशोभिकरण करणे या बाबी समाविष्ट होत्या.

सदर प्रकरणी तेथे रहिवास असलेल्या 40 कुटंबांचे पुनर्वसन करणेकामी वस्त्रोद्योग महामंडळाच्या नरसिंग गिरजी मिलच्या जागेपैकी 2250 चौ.मी. जागा ताब्यात घेऊन प्रती कुटुंब 400 चौ.फुट प्रमाणे प्रत्येकी 12,12,16 अशा गाळ्यांच्या तीन इमारती बांधण्याचे ठरविण्यात आले. त्याकरीता रु. 1.25 कोटी व भुसंपादनासाठी रु. 2.25 कोटीची तरतुद करण्यात आली.

वरील सर्व बाबींचा समावेश करुन शासन निर्ण य क्र . सोमपा/1808/140/प्र.क्र.15/08/न.वि.25 दि. 24/04/2008 जारी करण्यात आला. सदर शासन निर्णयानुसार राज्य स्तरावर एक समिती गठीत करण्यात आली तसेच दि. 6/01/2009 च्या टिप्पणीन्वये या कामावर देखरेख करणे व येणा -या अडचणींबाबत निर्णय घेणेकामी आयुक्त, सोलापुर महानगरपालिका याचे अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत करण्यात आली . सर्वसाधारण सभा ठराव क्र . 92 दिनांक 14/06/2008 अन्वये बाधित रहिवाशांना तळ (+) 1 मजला प्रमाणे रो - हाऊस बांधुन देण्याचे व त्याप्रमाणे संबंधित विभागाने प्रस्ताव ठेवण्याचे ठरविण्यात आले . तथापि त्यानुसार प्रस्ताव सादर केल्याचे व त्यास शासनाची मंजुरी प्राप्त करुन घेतेल्याचे नस्तीतील दस्तावेजामध्ये निष्पन्न झाले नाही . तद्नंतर झालेल्या विशेष समितीच्या दि . 17/01/2009 च्या बैठकीच्या इतिवृत्तामध्येही तसेच उपरोक्त शासन निर्णयामध्ये बाधित रहिवाशांना 400 चौ. फुटांचे गाळे असलेल्या तीन इमारती बांधण्याचे नमुद आहे . असे असताना सद्यस्थितीत रो - हाऊसेस बांधुन देण्यात आली आहेत.

निवासी जागा बांधणे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | डॉ.कोट्णीस स्मृती स्मारक (निवासी जागा बांधणे.) |
| सु.बे./म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | श्री. कलगुटगी |
| तांत्रिक मंजुरी | ----- |
| प्रशासकीय मंजुरी | स्था.स.ठ.क्र.798 दि. 12/08/2009 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2006-07 |

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकाची रक्कम | 14158976/- |
| बजेट तरतुद | 12500000/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 11 दिवस, लोकमत, सकाळ, |
| इसारा रक्कम | रु. 141600/- |
| निविदा रक्कम | रु. 15511158/- (9.54% जास्त) |
| सुरक्षा अनामत | रु. 283180/- (+) 2% देयकामधुन. |
| कामाचा कालावधी | 6 महिने |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 100/- दि. 20/08/2009 |
| दोषदायित्व कालावधी | 2 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | क्र. --- दि. 21/08/2009. |
| काम सुरु दिनांकः----- | काम पुर्ण दिनांकः |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम रु.18224675/- | देयक क्र. 1<br>देयक क्र. 2 |
| प्रमाणक क्र. | मोजमाप पुस्तक क्र. 162 |

डॉ. कोटणीस स्मृती स्मारक उभारणेकामी बाधीत रहिवाशांकरीता बांधावयाच्या रो - हाऊसेसचा नकाशा व खर्चाचे पुर्वगणनपत्रक पालिकेच्या पटावरील वास्तुविशारद श्री. हरीसंगम यांचेकडुन तयार करुन घेण्यात आले व त्यानुसार प्रस्तुत कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली . त्यास तीन निविदाकारांचा प्रतिसाद लाभला . त्याप्रमाणे प्राप्त झालेले दर , मे. हेव्हन कन्स्ट्रक्शन 17% ने अधिक (रु.16566001/-), मे. समर्थ कन्स्ट्रक्शन 12.28% ने अधिक (रु. 15897698/-) व श्री. कलकुटगी यांचे दर 9.54% ने अधिकचे (रु. 15511158/-) होते. स्थायी समिती ठराव क्र . 798 दि. 12/08/2009 अन्वये श्री कलकुटगी यांचे न्युनतम दर स्विकारण्यात आले . त्यानुसार श्री. कलकुटगी यांचेसोबत दि. 20/08/2009 रोजी रु. 100/- च्या स्टॅम्प पेपेरवर करारनामा करण्यात आला व त्यांना दि. 21/08/2009 रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.

व्यवस्थापकीय संचालक, वस्त्रोद्योग महामंडळ यांचेकडुन दि . 4/08/2009 रोजी 3100 चौ.मी. जागेचा ताबा घेण्यात आला (म्हणजे 850 चौ.मी. जास्त). जास्तीची जागा घेण्याबाबतची कारणे अथवा अन्य दस्तावेज नस्तीबध्द नाहीत. रो - हाऊसिंगच्या नियोजित प्लॅनमुळे जागेचे क्षेत्रफळ कायम ठेऊन जागेच्या लांबी रुंदीमध्ये 3 ते 4 मीटरचा फरक पडला. त्यासाठी मंजुरी मिळणेकरीता वस्त्रोद्योग महामंडळाकडे प्रस्ता व सादर करण्यात आला. त्यास प्राप्त झालेली मंजुरी नस्तीबध्द नाही . नमुद बदलानुसार नकाशातदेखील बदल झाला असुन वास्तुविशारदांनी नवीन नकाशे दि . 29/10/2009 रोजी सादर केले. पुनः कॉलमच्या मापामध्ये बदल करुन दि . 11/11/2009 रोजी नकाशे सादर केले . नियोजित जागेवर असलेली जुनी इमारत पाडण्याचे काम दि . 14/11/2009 रोजी पुर्ण झाआ.ले. सदर प्रकरणीची नस्ती तपासली असता पुढील अनियमितता आढळुन आल्या.

152) पहिल्या टप्प्याची कार्यवाही पुर्ण होऊन जागेवरील डेब्रीज उचलल्यावर वास्तुविशारद यांनी दि . 24/08/2009 रोजी कमाची पहाणी केली तेव्हा नॅशनल हायवे व पाडकामानंतर आतील ग्राऊण्ड लेव्हल यामध्ये साधारणतः 7 ते 8 फुटांचा फरक असल्याचे निदर्शनास आले . करीता वास्तुविशारदांनी सदर

जागेत स्टील्ट फ्लोअर करण्या चे किंवा मुरुम भराई करुन काम करण्यासाठी दि .21/10/2009 रोजी पुर्वगणन पत्रक सादर केले. आयुक्तांनी दि. 11/11/2009 रोजी सदर कामाचे फेर पुर्वगणन पत्रक सादर करण्यास सांगितले. त्यानुसार दि. 7/12/2009 रोजी सदर कामाच्या रु . 2260065/- च्या वाढीव खर्चासह (यात रिटेनिंग वॉल व मुरुम भराई इ . कामाचा समावेश आहे) फेर पुर्वगणन पत्रक व सदर काम सध्याच्या मंजुर मक्तेदाराकडुनच करुन घ्यावयाच्या कामाचा प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यास आयुक्तांनी दि . 10/12/2009 रोजी मान्यता देऊन दि . 11/12/2009 रोजी प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर केला. त्यास स्थायी समिती ठराव क्र. 2457 दि. 20/02/2010 अन्वये सक्षम मान्यता प्राप्त झाली. महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 165 अन्वये नगर अभियंता यांनी अंतिम तपशिलवार अंदाज तयार करण्यापुर्वी जागेच्या संबंधात स्थानिक निरीक्षण केले पाहिजे. प्रस्तुत प्रकरणी अशी कार्यवाही नगर अभियंता यांचेकडुन झालेली नसल्याने पुर्वगणन पत्रक वारंवार फेर तयार करावे लागले आहे तसेच त्यामुळे काम पुर्ण होणेमध्ये विलंब होत असल्याचे व कामाची किंमत रु. 40,65,699/- ने वाढली असलेचे स्पष्ट होते.

**153)** मे. कलकुटगी यांचेसोबत दि. 20/08/2009 रोजी रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. वस्तुतः मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती/सुधारणा क्र. 12 दि.1.5.2006 नुसार निविदा रकमेच्या प्रथम रु. 10 लक्षापर्यंत रु. 100/- व त्यापुढील प्रत्येक रु. 1 लक्षाकरीता रु. 100/- प्रमाणे (जास्तीत जास्त रु. 5 लक्षाच्या मर्यादेपर्यंत) मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक आहे. त्यानुसार मे. कलकुटगी यांन रु. 14700/- मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक होते. करीता संबंधितांकडुन रु. 14600/- वसुल करुन शासन सदरी जमा करावेत. तोपर्यंत रक्कम रु. 14600/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

**154)** वाढीव खर्चाच्या बाबींमध्ये डेब्रीजची वाहतुक करणे ही नवीन बाब समाविष्ट करण्यात आली आहे. यात दर्शविण्यात आलेल्या अंदाजे 80 खेपांवर प्रती खेप रु.872.52 प्रमाणे रु. 69802/- खर्चाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मोजमाप पुस्तिका क्र.162 पृष्ठ क्र. 170 वर तेवढाच खेपा/खर्च तंतोतंत झाल्याची नोंद घेण्यात आली आहे. प्रत्यक्षात अंदाज वर्तविताना तसेच नोंदी घेताना डेब्रीजचे परिमाण , वाहतुक करावयाचे अंतर, ते टाकण्याचे ठिकाण, त्याची मालकी याबाबत उल्लेख असणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याने **सदर खर्च रु.69802/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.**

155) पुर्वगणन पत्रक प्रत्यक्ष 40 रो - हाऊसेस, समाज भवन व वाचनालयाच्या बांधकामाकरीता व वाढीव खर्चासह तयार करण्यात आले होते . परंतु प्रत्यक्षात प्राप्त निधी फक्त 34 रो- हाऊसेस बांधण्यावरच खर्च करण्यात आला आहे . उर्वरीत 6 रो - हाऊसेस बांधण्याच्या खर्चाचा बोजा महानगरपालिका निधीवर पडणार आहे. सदर 6 रो - हाऊसेस महानगरपालिकेने अजुन बांधलेली नाहीत त्यामुळे उर्वरीत 6 बाधितांचे पुनर्वसन कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे याबाबतची माहिती नस्तीमध्ये नमुद नाही.

156) बांधकाम पुर्ण झालेली घरे बाधित कुटुंबांना हस्तांतरीत केली आहेत किंवा नाही याबाबतची माहिती नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र. 179 दि. 15/01/2014 अन्वये अभिप्राय कळविण्यात आले होते तथापि अनुपालन अप्राप्त आहे.

## *88 नगर अभियंता, विद्युत भांडार विभागाकडील खरेदी, लेखे/ नोंदवह्यामधील आढळुन आलेल्या अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : विद्युत साहित्य खरेदी महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2004057.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 843533.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 200406.00/-

***महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 145(1),145(2) नुसार व राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) जोड्पत्रातील एसटी 1 ते एसटी 3 या नमुन्यात भांडार लेखे ठेवले जात नाहीत. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6 दि. 2 जाने. 1992 मधील परिच्छेद क्र. 8.3 (ई) नुसार वर्षभर वापर असलेल्या वस्तुच्या खरेदीकरीता निविदा प्रक्रिया राबवुन वार्षिक दरकरार करणे व गरजेनुसार वेळोवेळी मक्तेदारास पुरवठा आदेश देऊन मालाची मागणी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी अशी कार्यपध्दती न अवलंबिता संपुर्ण वर्षाकरीता लागणारे साहित्य एकाच वेळी खरेदी केलेने महानगरपालिकेचा रु. 20,04,057/- एवढा निधी एकाच वेळी गुंतुन पडला.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | रस्त्यांवरील दिवे दुरुस्तीकरीता साहित्य खरेदी |
| सु.बे./म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | आर्या फिलामेंटस प्रायव्हेट लिमिटेड |
| तांत्रिक मंजुरी | ----- |
| प्रशासकीय मंजुरी | 2/09/2011 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | ----- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 20 लक्ष |
| बजेट तरतुद | 40 लक्ष |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 12दिवस, लोकमत-सोलापुर,पुणे.सकाळ-सोलापुर,मुंबई. |

| | |
|---|---|
| इसारा रक्कम | रु. 20,000/- |
| निविदा रक्कम | रु. 2004057/- |
| सुरक्षा अनामत | रु. 60081/- (+) 2% देयकामधुन. |
| कामाचा कालावधी | 30 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 1200/- दि. 31/12/2011 |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | क्र. 842 दि. 31/12/2011. |
| काम सुरु दिनांकः- 31/12/2011 | काम पुर्ण दिनांकः 16/4/2012 |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | देयक क्र. 1<br>रु. 1980118/- |
| प्रमाणक उपलब्ध झाले नाही | मोजमाप पुस्तक नाही |

157) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 145(1) नुसार नोंदवही नमुना क्र. 116 व 117 मध्ये उपभोग्य भांडार साहित्याच्या नोंदी ठेवणे आवश्यक असताना सदर नमुन्यात नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नाहीत.

158) नियम क्र. 145(2) अन्वये प्रत्येक महिनाअखेरीस लेखा पुर्ण करुन वस्तुमालाची शिल्लक पडताळणी करुन पुढील महिन्याची प्रारंभिक शिल्लक म्हणुन नोंद घेतली पाहिजेत. अशी कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.

159) महानगरपालिकेकडे ठेवण्यात आलेल्या नोंदवहयांमध्ये पुरवठा प्राप्त वस्तुंची फक्त संख्या नोंदविण्यात येते. अशा वस्तुंची नोंद घेताना त्याचा चलन क्रमांक, बीजक क्रमांक, वस्तुची प्रतिनग किंमत, बीजकाची एकुण रक्कम नोंदविणे आवश्यक आहे. तसेच वस्तुचा वापर नोंदविल्यावर हाती शिल्लक नोंदविणे आवश्यक आहे. तथापि अशा पध्दतीने नोंदी घेण्यात येत नाहीत.

160) शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि. 6/7/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) जोड्पत्रातील एसटी 1 ते एसटी 3 या नमुन्यात भांडार लेखे ठेवणे आवश्यक आहे. ही कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.

161) आर्थिक वर्ष 2011-12 मधील रस्त्यांवरील दिवे दुरुस्तीकरीता साहित्य खरेदीची निविदा प्रक्रिया माहे जुलै 2011 मध्ये राबविण्यात आली. दै. लोकमत व सकाळ या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्यास मे. क्रॉम्प्टन ग्रीव्हज, मे. बजाज इलेक्ट्रीकल्स, मे. सुर्या रोशनी व मे. आर्या फिलामेंट्स या कंपन्यांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. आर्या फिलामेंट्स यांची

न्युनतम निविदा स्विकारण्यात आली. त्याचेसोबत दि. 31/12/2011 रोजी करारनामा करुन त्याच दिवशी कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदर प्रकरण नस्ती तपासली असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

162) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक कार्य (विद्युत) विभागाच्या 2011-12 च्या प्रसिध्द करण्यात आलेल्या जिल्हा दरसुचीतील मंजुर दरांचा वापर करुन खरेदी करावयाच्या वस्तुमालाच्या प्रस्तावित खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन प्रथम त्यास तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही. (चालु आर्थिक वर्षाची दरसुची उपलब्ध नसल्यास मागील वर्षाचे दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे). लेखापरीक्षणास जिल्हा दरसुची उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निविदेद्वारे प्राप्त दर सुसंगत असल्याची तपासणी करता आलेली नाही.

**163)** निविदा प्रक्रिया उशिरा सुरु केल्याने व प्रक्रियेस लागलेल्या प्रशासकीय विलंबाने सोबतच्या परिशिष्टातील(23) बाब क्र. 2,3,4,6,16,18,20,24 हा वस्तुमाल 2010-11 च्या मक्तेदाराकडुन खरेदी करावा लागला. सदर मक्तेदाराचे दर चालु वर्षीच्या दरापेक्षा अधिकचे असल्याने महानगरपालिकेस रु. 17137.70 जादा खर्च करावा लागला. **रक्कम रु.17137.70 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.**

**164)** सोबतच्या परिशिष्टातील(24) बाब क्र. 6,7, 12 ते 17 व 19 ते 24 या वस्तुमालाची दि. 1/04/2011 ची शिल्लक व वार्षिक वापर पाहता सदर बाबींची सन 2011-12 मध्ये अनावश्यक खरेदी करण्यात आली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा रु. 826395.50 एवढा निधी अनावश्यकरित्या गुंतुन पडला. **करीता रक्कम रु. 826395.50 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.**

165) बाब क्र. 9,14 व 22 येथील वस्तुमालाच्या दरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसते. सदर वाढीबाबत सदर दर हे बाजारभावाशी सुसंगत असल्याचे सक्षम प्राधिका-याचे/निविदा समिती अथवा खरेदी समितीचे प्रमाणपत्र नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

166) मक्तेदारास कार्यारंभ आदेश दि. 31/12/2011 रोजी देण्यात आले होते. त्यानुसार मक्तेदाराने संपुर्ण वस्तुमालाचा पुरवठा 30 दिवसात म्हणजेच दि. 29/01/2012 पर्यंत करणे क्रमप्राप्त होते. तथापि प्रत्यक्ष पुरवठा दि. 30/03/12 रोजी व बाब क्र. 14 चा पुरवठा दि. 16/04/12 रोजी करण्यात आला आहे. निविदा अटी व शर्ती तसेच करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार पुरवठा विलंबाने केला गेल्यास मक्तेदाराकडुन प्रतिदिन रु. 100/- अथवा मक्त्याच्या रकेमेच्या 10% प्रमाणे दंड आकारणी करण्याचे नमुद आहे. त्यानुसार मक्तेदाराकडुन रु. 7700/- अथवा रु. 200406/- एवढी दंडवसुली करणे आवश्यक होते. परंतु देयक प्रदान करताना दंड आकारणी केल्याचे दिसुन येत नाही. **करीता दंडाची रक्कम रु. 200406/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.**

167) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6 दि. 2 जाने. 1992 मधील परिच्छेद क्र. 8.3 (ई) नुसार वर्षभर वापर असलेल्या वस्तुच्या

खरेदीकरीता निविदा प्रक्रिया राबवुन वार्षिक दरकरार करणे व गरजेनुसार वेळोवेळी मक्तेदारास पुरवठा आदेश देऊन मालाची मागणी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी अशी कार्यपध्दती न अवलंबिता संपुर्ण वर्षाकरीता लागणारे साहित्य एकाच वेळी खरेदी केलेने महानगरपालिकेचा रु. 20,04,057/- एवढा निधी एकाच वेळी गुंतुन पडला.

याबाबत देण्यात आलेल्या अर्धसमास ज्ञापनास दि . 22/10/2013 रोजी अनुपालन प्राप्त झाले असुन भविष्यात अर्धसमासात उल्लेखिलेल्या विहित नमुन्यातील नोंदवह्या , त्यातील नियमानुसार नोंदी इत्यादीबाबत तसेच निविद प्रक्रिया वेळीच राबविण्याबाबत कार्यवाही करणेत येईल असे नमुद आहे . तसेच निधी अनावश्यकरित्या गुंतुन पडला याबाबतच्या अनुपालनात खरेदीची कारणे व ती कशी खरेदी करण्यात येते याबाबतची प्रक्रिया नमुद करण्यात आली असल्याने अनुपलन संयुक्तिक नाही . याकरीता तातडीने उद्भविणा -या कामांकरीता आवश्यक साठा भांडारात उपलब्ध ठेवण्याची तरतुद आहे . त्यामुळे संपुर्ण वर्षाचे साहित्य खरेदी करण्याची आवश्यकता नाही , असे लेखापरीक्षणाचे मत आहे . वस्तुमालाच्या दरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याबाबत सदर दर हे बाजारभावाशी सुसंगत असल्याचे अनुपालन सादर करण्यात आले आहे . तथापि अभिप्रायात सदर दर बाजारभावाशी सुसंगत असल्याचे सक्षम प्राधि का-यांनी प्रमाणित केले नसल्याबद्दल आक्षेप आहे. वस्तुमाल विलंबाने पुरवठा केल्याबाबत रु. 30060/- दंड वसुलीची प्रक्रिया सुरु असल्याचे नमुद आहे परंतु हि रक्कम कशी परिगणित केली याबाबत अनुपालनात भाष्य नाही . कार्यवाही प्रलंबित असल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत.

आक्षेपाधिन रक्कम - रु. 8,43,533/-

**वसुलपात्र रक्कम - रु.** 2,00,406/-

DATSCDM5901 (Ref No : 105, Hmm No : 74)

## *89 नगर अभियंता, विद्युत भांडार विभागाकडील रु. 41,02,017/- च्या विद्युत साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : विद्युत साहित्य खरेदी महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 999369.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 67 (3)(क) अन्वये आयुक्तांना असलेल्या अधिकाराचा वापर करुन रु.10 लाखाच्या साहित्य खरेदीकरीता दि. 19/10/2010 च्या टिप्पणीन्वये आयुक्तांची मान्यता घेऊन रु.999369/- एवढ्या रकमेच्या विविध 14 साहित्यांची तातडीची खरेदी करण्यात आली आहे. परंतु आयुक्ताने केलेल्या कार्यवाहीमुळे झालेला खर्च याविषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व***

***महानगरपालिका यांचेकडे ताबडतोब पाठविणे आवश्यक असता ते पाठविलेले नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | रस्त्यांवरील दिवे दुरुस्तीकरीता साहित्य खरेदी |
| सु.बे./म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | बागडी एजन्सीज (सुर्या रोशनी लिमिटेड) |
| तांत्रिक मंजुरी | ----- |
| प्रशासकीय मंजुरी | स्था.स.ठ.क्र.894 दि. 30/11/10 (विद्युत विभागास प्राप्त दि.6/01/11) |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | ----- |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 40 लक्ष |
| बजेट तरतुद | 40 लक्ष |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 9दिवस, लोकमत,सकाळ,सांज,सुराज. |
| इसारा रक्कम | रु. 40,000/- |
| निविदा रक्कम | रु. 4394712/- |
| सुरक्षा अनामत | रु. 80000/- (+) 2% देयकामधुन. |
| कामाचा कालावधी | 30 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | रु. 3500/- दि. 19/1/2011 |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश | क्र. 1124 दि. 14/1/2011. |
| काम सुरु दिनांकः- 27/10/2013 | काम पुर्ण दिनांकः 16/4/2012 |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम | देयक क्र. 1 रु. 999369/-<br>देयक क्र. 2 रु.3102648/- |
| प्रमाणक उपलब्ध झली नाहीत. | मोजमाप पुस्तक नाही |

आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये “रस्त्यांवरील दिवे दुरुस्तीकरीता साहित्य खरेदी” या लेखाशिर्षांतर्गत रु. 41,02,017/- खर्ची टाकण्यात आले आहेत. या खर्चाच्या प्रकरण नस्तीची मागणी केली असता ती प्रत्यक्षात 2010-11 मधील असल्याचे निदर्शनास आले.

आर्थिक वर्ष 2010-11 मधील रस्त्यांवरील दिवे दुरुस्तीकरीता साहित्य खरेदीची निविदा प्रक्रिया माहे जुलै 2011 मध्ये राबविण्यात आली. दै. लोकमत, सकाळ, सांज व सुराज या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्यास मे. क्रॉम्प्टन ग्रीव्हज, मे. बजाज इलेक्ट्रीकल्स, मे. सुर्या रोशनी व मे. फिलिप्स या कंपन्यांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी मे. सुर्या रोशनी व मे. बजाज यांची विविध साहित्याची

न्युनतम निविदा स्विकारण्यात आली व प्रकरण स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विषय क्र. 901 दि. 30/10/2010 च्या बैठकीस्तव पाठविण्यात आले. तत्पुर्वी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 67 (3) (क) अन्वये आयुक्तांना असलेल्या अधिकाराचा वापर करुन रु. 10 लाखाच्या साहित्य खरेदीकरीता दि. 19/10/2010 च्या टिप्पणीन्वये आयुक्तांची मान्यता घेण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी सदर तातडीच्या खरेदीची जोडनस्तीही लेखापरीक्षणात तपासण्यात आली. निविदाप्रक्रियेस विलंब झाल्याने व मे. बजाज यांचे दर 30 दिवसांसाठी ग्राह्य असल्याने त्यांनी साहित्य पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली तथापि मे. सुर्या रोशनी यांनी मे. बजाज यांनी सादर केलेल्या न्युनतम दराने पुरवठा करण्याची तयारी दर्शविल्याने त्यांचेकडुन या बाबींची खरेदी करण्यात आली. मे. सुर्या रोशनी यांनी त्यांचे स्थानिक अधिकृत पुरवठादार मे. बागडी एजन्सीज यांचेमार्फत पुरवठा स्विकारण्यास कळविले. सदर प्रकरण नस्ती तपासली असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

168) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक कार्य (विद्युत) विभागाच्या सन 2011-12 च्या प्रसिध्द करण्यात जिल्हा दरसुचीतील मंजुर दरांचा वापर करुन खरेदी करावयाच्या वस्तुमालाच्या प्रस्तावित खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन प्रथम त्यास तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही. (चालु आर्थिक वर्षाची दरसुची उपलब्ध नसल्यास मागील वर्षाचे दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे). लेखापरीक्षणास जिल्हा दरसुची उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निविदेद्वारे प्राप्त दराची सुसंगतता तपासता आलेली नाही.

**169)** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 67 (3) (क)अन्वये आयुक्तांना असलेल्या अधिकाराचा वापर करुन रु. 10 लाखाच्या साहित्य खरेदीकरीता दि. 19/10/2010 च्या टिप्पणीन्वये आयुक्तांची मान्यता घेऊन रु.999369/- एवढ्या रकमेच्या विविध 14 साहित्यांची तातडीची खरेदी करण्यात आली. परंतु आयुक्ताने केलेल्या कार्यवाहीमुळे झालेला खर्च याविषयीचे प्रतिवृत्त 15 दिवसांचे आत स्थायी समिती व महानगरपालिका यांचेकडे माहितीस्तव पाठविणे आवश्यक असता ते पाठविलेले नाही. **करीता सदर खर्च रु. 999369/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.**

170) तातडीच्या खरेदीकरीता मे. सुर्य रोशनी यास दि. 27/10/2013 रोजी देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशान्वये सोबतच्या यादीतील साहित्य 60 दिवसांचे आत पुरवठा करण्याचे नमुद करण्यात आले आहे. मुळ निविदेमध्ये कामाचा कालावधी 30 दिवस ठरविण्यात आला आहे. तातडीच्या खरेदीमध्ये जास्त दिवसांची मुदत देण्यामागील कारणे लेखापरीक्षणास अवगत झाली नाहीत.

171) महानगरपालिकेच्या शहर व हद्दवाढ भागात एकुण पोलची संख्या, त्यावर लावण्यात येणा-या विविध दिव्यांची संख्या, दोन पोलमधील सर्वसाधारण अंतर, एम.एस.आर.डी.सी. चे विद्युत पोल यांची माहिती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

याबाबत देण्यात आलेल्या अर्धसमास ज्ञापनास दि . 22/10/2013 रोजी अनुपालन प्राप्त झाले असुन त्यात आयुक्तांच्या मान्यतेने तातडीच्या खरेदीची माहिती स्थायी समितीस दि . 19/01/2011 रोजी देण्यात

आल्याचे नमुद आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 च्या कलम 73(घ) अन्वये अशी माहिती 15 दिवसांचे आत स्थायी समितीच्या निदर्शनास आणणे आवश्यक असता ती 90 दिवसाने सादर करण्यात आलेली असल्याने या कलमाचा भंग झाला आहे . दि. 27/10/2010 च्या कार्यारंभ आदेशामध्ये पुरवठा कालावधी 06 दिवसांऐवजी नजरचुकीने 60 दिवस नमुद केल्याचे अनुपालनात नमुद आहे. तथापि वस्तुमालाचा पुरवठा 06 दिवसांऐवजी दि. 19/12/2010 पर्यंत म्हणजे पुढील 2 महिने करण्यात येत होता. या विलंबाच्या दंड आकारणीबाबत भाष्य केलेले नाही. करीता आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत.

आक्षेपाधिन रक्कम रु. 999369/-

DATSCDM5901 (Ref No : 106, Hmm No : 75)

## *90 व्यापाऱ्यांनी भरलेल्या स्थानिक संस्था कराचे कर निर्धारण न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सर्वसाधारण कर/अप्रत्यक्ष कर व इतर जमा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 288102087.00/-

***महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक अ ,असाधारण क्र.52 नगरविकास विभाग दि.25 मार्च 2010 चे नियम क्र.40 (1) (2) (3) अन्वये आयुक्तांनी लादलेल्या स्थानिक संस्था कर किंवा व्याज अथवा जप्त केलेली कोणतीही रक्कम किंवा दंडाची रक्कम नोंदणीकृत व्यापा-याने संबंधित वर्षातील प्रत्येक महिन्याच्या स्थानिक संस्था कराची रक्कम पुढील महिन्याच्या 10 तारखेला भरणे आवश्यक आहे. जर सदर रक्कम भरली गेली नाही तर नमुना ठ मध्ये नोटीस देऊन वसुलकरणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.तसेच विवरणपत्र भरलेल्या 444 व्यापा-यापैकी 107 व्यावसायिकांकडून त्यांचे कर निर्धारण न करता अंदाजे रु.288102087/- एवढी कर वसुली शिल्लक असल्याचे विवरणपत्रावरुन दिसून येते.***

सोलापूर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर कार्यालयाचे लेखापरिक्षण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

172) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या दि.9 फेब्रुवारी 2011 च्या अधिसूचनेनुसार शासनाने आदेश क्र.एलबीटी 2010/सीआर-132/10/युडी-34 अन्वये सोलापूर महानगरपालिकेस जकातीच्या ऐवजी स्थानिक संस्था कर दि.1 एप्रिल 2011 पासून आकारण्यास मंजूरी दिलेली आहे.

173) स्थानिक संस्था कर कार्यालयाने लेखापरिक्षणास सादर केलेल्या अभिलेखानुसार सन 2011-

12 या आर्थिक वर्षात एकूण 7709 विविध प्रकारच्या व्यावसायिकांनी महानगरपालिकेकडे नोंदणी केलेली असून त्यापैकी 4263 व्यावसायिकांनी प्रत्यक्ष कर भरलेला आहे. मात्र एकूण 1336 व्यावसायिकांनी सदर कर भरण्यास नकार देऊन केवळ 444 व्यावसायिकांनी त्यांचे 11/12या अर्थिक वर्षाचे उलाढालीचे विवरणपत्र महानगरपालिकेकडे जमा केल्याचे सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रावरुन दिसून येते.

a. स्थानिक संस्था कर कार्यालयात कर निर्धारणासाठी एकूण 14 आयातकर निरिक्षक आणि 4 मुख्य आयातकर निरिक्षक, आयातकर अधिक्षकांच्या अधिपत्याखाली नियुक्त आहेत. 2011-12 या वर्षामध्ये ज्या ज्या व्यावसायिकांकडून उच्चतम खरेदीची उलाढाल झाली आहे अशा प्रत्येक विभागातील 14 आयातकर निरिक्षक आणि मुख्यआयातकर निरिक्षक यांचे कडून नमुने दाखल प्रत्येकी 10 व्यावसायिकांच्या वार्षिक उलाढालीचा तपशील पडताळण्यासाठी मागणी केली असता त्यापैकी 11 आयातकर निरिक्षकांनी सोबत जोडलेले परिशिष्ट क्र.(15) मध्ये सादर केले आहे. उर्वरित 3 आयातकर निरिक्षक आणि त्यांचे मुख्य आयातकर निरिक्षक यांचेकडे विभगाने वारंवार मागणी करुन देखिल विहित कालावधीत लेखापरिक्षणास तपशील उपलब्ध करुन देण्यात आला नाही. त्यामुळे उपलब्ध विवरणपत्रावरुन 2011-12 मध्ये विक्रिकर विभागास व्हॅट्चा भरणा केलेल्या व्यवसायिकांच्या यादीवरुन त्यांनी केलेल्या मालाची वार्षिक उलाढाल निश्चित करुन त्यावरुन त्यास महानगरपालिकेने मंजुर केलेल्या दराने स्थानिक संस्था कर भरल्यावर त्यापैकी त्याने प्रत्यक्ष किती कर भरला व किती शिल्लक आहे व त्यावर दरमहा 2 टक्के व्याज धरुन किती वसुली शिल्लक आहे याची पडताळणी केली असता विवरणपत्र भरलेल्या 444 व्यापा-यापैकी 107 व्यावसायिकांकडून त्यांचे कर निर्धारण न करता अंदाजे रु.288102087/- एवढी कर वसुली शिल्लक असल्याचे वरील आयातकर निरिक्षकांनी सादर केलेल्या विवरणपत्रावरुन दिसून येते.

b. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या नियम 10 अन्वये व्यापा-यांना नोंदणी प्रमाणपत्र देताना नियम 3 च्या उपनियम 2 अन्वये नोंदणीस पात्र ठरलेल्या व्यापा-यांकडून सुरक्षा ठेव घेणे आवश्यक आहे. परंतु 2011-12 मध्ये व्यापा-यांची नोंदणीच झाली नसल्याने या बाबतची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर विवरणपत्रातील वार्षिक उलाढालीच्या रक्कमा ह्या व्यापा-यांनी जाहीर केलेल्या असल्याने व सदर विवरणपत्राचे प्रत्यक्ष कर निर्धारण महानगरपालिकेकडून केले गेले नसल्याने सदर व्यापा-यांनी प्रत्यक्षात किती रकमेची वार्षिक उलाढाल केली व त्यांनी नियमानुसार किती कर भरणे आवश्यक होते याचा निश्चित आकडा सांगता येणे शक्य नाही. परंतु वरील107 व्यवसायिकांकडून प्रलंबित कराचे आकडेवारी वरुन महानगरपालिकेस फार मोठ्या प्रमाणावर महसूलास मुकावे लागल्याचे स्पष्ट होते.

c. वरील कर निर्धारण करणेच्या प्रक्रियेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये खालील नियमान्वये कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

174) नियम क्र.10 अन्वये व्यापा-यांना नोंदणी प्रमाणपत्र देताना नियम 3 च्या उपनियम 2 अन्वये नोंदणीस पात्र ठरलेल्या व्यापा-यांकडून स्थानिक संस्था कर, व्याज अथवा दंडाची रक्कम समायोजित करण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी ठरवून दिलेल्या दिनांकापर्यंत सुरक्षाठेव रक्कम म्हणून स्विकारणेस आवश्यक होते.

175) नियम क्र.25 अन्वये आयात केलेल्या कोणत्याही मालाच्या बाबतीत त्याच्या खरेदीच्या कोणत्याही संबंधात एखाद्या व्यापा-याने दाखवलेली खरेदीची किंमत रास्त बाजरभावापेक्षा कमी आहे. अशी आयुक्तांची खात्री पटल्यास सदर व्यापा-याचे म्हणणे ऐकूण घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अशा वस्तूचे रास्त बाजारमुल्य निर्धारित करणे आवश्यक होते.

176) नियम क्र.26 (2) अन्वये मार्गस्थ मालाची तपासणी करताना वाहनचालक मालाच्या मालकीसंबंधीचे दस्तऐवज सादर करण्यास असमर्थ असेल तर सदर मालासंबंधीचा स्थानिक संस्था कर व त्यावरीलदेय व्याज किंवा दंडाची रक्कम नियमातील तरतूदीनुसार वसुलकरणेची तरतूद आहे. सन 2011-12 मध्ये एकूण किती वाहनाची तपासणी केली व एकूण किती दंड वसुल केला याची माहिती लेखापरिक्षणास देण्यात आलेली नाही.

177) नियम क्र.29 अन्वये प्रत्येक नोंदणीकृत व्यापा-याने दि.01/04/2011 पासून नमुना ड-1 मध्ये सहामाही विवरणपत्र आणि नमुना ड-2 मध्ये वार्षिक विवरणपत्र सादर केले आहे किंवा नाही हे आयातकर निरिक्षकाने तपासल्याचे दिसुन येत नाही.

178) नियम क्र.33 अन्वये नोंदणीकृत व्यापा-याने दिलेले विवरणपत्रे अचूक व पुर्ण आहे याची खात्री करुन विवरणपत्राच्या आधारे त्या व्यापा-याकडून देय असलेल्या स्थानिक संस्था कराची रक्कम निर्धारित करणे आवश्यक होते. आणि जे व्यापारी विवरणपत्र सादर करण्यात कसूर करतील किंवा दिलेली विवरणपत्रे अचूक व पूर्ण नसतील तर सदर व्यापा-यास आपली बाजू मांडण्याची योग्य संधी देऊन त्यांच्याकडून देय असलेली स्थानिक संस्था कराची रक्कम नियम 33 (6) अन्वये योग्य निर्णय शक्ती नुसार निर्धारित करणे आवश्यक आहे. तसेच 33 (7) अन्वये त्याबाबत व्यापारास नमुना 'ज' मध्ये 15 दिवस आधी नोटीस देईल. अशा निर्धारणाच्या वर्षाच्या अंतिम पासून 5 वर्षाच्या आत व्यापाराचे निर्धारण करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते. उपनियम 9 अन्वये मूल्य निर्धारणाचा आदेश नमुना झ मध्ये देणे आवश्यक होते. उपनियम 10 अन्वये स्थानिक संस्था कर नियमाच्या नियम 45 अन्वये दंड किंवा व्याज किंवा दोन्हीही किंवा दोन्हीशिवाय असलेला जप्तीचा आदेश सदर मूल्य निर्धारणाच्या आदेशामधील सामाविष्ट असेल. त्याप्रमाणे देण्यात आलेले नाहीत.

179) नियम क्र.38 अन्वये आपल्यामध्ये मंजुर केलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत अपिल कर्त्यास विनामूल्य देणे आवश्यक होते.

180) नियम क्र.40 (1) (2) (3) अन्वये आयुक्तांनी लादलेल्या स्थानिक संस्था कर किंवा व्याज

अथवा जप्त केलेली कोणतीही रक्कम किंवा दंडाची रक्कम नोंदणीकृत व्यापा-याने संबंधित वर्षातील प्रत्येक महिन्याच्या स्थानिक संस्था कराची रक्कम पुढील महिन्याच्या 10 तारखेला भरणे आवश्यक आहे. जर सदर रक्कम भरली गेली नाही तर नमुना ठ मध्ये नोटीस देऊन वसुलकरणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

181) नियम क्र.43 अन्वये स्थानिक संस्था कराच्या वसुली च्या चौकशीच्या कालावधी मध्ये किंवा तपासणी चालू असताना महसूलाच्या रक्षणाच्या प्रयोजनार्थ आयुक्तांचे मत झाल्यास त्या व्यापाराच्या मालकीची संपत्ती लेखी नोटीस देऊन तात्पुरती जप्ती करणे आवश्यक होते. सदर जप्ती पोटनियम 3 अन्वये जास्तीत जास्त दोन वर्षाचे असेल. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

182) नियम क्र.47 अन्वये कलम 152-त्र खाली कोणतेही लेख व कागदपत्रे सादर करण्यास, कोणतीही माहिती पुरविण्यास नमुना ढ मध्ये नोटीस काढलेली दिसून येत नाही.

183) नियम क्र. 48 च्या कलम 152-छ मध्ये उल्लेखलेल्या विक्रिदार व्यापा-याने, आवश्यक असल्याप्रमाणे खरेदिदार व्यापा-यास बिल, बिजक किंवा रोखीचे टिपण देण्यात कसूर केली तर आयुक्त विक्रिदार व्यापा-यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन जर विकलेला माल हा त्याने उपभोग, उपयोग किंवा विक्री करण्यासाठी शहरात आयात केला असता तर त्यावर जो स्थानिक संस्था कर प्रदेय झाला असता त्या रकमेहून अधिक नसेल अशी शास्ती लावणे आवश्यक होते. तसेच (2) (क) अन्वये एखाद्या व्यापा-याने नोंदणीसाठी अर्ज न करताच तसेच अधिनियमाची व नियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करुन व्यापारी म्हणून धंदा चालविला असल्यास प्रदेय असलेल्या स्थानिक संस्था कराच्या रकमेच्या 10 पटीहून अधिक नसेल अशी रक्कम किंवा 2 (ख) अन्वये लेख व कागदपत्रे यांची निर्धारण व पुनर्निधारण, ती सादर करणे व त्याची तपासणी व जागेची झडती घेणे व पुनःरिक्षण याबाबतीत कार्यवाहीच्या नोटीसीचे पालन न केल्यास रु.10000/-पेक्षा अधिक नसेल इतका दंड वसुलकरणे आवश्यक आहे. किंवा 2(ग) अन्वये चुकीच्या परताव्याची मागणी केल्यास त्यास याबाबतीत म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर दंड वसुलकरणे आवश्यक होते. कलम 3 (क) अन्वये आवश्यक मुदतीत स्थानिक संस्था कर भरला नाही तर सदर कराची सरळ व्याजाची आकारणी पहिल्या 12 महिन्यांकरिता दरमहा 2 टक्के आणि त्यानंतर प्रत्येक महिन्याच्या स्थानिक संस्था कराच्या 3 टक्के वसुलकरणे आवश्यक होते. तसेच नियम 48 च्या 5 अन्वये स्थानिक संस्था कर 5 पट आणि 6 अन्वये 5 हजार पेक्षा जास्त नसेल एवढी रक्कम शास्ती म्हणून लावणे आवश्यक होते.

184) नियम 52 अन्वये जर एखाद्या व्यापाराची आकडेवारी गोळा करुन त्या अन्वये माहिती किंवा विवरण सादर करण्यास त्यांनी कसूर केली असेल तर सदर व्यापा-यांविरुद्ध भारतीय दंड संहितेखाली फौजदारी खटला दाखल करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते.याप्रमाणे कार्यवाही न केलेने मनपाचे मोठया प्रमाणावर अर्थिक नुकसान झालेले आहे.

185) अर्थिक वर्ष 11/12 मध्ये अंदाजपत्रकास स्थानिक संस्था कराची जमा रु.117 कोटी 41 लाख अंदाजित केली आहे. परंतु मनपाने स्थानिक संस्था कराची वसुली योग्यरित्या केली नसलेने मार्च

2012 अखेर रु.60 कोटी 52 लाखाचे उत्पन्न प्राप्त झाल्याचे 13/14 च्या अंदाजपत्रकातील नक्की आकड्यावरुन दिसून येते.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 113, दिनांक 11.11.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 47, Hmm No : 113)

## *91 गजानन महिला मंडळ झुणका भाकर केंद्रास मोकळी जागा भाडयाने देण्यामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : खुली जागा भाडे महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 67472.00/-

***अतिक्रमण केलेली जागामोकळी करून सदर जागेचा लिलाव करणेअपेक्षित असताना त्याच संस्थेस सदर वाढीव जागादेण्याचा चुकीचा प्रस्ताव भूमी व मालमत्ता विभागाने आयुक्तांचे मान्यतेसाठी प्रस्तावित केला आहे. तसेच रु.12892/- ची थकबाकी दि.31/3/2003 पासुन प्रलंबित असलेने वार्षिक 18% दराने व्याजाने रु.67472/- ची वसुली करणेत यावी.***

जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा शाखा पत्र क्र.कार्या/ 21(2) /आरआर /542 दि.12/12/1996 अन्वये गजानन महिला मंडळ (सौ.शांताबाई कोल्हापुरे ) यांचे नांवे शेळगी येथील ठिकाणी झुणका भाकर केंद्रास जागा मंजूर केल्याचे कळविणेत आले. सदर ठिकाणी दि.18/12/1996 रोजी उदघाटन करण्यात आले. दि.3/1/1997 रोजी सदरची जागा गैरसोयीची असल्याने बदलून मिळणेस अर्ज करण्यात आला. सदर केंद्रास मंगळवार बाजार जोडभावी पेठ शाळा नं.13 येथील राखीव जागेस मंजुरी मिळणेबाबत विनंती करणेत आली. त्यानुसार भूमी व मालमत्ता यांची दि.15/1/1997 चे पत्रान्वये कळविले वरून अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र क्र.पीए/आरआर/85/97 दि.27/1/1997 अन्वये श्री.गजानन महिला मंडळास मंगळवार बाजार, जोडभवानी, पेठ, महानगरपालिका शाळा या जागेस मंजुरी दिल्याचे कळविले. त्या जागेस महानगरपालिका ने दरमहा रू.480/- प्रमाणे 11 महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम जमा करून भाडेपट्टा करणेस दि.14/2/1997 च्या पत्रान्वये कळविल्यावरून दि.15/9/1997 रोजी रू.5280/- पावती क्र.37386 ने जमा करून दि.17/2/1997 ते 16/1/1998 या कालावधीकरिता रू.470/- च्या स्टॅम्प पेपरवर करार करणेत आलेला असून दि.17/2/1997 रोजी कब्जा पावती देण्यात आलेली आहे.

अधिक्षक,भूमी व मालमत्ता विभागाकडील पत्र क्र.11/3/1995 दि.20/3/1999 अन्वये मुदतवाढी करिता अर्ज न केल्याने दि.1/4/1997 ते दि.16/1/1998 कालावधीतील फरक रू.2160/- दि.17/1/1998 ते 16/3/1999 अखेर 15 महिन्याची अनधिकृत जागा वापर आकारणी रू.10800/-व 15% दंड व्याज रक्कम रू.1620/- एकूण रू.14580/- महापालिकेत सात दिवसात जमा करणेस कळविले आहे.

अधिक्षक, भू व मा. पत्र क्र.11/3/1820 दि.1/2/2000 च्या पत्रान्वये दि.1/4/1997 ते दि.16/1/1998 फरकाची रक्कम रू.2160/- दि.17/1/1998 ते 31/12/1999 अनधिकृत वापर दंड रू.17280/- व त्यावरील दंड व्याज रू.2196/- एकूण र.रू.22356/- सात दिवसात न भरल्यास सदर जागेस कुलुप लावणेत येईल अशी नोटीस देण्यात आली. त्यावरून दि.23/11/2000 रोजी पावती क्र.20251 अन्वये रू.20000/- भरणा केले वरून सील काढणेत येऊन जागा पुन्हा ताब्यात देण्यात आली आहे. दि.16/12/2000 रोजी पावती क्र.20294 अन्वये रू.7000/-थकबाकी पोटी भरणा केल्याची नोंद आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1. अधिक्षक, भूमी व मालमत्ता यांचे पत्र क्र.11/3/154 दि.10/1/2001 अन्वये सदर जागेच्या पूर्व / दक्षिण व उत्तर बाजूस एकूण 520 चौ.फूटाचे अतिक्रमण केले असून, ते तातडीने काढणेस कळविलेले आहे. सदर जागा नियमानुसार भाड्याने मिळणेबाबत दि.30/7/2002 रोजी संस्थेने अर्ज केलेला असून भूमी व मालमत्ता विभागातील टिपणी क्र.1/3/928 दि.19/9/2002 सदर वाढीव जागा 543 चौ.फू. प्रचलित दराने ऑक्युपन्शी प्राईसने देण्याबाबत प्रस्तावीत केलेले आहे. अतिक्रमण केलेली जागा मोकळी करून सदर जागेचा लिलाव करणे अपेक्षित असताना त्याच संस्थेस सदर वाढीव जागा देण्याचा चुकीचा प्रस्ताव भूमी व मालमत्ता विभागाने नियमाबाहयरित्या प्रस्तावीत केला आहे.

2. भूमी व मालमत्ता विभागाचे पत्र क्र.11/3 दि.28/2/2003 नुसार दि.31/3/2003 अखेर रू.56197/- थकबाकी असताना फक्त रू.30520/- भरणा करणेत आलेले असून, शिल्लक रक्कम 8 दिवसात भरण्यास कळविलेले आहे. त्यानुसार रू.43304/-भरण्यात आलेले असून, रक्कम रू.12892/- दि.31/3/2013 अखेर शिल्लक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81(ब) नुसार जागा ताब्यात घेणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही तसेच नियमानुसार थकबाकीवर वार्षिक 18 % दराने रु.67472/- व्याजाची वसुली करणेत यावी.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 102, दिनांक 28.10.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 76, Hmm No : 102)

## *92 कुंभार वेस शॉपींग सेंटर-मधील गाळा क्र.17 मधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गाळा भाडे महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 5708.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79(ब)(क) अन्वये भाडे नियमित करणेचे अधिकार महासभेस असताना स्थायीसमितीने नियमबाहयरित्या आपल्या अधिकारात भाडे कमी केले आहे व प्रशासनाने ते मान्य केले आहे.***

1. कुंभार वेस शॉपींग सेंटर मधील गाळा क्र.17 हा श्री.जयंत तेजाराम पुकराज यांना दि.28/4/1984 रोजी एकूण क्षेत्र 31.35 चौ.मि. दरमहा भाडे रू.995.20 प्रमाणे 5 वर्ष मुदतीने भाड्याने दिलेला असून (दि.26/4/1984 ते 25/3/1989) त्यानंतर स्थायी समिती ठराव क्र.517 दि.11/8/1995 ने सदर गाळ्यास हे भाडे रू.776/-प्रमाणे दरमहा कमी केलेले आहे. मुं.प्रा.महा.अधि.1949 चे कलम 79(ब)(क)अन्वये भाडे नियमित करणेचे अधिकार महासभेस असताना स्थायी समितीने नियमबाहयरित्या आपल्या अधिकारात भाडे कमी केले आहे.व प्रशासनाने ते मान्य केले आहे.. तसेच सदर अधिकार स्थायी समितीस प्रदान केल्याबाबत व प्रशासनाने त्यावर कोणत्या नियमान्वये कार्यवाही केलेली आहे याबाबतचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्रं.107 दि.28/10/2013 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नाही.

2. स्थायी समिती ठराव क्र.907 दि.9/8/2001 अन्वये दि.1/4/95 ते दि.31/3/2001 अखेर जे भाडे यापूर्वी आहे ते कायम ठेवण्यात येऊन मुदत संपलेल्या गाळे धारकांना 9 वर्ष 11 महिने कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात येऊन पुढील मुदतीकरिता सुरूवातीस 10% तसेच 5 वर्षानंतर प्रतिवर्षी 3% प्रमाणे जादा भाडेवाढ आकारण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. स्थायी समिती ठराव क्र.517 दि.11/8/1995 ने कमी करण्यात आलेले भाडे रू.776/-+ (10%) प्रमाणे रु.79/- = रु.855/- 2005 मध्ये 855+(3%)प्रमाणे रु. 26/- = रु. 881/- 2006 मध्ये, 881+(3%) प्रमाणे रु. 26/- = रु.907/- (सन 2007), रु. 907+(3%) प्रमाणे रु.27/- = रु.934/- (2008), 934+(3%) प्रमाणे रु.28/- = रु.962/- (2009), 962+(3%) प्रमाणे रु. 29/- = रु.991/- (2010) असे भाडे होईल. याप्रमाणे सदर गाळ्याची वसुली श्री.जयंत तेजाराम पुकराज यांचेकडून वसुल करण्यात यावी.

3. श्री.जयंत तेजाराम पुकराज यांचेकडून दि.31/3/2012 अखेर रू.5708/- वसुल होणे बाकी आहे.तरी रु. रू.5708/- पुकराज यांचेकडून वसुली करण्यात यावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.107 दि.28/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 77, Hmm No : 107)

## *93 मोतीबाग प्राणीसंग्रहालयाचे समोरील बाजूची 400 फु. इतकी खुली जागा भाड्याने देणेमधील अनियमिततेबाबत.*

सोलापूर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : खुली जागा भाडे महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 405.00/-

***मोतीबाग प्राणीसंग्रहालयाचे समोरील बाजूची 400 फु. इतकी खुली जागा भाड्याने देणे कामातील निविदा प्रक्रिया न राबविता खुली जागा आयुक्त यांनी प्रतिवर्षी ज्या त्या भाडे मुल्याच्या 5 टक्के दरवाढ करून सदर जागेस 9 वर्षे 11 महिने करिता मुदतवाढ दि.10/5/2013 मध्ये देण्यात आली आहे. मुं.प्रा.महा.अधिनियम चे कलम 79 (क) अन्वये महासभेची मान्यता घेणे आवश्यक असताना प्रशासनाने स्थायी समितीच्या नियमबाह्य परवानगीने मुदतवाढ दिली आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या ताब्यातील मोतीबाग प्राणीसंग्रहालयाचे समोरील बाजूची आरक्षण क्र.9/31, टाऊन पार्क जागेपैकी 20 x 20 = 400 चौ.फु. इतकी खुली जागा स्थायी समिती ठराव क्र.374 दि.1/7/2011 अन्वये श्री.बनसोडे यांना पार्किंग व्यवसाय करणेकरिता 29 वर्षे 11 महिने या कालावधीकरिता देण्याची मान्यता देण्यात आली होती.

सदरची जागा 11 महिने करारावर भाड्याने देण्याकरिता जाहिर प्रसिध्दीकरणा द्वारे वर्तमानपत्रात दि.5/11/2011 रोजी नोटीस प्रसिध्द करून दि.9/11/2011 पर्यंत निविदा सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. कोणत्या वर्तमानपत्रामध्ये निविदा प्रसिध्द करणेत आली आहे त्याची प्रत नस्तीमध्ये दिसून येत नाही. मुं.प्र.महा.अधि.1949 चे कलम 74 नुसार निविदेची मुदत 7 दिवसाची देणे आवश्यक असताना 4 दिवसाची मुदत देण्यात आली असल्याने जास्त निविदाधारकांनी निविदा न भरल्याने महानगरपालिकास स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. सदरच्या कालावधीत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्या दि.11/11/2011 रोजी 11.00 वाजता उघडण्यात आल्या असुन रू.5000/- अनामत रक्कम घेण्यात आली आहे. निविदेचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | नांव | पावती क्रमांक व दिनांक | निविदा रक्कम रू. महिने करिता) |
|---|---|---|---|
| 1. | श्री.अशोक भिमराव बनसोडे | 0089200 ,दि.5/11/11 | 19700 |
| 2. | उमेश ईश्वर गायकवाड | 0089201,दि.8/11/11 | 18000 |
| 3. | रविंद्र मारूती घुले. | 0089199,दि.5/11/11 | 17500 |

श्री.अशोक भिमराव बनसोडे यांनी सरकारी बोली रू.19300/- पेक्षा सर्वात जास्तीचे दर दिलेले असून, या रक्कमेमध्ये वाढ होण्याचे दृष्टीने दि.18/11/2011 रोजी 12.00 वाजता वाटाघाटी करिता बोलविण्यात आले व वाटाघाटी दरम्यान रू.20500/- अकरा महिन्या करिता मान्य करण्यात येत असल्याचे

दि.18/11/2011 रोजी पत्र देऊन जागा ताब्यात मिळणेकरिता विनंती केली. 11 महिन्याचे भाडे पावती क्र.0081762 दि.30/12/2011 ने भरणा करून दि.9/1/2012 ते 8/12/2012 अखेर पर्यंतचा करार करण्यात आला.

श्री.बनसोडे यांनी दि.5/10/2012 च्या अर्जान्वये सदरची जागा मुदतीअंती पुढे 29 वर्षे 11 महिने मुदतवाढीने मिळण्याकरिता विनंती अर्ज केला भूमी व मालमत्ता पत्र क्र.महसुल2699 दि.21/12/2012 च्या पत्रान्वये सदरची जागा महात्मा गांधी प्राणी संग्राहलयाची विस्तारीकरणा करिता आवश्यकता असल्याने सदरच्या जागेस 29 वर्ष 11 महिने मुदतवाढ देता येणार नाही असे नमूद असून, नव्याने जाहिर प्रसिध्दीकरणाने देकार पत्र मागविल्यास सदरची जागा भाड्याने देण्याचे प्रक्रियेस बराच कालावधी होण्याची शक्यता असल्याने जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील करून देकार पत्र न मागविता प्रतीवर्षी 5 टक्के दरवाढ करून पहिल्या वर्षी रू.21525/- दुसऱ्या वर्षाकरिता रू.22601/- व तिसऱ्या वर्षाकरिता रू.23731/- आकारून मुदतवाढ देण्यास हरकत नसल्याचे कळविले. स्थायी समिती ठराव क्र.439 दि.31/3/2013 अन्वये मान्यता देण्यात आली. मा.आयुक्त यांनी प्रतिवर्षी ज्या त्या भाडे मुल्याच्या 5 टक्के दरवाढ करून सदर जागेस 9 वर्षे 11 महिने करिता मुदतवाढ दि.10/5/2013 मध्ये देण्यात आली. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम 79 (क) अन्वये महासभेची मान्यता घेणे आवश्यक असताना प्रशासनाने स्थायी समितीच्या परवानगीने नियमबाह्य मुदतवाढ दिली आहे.

सदर ठिकाणचे वाहनांचे पार्किंगचे दर कोणी ठरविले आहेत, त्यांना पावती पुस्तके कोणी पुरविली आहेत. याची माहिती अर्धसमास ज्ञापन क्रं.99 दि.23/10/2013 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नाही. दि.9/12/2012 ते 8/12/2013 या कालावधीकरिता भाडे मुल्य रू.21120/- पावती क्र.0191542 दि.24/5/2012 अन्वये स्विकारून भाडे करार करणेत आलेला आहे. सदरच्या कालावधी करिता दि.21/12/2012 च्या टिपणीन्वये भाडे मुल्य रू.21525/- होत असताना रू.405/-कमी आकारून भाडे करार करण्यात आलेला असलेने रक्कम रू.405/- ची वसुली करण्यात यावी.

DATASDM5602 (Ref No : 85, Hmm No : 99)

## *94 राघवेंद्र क्रीडा व शैक्षणिक संस्थेस झुणका भाकर सुरू करणेस दिलेल्या मोकळ्या जागेबाबत .*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : खुली जागा भाडे महानगरपालिका निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 144854.00/-

***राघवेंद्र क्रीडा व शैक्षणिक संस्थेकडे अनधिकृत वापराबाबत दंड व्याजापोटी रक्कम रू.1,25,960/- अधिक 15% व्याजाची रक्कम रु.18894/- असे एकूण रु.144854/- दि.31/3/2012 अखेर वसुल करणे शिल्लक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) (अ) व कलम 81(1)(क) अन्वये कार्यवाही करणे अपेक्षित असताना तशी कार्यवाही करणेत आली नाही.***

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर पुरवठा शाखा आदेश क्र.कार्या/21(2)/आरआर/542 दि.12/12/1996 अन्वये श्री.पुरुषोत्तम दत्तात्रय बरडे, राघवेंद्र क्रीडा शैक्षणिक संस्था, अवंती नगरी, पुणे नाका येथील जागा झुणका भाकर केंद्र सुरू करणे करिता 400 चौ.फू. मंजूर करणेत आली. सदर जागेचा करारनामा दि.28/12/1996 ते 27/11/1997 अकरा महिने कालावधीकरिता दरमहा रू.480/- प्रमाणे एकूण रू.5280/- आगाऊ भरून दि.28/12/1996 रोजी करणेत आला आहे.करारनाम्यातील अट व शर्त क्र.9 नुसार तीन महिने अगोदर मुदतवाढीसाठी परवानगी मागणे आवश्यक आहे. असे न करता दि.7/2/1998 रोजी मुदतवाढीसाठी मागणी केली आहे.

भूमी व मालमत्ता जा.क्र.11/3/1727 दि.16/3/1998 नुसार भाडे दरात वाढ झाल्याने दि.1/4/1997 ते 27/11/1997 वाढीव भाडे रू.120/- प्रमाणे रू.960/- भरणे व मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडील पुढील मुदतवाढी करिता केलेल्या करारनाम्याची प्रत सादर करावी त्यानंतर मुदतवाढीबाबत पुढील कार्यवाही करणेत येईल असे कळविणेत आले आहे.

भूमी व मालमत्ता जा.क्र.11/3/1112 दि.12/11/1998 अन्वये मुदत संपल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाकडील करारनामा व पुढील मुदतीचे नुतनीकरण न केल्याने तसेच वाढीव भाड्याचे फरकाची रक्कम न भरल्याने आपणास जागेची आवश्यकता नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयास कळविणेत येईल असे श्री.बरडे यांना कळविणेत आल्यावरून पावती क्र.104119 दि.18/11/1998 रोजी वाढीव भाडे फरक रू.960/- अनधिकृत जागा वापर दंड व्याज दि.28/11/1997 ते दि. 27/10/1998 कालावधीकरिता रू.7920/- असे एकूण रू.8880/- भरणा केलेले आहेत.

186) भूमी व मालमत्ता जा.क्र.11/3/1824 दि.31/1/2000 अन्वये दि.28/10/1998 ते दि.31/12/1999 कालावधीचे अनधिकृत वापर दंड रू.720/- प्रतिमहा प्रमाणे रू.11592/- भरण्यास कळविणेत आल्या वरून पावती क्र.27567 दि.18/4/2000 नुसार रू.5000/-जमा करणेत आले आहेत. (रू.11592-5000=6592/-) थकबाकी रू.6592/- शिल्लक आहे.

187) सदर संस्थेने आजतागायत मुदतवाढी करिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडील परवानगी व नुतनीकरणाचे आदेश सादर केलेले नाहीत. व महानगरपालिका प्रशासनाने सदरच्या जागेचे थकीत भाडे वसुली करिता जा.क्र.11/3/2297 दि.20/3/2003 नंतर प्रयत्न केल्याचे नस्ती वरून दिसून येत नाही. संबंधीत संस्थेकडे अनधिकृत वापराबाबत दंड व्याजापोटी रक्कम रू.1,25,960/- अधिक 15% व्याजाची रक्कम दि.31/3/2012 अखेर वसुल करणे शिल्लक आहे.

188) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) ( अ) (एक) नुसार

भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही न करता जागा नियमबाह्यरित्या भोगवटादाराच्या ताब्यात ठेवली आहे.

189) वसुलपात्र रक्कम रु. 1,25,960/- अधिक 15% व्याजाची रक्कम रु.18894/-असे एकूण रु.144854/- वसुल करावी.

अर्धसमास ज्ञापन क्र.98 दि.28/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 86, Hmm No : 98)

## *95 महानगरपालिका शॉपींग सेंटर गाळा क्र.1 तुळजापूर वेस लगतची खुली जागा भाड्याने देणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : खुली जागा भाडे महानगरपलिका निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 17796.00/-

***शॉपींग सेंटर गाळा क्र.1 तुळजापूर वेस लगतची खुली जागा, सहा.संचालक नगररचना यांनी सदर जागा रस्त्याची असल्याने जागा भाड्याने देता येणार नाही असे पत्र दिले असतानाही जागा नियमबाह्यरित्या भोगवटाधारकास दिली आहे.***

शॉपींग सेंटर गाळा क्र.1 तुळजापूर वेस लगतची खुली जागा भाड्याने मिळणेबाबत श्री.संतोष बाबुराव वाघमारे यांनी दि.10/1/2003 रोजी अर्ज केल्यावरून भूमी व मालमत्ता कार्यालय जा.क्र.11/3/अ/252 दि.23/6/2003 च्या टिपणीवरून शासकीय शीघ्रगणकानुसार जमीनेचे अक्युपंशीप्राईस ठरविणेत येऊन कार्यवाही करावी असा शेरा दि.29/6/2003 रोजी नमूद केला असून, त्यानुसार सहा.संचालक, नगररचना यांनी जा.क्र.ससन र/नर/1228 दि.15/7/2003 च्या पत्रानुसार सदरची जागा रस्त्याची आहे व रस्ता म्हणून अनुज्ञेय होत आहे.असे असताना आयुक्त यांच्या दि.29/6/2003 च्या आदेशानुसार अक्युपंशी प्राईस प्रति चौ.मि. ला रू.2205/- असल्याचे कळविले वरून भूमी व मालमत्ता जा.क्र.11/3/अ/1075 दि.21/10/2003 नुसार 48 चौ.फू. खुली जागा 11 महिन्याचे मुदती करीता रू.2420/-

व अक्युपंशी प्राईस रू.9836/- भरणा करून दि.25/11/2003 ते दि.24/10/2004 अखेर करारनामा करणेत आला. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) नुसार आयुक्तास / महापालिकेच्या मंजुरीने / महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल / विकता येईल /भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल असे नमूद असताना आयुक्तांनी आपल्या अधिकारात महानगरपालिकेची मान्यता न घेता नियमबाह्यरित्या जागा भाड्याने दिली आहे.

सहा.संचालक नगररचना यांनी सदर जागा रस्त्याची असल्याने जागा भाड्याने देता येणार नाही असे पत्र दिले असतानाही जागा नियमबाह्यरित्या भोगवटधारास दिली आहे.

श्री.संतोष वाघमारे यांनी सदर जागेची मुदत दि.24/10/2004 संपत असल्याने मुदतवाढ देण्याकरिता दि.5/7/2004 रोजी अर्ज केलेला असून, सदरची मुदतवाढ आजतागायत देण्यात आलेली नाही. संबंधीतांकडे दि.31/3/2012 अखेर एकूण थकबाकी रू.17,796/- प्रलंबित आहे.

वसुलपात्र रक्कम रु.17796/-

DATASDM5602 (Ref No : 87, Hmm No : 104)

## *96 सोलापूर महानगरपालिकेच्या मेजर शॉपींग सेंटरमधील भाड्याच्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गाळा भाडे महानगरपलिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 4939417.00/-

***स्थायी समिती ठराव क्र.1461 दि:28/2/2011 नुसार लाल बहादूर शॉपींग सेंटरमधील गाळ्यांची मुदत संपलेल्या तारखेपासून पुढे 9 वर्ष 11 महिने मुदतवाढ देण्यास व तसेच तीन वर्षा नंतर प्रति वर्षी 3 % भाडेवाढ करणेस मान्यता झाली आहे. सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये एकूण 68 दुकान गाळेधारकांची जुनी डिमांड रू.68/- प्रति चौ.मि. प्रमाणे न घेता चुकीची घेतल्याने तसेच नवीन भाडेवाढ रू.185/- प्रति चौ.मि. प्रमाणे भाडेवाढ न केल्याने 2011-12 मध्ये महानगरपालिकेचे रू.42,95,145/- व त्यावर 15% प्रमाणे व्याजाची रक्कम रू.6,44,272/- असे एकूण रू.49,39,417/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

सोलापूर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रात 19 मेजर शॉपींग सेंटर असून, त्यामध्ये 608 गाळे आहेत. त्यापैकी एक गाळा महापालिकेच्या ताब्यात असून, उर्वरीत 607 गाळे लिलाव पध्दतीने भाडे तत्वावर देण्यात आली आहेत, भाड्याने देताना त्यांचेकडून करारपत्र करून घेण्यात आलेले असून, त्यातील अट क्र.4 प्रमाणे गाळे धारकांनी दरमहा 10 तारखेपर्यंत भाडे भरणे आवश्यक आहे व अट क्र.5 अन्वये सदर गाळ्याचे भाडे मुदतीत न भरल्यास भाड्याची रक्कम भरे पर्यंत द.स.द.शे. 15 टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम आकारणेत येईल. अट क्र.14 नुसार भाडेपट्टयाची मुदत संपताक्षणी सदर गाळा महापालिकेच्या ताब्यात सुस्थितीत देण्याचा आहे. भाड्याच्या मुदतीनंतर गाळा पाहिजे असल्यास मुदत संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर लेखी विनंती अर्ज करणे आवश्यक आहे.

190) सदरचे गाळे प्रथमत: 5 वर्ष मुदतीकरिता भाड्याने दिलेले असून, नस्ती तपासली असता कोणत्याही गाळे धारकांनी उपरोक्त अटी व शर्तीचे पालन केल्याचे आढळून येत नाही. पाच वर्ष झालेनंतर संबंधीत गाळे धारकांनी पुढील मुदती करिता करारनामा केलेला नाही. करारनामा न करताच महानगरपालिकेने कोणत्या नियमान्वये त्यांना गाळे मुदतवाढ दिली आहे याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्रं.106 दि.28/10/2013 अन्वये मागणी करुनही दिला नाही.

191) स्थायी समिती ठराव क्र.1461 दि.28/2/2011 नुसार लाल बहाद्दूर शॉपींग सेंटर मधील गाळ्यांची मुदत संपलेल्या तारखेपासून पुढे 9 वर्ष 11 महिने मुदतवाढ देण्यास व तसेच तीन वर्षानंतर प्रतिवर्षी 3 % भाडेवाढ करणेस मान्यता झाली आहे. सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये एकूण 68 दुकान गाळेधारकांची जुनी डिमांड रू.68/- प्रति चौ.मि. प्रमाणे न घेता चुकीची घेतल्याने तसेच नवीन भाडेवाढ रू.185/- प्रति चौ.मि. प्रमाणे भाडेवाढ न केल्याने 2011-12 मध्ये महानगरपालिकेचे रू.42,95,145/- व त्यावर 15% प्रमाणे व्याजाची र.रू.6,44,272/- असे एकूण रू.49,39,417/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

192) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81(ब)(1) (अ) (एक) नुसार भोगवटा करणाऱ्या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्या पेक्षा अधिकच्या मुदतीत दिले नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81(ब) (2) अन्वये काढून टाकणेत बाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीसीचे पालन करणे कसूर करणाऱ्या व्यक्तीस काढून टाकणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता थकीत गाळे भाडे असणाऱ्या भोगवटा धारकास मुदतवाढ देण्यात आली आहे.

193) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79(क) मध्ये आयुक्तास / महापालिकेच्या मंजुरीने पालिकेच्या मालकीची कोणती स्तावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल / विकता येईल / भाड्याने देता येईल अशी तरतुद असताना स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाह्यरित्या मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

194) 2011-12 ची भाडे वसुलीची नोंद वही तपासली असता, 2010-11 मधील थकबाकी पुढे

ओढण्यात आलेली नाही. 2010-11 अखेर असलेली थकबाकी व त्या रक्कमे वर 15 टक्के व्याज आकारून सुधारीत थकबाकी नोंदविणे आवश्यक असताना तसे केल्याचे तपासणीत आढळून आले नाही. नस्ती तपासली असता, भाडेवाढ कोणत्या दिनांकापासून करणेत आली व त्या अगोदर कोणत्या दराने भाडे वसुली करणेत येत होती याचा तपशील नमूद नसल्याने प्रत्येक गाळे धारकाकडे प्रलंबित असलेल्या एकूण भाडे थकबाकी व दंडाची रक्कम किती आहे याचा ताळमेळ घेता येत नाही. भारत सरकार,अर्थ मंत्रालय, महसूल विभाग अधिसूचना क्र.23/2007 ने दि.22/5/2007 नुसार दि.1/6/2007पासुन सेवा कर 12.36% दराने वसुल करावयाचा आहे. गाळे धारकांनी फक्त भाडे भरलेले असून, सेवाकर वसुली न केल्याने शासनाचे कराचे नुकसान झालेले आहे.

वसुलपात्र रक्कम रु.49,39,417/

अर्धसमास ज्ञापन क्र.106 दि.28/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 88, Hmm No : 106)

## *97 भद्रावती पाण्याच्या टाकी परिसरातील जागा झुणका भाकर केंद्रासाठी देण्यात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : खुली जागा भाडे महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 39468.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) (अ) (एक) नुसार भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिक मुदतीपर्यंत दिले नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही न करता नियमबाह्यरित्या भोगवटादाराच्या ताब्यात ठेवली आहे. दि:31/3/2012 अखेर थकबाकी रू.34320/- दर्शविणेत आलेली आहे. थकबाकी वर 15 टक्के व्याज आकारणी रु.5148/ -करून थकबाकी रु.39468/- वसुल करण्यात यावी.***

महापालिका हद्दीतील भद्रावती पाण्याच्या टाकी परिसरातील जागा उमा माहेश्वरी महिला मंडळ यांना झुणका भाकर केंद्रासाठी 11 महिन्याचे मुदतीकरिता दि.3/1/1997 ते 2/12/1997 दरमहा रू.480/- प्रमाणे देण्यात आलेली होती. मुदतीनंतर मुदतवाढ घेण्यात आलेली नसल्याने अनधिकृत वापर दंड दरमहा रू.720/- प्रमाणे भाडे आकारणी दि.3/12/1997 ते 31/12/1999 रू.1800/- अधिक भाडे फरक र.रू.1920/- अधिक रू.2700/- व्याज याप्रमाणे रू.22620/- दि.31/1/2000 चे पत्र क्र.11/3/1826 ने कळविणेत आले होते. दि.1/4/2000 ते 1/4/2011 या कालावधीतील वसुलीचे दस्तऐवज, मागणी रजिस्टर तपासणी करिता अर्धसमास ज्ञापन क्रं.103 दि.28/10/2013 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाले नसल्याने किती रक्कम भरणा करण्यात आली किंवा कसे हे नस्ती तपासली असता आढळून आले नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) ( अ) ( एक) नुसार सदरची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेण्याची कार्यवाही केलेली नाही.

दि.31/3/2012 अखेर थकबाकी रू.34320/- दर्शविणेत आलेली आहे. थकबाकी वरील 15 टक्के व्याज आकारणी रु.5148/-करून थकबाकी रु.39468/- वसुल करण्यात यावी.

DATASDM5602 (Ref No : 89, Hmm No : 103)

## *98 श्री.महालक्ष्मी मागासवर्गीय महिला विकास मंडळ यांना जागा भाड्याने देणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : खुली जागा भाडे महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 93498.00/-

***श्री.महालक्ष्मी मागासवर्गीय महिला विकास मंडळ यांची मार्च 2012 अखेरची थकबाकी रू.85,868/-+ रू.7,630/- (सेवाकर) एकूण रू.93,498/- आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 (ब) 1(अ) नुसार सदरची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेण्याची कार्यवाही करणेत आली नाही.***

श्री.महालक्ष्मी मागासवर्गीय महिला विकास मंडळ यांना झुणका भाकर केंद्रासाठी जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत राणी लक्ष्मी मंडई या ठिकाणी जागा मंजूर करणेत आलेली असताना सदरची जागा बदलून कस्तुरबा मार्केट समोरील जागा दि.19/9/1996 ते 18/8/1997 या कालावधीकरिता दरमहा रू.480/- प्रमाणे देण्यात आली. पावती क्र.4515 दि.27/8/1996 रोजी रू.5280/- भरणा करणेत आल्या वरून दि.17/9/1996 रोजी ताबा मिळाल्याची पावती देण्यात आलेली आहे.

त्यानंतर दि.1/11/1998 ते 30/9/1999 अखेर दरमहा रू.720/- प्रमाणे 11 महिन्याचे रू.7920/- भाडे भरून करारपत्र करण्यास भूमी व मालमत्ता जा.क्र.11/3/2010 दि.24/3/1999 अन्वये कळविणेत आलेले होते. त्यावर कार्यवाही करणेत आलेली नाही. भूमी व मालमत्ता जा.क्र.11/3/1817 दि.31/1/2000 अन्वये अनधिकृत वापर दंड रू.720/- प्रमाणे 7920/- तीन महिन्याचे अधिक रू.2160/- अधिक व्याज दंड रू.1592/- एकूण रू.11592/- भरणा करणे करिता कळविणेत आले. सदरची थकबाकी रक्कम न भरणा केल्याने दि.25/2/2000 रोजी पंचनामा करून जागा सील करण्यात आली. त्यानंतर दि.31/1/2000 अखेर रू.11592/- अधिक दि.1/1/2000 ते 31/3/2000 अखेरचे भाडे रू.2160/- एकूण रू.13572/- पैकी रू.6000/- जमा करणेत आले.परंतु उर्वरीत रू.7572/- भरणा केल्याचे नस्ती वरून दिसून येत नाही. संबंधीत संस्थेकडे मार्च 2003 अखेर रू.22268/- थकीत भाडे असल्याचे भूमी व मालमत्ता पत्र क्र.जा.क्र.11/3/2300 दि.20/3/2003 अन्वये कळविणेत आलेले असून, मार्च 2012 अखेरची थकबाकी रू.85,868/- + रू.7,630/- (सेवाकर) एकूण रू.93,498/- असल्याचे निदर्शनास येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) ( अ) ( एक) नुसार भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकुन जागा ताब्यात घेण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही. अर्धसमास ज्ञापन क्र.105 दि.28/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

वसुलपात्र रक्कम रु.93498/-

DATASDM5602 (Ref No : 90, Hmm No : 105)

## *99 महापालिकेच्या ताब्यात असलेल्या मिनी शॉपींग सेंटरचे भाडे वसुलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गाळा भाडे महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1323986.00/-

***डाळींबीआड मिनी शॉपींग सेंटर मधील 48 गाळेधारकांची 2011-12 अखेर एकुण थकबाकी रू1132127/- असुन त्यावर करारनाम्यातील अट क्र.5 अन्वये 15% दराने रू1,70,209/- होते. असे एकूण रू13,23,986/- संबंधीत गाळे धारकांकडून वसुल करण्यात यावी. तसेच भाडे वसुली न झाल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 (ब) 1(अ) नुसार सदरची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेण्याची कार्यवाही***

***केलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या जागेवर असलेले एकूण 45 मिनी शॉपींग सेंटरमध्ये 663 गाळे महापालिकेने प्रथमत: पाच वर्ष मुदती करिता 1988 पासून भाडे तत्वावर दिलेले असून, भाडे तत्वावर देताना गाळे धारकांशी करारपत्र केले आहे.

करारपत्रातील अट क्र.4 अन्वये गाळे धारकांनी दरमहा 10 तारखेपर्यंत भाडे भरणे आवश्यक आहे. करारपत्रातील अट क्र.5 अन्वये सदर गाळ्याचे भाडे मुदतीत न भरल्यास सदर भाड्याची रक्कम भरेपर्यंत द.सा.द.शे. 15 % प्रमाणे व्याजाची आकारणी करणेत येईल असे नमुद आहे.

करारपत्रातील अट क्र.14 अन्वये भाड्याची मुदत संपता क्षणी सदर गाळा महानगरपालिकेच्या ताब्यात सुस्थितीत देण्याचा आहे. भाडे पट्ट्याच्या मुदतीनंतर गाळा पाहिजे असल्यास भाडे पट्ट्याची मुदत संपण्यापूर्वी सहा महिने लेखी विनंती अर्ज करून कळविले पाहिजे.

195) सदर गाळ्यांची मुदत संपल्यावर स्थायी समिती ठराव क्र.623 दि.6/12/2007 अन्वये दि.1/4/2002 पासून मुदतवाढ प्रथमत: पाच वर्षे व काही गाळ्यांना स्थायी समिती ठराव क्र. 604 दि.25/7/08 अन्वये पाच वर्षाकरिता मुदतवाढ देणेत आली आहे. स्थायी समिती ठराव क्र.173 दि.11/9/2012 अन्वये सर्व गाळे धारकांना त्यांच्या मागील संपलेल्या मुदतीपासून दि.31/3/2015 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) मध्ये आयुक्तास / महापालिकेच्या मंजुरीने पालिकेच्या मालकीची कोणती स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल / विकता येईल / भाड्याने देता येईल अशी तरतुद असताना स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाहयरित्या मुदतवाढ देण्यात आलेली आहे. नस्तीचे अवलोकन केले असता, पाच वर्षे झालेनंतरही अट क्र.14 अन्वये गाळेधारकांनी कार्यवाही केलेली नाही. व पुढील मुदती करिता करारनामा केलेला नाही. करारनामा न करताच स्थायी समितीचे मान्यतेने नियमबाहयपणे मुदतवाढ दिलेली आहे.

196) 2011-12 ची भाडे वसुलीची नोंद वही (डिमांड रजिस्टर) तपासली असता, 2010-11 मधील थकबाकी पुढे चुकीची ओढली आहे. 2010-11 अखेर असलेली थकबाकी व त्या रक्कमेवर करारनाम्यातील अट क्र.5 अन्वये 15% व्याज आकारून सुधारीत थकबाकी नोंदविणे आवश्यक असताना, तसे केल्याचे तपासणीत आढळून आलेले नाहीत. नोंदवही तपासली असता, भाडेवाढ कोणत्या दिनांकापासून करण्यात आली व त्या अगोदर कोणत्या दराने भाडे वसुली करण्यात येत आहे. याचा तपशील नमूद नसलेने प्रत्येक गाळे धारकांकडे प्रलंबित असलेल्या एकूण भाडेवाढ, थकबाकी व दंडाची रक्कम किती प्रलंबित आहे याचा ताळमेळ घेता येत नाही.

197) स्थायी समिती ठराव क्र.173 दि.11/9/2012 नुसार 45 शॉपींग सेंटरमधील 663 गाळ्यांना त्यांच्या मागील संपलेल्या मुदतीपासून 31/3/2015 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. व मुदत संपलेल्या तारखेपासून सहा.संचालक, नगररचना यांचेकडून दरवर्षी निश्चित

होणाऱ्या बदलत्या शिघ्र सिध्दगणक भाडेनुसार किंवा 3% जादा यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम दरवर्षी भाडे दर म्हणून निश्चित होण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

198) सहा.संचालक यांचे दि.15/4/2013 च्या पत्रान्वये 2006 पासूनची शिघ्र सिध्दगणक पत्रान्वये वेळोवेळी भाडे निश्चिती करून कळविलेले असताना आपण त्याप्रमाणे भाडेवाढीची कार्यवाही न केल्याने पुन्हा एकदा उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सहा.संचालक यांनी गाळ्याचे 2006 पासूनचे मासिक भाडे निश्चितीचे दर कळविले आहेत. त्याप्रमाणे दि.1/4/2006 पासून वाढीव भाड्याच्या फरकाची रक्कम आकारणी करण्यात आलेली नाही. उदा. डाळींबी मिनी शॉपींग सेंटरमधील 48 गाळ्यांपैकी एका गाळ्याची दि.1/4/2006 ते 31/3/2012 अखेर या भाडे फरकाची आकारणीबाबतची माहिती काढणेत आलेली आहे.

| कालावधी | मासिक सुधारीत दर | मासिक वसुली केलेला दर | मासिक फरक | 12 महिन्याचा फरक |
|---|---|---|---|---|
| 2006-07 | 483 | 225 | 258 | 3096 |
| 2007-08 | 545 | 225 | 320 | 3840 |
| 2008-09 | 576 | 375 | 201 | 2412 |
| 2009-10 | 635 | 375 | 260 | 3120 |
| 2010-11 | 705 | 375 | 330 | 3960 |
| 2011-12 | 803 | 375 | 408 | 5136 |

5. उपरोक्त कोष्टकाप्रमाणे डाळींबीआड मिनी शॉपींग सेंटर मधील 48 गाळेधारकांची थकबाकीची माहिती सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्र. (11) प्रमाणे गणना केली असता, त्यांची थकबाकीची रू.11,53,777/- होत आहे, त्यावर करारनाम्यातील अट क्र.5 अन्वये 15% दराने व्याज रू.1,70,209/-अशी एकूण रक्कम रू.13,23,986/- संबंधीत गाळे धारकांकडून वसुल करण्यात यावी. व याच प्रमाणे उर्वरीत 44 शॉपींग सेंटरमधील गाळेधारकांकडून भाडे फरकाची रक्कम व व्याजाची रक्कम वसुल करण्यात यावी.

वसुलपात्र रक्कम रु.13,23,986/-

अर्धसमास ज्ञापन क्र.109 दि.31/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 92, Hmm No : 109)

## *100 महापालिका क्षेत्रातील खोक्यांची थकबाकी वसुल करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गाळा भाडे महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1425905.00/-

***भूमी व मालमत्ता कार्यालयात उपलब्ध असलेली अधिकृत खोके धारकांची 2008 पासून सुरु असलेली नोंद वही तपासली असता, दि.31/3/2012 अखेर प्रलंबित असलेली भाड्याची एकूण थकबाकी रू 14,25,905/- इतकी आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 (ब) 1(अ) नुसार भाडे न मिळाल्याने सदरची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेण्याची कार्यवाही केलेली नाही.***

199) सोलापूर महानगरपालिकेच्या क्षेत्रात अधिकृत एकूण 169 खोकी असून, त्याचे दरमहा भाडे रू.100/- होते. सदरचे भाडे मार्च 2011 अखेर सुधारणा करून रू.300/-आयुक्तांचे मान्यतेने करण्यात आले आहे. सदर खोके धारकांकडे पूर्वीची थकबाकी किती आहे. याबाबत कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नाही. वसुली कशाच्या आधारे करण्यात येते याबाबतच्या आदेशाची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. कार्यालयात उपलब्ध असलेले अधिकृत खोके धारकांची 2008 पासून सुरू असलेली नोंद वही तपासली असता, दि.31/3/2012 अखेर प्रलंबित असलेली एकूण थकबाकी रू. 14,25,905/- इतकी आहे. सदरची वसुली बाबत करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास तपासणी करिता उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

200) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) ( अ) (एक) नुसार भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.110 दि.31/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 93, Hmm No : 110)

## *101 कुंभार वेस शॉपींग सेंटर मधील गाळा क्र.18 मधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भुमी व मालमत्ता महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1158360.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) (अ) (एक) नुसार भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिले नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही न करता नियमबाह्यरित्या दंड व्याज माफ केल्यामुळे महानगरपालिकेचे रु.1158360/- चे आर्थिक नुकसान झालेले असल्याने सदरची रक्कम संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन वसुली करण्यात यावी.***

कुंभार वेस शॉपींग सेंटर मधील गाळा क्र.18 हा चेअरमन, सोलापूर जिल्हा मोटर मालक संघ, श्री.महादेव बाबुराव चाकोते यांना दि.22/10/87 पासून भाड्याने देण्यात आलेला आहे. जा.क्र.भूवमा/11/4/111 दि.7/1/08 च्या नस्तीमध्ये सदर भाडेपट्टा करारपत्र संबंधित संचिकेत उपलब्ध नसल्याचे नमुद आहे. सदर गाळ्यास दि.1/10/1987 ते 31/3/2000 अखेर रु.4800/- दरमहा भाडे होते.मा.स्थायी समिती ठराव क्र.907 दि.2/8/01 च्या निर्णयान्वये दि.1/4/2000 ते 31/3/2005 अखेर 10 % भाडेवाढ प्रमाणे रु.5438/-प्रतिमहा व दि.1/4/2006 ते 31/3/2007 अखेर 3% भाडेवाढ प्रमाणे रु.5469/- प्रतिमहा असे झाले.

दि.1/10/1987 ते 31/12/2007 अखेर भाड्याची रक्कम रु.1221249/-

वजा भरलेली भाडे रक्कम रु.299400/-

शिल्लक रक्कम रु.921849/-

पावती क्र.1872 दि.14/2/2007 (-) रु.921849/-

201) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79( क) अन्वये आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल,भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल अशी तरतुद असताना व सदरचे अधिकार महासभेस असताना स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाह्यपणे सदरची जागा भाड्याने देण्यात आलेली आहे.

202) भाडे पट्टा करारातील शर्ती व अटी क्र.4 व 5 मध्ये नमुद केलेप्रमाणे दरमहाचे भाडे प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत न भरल्यास प्रति वर्षी 15 % प्रमाणे दंड व्याज आकारण्यात येईल असे नमुद आहे. त्याप्रमाणे **दंड व्याजाची रक्कम रु.1158360/- इतकी होते.** परंतु उपरोक्त टिपणी नुसार सदर दंड व व्याज सुटीत काढण्याचा प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समितीपुढे सादर केला आहे. सुट कोणत्या कारणासाठी देण्यात येत आहे ते कारण नस्तीमध्ये नमुद नसतानाही प्रस्तावास स्थायी समितीने ठराव क्र.901 दि.25/2/2008 अन्वये सुटीस मान्यता दिली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) (अ) (एक) नुसार भोगवटा करणा-या व्यक्तीने

त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही न करता नियमबाह्यरित्या दंड व्याज माफ केल्यामुळे महानगरपालिकेचे रु.1158360/- चे आर्थिक नुकसान झालेले असल्याने सदरची रक्कम संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन वसुल करण्यात यावी.

203) तसेच सदर गाळा चेअरमन, सोलापूर जिल्हा मोटर मालक संघ यांनी श्री.मनोहर गोविंदराव वलेचा यांना हस्तांतरित केला आहे व स्थायी समिती ठराव क्र.942 दि.29/2/2008 अन्वये हस्तांतरास मान्यता दिल्याची नोंद जा.क्र.भुवमा/11/4/141 दि.18/3/2008 चे पत्र नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

204) प्रशासनाने गाळा ताब्यात घेऊन पुन्हा लिलाव पद्धतीने देणे आवश्यक असताना चेअरमन, सोलापूर जिल्हा मोटर मालक संघ यांनी श्री.मनोहर गोविंदराव वलेचा यांना हस्तांतरित केला आहे. अशा परस्पर केलेल्या हस्तांतरास स्थायी समितीची नियमबाह्य रित्या मान्यता घेतल्याने महानगरपालिका ची ऑक्युपंशी प्राईस मुळे येणा-या जादा रकमेची तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल,पट्याने देता येईल,किंवा अन्यथा हस्तांतरित करता येईल तो मोबदला,असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 101, दिनांक 28.10.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 113, Hmm No : 101)

## *102 जोडभावी पेठ सि.स.नं.9062 पैकी 550 चौ.फू. जागा भाड्याने देणेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : खुली जागा भाडे महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 66860.00/-

***भाड्याने दिलेली जागा ताब्यात घेतल्यावर थकबाकी वसुली न करता सदरची जागा परत वारसास नियमबाह्य***

***हस्तांतरित केल्याबाबत मुं.प्रा. अधि. नि. 1949 चे कलम 81 ब (1) व ब व क अन्वये कार्यवाही केली नाही.***

श्री.बबनराव पुंडलिक ढांगे, रा.42/भवानी पेठ, सोलापूर यांना जोडभावी पेठ सि.सं.नं.9062 पैकी 550 चौ.फु. जागा दि.2/9/1992 च्या अर्जान्वये 11 महिने मुदतीकरिता (दि.5/12/1993 ते 4/11/1994) भाड्याने देण्यात आली. सदरची मुदत दि.4/11/1994 रोजी संपलेली असून, भू.व मा. पत्र क्र.11/3/70 दि.5/6/1997 चे पत्रान्वये मुदतवाढ न घेतल्याने अनधिकृत भोगवटाधारक असल्याने थकबाकी खालील प्रमाणे.

दि.5/12/1993 ते 4/11/1994 अधिकृत भाडे रू.14520/-

दि.5/11/1994 पासून दि.31/3/1997 अखेर रू.30630/-

205) अनधिकृत वापर भाडे एकूण रक्कम रू.45150/-थकीत असल्याने सदरची नोटीस मिळाले पासून 15 दिवसात थकबाकीदार असल्याने सदरची जागा ताब्यात घेऊन निष्कासीत का करणेत येऊ नये, असे कळविणेत आल्यावरून श्री.डांगे यांनी दि.19/7/1997 च्या पत्रान्वये भाड्याची थकबाकी रू.15000/- भरण्यास तयार असून, उर्वरीत रक्कम सहा समान हप्त्यात भरण्यास परवानगी मागवून जागेचे भाडे भरण्याची आर्थिक परिस्थिती नसल्याने जागा ताब्यात घेणेबाबत विनंती केलेली आहे. याबाबत मा.आयुक्तांनी दि.12/9/1997 रोजी जागा आधी ताब्यात घ्या आणि वसुलीची कार्यवाही नंतर करण्यात येईल अशा सूचना दिल्यावरून दि.25/9/1997 च्या पत्र क्र.11/3/886 अन्वये महानगरपालिकाची जागा ताब्यात देण्याबाबत व थकीत वसुलीबाबत रू.100/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र दिल्यावर कार्यवाही करण्यात येईल असे श्री.डांगे यांना कळविले. त्यावरून रू.100/- च्या स्टॅम्पपेपर वर हमीपत्र लिहून दिलेले आहे व जागा दि. 15/02/1998 रोजी ताब्यात दिल्याचे लिहून दिलेले आहे.

206) भूमी व मालमत्ता पत्र क्र.11/3/1799 दि.20/2/1999 अन्वये पत्र क्र.11/3/70 दि.5/6/1997 अन्वये थकबाकी रू.45150/- भरणेस कळविलेले असताना रू.15000/- भरणा केले व उर्वरीत रू.30150/- +2970 (दि.1/4/1997 ते 30/6/1997) ची वसुली एकूण रू.33120/- सहा महिन्यात भरणा करणेचे मान्य करून देखील भरणा केलेली नसल्याने सक्तीची कार्यवाही करणेत येईल अशी नोटीस देण्यात आलेली आहे.

207) भू व मा पत्र क्र.11/3/1540 दि.25/11/2002 अन्वये सदर जागेची मागील व चालु भाडेची बाकी रू.15840/- ताबडतोब भरणेबाबत कळविलेले आहे. दि.20/2/1999 च्या पत्रान्वये थकबाकी रू.33120/- कळविलेली असताना दि.25/11/2002 च्या पत्रान्वये रू.15840/- थकबाकी दर्शविणेत आली आहे. सदरची जागा महानगरपालिकेने 1998 मध्ये ताब्यात घेऊन थकबाकी वसुलीची कार्यवाही नंतर केली आहे. परंतु नस्तीचे अवलोकन करता ती जागा त्यांच्या पत्नीचे नांवे हस्तांतरीत केल्याचे नमूद आहे. परंतु त्याबाबतचे ठराव / कार्यालयीन आदेश नस्तीमध्ये दिसून येत नाही. ताब्यात घेतलेली जागा नियमबाह्यपणे भोगवटादाराच्या पत्नीच्या नावे

हस्तांतरीत केली आहे.डिमांड रजिस्टरमध्ये दि.31/3/2012 अखेर **थकबाकी रू.63360/- + रू.3500/- सेवाकर** दाखविण्यात आला आहे.

208) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) ( अ) ( एक) नुसार भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही न करता ताब्यात घेतलेली जागा नियमबाह्यपणे भोगवटादाराच्या पत्नीच्या नावे हस्तांतरीत केली आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 100, दिनांक 28.10.2013 चे उत्तर दिलेले नाही.

वसुलपात्र रक्कम रु.66860/-

DATASDM5602 (Ref No : 131, Hmm No : 100)

## *103 महात्मा गांधी प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना बीफ पुरवठा करणे कामातील अनियमितते बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : प्राणी संग्रहालयाची देखभाल महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 347140.00/-

***ठेकेदाराने प्राणीसंग्रहालयाला वर्षाच्या 366 दिवसापैकी केवळ 314 दिवस बीफ पुरवठा करुन 52 दिवस बीफ पुरवठा केलला नाही.करारानुसार सकाळी 11 चे आत बीफ पुरविणे आवश्यक असता अनेकदा दुपारी 2 ते 2.30 नंतर बीफ पुरवठा करणेत आला आहे. त्यामुळे सुटीच्या दिवशी प्राण्यांना अन्न मिळाले नसल्याचे स्पष्ट होते. वरील बीफ पुरवठ्याच्या कमतरतेमुळे आणि अनियमिततेमुळे म.गांधी प्राणी संग्रहालयातील एकमेव दुर्मिळ बिबटा हा प्राणी कुपोषणामुळे दि.16/8/2011 रोजी मृत झाल्याचे उद्यान अधिक्षकांच्या पत्रावरुन दिसुन येते.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागांतर्गत असणा-या महात्मा गांधी प्राणिसंग्रहालयातील विविध प्राण्यांना खाण्यासाठी बीफ पुरवठा करण्यात आलेला आहे. 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये बीफ पुरविणेकामी खालील प्रमाणे निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणाची नस्ती तपासली असता असे दिसुन येते कि, म.गांधी प्राणिसंग्रहालयात सन 2011-12 या काळात 1 सिंह, 1 बिबटा आणि 2 मगरी वास्तव्य होते. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे सिंहासाठी प्रतिदिन 10-12 किलो, बिबट्यासाठी प्रतिदिन 6-8 किलो आणि 2 मगरींसाठी प्रतिदिन 2-4 किलो इतके बीफ पुरविणे, त्यांच्या आरोग्यासाठी हितावह होते.त्यासाठी महानगरपालिकेने रु.5 लाखाची निविदा रक्कम असलेली जाहिरात दि.19/7/2011 रोजी दै.संचार या स्थानिक वृत्तपत्रात दिली. त्यास अनुसरुन एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या, सदर निविदा दि.30/7/11 रोजी उघडण्यात आल्या. असून सर्वात कमी रकमेची मागणी करणा-या श्री.महम्मद शरिफ अ.मजीद कुरेशी यांची निविदा मंजुर करण्यात आली. मक्तेदाराबरोबर दर कमी करण्याची प्रशासनाने वाटाघाटी करुन रु.80/- वरुन रु.68/- या दराने बीफ पुरविण्याचे मान्य केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी लेखापरिक्षाअंती खालील बाबी दिसुन आल्या.

209) वरील मंजुर ठेकेदाराबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्याच्या दि.8/12/2011 रोजीच्या रु.100/- च्या महसुली मुद्रांकावरील करारनाम्यावर दिनांक नमुद नाही. त्यामुळे करारनामा कधीपासुन सुरु झाला याचा उलगडा होत नाही.

210) ठेकेदाराचा मुंबई दुकाने व संस्था अधिनियम1948नुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला नस्तीमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे सदर ठेकेदार अधिकृत व्यावसायिक असल्याचे स्पष्ट होत नाही.

211) महानगरपालिकेच्या निविदा अटी व शर्तीच्या पत्रानुसार अट क्र.6 अन्वये मक्तेदाराने निविदा मंजुर झाल्यावर म्हणजे दि.29/8/2011 रोजी 7 दिवसांच्या आत करारपत्र लिहुन देणे आवश्यक होते. त्या मुदतीत करार न केल्यास बयाणा रक्कम जमा करुन मक्ता रद्द करण्यात येईल असे नमुद करण्यात आले आहे, परंतु मक्तेदाराने करारनामा दि.8/12/2011 रोजी करुन म्हणजे तब्बल 101 दिवसांनी करुन देखील बयाणा रक्कम जमा केल्याचे आणि मक्ता रद्द केल्याचे दिसुन आले नाही.

212) मक्तेदाराबरोबर केलेला करारनामा महसुली मुद्रांकावरील दिनांकानुसार म्हणजे दि.8/12/2011 रोजी केला असे ग्राह्य धरल्यास त्यापुर्वीच त्यांना दि.29/8/2011 रोजी वर्क ऑर्डर दिल्याचे दिसुन येते.

213) पशु वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानुसार सदर प्राणि संग्रहालयातील प्राण्यांना वर्ष भरात कमीतकमी 6588 आणि जास्तीत जास्त 8784 किलो बीफ पुरवठा होणे आवश्यक असताना ठेकेदाराने वर्षभरात केवळ 5105 किलो बीफ पुरवठा केल्याचे उपलब्ध नोंदवहीवरुन दिसुन येते. त्यामुळे करारपत्रातील अटींचा भंग झालेला आहे.

214) करारपत्रानुसार मक्तेदाराने रोजच्या रोज आणि वेळेवर म्हणजे सकाळी 11 वाजायच्या आत ताजे बीफ प्राण्यांना पुरविणे आवश्यक होते. परंतु उपलब्ध नोंदीनुसार वर्षाच्या 366 दिवसापैकी केवळ 314 दिवस बीफ पुरवठा केलेला आहे. आणि अनेकदा दुपारी 2 ते 2.30 नंतर बीफ पुरवठा केल्याचे दिसुन येते. त्यामुळे सुटीच्या दिवशी प्राण्यांना अन्न मिळाले नसल्याचे स्पष्ट होते. सदरचा बीफ पुरवठा वेळेत झाल्याचे अथवा ताजा पुरवठा झाल्याचे उद्यान अधिक्षकाने प्रमाणित केलेले नाही.

तसेच बीफ खाणेस योग्य असलेबाबतचा सक्षम प्राधिका-याचा दाखला घेणेत आलेला नाही.

a. वरील बीफ पुरवठ्याच्या कमतरतेमुळे आणि अनियमिततेमुळे म.गांधी प्राणी संग्रहालयातील एकमेव दुर्मिळ बिबटा हा प्राणी कुपोषणामुळे दि.16/8/2011 रोजी मृत झाल्याचे उद्यान अधिक्षकांच्या पत्रावरुन दिसुन येते.
b. याबाबत करारपत्रानुसार संबंधित मक्तेदारास अथवा कुठल्याही सक्षम प्राधिका-यावर दंडात्मक अथवा प्रशासकिय कारवाई झालेली दिसुन येत नाही. उपरोक्त आक्षेपाचे पुर्ततेस्तव रु.347140/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 115, दिनांक 12.11.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 49, Hmm No : 115)

### *104 धर्मवीर संभाजी तलावातील नौका विहार मक्त्याधील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : संभाजी तलाव नौकाविहार महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 903437.00/-

***निविदेमधील अट क्र.3 नुसार मक्तेदाराने निविदेमधील देकार रक्कमेपैकी 50 टक्के रक्कम वर्क ऑर्डर मिळालेपासुन सात दिवसाचे आत व उर्वरित रक्कम सलग पाच महिन्यात मनपाच्या खजिन्यात भरणे आवश्यक होते. मासिक हप्ते वेळेवर जमा न झाल्यास द.सा.द.शे. 18 टक्के इतके व्याज आकारणे व सलग तीन मासिक हप्ते न भरलेस मक्ता रद्द करण्यात येईल, असे नमुद असताना देखिल प्रस्तुत प्रकरणी मक्तेदाराने आपले हप्ते न भरल्याने त्यांचे कडून रु. 903437/- वसुल करणेत यावी.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागांतर्गत असणा-या धर्मवीर संभाजी तलाव येथील नौका विहारासाठी निविदा प्रक्रियेद्वारे मक्ता देण्यात आला होता. त्या बाबतची नस्ती पडताळली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

धर्मवीर संभाजी तलावामध्ये नौका विहार करण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे मक्ता देऊन महानगरपालिकेच्या महसुलात भर टाकण्याच्या हेतुने दै.विश्वसमाचार मध्ये दि.10/1/2009 रोजी जाहिरात देण्यात आली. सदरचा मक्ता 5 वर्षासाठीचा होता. त्यास अनुसरुन 6 मक्तेदारानी खालील प्रमाणे आपल्या निविदा दि. 29/1/2009 रोजी सादर केल्या त्यानुसार 1) श्री.उत्कर्ष गरड रु.180000/- 2) श्रीनिवास गाली

रु.130000/- 3) श्री.प्रभाकर जाधव रु.100001/- 4) रेश्मा ॲक्ट्स रु.90000/- 5) ओम क्रिएशन रु.75000/- आणि 6) श्री मिजाज जहागिरदार रु.61000/- अशा दरांच्या प्रति वर्षा करिता सादर केल्यामुळे त्यातील अनु.क्र.1 ची श्री.उत्कर्ष गरड यांची जास्त दराची निविदा स्थायी समिती ठ.क्र.1890 दि.27/2/2009 अन्वये मंजुर करण्यात आली. याबाबतची वर्क ऑर्डर दि.25/6/2009 रोजी त्यांना देण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणी लेखापरिक्षणात खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात आलेले आहेत.

215) वर्कऑर्डर मधील बाब क्र.5 अन्वये वर्कऑर्डर मिळाल्यापासुन 8 दिवसाच्या आत रु.5000/- चे स्टॅम्प पेपरवर करारपत्र करणे आवश्यक होते. परंतु त्यानी तसे करारपत्र केल्याचे दिसुन येत नाही. याबाबत महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने पत्र.1) क्र.231 दि.26/5/2010, 2) क्र.539 दि.16/8/2010. 3) क्र. 752 दि.28/9/2010, 4) क्र.978 दि.30/11/2010 तसेच शहर हद्दवाढ यांचे पत्र क्र.उप्र/3-ब/1360,दि.1/3/2012 अन्वये सदर मक्तेदारास वारंवार सुचित करुन देखील त्याने अद्यापही करारपत्र केल्याचे दिसुन येत नाही. तसेच मक्तेदाराने रु.10000/- अनामत रक्कम महानगरपालिकेमध्ये जमा केल्याचे नस्तीवरुन दिसुन येत नाही.तसेच निविदा अटी व शर्ती अट क्र.3 नुसार करारपत्र केल्या पासून 30 दिवसांच्या आत नौकाविहार चालू करणे मक्तेदारास बंधनकारक आहे असे नमुद आहे. परंतु करार न करताच नौकाविहार चालू करण्यात आल्याचे दिसुन येते.

216) महानगरपालिकेच्या मुल्यनिविदा शर्तीमधील अट क्र. 13 अन्वये मक्तेदाराने करारपत्र करुन न दिल्यास अगर मक्त्याच्या कामात हयगय, दिरंगाई, खोटारडेपणा आणि अनियमितपणा केल्यास मक्ता रद्द करण्यात येईल असे स्पष्टपणे नमुद असतानाही मक्तेदाराने करारपत्र न केल्यामुळे त्याचा मक्ता रद्द होणे आवश्यक होते. परंतु तसे झाल्याचे नस्ती मधील कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही.

217) करारपत्राच्या अट क्र.10 अन्वये Third party insurance काढल्याचे नस्तीवरुन दिसुन येत नाही.

218) महानगरपालिकेच्या करारपत्रातील अट क्र.4 अन्वये मक्तेदाराने नौकाविहारासाठी दर माणशी अर्धा तासासाठी रु.10/- आकारण्याचे मान्य केले असुन तशी आकारणी त्यांच्याकडून होत असल्याबाबत महानगरपालिका कशा पध्दतीने नियंत्रण ठेवते याबाबत खुलासा करणेत आलेला नाही.

219) अट क्र. 14 अन्वये मक्तेदाराने वर्कऑर्डर दिल्यापासुन 7 दिवसाच्या आत एकूण मक्त्याच्या रकमेच्या 50 टक्के रक्कम म.न.पा.च्या खाजिन्यात जमा केली पाहिजे. व उर्वरित रक्कम सलग पाच महिन्यात मनपाच्या खजिन्यात भरणे आवश्यक होते. मासिक हप्ते वेळेवर जमा न झाल्यास द.सा.द.शे. 18 टक्के इतके व्याज आकारणे व सलग तीन मासिक हप्ते न भरलेस मक्ता रद्द करण्यात येईल, असे नमुद असताना देखिल प्रस्तुत प्रकरणी मक्तेदाराने आपले हप्ते न भरल्याने त्यांचे कडून खालील प्रमाणे मक्त्याची तसेच त्या वरील व्याजाची वसुली करणे आवश्यक ठरते,

| कालावधी (1) | मुद्दल (2) | निविदा रक्कम (3) | एकूण रक्कम 2+3 (4) | 18% व्याज (5) | एकूण वसुली (6) |
|---|---|---|---|---|---|
| 14/8/09 ते 31/8/09 | ---- | 18000/- | 18000/- | 157/- | 18157/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सप्टें.2009 | 18157/- | 18000/- | 36157/- | 542/- | 36699/- |
| ऑक्टो.2009 | 36699/- | 18000/- | 54699/- | 820/- | 55519/- |
| नोव्हें.2009 | 55519/- | 18000/- | 73519/- | 1103/- | 74622/- |
| डिसें.2009 | 74622/- | 18000/- | 92622/- | 1389/- | 94011/- |
| 2010 | 94011/- | 180000/- | 274011/- | 49322/- | 323333/- |
| 2011 | 323333/- | 180000/- | 503333/- | 90600/- | 684533/- |
| मार्च 12 पर्यंत | 684533/- | 180000/- | 864533/- | 38904/- | 903437/- |

एकूण वसुलीः- रु.903437/-(नऊ लाख तीन हजार चारशे सदोतीस फक्त)

6. मुल्यनिविदा शर्तीमधील अट क्र.6 अन्वये वर्कऑर्डर दिल्यापासुन 7 दिवसाच्या आत मक्त्याच्या रक्कमेच्या 50%रक्कम मनपा कडे जमा करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणी मक्तेदारास वर्कऑर्डर दि.25/6/2009 रोजी प्राप्त झाल्यावर दि.2/7/2009 रोजी सदर रक्कम भरणे आवश्यक होते. परंतु त्यांनी 42 दिवसानंतर म्हणजे दि.13/8/2009 रोजी सदर रक्कम जमा केल्याची पावती क्र. 127265 दि.13/8/2009 अन्वये दिसुन येते. अशा प्रकारे मक्तेदाराने अटीचा भंग केलेला आहे.

7. करारपत्रातील अट क्र.5 अन्वये नौका विहार चालववायास घेणा-या मक्तेदाराने बोटीसाठीचा फेरा परवाना (लायसेन्स) सक्षम प्राधिका-याकडून घेणे आवश्यक ठरते. प्रस्तुत प्रकरणी मक्तेदाराने सदरचा परवाना घेतला नसल्याचे उपरोल्लेखित जिल्हाधिकारी कार्यालय सोलापुर यांच्या पत्रावरुन दिसुन येते.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 120, दिनांक 14.11.2013 चे उत्तर दिलेले नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम रु.903437/-

DATRADM5901 (Ref No : 51, Hmm No : 120)

## *105 महात्मा गांधी प्राणीसंग्रहालयास दूधपुरवठा करण्याच्या ठेक्यातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : प्राणी संग्रहालयाची देखभाल महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 18700.00/-

***संस्थेस 2011-12 मधील वर्षाच्या 366 दिवसांकरिता 10 लिटर साठी रु.18/- प्रति लिटर च्या दराने एकूण 10 ली.x रु.18 प्रति लीटर प्रमाणे 366 दिवसासाठी रु.65880/- एवढे प्रदान होणे आवश्यक होते. परंतू याबाबतचा लेखा तपासला असता 2011-12 करिता कृष्णा महिला दूध उत्पादक संघ एकूण 84,600 चे प्रदान केल्याचे***

***दिसून येते.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे लेखापरीक्षण केले असता, प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना दररोज दुध पूरवठा केला जात असल्याचे दिसून येते. याबाबतची नस्ती तपासली असता, खालील बाबी निदर्शनास आल्या.

म.गांधी प्राणी संग्रहालयात एकुण 34 प्राणी असून त्यामध्ये 1 सिंह, 32 माकडे आणि एक बिबटा असे एकुण 34 प्राणी आहेत. त्यापैकी माकड,सिंह आणि बिबटा यांना रोज 10 लिटर दुध पुरवठा कृष्णा महिला दुध उत्पादक उद्योग या संस्थेमार्फ़त गेली अनेक वर्ष केला जात आहे.

2011-12 वर्षाकरिता सदर संस्था प्रतिलिटर रु.18/- या दराने दुध पूरवठा करण्यासाठी जाहिर प्रसिद्धीकरणाची अट शिथिल करुन (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या नियम क्र.5.2.2) स्थायी समितीने ठराव क्रं.589 दि.20/08/2011 अन्वये मान्यता दिली.

1. प्रस्तूत प्रकरणी संस्थेने महानगरपालिकेशी कुठलेही करारपत्र केल्याचे दिसून येत नाही.
2. संस्थेस 2011-12 मधील वर्षाच्या 366 दिवसांकरिता 10 लिटरसाठी रु.18/- प्रति लिटर च्या दराने एकूण 10ली.xरु.18/-ली. प्रमाणे 366 दिवसासाठी रु.65880/- एवढे प्रदान होणे आवश्यक होते. परंतू याबाबतचा लेखा तपासला असता सन 2011-12 करिता कृष्णा महिला दूध उत्पादक संघास एकूण 84,600 चे प्रदान विभागातील उपलब्ध नोंदवहीवरुन केल्याचे दिसून येते. याबाबतची उपलब्ध प्रमाणके क्रं. खालील प्रमाणे आहेत.

| प्रमाणक क्रं./दिनांक | धनादेश क्रं/दिनांक | प्रदान रक्कम |
|---|---|---|
| 12781/1-11-2011 | 468801/15-11-2011 | 5,400/- |
| 12769/1-11-2011 | 468816/15-11-2011 | 16,560/- |
| 1859-64/21-5-2011 | 376102/26-5-2011 | 9,520/- |
| 16608-09/17-12-2012 | 471318-19/24-1-2012 | 10,360/- |
| 199172-73/3-3-2012 | 475905-06/17-3-2012 | 10,980/- |
| एकूण र. रु. | | 52,820/- |

त्यामुळे सदर संस्थेस रु.84,600 - रु.65,880 = रु.18,700/- एवढे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 58, Hmm No : 134)

## ***106 महात्मा गांधी प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना फळभाज्या, पालेभाज्या व फळफळावळ पुरविण्याच्या ठेक्यातील अनियमितते बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : प्राणी संग्रहालयाची देखभाल महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 838130.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 96579.00/-

***2011-12 या आर्थिक वर्षात निविदा काढणे आवश्यक असताना ती न काढता नियमबाह्य रित्या ठेका मागील मंजूर मक्तेदारास देण्यात आलेला आहे. तसेच निविदा शेवटच्या महिन्यात काढली आहे. दि.1/12/2011 ते 30/11/2012 याकालावधीतील खर्चास स्थायी समितीची ठ.क्रं.203 ने दि.01/10/2012 ने नियमबाह्यरित्या कार्योत्तर मान्यता घेतली आहे. सदर कामासाठी 4,50,000/- ची तरतूद असताना सन 2011-12 मध्ये एकूण खर्च 8,38,130/- करणेत आला आहे,***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्‌यान विभागांतर्गत संग्रहालयातील विविध प्राण्यांना दररोज फळभाज्या, पालेभाज्या आणि फळफळावळ तसेच पशुखाद्‌य पूरविले जाते. त्याबाबतची सन 2011-12 मध्ये पूरविलेल्या पशुखाद्‌य नोंदवहीची पडताळणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

220) फळभाज्या, पालेभाज्या व फळफळावळ आणि पशुखाद्‌य म.गांधी प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना पुरविण्याचा मक्ता पूरवठादार नागेश एंटरप्रायजेस,शुक्रवार पेठ,सोलापूर यांना दि.1/12/2010 ते 30/11/2011 आणि 1/12/2011 ते 30/11/2012 पर्यंत मंजूर करण्यात आला आहे. सदरचा मक्ता नागेश एंटरप्रायजेस यांना सन 2009-10 पासून मंजूर केलेला असून त्यांनी सन 2009-10 मध्ये ज्या मंजूर दराने वरील पशुखाद्‌य पुरविण्याचे मान्य केले आहे, त्याच दराने ते 2011-12 साठी सुद्धा सदर पशुखाद्‌य, फळफळावळ पूरवतील या अटीवर तसेच जाहीर प्रसिद्धीकरणाने निविदा मागविणेची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या नियम क्र.5.2.2 ची अट शिथिल करुन मा.स्थायी समितीने ठराव मंजूर क्र.309 दि.20/11/2012 रोजी कार्योत्तर मंजूरी दिली आहे. सदरचा खर्च 'प्राणी संग्रहालय देखभाल दुरुस्ती' या मुख्यलेखाशिर्षामध्ये करण्याचे व त्यासाठी वार्षिक 25 लाख रुपयांच्या तरतूदीस तसेच रु.4.50/- लाख निविदा रकमेस मंजूरी देण्यात आली आहे. (अर्थसंकल्प पूस्तिका पृष्ठ क्र.56 वरील10(7) कलमान्वये) 2011-12 या आर्थिक वर्षात निविदा काढणे आवश्यक असताना ती न काढता नियमबाह्य रित्या ठेका मागील मंजूर मक्तेदारास देण्यात आलेला आहे. सदर निविदा 11-12 करिता असल्याने वर्षाच्या सुरुवातीस काढणे आवश्यक असता 2011-12 च्या शेवटच्या महिन्यात काढली आहे. तसेच दि. 1/12/2011 ते 30/11/2012 या कालावधीतील खर्चास स्थायी समितीची ठ.क्रं.203 दि.1/10/2012 अन्वये कार्योत्तर मान्यता घेतली आहे. सदर निविदेसाठी 4,50,000/- ची तरतूद असताना सन 2011-12 मध्ये एकूण खर्च 8,38,130/- करणेत आला आहे.

221) प्रस्तूत प्रकरणी वरील मंजूर मक्तेदारास दि.18/11/2009 रोजी कार्यादेश देवून तसेच विधान सल्लागारांचे पत्र क्र. वि.स./क्ष/14/189 दि.16/8/2010 अन्वये करारपत्र करण्याचे सूचित करुन देखील

अद्याप पर्यंत मक्तेदाराने करारपत्र केलेले नाही. सबब सदर मक्तेदारास 2011-12 मध्ये प्रदान करण्यात आलेली एकूण रक्कम 8,38,130/- (सोबत परिशिष्ट क्र. 16 जोडलेले आहे) आक्षेपाधिन धरण्यात येत आहे.

222) मक्तेदाराने पुरविलेल्या पालेभाजी, भाजीपाला, फळफळावळ यांची गुणवत्ता चांगली आणि प्रमाण योग्य आहे, हे करारपत्रातील अटीनुसार सक्षम प्राधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. जर सदर फळे/भाजी ताजी व योग्य प्रमाणात न पुरविल्यास त्याचा विपरित परिणाम प्राणी आणि पक्षांच्या जिवितावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत प्रकरणी मक्तेदाराने फळे पुरविल्यानंतर त्यांचा गुणात्मक दर्जाबाबत सक्षम प्राधिका-यातर्फे त्वरित प्रमाणित केले जात नसल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

223) मक्तेदाराने माल पुरविल्यानंतर त्यांचे डिलिव्हरी चलनावर महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिका-याची माल स्विकारल्या बाबतची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. परंतू सदर चलने तपासले असता, असे दिसून येते कि, दि.7/9/2011 ते 1/10/2011, दि.1/11/2011 ते 24/11/2011 तसेच दि.1/2/2012 ते 3/2/2012 च्या चलनावर श्री. तिवारी नामक मक्तेदाराच्या वाहन चालकाच्या स्वाक्ष-या दिसून येतात. दि.3/8/2011 ते 31/8/2011 या कालावधीतील चलनावर कोणाच्याच स्वाक्ष-या नाहीत तर दि.7/5/2011 ते 1/6/2011 व दि.11/6/2011 ते 18/6/2011 या कालावधीतील चलनावर श्री.कोल्लूर नामक मजूर सेवकाच्या स्वाक्ष-या दिसून येतात.तसेच दि.1/12/2010 च्या वर्कऑर्डरमधील क्रं.2 अन्वये सदर माल सकाळी 9 ते 10 वाजेपर्यंत पुरविणे आवश्यक आहे. परंतू नोंद वहीवरुन अनेक वेळा मक्तेदाराने सदरची वेळ न पाळता दुपारी 2 वाजेपर्यंत माल पूरविलेला आहे.त्यामुळे प्राणीसंग्रहालयातील 484 मुक्या प्राण्यांना प्रसंगी उपाशी रहावे लागते. माल पोहोच रजिस्टर मध्ये नोंदी घेतल्या आहेत परंतू वापर रजिस्टर ठेवण्यात आले नसल्याने कोणत्या प्राण्यांना किती खाद्य कोणत्या वेळेत देण्यात आले आहे ते समजून येत नाही.माहे एप्रिल 2010 ते नोव्हेंबर 2010 या कालावधीतील फळे, भाज्या आणि फळफळावळ यांच्या गुणवत्ते बाबतचे प्रमाणपत्र पशुवैद्यकीय अधिकारी यांनी एकाच दिवशी म्हणजे दि.5/2/2011 रोजी प्रमाणित केल्याचे नस्तीमधील कागदपत्रावरुन दिसून येते.यावरुन सदर पशुवैद्यकिय अधिकारी यांनी वेळच्या वेळी पशुखादयाची गुणवत्ता तसेच वेळा कटाक्षाने व जातीने तपासल्याचे दिसून येत नाही.भविष्यात प्राणीसंग्रहालयातील मुक्या प्राण्यांच्या व पक्षांच्या जिवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही.

224) उद्यान अधिक्षक यांची नस्ती मधील टिपणी (पृ.क्र.33) जा.क्र.उ.प्र./3ब/917,दि.15/11/2011 ने मक्तेदाराने सन 2009-10 मध्ये पूरविलेल्या वरील मालाच्या दरानेच सन 2011-12 करिता सदर मालाचा पुरवठा करण्याचे मान्य केल्याने मा.आयुक्त यांनी सदर प्रस्तावास मान्यता दिल्याचे टिपणीवरुन दिसून येते.परंतू मक्तेदाराने उपरोक्त माल सन 2009-10 च्या दराने न पुरविल्याचे नस्ती मधील मक्तेदाराचने आकारलेल्या दरावरुन दिसून येते.

225) सोबत जोडलेले विवरणपत्र प्राप्त कागदपत्रांवरुन तयार करणेत आले असून मक्तेदाराने सन

2011-12 मध्ये केलेल्या वाढीव दराची एकुण र. रु.96,579/- ची वसुली करण्यात यावी.

a. केळी,शेंगा कलिंगड, टरबुज,मका-कणिस तसेच तक्ता अ मधील उर्वरित पालेभाज्या आणि फळभाज्या यांचे सन 2011-12 मधिल दर उपलब्ध होत नसल्याने वाढीव दराच्या तक्त्याची परिगणना करणे शक्य झाले नाही.तरी सदर तक्त्याची परिगणना करुन त्याची वसुली करण्यात यावी.

226) माल पोहोच रजिष्टर मध्ये नोंदी घेतल्या आहेत परंतू वापर रजिष्टर ठेवण्यात आले नसल्याने कोणत्या प्राण्याला किती खाद्य आणि कोणत्या वेळी देण्यात आले हे समजून येत नाही.तसेच लसूण घास,कोथिंबीर पालक इ. च्या पेंढ्या विकत घेतल्याने नेमका किती किलो ओला चारा प्राण्यांना देण्यात आला ते समजून येत नाही.

a. मक्तेदाराने निविदेत पालेभाजी/फळभाजी आणि फळफळांच्या दराची खातरजमा शासनाच्या अधिकृत संस्थेकडुन करुन घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. केवळ वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या दरांवरुन दरनिश्चिती करण्यात आल्याने जादा दराने सदर वस्तू खरेदी केल्याचे दिसुन येते.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 135, दिनांक 25.11.2013 चे उत्तर दिलेले नाही.

आक्षेपाधिन रक्कम- 8,38,130/-

वसूलपात्र रक्कम- 96,579/-

DATRADM5901 (Ref No : 59, Hmm No : 135)

## *107 उद्यान विभागांतर्गत जयभवानी बागेच्या खाजगीकरणातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मनपा बागेची देखभाल महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2400.00/-

***अधिनियम 1949 चे कलम 79 मधील परंतू (अ) नुसार कोणत्याही विशिष्ट विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेली कोणतीही मालमत्ता ज्या प्रयोजनासाठी ती धारण करण्यात आली असेल त्यास बाधा येईल अशा रितीने पट्ट्याने देता, विकता किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येणार नाही असे नमुद आहे.बागेचा वापर सार्वजनिक उपयोगासाठी करणे आवश्यक असलेने जागा नियमबाह्यरित्या पट्ट्याने दिल्याचे स्पष्ट होते.***

सोलापुर महानगरपालिकेच्या उद्यान विभागांतर्गत असलेल्या बागांपैकी जय भवानी बागेचे खाजगीकरण 'एस.आर.ए.बिल्डर्स ऍ़ड डेव्हलपर्स' या खाजगी विकासकाने केलेले आहे. याबाबतची नस्ती पडताळली असता, खालील बाबी निदर्शनास आल्या.

जयभवानी बागेचा खाजगी करणाच्या धोरणानुसार विकास करण्यासाठी दै. तरुणभारत आणि दै सकाळ मध्ये दि.10/2/2011 रोजी जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार 1) द हेरीटेज मल्टी ॲक्टीव्हीटी सेंटर,2) एस.आर.बिल्डर्स ऍ़ड डेव्हलपर्स, 3) सौ.सूनिला लक्ष्मीकांत दासरी, 4) गणेश कन्स्ट्रक्शन, 5) गणेश कन्स्ट्रक्शन, 6) गौरव आर्टस आणि 7) पटेल कन्स्ट्रक्शन अशा निविदाकारांनी आपआपल्या निविदा सादर केल्या त्यापैकी 'एस.आर बिल्डर्स ऍ़ड डेव्हलपर्स' यांनी ते वार्षिक 1 लाख रुपये भाडे महानगरपालिकेस देणार असल्याचे मान्य केल्याने त्यांची निविदा स्थायी समिती ठ.क्र.316 दि.24/6/2011 अन्वये मंजूर करण्यात आली. सदरचा मक्ता प्रथम 5 वर्षाकरीता मंजूर करण्याचा प्रस्ताव प्रभारी उद्यान अधिक्षकांनी सादर केलेला होता, व त्यानुसार मा.आयुक्त यांनी दि.9/3/2011 रोजी आदेश निर्गमित केल्याचे उद्यान अधिक्षकांचे नस्तीमधील पत्र क्र.जा.क्र.उप्र/उब/449,दि22/7/2011 अन्वये दिसून येते परंतू स्थायी समिति ठ.क्र.316, दि.24/6/2011 अन्वये सदर मक्ता 29 वर्ष 11 महिन्यांच्या कालावधीसाठी नियमबाह्यरित्या मंजूर करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी लेखापरिक्षणात आढळलेल्या त्रुटी खालील प्रमाणे आहेत.

227) सदर मंजूर मक्त्याचा प्रस्ताव हा विभागाकडून 5 वर्षासाठी असताना आणि त्यास मा. आयुक्तांची देखील मान्यता दिली असताना तो 5 वर्षाएवजी 29 वर्ष 11 महिन्यांकरिता स्थायी समितीने वाढविला असून मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाच्या कोणत्या तरतूदीनुसार प्रशासनाने वाढीव 29 वर्ष 11 महिने मुदतीकरता मान्यता दिली आहे याबाबत खुलासा व्हावा.

228) मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 च्या कलम 79 (ड) अन्वये जो मोबदला घेऊन मनपाच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्ट्याने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये. परंतू चालु बाजारभावाप्रमाणे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला न ठरविताच नियमबाह्यरित्या निविदा काढल्याचे स्पष्ट होते.

229) अधिनियम 1949 चे कलम 79 मधील परंतू (अ) नुसार कोणत्याही विशिष्ट विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेली कोणतीही मालमत्ता ज्या प्रयोजनासाठी ती धारण करण्यात आली असेल त्यास बाधा येईल अशा रितीने पट्ट्याने देता, विकता किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येणार नाही. असे नमुद आहे. बागेचा उपयोग सार्वजनिक वापराकरीता असलेने त्यामध्ये उपरोक्त नियमानुसार जागावापरात बदल करता येत नसतानाही जागा पट्ट्याने दिल्याचे स्पष्ट होते.

230) स्थायी समितीच्या ठरावामध्ये एकमेव निविदा आली आहे, असे म्हटले आहे. परंतू निविदा उघडण्याच्या दि.22/2/2011 च्या पत्रानुसार वरील प्रमाणे एकुण 7 निविदाकारांनी त्यांच्या निविदा सादर केल्याचे दिसून येते. वरील तफावती बाबत खुलासा सादर करणेत आलेला नाही.करारनामा

रु.100 च्या मुद्रांकावर केलेला आहे परंतू करारनाम्यावर दिनांक नाही.

231) सदर मक्ता हा 29 वर्ष 11 महिन्यांसाठी असल्याने मुंबई महसूल मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 63 ची दुरुस्ती /सूधारणा क्र.12 दि.1/5/2006 अन्वये 10 लाखांपर्यंत रु.100/- चे महसूल मुद्रांक आणि पुढीलप्रमाणे 1 लाखाकरिता रु.100/- निविदा रकमेच्या (जास्तीत जास्त 5 लाखांपर्यंत) या दराने महसूल मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक ठरते. त्यानुसार निविदाकाराने 29 वर्ष 11 महिन्यांकरिता प्रतिवर्ष 1 लाखापर्यंत एकूण रु.2,500/-चा मुद्रांक भरणे आवश्यक होते. रु.100/- चा मुद्रांक भरलेला असल्याने उर्वरित 2,400/- ची वसुली करणेत यावी.

232) जाहिरातीमध्ये एकूण 4 उद्याने विकसित करावयाचा उल्लेख आहे. जयभवानी बाग वगळता इतर बागा अनुक्रमे हुतात्मा, साधुवास्वानी आणि कस्तूरबा बागेच्या विकासाच्या नस्त्या लेखापरिक्षणास सादर झाल्या नाहीत.

233) करारपत्रातील अट क्र.2 अन्वये मक्तेदार एक एकर क्षेत्रफळासाठी 1 माळी व 2 मजूर झाडाझुडूपांच्या देखभालीसाठी नियुक्त करणार असल्याचे नमुद केले आहे.सदर मजूरांच्या बाबतीत, मजूरांच्या वेतनाचा कायदा, 1948, कामगारांच्या सूरक्षेचा कायदा 1938, कामगाराच्या नुकसान भरपाई कायदा 1961, कंत्राटी कर्मचारी कायदा 1979 अन्वये आवश्यक असलेली प्रमाणपत्रे नस्तीमध्ये आढळलेली नाही, तसेच सदर कर्मचारी नेमल्याचे व बागेची देखभाल करित असलेचे उद्यान अधिक्षकांनी प्रमाणित केलेले नाही.

234) अट क्र. 4 अन्वये मक्तेदाराने किती अधिमुल्य रु.1,00,000/- मध्ये उद्यानाची देखभाल कशा प्रकारे करणार याची सविस्तर माहिती देणे आवश्यक आहे. याबाबतची कार्यवाही मक्तेदाराने पुर्ण केल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

235) अट क्र. 5 अन्वये आयुक्त यांनी आदेश दिलेले म.न.पा.चे संबंधित अधिकारी/उद्यान विभागातील हेडमाळी/जमादार जागेवर जावुन तपासणी करतील असे नमूद असताना अशी प्रकारची कार्यवाही संबंधित अधिकारी हेडमाळी यांचेकडून झाल्याचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

236) अट क्र. 7 अन्वये विकासकाने विकसित उद्यानामध्ये केलेल्या कार्यक्रमाची आयुक्तांनी ठरविलेल्या रकमेचे स्वामित्वधन मनपास देणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणांत संबंधित विकासकाने प्रत्येक कार्यक्रमाच्या रकमेच्या 45% रक्कम म.न.पा.कडे जमा करण्याचे कबूल केल्याचे नस्तीवरुन दिसते. परंतू आयुक्तांनी प्रत्येक कार्यक्रमाचे स्वामित्वधन किती ठरविले व अशा प्रकारच्या किती रकमा विकासकाने जमा केल्या त्यांच्या पावत्या लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

237) अट क्र.9 अन्वये विकासकाने उद्यान विकसित करण्याबाबत करारपत्र केल्यानंतर 5 महिन्यांच्या आत पुर्ण करणे आवश्यक होते. परंतू विकासकाने उद्यान विकासाचे काम 5 महिन्यात पुर्ण केल्याचे उद्यान अधिक्षकाने अथवा संबंधित सक्षम अधिका-याने प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र नस्तीमध्ये आढळले नाही.

238) अट क्र.16 अन्वये विकसित उद्यानाचा भाग कार्यक्रमास देताना त्याचे व्यवस्थित रेकॉर्ड करुन ते आठवड्यातून एक वेळ उद्यान अधिक्षकाकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक ठरते. परंतू प्रस्तुत प्रकरणी तसे केल्याचे प्रमाणपत्रे नस्तीमध्ये आढळली नाहीत.

239) करारपत्राच्या प्रत्येक पानावर मनपा तर्फे तसेच विकासकातर्फे स्वाक्षरी करणे आवश्यक होते. परंतू तसे केल्याचे दिसून येत नाही.

वरील प्रमाणे विकासकाने अनेक अटींचा भंग करुनही सदरचा मक्ता नियमबाह्य रित्या चालु ठेवल्याचे स्पष्ट होते. अर्धसमास ज्ञापन क्रमांक 153, दिनांक 5.12.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 74, Hmm No : 153)

## *108 मौलाना आझाद बागेच्या निविदा प्रक्रियेतील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बागेची देखभाल महनगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 227168.00/-

***मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 च्या कलम 79 (ड) अन्वये जो मोबदला घेऊन मनपाच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये. परंतू चालु बाजारभावाप्रमाणे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला न ठरविताच नियमबाह्यरित्या निविदा काढलेचे स्पष्ट होते.***

उद्यान विभागांतर्गत असलेल्या मौलाना आझाद बागेसह काही इतर बागा खाजगी करणाने विकसित करण्याच्या धोरणानुसार सन 2005 ते 2010 या 5 वर्षाच्या कालावधीकरीता स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मौलाना आझाद बागेच्या विकासाकरीता मक्तेदार 'के.एम.सी.बिल्डर्स आणि डेव्हलपर्स' यांना स्थायी समितीचा ठराव क्र.121 दि.30/04/2005 अन्वये ठेका मंजूर करण्यात आला. त्यानुसार मक्तेदाराबरोबर दि.27/05/2005 रोजी दि.27/05/2005 ते 26/05/2010 या कालावधीसाठी करारपत्र करण्यात आले. त्यानंतर सदरचा कालावधी संपताच 27/05/2010 ते 26/05/2015 या 5 वर्षाच्या कालावधीसाठी स्थायी ठराव समिती ठराव क्र.1201 दि.07/01/2011 रोजी 'के.एम.सी.बिल्डर्स आणि डेव्हलपर्स' या पुर्वीच्याच मक्तेदारास मुदतवाढ देण्यात आली. परंतू महानगरपालिकेने ठरविलेल्या वार्षिक

भाड्यामध्ये दरवर्षी 3% वाढ करुन पुढील वर्षाचे भाडे ठरविण्याच्या अटीवर मा.आयुक्तांनी मक्ता मंजूर केलेला आहे. परंतू 'के.एम.सी.बिल्डर्स आणि डेव्हलपर्स' या मक्तेदाराने सन 2010-11 करिताचे भाडे रु.72600/- पावती क्र. 0098125, आणि सन 2011-12 चे भाडे रु.76600/- असे एकत्रित भाडे रु.1,49,200/-चा भरणा दि.15/12/2011 रोजी केला. याचा अर्थ मक्तेदाराने सन 2010-11 चे भाडे एप्रिल 2010 मध्ये न भरता दि.15/12/2011 म्हणजे तब्बल 20 महिन्यांनी उशिरा भरले. यावरुन सदर मक्तेदाराने करारपत्रातील अटींचा भंग करुनही त्याचेकडून कुठल्याही प्रकारचा प्रशासनाने दंड आकारल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. वास्तविक मक्तेदाराने अटीचा भंग केला असल्याने त्यांचे डिपॉझिट रु.25000/- जप्त करुन त्याचा मक्ता त्वरित रद्द करणे आवश्यक होते.

प्रस्तुत प्रकरणी लेखापरिक्षणात खालील त्रुटी आढळलेल्या आहेत.

240) मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 च्या कलम 79 (ड) अन्वये जो मोबदला घेऊन मनपाच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्ट्याने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये. परंतू चालु बाजारभावाप्रमाणे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला न ठरविताच नियमबाह्यरित्या निविदा काढलेचे स्पष्ट होते.

241) अधिनियम 1949 चे कलम 79 मधील परंतू (अ) नुसार कोणत्याही विशिष्ट विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेली कोणतीही मालमत्ता ज्या प्रयोजनासाठी ती धारण करण्यात आली असेल त्यास बाधा येईल अशा रितीने पट्ट्याने देता, विकता किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येणार नाही. असे नमुद असता बागेचा उपयोग सार्वजनिक वापराकरीता असलेने त्यामध्ये उपरोक्त नियमानुसार जागावापरात बदल करणे चुकीचे असलेने जागा नियमबाह्यरित्या पट्ट्याने दिल्याचे स्पष्ट होते.

242) ठेक्याचा कालावधी संपल्यानंतर पुन्हा निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदार निश्चित करणे आवश्यक असता प्रशासनाने त्याच ठेकेदारास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला आहे. तसेच पुन्हा निविदा न मागविलेने स्पर्धात्मक दराचा लाभ न मिळाल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.

243) मक्तेदारास मक्ता मंजूर करण्यापुर्वी त्याला यापुर्वी उद्यान विकसित करण्याचा अनुभव आहे किंवा नाही हे विचारात घेणे आवश्यक होते. परंतू प्रस्तुत प्रकरणी मक्तेदाराचा पुर्वानुभव लक्षात न घेताच त्याचा मक्ता मंजूर केल्याने महानगरपालिकेच्या बागेचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

244) मक्तेदाराबरोबर केलेल्या करारपत्रातील अट क्र.8 अन्वये बागेच्या विकसित जागेत त्याने आयाजित केलेल्या कार्यक्रमातून त्याला मिळालेल्या रकमेच्या 45% रक्कम स्वामित्वधन म्हणून महानगरपालिकेस जमा करणे आवश्यक ठरते. सदरची नस्ती पडताळली असता त्यामध्ये मक्तेदाराने मार्च 2012 पर्यंत किती कार्यक्रम केले? त्यानुसार त्याने 45 टक्क्यांच्या दराने किती रक्कम

महानगरपालिकेकडे जमा केली त्याबाबतची कागदपत्रे, पावत्या लेखापरिक्षणास सादर केलेल्या नाहीत. तसेच मक्तेदाराने दि.16/06/2005 च्या पत्रामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे दरवर्षी उत्पन्नाच्या 45% म्हणजे रु.66150/- असे नमुद आहे, सदर रक्कम मक्तेदाराने कशाच्या आधारे ठरविली याबाबतची माहीती लेखापरिक्षणास देणेत आलेली नाही.

245) करारपत्राच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व मनपाच्या वतीने सक्षम प्राधिका-याने स्वाक्षरी करणे आवश्यक असता ती न केल्याने कराराच्या खरेपणाबाबत खात्री करता येत नाही.

246) मक्तेदाराकडुन अनामत रक्कम घेतल्याबाबतचे कागदपत्रे/पुरावा नस्तीमध्ये आढळला नाही.

247) करारपत्रातील अट क्र.17 अन्वये मक्तेदारास बागेतील विकसित जागेत कार्यक्रम करण्यास मंजूरी दिल्यावर त्याने केलेल्या प्रत्येक कार्यक्रमाचे व्यवस्थित रेकॉर्ड करुन ठेवून ते उद्यान अधिक्षकाने आठवड्यातून एकदा प्रमाणित करणे आवश्यक होते. अशा प्रकारचे प्रमाणित केलेली कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

248) निविदाकाराने बागेचा विकास करताना तो सदर विकास कशाप्रकारे करणार आहे, किती करणार आहे याबाबतचा विकास आराखडा अथवा नकाशे सादर करणे आवश्यक होते. याबाबत मुख्यलेखापरिक्षकांनी देखील अभिप्राय नस्ती मध्ये नोंदविलेले आहेत. तरी देखील निविदाकाराकडून बागेचा विकास आराखडा/नकाशे प्राप्त न करताच निविदा मंजूर करण्यात आल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

249) अट क्र. 2 अन्वये निविदाकाराने बागेच्या हिरवळीची स्वच्छता राखण्यासाठी, देखभालीसाठी एक एकरासाठी एक माळी व दोन मजूर नियुक्त करणार असल्याचे मंजूर केले आहे. परंतू त्यासाठी त्यांनी मजूरांच्या वेतनाचा कायदा 1996, किमान वेतन कायदा 1948, सूरक्षेचा कायदा 1938, कामगारांच्या नुकसान भरपाईचा कायदा 1961, कंत्राटी कर्मचारी कायदा 1979 अन्वये आवश्यक असलेली प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक होते.सदर प्रमाणपत्रे नस्तीमध्ये आढळली नाहीत.

250) सदर निविदाकारास सन 2010 ते 2015 या 5 वर्षाच्या मक्त्यास मुदतवाढ दिल्यानंतर त्याच्याशी करारपत्र केलेले नाही.

251) करारपत्रातील अट क्र.4 अन्वये मक्तेदाराने बागेच्या विकासाकरिता वार्षिक भाडे रु.66000/- दरवर्षी पालिकेकडे जमा करणे आवश्यक होते, परंतू नस्तीमधील उद्यान अधिक्षकांचे दि.03/04/2010 च्या पत्रावरुन सदर रक्कम दरवर्षी न भरता 5 वर्षाचे एकत्रित रु.3,30,000/-दि.26/05/2010 रोजी भरल्याचे दिसून येते. त्यामुळे करारपत्रातील अटींचा भंग झालेला असूनही नियमबाहयरित्या त्याच ठेकेदारास पुन्हा ठेका देण्यात आलेला आहे, तसेच ठेकेदाराकडुन रक्कम वेळेत न भरल्याने 18 % प्रमाणे वार्षिक दराने व्याजाची रक्कम रु.227168/- + दंडाची रक्कम याप्रमाणे वसुलकरण्यात यावी.

वरील सर्व बाबी लक्षात घेता निविदाकाराने करारपत्रातील अनेक अटींचा भंग केलेला आहे. तसेच सन 2010 ते 2015 या मुदतवाढीतील मंजूर मक्त्याचे करारपत्र न करताच मक्ता तसाच पुढे चालू ठेवल्यामुळे सदरचा मक्ता नियमबाह्य ठरतो. तरी मक्ता त्वरित रद्द करुन मक्तेदाराकडून त्याने वरील काळात सदर बागेत

केलेल्या कार्यक्रमाच्या 45% महानगरपालिकेच्या देय रक्कमेची निविदेच्या अनामत रकमेची, स्वामित्वधनाची आणि दरवर्षीच्या मक्ताच्या 3 % दराने वाढीव रकमेची वसुली करणे आवश्यक ठरते.

DATRADM5901 (Ref No : 75, Hmm No : 152)

## *109 सभापती, महिला व बालकल्याण आणि अधिकारी यांच्या वाहनांवरील खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : म.बा.कल्याण महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 332949.00/-

***महिला व बालकल्याण विभागाच्या समितीच्या व्यवस्थापनासाठी एकूण 23 लाख 70 हजारांच्या तरतुदीमधून समितीच्या सभापती आणि महिला व बालकल्याण अधिका-याच्या वाहनावर रक्कम रु.961066 इतका खर्च झाला असून त्यांचे लॉगबुक मधील नोंदी अपुर्ण आणि प्रमाणित नाहीत. सभापतीच्या वाहनावरील पेट्रोलसाठी रु.31689 आणि दुरुस्ती आणि सुट्या भागांवरील खर्च रु.332949 अशी एकूण रु.364638 आक्षेपाधिन ठरते.***

महिला व बालकल्याण विभागासाठी सोलापूर महानगरपालिकेने 2011-12 मध्ये एकूण 2 कोटींची तरतूद केली असून त्यापैकी महिला व बालकल्याण समितीच्या व्यवस्थापनासाठी रु.23 लाख 70 हजारांची तरतूद करण्यात आली होती. सदर समितीच्या सभापती आणि अधिकारी यांच्या वाहनासाठी रु.1050000/-च्या तरतुदीमधून रु.961066/- एवढा खर्च करुन रु.88934/- एवढी' रक्कम शिल्लक राहिल्याचे सदर विभागाने सादर केलेल्या 2011-12 च्या अर्थसंकल्पिय तरतुदी आणि खर्चाच्या विवरणपत्रावरुन दिसून येते.

252) महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीसाठी वाहन क्र.MH-13-PC-284(टाटा इंडिका) आणि अधिका-यांसाठी वाहन क्र. MH-13-P-342(1,2,3 जानेवारी 2012 आणि फेब्रुवारी 19 व 21 अशा एकूण 32 दिवसांच्या वाहन वापराच्या आणि कि.मी.च्या नोंदी दिसून आल्या. त्यानंतर सदर वाहन निवडणुकीच्या कामासाठी जमा केल्याचे दिसून येते. परंतु सदर वाहनाच्या प्रवासाचा हेतु, ते किती कि.मी.चालले, किती लिटर पेट्रोल खर्च झाले, या रकान्यामधील नोंदी अपुर्ण आहेत. तसेच सदर वाहनातुन प्रवास करणा-या अधिका-याची आणि इनचार्ज अधिकारी यांच्या स्वाक्ष-या लॉगबुकमध्ये नाहीत. तसेच सदर वाहनाचे माहे एप्रिल 2011 ते 4 डिसेंबर 2011 पर्यंतचे लॉगबुक तपासणीसाठी उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे सदर वाहनावर आर्थिक वर्षात पेट्रोलवर आणि त्याच्या दुरुस्तीवर एकूण किती खर्च झाला ते लेखापरिक्षणास कळू शकले नाही.

253) तसेच महिला व बालकल्याण अधिकारी यांना देण्यात आलेले वाहन क्र. MH-13-P-342(टाटा सुमो) या वाहनाचे 2011-12 मधील लॉगबुक उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे सदर वाहनासाठी खर्ची पडलेल्या पेट्रोलची व त्याच्या दुरुस्ती आणि सुट्या भागांच्या खरेदीवरील खर्चाची परिगणना करणे लेखापरिक्षणास शक्य झाले नाही. महिला व बालकल्याण समितीने 2011-12 चे दिलेल्या खर्च विवरण पत्रानुसार दोन वाहनांवरील इंधन/दुरुस्तीवर रु.332949/- खर्च केल्याचे दिसून येते. परंतु नगर परिषद लेखा संहिता 1971 चे नियम 153 प्रमाणे टाटा सुमो) ही वाहने परिवहन विभागामार्फत खरेदी करण्यात आली. सदर वाहनाच्या लॉग बुकची मागणी केली असता सभापती यांचे वाहन क्र. MH-13-PC-284 (टाटा इंडिका) चे लॉग बुक लेखा परिक्षणासाठी सादर करण्यात आले. सदर लॉगबुक मध्ये केवळ दि.5/12/2011 ते 31/12/2011,

254) नियंत्रण अधिका-यास इंधन वापरावर होणा-या खर्चाचे परिनिरिक्षण करता यावे म्हणून नमुना क्र.127 प्रमाणे मोटार वाहन लेखापुस्तक ठेवणे आवश्यक असता त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही न केल्याने र. रु.332949/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी महिला व बालकल्याण विभागास अर्धसमास ज्ञापन क्र.173 दि.8/1/2014 अन्वये विचारणा करण्यात आली आहे. परंतू त्यांचा अनुपालन अहवाल अप्राप्त आहे.

एकूण आक्षेपाधिन रक्कम रु.332949/-

DATRADM5901 (Ref No : 123, Hmm No : 173)

## *110 महिला व बालकल्याण समितीने राबविलेल्या संगणक (एम.एस.सी.आय.टी) प्रशिक्षणाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : महिला व बालकल्याण महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 248000.00/-

***महिला व बालकल्याण समिती मार्फत मुलींना व महिलांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी शांती टेक्निकल इन्स्टि. आणि किर्ती प्रोफेशनल ॲकॅडमी यांना निविदा प्रक्रिया न राबविताच ठेका मंजुर केला आहे. शांती टेक्निकल इन्स्टि. यांनी प्रशिक्षणार्थीना शासन मान्य परीक्षेला पाठविलेले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागांतर्गत गठीत करण्यात आलेल्या

समितीमार्फत .2011-12 मध्ये शासनाच्या नगरविकास विभागाचे आदेश क्र.संकीर्ण 2005/प्र.क्र.156/05/नवि.20, दि.30 डिसेंबर 2006 अन्वये आदेशित केल्याप्रमाणे मुलींना व महिलांना विविध प्रकारचे व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे या प्रवर्गाखाली संगणक प्रशिक्षण (एम.एस.सी.आय.टी) देण्यात आले. याबाबतच्या नस्तीचे लेखापरिक्षण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

सदर प्रशिक्षण वर्गासाठी शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्रमांक भांखस/1093/2635/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 अन्वये रु.50 हजाराच्या वरील खर्चासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. परंतु प्रस्तूत प्रकरणी **निविदा प्रक्रिया न राबविता प्रशिक्षण संस्थेची निवड केलेली आहे.** त्यामुळे सदर संगणक प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या किर्ती प्रोफेशनल ऍकॅडमी आणि शांती टेक्निकल इन्स्टिट्युट या दोन संस्थांवर खर्ची पडलेली रक्कम अनुक्रमे रु.110000/- आणि रु.138000/-अशी मिळून **रु.248000/- आक्षेपाधिन ठेवण्यात** येत आहे.

सदर प्रशिक्षण देण्यासाठी किर्ती प्रोफेशनल एकॅडमी आणि शांती टेक्नीकल इन्स्टिट्युट या दोन संस्थांची स्थायी समितीच्या ठराव क्र.929 दि. 3/12/2011 अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दोन्ही संस्थांना दि.22/12/2011 रोजी वर्क ऑर्डर देऊन त्यानंतर शांती टेक्नीकल इन्स्टिट्युट या संस्थेबरोबर दि.26/12/2011 रोजी आणि किर्ती प्रोफेशनल एकॅडमी यांचेबरोबर दि.31/12/2011 रोजी करारपत्र करण्यात आले आहे. यावरुन असे दिसून येते कि प्रथम वर्क ऑर्डर देऊन नंतर करारपत्र केलेले आहे. वस्तुतः महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 171 नुसार प्रथम करारपत्र करुन नंतर वर्कऑर्डर देणे आवश्यक ठरते त्यामुळे महानगरपालिकेची सदरची कृती नियमबाह्य आहे.

शांती टेक्नीकल इन्स्टिट्युट या संस्थेने एकूण 46 लाभार्थींना प्रशिक्षण दिले आहे व त्यांची संस्थेमार्फतच परिक्षा घेण्यात आलेली आहे. परंतू त्यांना महाराष्ट्र तंत्र शिक्षण संचालनालयाचे संगणक प्रशिक्षण कोर्सचे प्रशिक्षण देऊन शासन मान्य परिक्षेला पाठविणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने शासनाचे मुलींना व महिलांना सदर प्रशिक्षण देण्यामागील उद्दिष्ट साध्य झाले नाही.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.248000/-

DATRADM5901 (Ref No : 130, Hmm No : 175)

## *111 इंदिरा गांधी स्टेडियममधील गाळ्यांच्या भाडे थकबाकीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : क्रिडा महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 538737.00/-

***थकित भाडेकरुंकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या परिशिष्ट 8 नुसार नोटीस फी, वॉरंट फी, जंगम- स्थावर मिळकतीची जप्ती करुन कलम 81 नुसार कारवाई करुन एकूण 59 गाळ्यांचा कब्जा परत घेणे आवश्यक होते परंतु तशी कारवाई कमिटीने केल्याचे दिसून येत नाही सदर गाळ्याची मुदत संपल्यानंतर मुदत वाढीचे करार केले नसल्याचे दिसून येते. 2011-12 मध्ये सर्व गाळेधारकांने एकूण रक्कम रु.1819339/- भरणा केले आहे. परंतु 12.36% या दराने सेवाकर रु.224870/- त्यांच्याकडून वसुल केलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या क्रिडा विभागाच्या अधिनस्त असलेल्या इंदिरा गांधी स्टेडियम मधील 1 ते 59 गाळ्यांचे लेखापरिक्षण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

255) इंदिरा गांधी स्टेडियम मधील 59 गाळ्यांचे व्यवस्थापन महानगरपालिकेच्या अधिपत्या खालील सोलापूर जिल्हा स्टेडियम कमिटी ही सांभाळत आहे.सदर कमिटीने दि.06/05/1977 च्या निर्णयानुसार प्रत्येक गाळ्यास दरमहा रु.400/- सर्व करांसह याप्रमाणे 9 वर्ष 11 महिने करीता भाडे मंजुरीचा निर्णय घेतलेला आहे. सदर कमिटीच्या निर्णयानुसार करण्यात आलेल्या अटी व शर्ती मधील अट क्र.6 अन्वये गाळेधारकाने दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत भाडे न भरल्यास सदर भाड्याची रक्कम भरेपर्यंत दंड आणि द.सा.द.शे. 10% प्रमाणे व्याजाची आकारणी करणे बंधनकारक होते, तसेच अट क्र.7 नुसार 3 महिन्यापेक्षा जास्त थकबाकी राहिल्यास कमिटीस गाळा केव्हाही ताब्यात घेण्याचा अधिकार आहे. याबाबत गाळ्यांच्या भाडे थकबाकीच्या तत्कालीन नोटीसा तपासल्या असता अनेक गाळेधारकांना कमिटीतर्फे त्यांच्या गाळ्यांच्या भाड्यांच्या थकबाकीच्या नोटिसा बजावलेल्या आहेत परंतु त्या नोटिसीना प्रतिसाद न देता गाळेधारकांनी त्यांचे भाडे व त्यावरील व्याज कित्येक महिने थकविल्याचे नोटिसींवरुन दिसून येते तथापी स्टेडियम कमिटीने सदर थकित गाळेधारकांनी अटी व शर्तीचा भंग केल्याने त्यांचेकडून गाळा ताब्यात घेण्याची कारवाई करणे आवश्यक होते, तसेच वसुली संबंधीच्या सुचना क्र.7 अन्वये भाड्याच्या थकबाकी वसुली बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949चे परिशिष्ट 8 मधील तरतुदी नुसार नोटीस फी, वॉरंट फी, जंगम-स्थावर मिळकतीची जप्ती वगैरे करणेसाठी मनपा कर वसुलीच्या पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक होते तसेच वरील कायद्यातील कलम 81 नुसार वसुलीची सुचना क्र.4 नुसार व अन्य शर्तीचा भंग केल्यास व इतर कायद्या नुसार कमिटीने जागेचा कब्जा परत घेणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे जागेचा कब्जा घेण्यात आलेला नाही.

256) महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 च्या नियम क्र.120 अन्वये महानगर पालिकेची मालमत्ता भाड्याने देण्यासंबंधीचे नमुना क्र.89 प्रमाणे असलेले पुस्तक ठेवणे आवश्यक आहे. मालमत्तेच्या भाड्याच्या रकमा, त्यासह वस्तुंचा तपशील व कोणास भाड्याने दिली याच्या नोंदी व्यक्तीच्या अर्जावरुन व सक्षम अधिका-याने दिलेल्या आदेशावरुन नोंदविण्यात याव्यात. दिलेली वस्तु परत येताच, त्याचा दिनांक पुस्तकात नोंदविण्यात यावा. वर्षअखेर शुल्क/भाड्याची थकबाकी

राहिल्यास ती पुढील वर्षात अग्रेषित केली पाहिजे. वरील प्रमाणे नोंदवही क्रिडा विभागाने ठेवलेली नाही.

257) सदर कमिटीच्या अट क्र.15 अन्वये दुकानाची पडझड, रंगसफेदी व इतर किरकोळ दुरुस्तीसाठी कमिटीची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. याबाबतच्या प्रकरणांच्या नस्तींची मागणी अर्धसमास क्र.180 दि. 16/01/14 अन्वये केली असता ती लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

258) कमिटीने आपल्या दि.6/05/1977 च्या निर्णयानुसार 9 वर्षे 11 महिन्यांच्या मुदतीनंतर गाळ्यांना मुदतवाढ देण्याकरिता नव्याने ठराव करणे आवश्यक होते, सदर ठरावांच्या प्रतींची मागणी केली असता क्रिडा विभागाकडून गाळा क्र.34 ची नस्ती सादर करण्यात आली. त्यातील उपलब्ध कागदपत्रानुसार स्टेडियम कमिटीच्या दि.09/04/1990 रोजीच्या बैठकीत झालेल्या विषय क्र.25 च्या निर्णयानुसार केवळ 1 ते 13 गाळ्यांना 9 वर्षे 11 महिन्यांकरिता दि.01/05/1990 पासून त्यापूर्वीच्या भाड्याचे दर रु.400/- दरमहा आणि त्याव्यतिरिक्त 0.05 पैसे प्रति.चौ.फुटास भाडे आकारण्याचे ठरल्याचे दिसून येते, त्यानुसार तत्कालीन गाळेधारकांनी सुधारित दराने भाडे भरल्याची, नसल्यास दंड आकारण्याची, व्याज आकारण्याचे तथापी एकूण थकबाकीच्या वसुली च्या कागदपत्रांची मागणी केली असता ती लेखापरिक्षणास सादर झाली नाहीत.

259) सद्य परिस्थितीत सदर स्टेडियम कमिटीने दि.22/08/2012 च्या बैठकीत घेतलेल्या गाळ्यांच्या भाडेवाढीच्या निर्णयानुसार सोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. 21 अन्वये 2006-07 पासून 11 वर्षांसाठी गाळ्यांची मुदतवाढ देण्याबाबतचे क्रिडाविभागाचे पत्र क्र.क्रिडा 580, दि.07/12/2012 अन्वये केल्याचे दिसून येते. स्टेडियम कमिटीच्या सदर निर्णयानुसार ज्या गाळेधारकांनी आपले गाळे हस्तांतरित ( Transfer) केले आहेत अशा गाळेधारकांकडून कराव्यतिरिक्त गाळा हस्तांतरणासाठी रु.200000/- फी आकारण्याचे आदेशित केले आहे. (याबाबतचा अभिलेख उपलब्ध केला गेला नाही). वरील मुदतवाढीच्या 59 गाळेधारकांपैकी 14 गाळेधारकांकडून जुन्या व सुधारित दरातील तफावतींची रक्कम **रु.313867/- इतकी वसुली प्रलंबित** असल्याचे क्रिडा विभागाने सादर केलेल्या विवरणपत्र तपासले असता त्या वरुन दिसून येते. तसेच 2011-12 मध्ये सर्व गाळेधारकांकडून जुन्या दराच्या भाड्यावर तसेच जुन्या व सुधारित दरातील भाड्याच्या फरकाच्या रकमेवर केंद्र सरकारच्या अबकारी विभागाचे पत्र क्र.एस.टी.न्यु सर्विसेस/2006/सोलापूर, दि.4 जुलै 2008 अन्वये 12.36 % दराने सेवाकराची आकारणी करणे आवश्यक होते. परंतु अशा सेवा कराची क्रिडा विभागाने आकारणी केल्याचे दिसून येत नाही. 2011-12 मध्ये क्रिडा विभागाकडे गाळेधारकांकडून रु.1819339/- एवढी रक्कम गाळ्यांच्या भाड्यापोटी जमा झाल्याचे क्रिडा विभागाने सादर केलेल्या भाड्याच्या तपशीलावरुन दिसून येते त्यानुसार सदर रकमेवर 12.36% या दराने एकूण **रु.224870/- एवढी रक्कम सेवाकर** म्हणून वसुल होणे आवश्यक आहे. 2006-07 पासून 11 वर्षांच्या मुदत वाढीचे करारपत्र अद्याप गाळेधारकांसोबत करण्यात आलेले नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र. 180 दि. 16/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

**एकूण वसूलपात्र रक्कम रु. 313867/- + रु. 224870/- = रु. 538737/-**



## *112 झोपडपट्टीधारकांना ओळखपत्र वितरीत न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधारणा महानगरपालिका निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 93004200.00/-

***गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.गवसू-1220/प्र.क्र.364 (2) झोपसू-1 दि.3/5/2003, मुद्दा क्र.5 अन्वये उपरोक्त पात्र निवासी झोपडपट्टी धारकांकडुन एकत्रित शुल्काची (सेवाशुल्क, प्रशासकिय आकार, भुईभाडे) वसुली दि.1/1/2003 पासून रु.100/महिना दराच्या 25% प्रमाणे वसुल करणे आवश्यक आहे. परंतु एकूण 34446 झोपडपट्टी धारकांकडुन रु.300 वार्षिक दराने, एकूण 9 वर्षाची (34446x300x9) थकीत रक्कम रु.93004200/- वसुली केलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत 2011-12 या वर्षाचे लेखा परीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या आहेत, सदर अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.137 दि.28/11/2013 अन्वये कळविले होते. त्यानुसार विभागांनी माहिती सादर केलेली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

260) गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.गवसू 1220/प्र.क्र.204(1) झोपसू-1.दि.11/7/2001 अन्वये 6 ( क) नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरीक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीसाठी सेवाशुल्क इत्यादीचा दर अनुक्रमे 50% राहील असे आदेश होते.

261) तथापि सदर शासन निर्णयास गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र. गवसू 1220/ प्र.क्र.364 (2)/झोपसू-1 दि.3/5/2003 अन्वये 6 ( ब) नुसार सूधारणा करुन पात्र झोपडपट्टीवासियांना ओळखपत्र योजनेअंतर्गत ओळखपत्र देताना निवासी वापरातील झोपड्यांची दि.31/12/2002 पर्यंतच्या नुकसान भरपाई/ **<u>एकत्रित शुल्काची थकबाकी माफ करण्यात आलेली आहे</u>**. तसेच 6 ( क) अन्वये बृहनमुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरीक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील वसुल करावयाच्या एकत्रित शुल्काचा दर परीच्छेद 6 ( ब) 5 मध्ये नमुद केल्यानुसार बृहनमुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठीच्या दराच्या 25% एवढा राहील असे शासन आदेश आहेत. याबाबत विभागाने सदर शासन

निर्णयानुसार वसुली करणेसाठी काय कार्यवाही केली याची माहीती सादर केली नसल्याने वसुली बाबतची खात्री करता आली नाही.

झोपडपट्टीधारकांचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | झोपडपट्टीतील वापराचा तपशील | 1/1/95पर्यंत सर्वेक्षणा नुसार पात्र झोपडपट्टीधारकांची एकूण संख्या | ओळखपत्र दिलेल्या झोपडपट्टीधारकांची संख्या | ओळखपत्र न दिलेल्याझोपडपट्टी धारकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| अ. | निवासी | 33762 | 856 | 34446 |
| ब. | सांस्कृतिक,सामाजिक,धार्मिक, शैक्षणिक | 40 | | -- |
| क. | संयुक्त | 1500 | | -- |
| ड. | अनिवासी | | | -- |
| एकूण | | 35302 | 856 | 34446 |

3. गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.गवसू 1220/प्र.क्र.204(1) झोपसू-1.दि.11/7/2001 मधील मुद्दा क्र. 9 नुसार हस्तांतरणाची मान्यता जमिनीची मालकी असलेल्या संस्थांनी(मनपा) करणे आवश्यक आहे.त्यानुसार 2011-12 वर्षात 421 प्रकरणांची हस्तांतरण प्रक्रिया केलेली आहे.परंतु हस्तांतरणाची नस्ती लेखापरीक्षणास सादर केली नसल्याने मुळ झोपडपट्टी धारकांच्याकडे ओळखपत्र असल्याबाबतची खात्री झाली नाही व कशाच्या आधारे 421 प्रकरणांची हस्तांतरण प्रक्रिया केली आहे, याबाबत साधार खुलासा विभागाने केलेला नाही.

4. एकूण 34446 एवढ्या झोपडपट्टी धारकांना फोटोपास अद्याप वितरीत केलेले नसलेने, एकूण 34446 झोपडी धारकांकडून रु.300 वार्षिक दराने, एकूण 9 वर्षाची (34446x300x9) अशी एकूण रक्कम रु.93004200/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

5. विभागाने प्रभागनिहाय अधिकृत किती झोपडीधारक आहेत यांची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे विभागाने सादर केलेल्या माहिती बाबत खात्री देता येत नाही. तरी अद्यावत नोंदवही ठेवणेत यावी.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 137, दिनांक 28.11.2013 चे उत्तर दिले नाही.

DATSBWM6801 (Ref No : 134, Hmm No : 137)

## *113 घर तेथे शौचालय अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधणे(फेज-1)कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

सोलापूर महानगरपालिका

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधार केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3964466.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 925873.00/-

***फेज-1 मध्ये अशासकिय संस्थेने 5000 आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थींची निवड केलेली आहे. परंतु त्यांच्या पात्रतेसंबंधीची कागदपत्रे मागणी करुनही उपलब्ध केली नाहीत.शौचालयाचे बिल अदा करणेपुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून त्रयस्थ संस्था म्हणून नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. परंतु सदर ना हरकत प्रमाणपत्र न घेताच रु.3964466/- रक्कमेचे प्रदान केलेले आहे. सदर प्रदान नियमबाहय दिसून येते.***

प्रशासकिय मान्यताः- रु.50000000/- पाणी पूरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र.कखयो-2011/प्रकरण क्र.74/पापू-21, दि.04/05/2011

अंदाजपत्रकीय मान्यताः- रु.59610000/- स्थापत्य समिती ठराव क्र.41, दि.24/08/2011

निविदा मान्यः- रु.50550000/- स्थायी समिती ठराव क्र.1041, दि.02/01/2012

कामाचे आदेशः- क्र.960, दि.24/02/2012 मुदत 3 महिने.

कामाचा कालावधीः- दि.24/02/2012 ते 31/03/2012 (अपुर्ण)

कामावरील खर्चः- रु.3964466/-

मक्तेदारः- नवभारत सामाजिक प्रतिष्ठान मुंबई.

केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकाकरिता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम राबविणे बाबत शासन परिपत्रक क्र.करवयो-2008/प्रक्र.133/वै.शि.पाणी पुरवठा -21 दि.23/10/2008 च्या मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दती दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने शौचालय बांधणेची योजना राबविली आहे. सदर शौचालय बांधकामाच्या निविदा नस्ती व झालेल्या खर्चाची देयके तपासली असता खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1. फेज-1 मध्ये अशासकिय संस्थेने 5000 आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांची निवड केलेली आहे. परंतु त्यांच्या पात्रतेसंबंधीची कागदपत्रे मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली नाहीत.

2. लाभार्थी पात्र असलेबाबत नागरी समुदाय विकास प्रकल्प सोलापूर महानगरपालिका यांचेकडील तसेच विशेष अधिकारी यांचेकडून प्रमाणित केल्याचे अभिलेख नस्तीत सामाविष्ट नाहीत.

3. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई -32 यांचे परिपत्रक क्र.करवयो-2008/प्रक्र 133/वैशि/पापु-21 दि.23/10/2008 मधील तरतुदीनुसार लाभार्थींची 10% हिस्स्याची रक्कम जमा करणेबाबत सुचना असून एकुण 341 लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालय बांधुन दिलेले आहे त्याचा प्रती लाभार्थी हिस्सा रुपये 1000/-प्रमाणे वसुल केलेला नसल्याने रु.341000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4. बयाणा रक्कम रु.506000/-धनाकर्ष क्र.945834 आयडीबीआय बँकत भरणा केलेली आहे.असे निविदा नस्तीमध्ये अभिप्राय नोंदविले आहेत. परंतु नस्तीत चलनाची त्याची प्रत जोडलेली नाही. तसेच रक्कम जमा

असल्याची बँकस्क्रोल उपलब्ध नसल्याने खात्री करता आली नसल्याने रु. 506000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

5. निविदेची एकूण रक्कम रु.50550000/- इतकी असून कार्यकंत्राटाच्या रक्कमेनुसार करारनामा रु.49700/- चा करणे आवश्यक असताना रु.20000/- च्या मुद्रांकावर केला आहे. मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम-63 व नगर विकास विभाग शासन निर्णय दि.7/12/2009 नुसार कार्यवाही केली नसल्याने रुपये 29700/- वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

6. सुरक्षा अनामत रक्कम रु.1214400/- ही एचडीएफसी बँक धनाकर्ष क्र.001724 दि.21/02/2012 ची रक्कम महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम क्र.169(5) नुसार ठेवीकडे वर्ग केल्याबाबतची कागदपत्रे अर्धसमास ज्ञापन क्रं.182 दि.17/01/2014 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नाहीत.

7) फेज-1 मधील कंत्राटदारामार्फत किती शौचालय मार्च-2012 अखेर पूर्ण तसेच वैयक्तिक लाभार्थ्यांनी किती शौचालये बांधली व त्यांना प्रदान करण्यात आलेल्या रक्कमांचा तपशिल प्राप्त झाला नाही.

8) 11/12 या आर्थिक वर्षामध्ये वैयक्तिक शौचालयासाठी रु.9000/-प्रमाणे 1360 लाभार्थ्यांना रु.12240000/- व रु.2500/- प्रमाणे 271 लाभार्थ्यांना रु.677500/-तसेच रु.6500/-प्रमाणे 15 लाभार्थ्यांना रु.97500/-असे एकुण रु.13015600/-प्रदान केले आहेत.शासनाच्या मार्गदर्शक सुचनामध्ये व तपशीलवार प्रकल्प अहवालामध्ये लाभार्थ्याने वैयक्तिक शौचालय बांधावे असा उल्लेख नाही. शासन निर्णय 2 ऑक्टों. 2008 अट क्र.7 नुसार बांधकाम व देखभाल दुरुस्तीचे कामाकरिता त्यांचे स्तरावर संस्थांची निवड करणे आवश्यक असता लाभार्थ्याला शौचालय बांधणीसाठी नियमबाह्यरित्या रकमा प्रदान केल्या आहेत.

9) काम पुर्ण झालेनंतर आवेक्षक (कनिष्ठ अभियंता) यांनी तांत्रिक तपासणी करुन अंदाजपत्रकानुसार काम योग्य असल्याचा दाखला व त्याची मोजमापे नोंदविणे आवश्यक आहे. परंतु मक्तेदाराच्या बिलासोबत मोजमापे प्रमाणित केलेची कागदपत्रे नाहीत.तसेच मागणी करुनही उपलब्ध झालेली नाहीत. मुंबई स्थानिक अधिनियम-1930 मधील कलम 4(3) नुसार अभिलेख उपलब्ध करुन देणे स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे त्याचे पालन झालेले नाही.

10) मक्तेदाराचे बील प्रदान करण्यापुर्वी विभागीय अधिकारी व सहायक अभियंता यांनी कामाच्या 20 % तांत्रिक तपासणी करण्याचे आदेश आहेत. परंतु त्याचे पालन केलेले नाही. तसेच बील अदा करणेपुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या त्रयस्थ संस्थेकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. सदर ना हरकत प्रमाणपत्र घेताच रुपये 3964466/- रक्कमेचे प्रदान केलेले आहे. सदर प्रदान नियमबाह्य दिसून येते.

11) वॉर्ड क्र.79, 92 व 96 मधील मक्तेदाराने बांधलेल्या शौचालयाचे बिला सोबत जोडलेले फोटो तपासले असता 127 शौचालयास दरवाजाची फक्त फ्रेम बसविली आहे. झडपेचे दरवाजे सुद्धा बसविणे आवश्यक आहे. परंतु बसविलेले नसल्याचे दिसते. तसेच अंदाजपत्रकामध्ये (Providing and Fixing e.c.Door with Bison panel Shutter) या पुर्ण बाबीचा दर रुपये 750/- दिलेला आहे. बाब अपूर्ण असताना मक्तेदारास पूर्ण दराने रक्कम प्रदान केली आहे. सदर रक्कम रुपये 95250/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

12) कंत्राटदारास नोंदणीकृत असल्याचे मुल्यवर्धित कराचे प्रमाणपत्र नाही. मक्तेदारास रुपये 3964466/-

रक्कमेचे प्रदान केलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांच्या दि. 3 मार्च 2006 च्या शासन निर्णयानुसार नोंदणीकृत ठेकेदाराकडून 2% व अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 4% मुल्यवर्धित कर देयकामधून वसुल करणेचे आदेश आहेत. त्याचे पालन झालेले नाही, तरी रुपये 158579/- वसुल करण्यात यावी.

13) उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांच्या शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार-6 दि.17/06/2000 नुसार कामगार कल्याण उपकाराची 1 % रक्कम कपात करणे बंधनकारक आहे पुर्वगणक पत्रकामध्ये 1% उपकर व विम्याची तरतुद केली आहे, परंतु ठेकेदाराच्या देयकातून कामगार उपकाराची वसुली केली नसल्याने शासनाचे रुपये 39645/- चे नुकसान झाले आहे. तरी सदर रक्कम वसूलपात्र आहे.

14) मक्तेदाराने कामाचा व कामगाराचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतु त्याचे पालन केलेले नाही. वित्त विभाग शासन निर्णय क्र.1098/प्रक्र 2289/ शासन हमी दि.19/08/1998 व नगरविकास विभाग क्र.जीईएन-1998/1356 दि.3/11/2003 नुसार अंदाजपत्रकिय रक्कम रु.50550000/-च्या 1% प्रमाणे रु.505500/- विम्याची रक्कम वसुल करण्यात यावी.

15) निविदा अटी व शर्तीनुसार मक्तेदाराच्या बिलामधून सुरक्षा अनामत रक्कम म्हणून 2% प्रमाणे कपात करणे आवश्यक आहे. त्याचे पालन केलेले नसल्याने रु.79289/- वसुल करण्यात यावेत.

16) फेज- 1 मधील 341 शौचालयाच्या कामाचे बिल प्रदान केले आहे. लाभार्थीचा हिस्सा 10% प्रमाणे रु.2626/- वसुल करुन महानगरपालिका निधीत जमा करणे आवश्यक असल्याचा होते. दि.23/10/2008 च्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेमध्ये समावेश आहे. लाभार्थी हिस्साची रक्कम जमा करुन मक्तेदारास बिल न करता लाभार्थ्यांनी परस्पर मक्तेदारास प्रदान असलेने रुपये 895466/- या रकमेवर आयकर वसुली झालेली नाही. तरी आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 सी नुसार 2% प्रमाणे रु.17910/- आयकर वसुल करणेत यावा.

17) सर्वसाधारण सभा ठराव क्र.222 दि.27/09/2010 नुसार योजनेत प्रति शौचालय रु.10000/- पेक्षा जास्त होणारी रक्कम रु.1472/- व रु.1000/- लाभार्थी हिस्सा अशी एकूण रु.2472/- प्रति लाभार्थीकडून भागविणेची हमी घेत असले बाबतचा ठराव महानगरपालिकाने मंजुर करुन मा.उपसचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांना दि.01/07/2010 रोजी पाठविलेचे नस्ती मध्ये नमुद आहे. परंतु सेप्टिक टँक व सोकपीट बांधावयाची सर्वसाधारण वित्तीय आकृतीबंधापेक्षा जादा होणारी रक्कम ड्रेनेज लाईन अस्तित्वात असलेल्या 4756 शौचालयांचा प्रति शौचालय रुपये 64 प्रमाणे जादा खर्च रुपये 304384/- व सोकपीट व सेप्टीक टँक सह एकूण 9710 शौचालय बांधणेचा प्रति शौचालय रुपये 1472/- जादा खर्च प्रमाणे रुपये 14293120/- इतका जादा खर्च अशी एकूण रुपये 14597504/- वित्तीय आकृतीबंधापेक्षा जादा होणारी रक्कम महानगरपालिकेचे निधीतून खर्च करणेचा ठराव करुन शासनाकडे पाठविला आहे. पुन्हा स्थायी समिती ठराव क्र.1041 दि.02/01/2012 ने शौचालय बांधकामासाठी प्रति युनिट रु.11626/-व प्रिकॉस्टसाठी (तयार संडाससाठी) प्रती युनिट रु.11501/- दर स्विकृत करुन लाभार्थींचा हिस्सा (रु.1000) आणि 10000/- पेक्षा जास्त होणारी रक्कम (रु.1626 व रु.1501) ठेकेदाराने लाभार्थीकडून वसुल करुन घेण्याचे अटीवर अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये आयुक्त यांचे टिपणीने मान्यता दिली आहे. सदर बाब धोरणात्मक असलेने पुन्हा सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन ठराव शासनाकडे पाठविणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न स्थायी समितीने नियमबाह्यपणे निविदा मंजुर

केली आहे.

18) निविदेपेक्षा जादाची रक्कम लाभार्थीकडून महानगरपालिकेने घेऊन ठेकेदारास देणे आवश्यक असता, लाभार्थ्याकडून उर्वरित रक्कम ठेकेदाराने परस्पर वसुल केली आहे. हे नियमबाह्य आहे.

19) ठेकेदाराने शौचालय बांधकाम केलेनंतर प्रती लाभार्थी रु.9000/- प्रमाणे रक्कम ठेकेदारास अदा केली आहे. परंतु शौचालय सेप्टिक टँक सहित बांधलेचे तसेच ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन आहे त्यास जोडले बाबत तांत्रिक तपासणी केलेचा दाखला संबंधित अधिका-यांनी दिलेला नाही. तसेच रितसर ड्रेनेज कनेक्शन चार्जेस आकारणीची पावती सोबत न जोडता देयके नियमबाहयरित्या अदा केली आहेत.

20) देयकासोबत शौचालयाचे फोटो आहेत. परंतु सेप्टिक टँक वा ड्रेनेजलाईन कनेक्शन जोडलेचे फोटो जोडण्यात आलेले नाहीत.

21) लाभार्थी अर्जामधील अटी/नियम 5 नुसार शौचालय बांधकामाची मंजुरी विभागीय कार्यालयाकडून घेतले नंतरच बांधकाम करणे आवश्यक आहे. परंतु बांधकाम परवानगी न घेताच ठेकेदाराने बांधकाम केलेले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.182 दि.17/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.3964466/-

वसुलपात्र रक्कम रु.925873/-

DATDDZM6901 (Ref No : 142, Hmm No : 182)

## *114 घर तेथे वैयक्तिक शौचालय बांधणे कामासाठी प्राप्त निधी व खर्चामधील तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधार केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 15717524.00/-

***केंद्र शासन पुरस्कृत वैयक्तिक शौचालय बांधणे कामासाठी प्राप्त निधी व खर्चाच्या तपशीलाची छाननी केली असता प्राप्त निधी व खर्च तसेच अर्थसंकल्पामधील आकडेवारीमध्ये तफावत दिसून येते.***

केंद्र शासन पुरस्कृत वैयक्तिक शौचालय बांधणे कामासाठी प्राप्त निधी व खर्चाच्या तपशीलाची छाननी केली असता प्राप्त निधी व खर्च तसेच अर्थसंकल्पामधील आकडेवारीमध्ये तफावत दिसून येते.

जमा व खर्च विवरणपत्र 2011-12 या वित्तीय वर्षाच्या जमा झालेले शासन अनुदान रुपये 38606000/-

तर खर्च रुपये 38606000/- दाखविला आहे.

1) खर्चाचे प्रत्यक्ष नोंदवहीनुसार वैयक्तिक लाभार्थीने स्वतः बांधलेल्या शौचालयासाठी रु.13015600/-चे धनादेश वाटप झालेले आहे. व मक्तेदारामार्फत बांधलेले शौचालयाबाबत रु.7020000/- रक्कमेचे प्रदान झालेले आहे. तसेच लाभार्थी निवड करणेसाठी अशासकिय सेवाभावी संस्था (NGO) यांना सर्वेक्षणासाठी रु.3619387/- अदा केलेली आहे. असा एकूण खर्च रु.23654987/- दिसून येतो व कामामध्ये प्रगती नसल्याने रु.25393813/- अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सोलापूर यांना धनादेश क्र.945227 दिनांक 3/3/2012 रोजी परत केले आहे. ह्या सर्व बाबीनुसार एकूण खर्च रुपये 49048800/- दिसतो.परंतु नोंदवहीनुसार प्राप्त निधी रु. 38606000/- असल्याने प्राप्त निधी पेक्षा रु.10442800/- जादा खर्च झाला आहे. या तफावतीबाबत अर्धसमास क्रमांक 183 दिनांक 20/1/2014 अन्वये मागणी करूनही साधार खुलासा प्राप्त झालेला नसल्याने सदर खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) 2013-14 वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये 2011-12 वर्षाच्या नक्की आकड्यामध्ये अनुदानामधून केलेली कामे (भांडवली) जमा व भांडवली खर्चाच्या रक्कमेत तफावत आहे. लेखा विभागाने दिलेल्या माहिती नुसार जमा शासन अनुदान रु.38606000/-असून अर्थसंकल्पामध्ये 2011-12 वर्षाच्या नक्की आकड्यामध्ये प्रत्यक्ष जमा आकडा रु.38581000/- असा घेतला आहे. तफावत रु.25000/- प्रकरणी खुलासा प्राप्त झालेला नाही.

3) 2013-14 वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये 2011-12 वर्षाच्या खर्चाच्या बाजुस नक्की आकडा रु.18436911 असा असून शासन अनुदान परत रु.25393813/- नुसार एकूण रु.43830724/- खर्च झाला आहे. परंतु जमा बाजुस रु.38581000/-दर्शविले आहेत.त्यामुळे अर्थसंकल्पामध्ये प्रत्यक्ष दर्शविलेल्या जमेपेक्षा रु.5249724/- खर्च जादा घेतल्याने अर्थसंकल्प परिपूर्ण केलेला नसल्याचे स्पष्ट होते.

वर निर्देशिलेल्या तीनही तफावतींची रक्कम रु. 10442800/-+रु.25000/- + रु.5249724/- एकुण रु.15717524/-आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.183 दि.20/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATDDZM6901 (Ref No : 143, Hmm No : 183)

## *115 घर तेथे शौचालय अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधणे (फेज-4) मधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधार केंद्र/राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5542814.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 542293.00/-

***केंद्र शासन पुरस्कृत घर तेथे शौचालय योजना फेज-4 मधील कामे नियमबाह्य पध्दतीने झाल्याचे निदर्शनास येते.***

प्रशासकिय मान्यताः- पाणी पूरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र.कखयो- 2011/ प्रकरण क्र. 74/पापु-21, दिनांक 4/5/2014 ने रुपये 20000000/-

अंदाजपत्रकिय मान्यताः- रु.24900000/- स्थापत्य समिती ठराव क्र.41, दि.24/08/2011

निविदा मान्यः- रु.20220000/- स्थायी समिती ठराव क्र.1041, दि.02/01/2012

कामाचे आदेशः- क्र.824, दि.03/01/2012 मुदत 3 महिने.

कामाचा कालावधीः- दि.03/01/2012 ते 31/03/2012 (अपुर्ण)

कामावरील खर्चः- रु.5542814/-

मक्तेदारः- भारत कंट्रक्शन ऍंड फेब्रिकेशन

केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकाकरीता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम राबविणे बाबत शासन परिपत्रक क्र.करवयो-2008/प्रक्र.133/वै.शि.पाणी पुरवठा-21 दि.23/10/2008 च्या मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दती नुसार शौचालय बांधले आहेत. सदर शौचालयाचे बांधकामाच्या निविदा नस्ती व झालेल्या खर्चाची देयके तपासली असता खालील उणीवा निदर्शनास आल्या याबाबत अर्धसमास क्रमांक 184 दि.20/01/2014 अन्वये खुलासा मागविला असुन लेखापरीक्षण कालावधीपर्यंत खुलासा प्राप्त झाला नसल्याने खालील अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

1) फेज-4 मध्ये अशासकिय संस्थेने 2000 आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थींची निवड केलेली आहे. परंतु त्यांच्या पात्रतेसंबंधीची कागदपत्रे मागणी करुनही लेखापरीक्षाणास उपलब्ध केलेली नाहीत.

2) लाभार्थी पात्र असलेबाबत नागरी समुदाय विकास प्रकल्प सोलापूर महानगरपालिका यांचेकडील तसेच विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्रमाणित केल्याचे अभिलेख नस्तीत समाविष्ट नाहीत.

3) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई -32 यांचे परिपत्रक क्र.करवयो-2008/प्रक्र 133/वैशि/पापु-21 दि.23/10/2008 मधील तरतुदीनुसार लाभार्थींची 10 % हिस्स्याची रक्कम जमा करणेबाबत सुचना आहेत.तथापी त्याचे पालन झालेले नाही.439 लाभार्थींना वैयक्तिक शौचालये ठेकेदाराने बांधुन दिलेली आहेत.रु.1000/-प्रमाणे लाभार्थी हिस्सा वसुल केला नसल्याने रु.439000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

4) सुरक्षा अनामत रक्कम रु.406000/- ही दी सोलापूर सोशल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांच्याकडील बँक गॅरंटी स्वरुपात घेतलेली आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम क्र.169(5) नुसार रोख अथवा धनाकर्ष स्वरुपात घेऊन ती ठेवीकडे वर्ग करणे आवश्यक आहे.परंतु त्याचे पालन झालेले नाही.

5) फेज-4 मधील कंत्राटदारामार्फत किती शौचालय मार्च-2012 अखेर पूर्ण केली तसेच वैयक्तिक लाभार्थींनी किती शौचालये बांधली व त्यांना प्रदान करण्यात आलेल्या रक्कमांचा तपशिल उपलब्ध झाला नाही.

6) 11/12 या आर्थिक वर्षामध्ये 1360 लाभार्थ्यांना रु.9000/-प्रमाणे रु.12240000/-व 271 लाभार्थ्यांना रु.2500/-

प्रमाणे रु.677500/-तसेच 15 लाभार्थ्यांना रु.6500/-प्रमाणे रु.97500/- असे एकुण रु.13015600/- वैयक्तिक शौचालय बांधणेसाठी लाभार्थ्यांना रक्कमा अदा केलेल्या आहेत. शासनाच्या मार्गदर्शक सुचनामध्ये व तपशीलवार प्रकल्प अहवालामध्ये लाभार्थ्याने वैयक्तिक शौचालय बांधावे असा उल्लेख नाही. शासन निर्णय 23 ऑक्टों. 2008 अट क्र.7 नुसार बांधकाम व देखभाल दुरुस्तीचे कामाकरिता त्यांचे स्तरावर संस्थांची निवड करणे आवश्यक असता लाभार्थ्याला नियमबाह्यरित्या शौचालय बांधणीसाठी अनुदान दिले आहे.

7) काम पुर्ण झालेनंतर आवेक्षक (कनिष्ठ अभियंता) यांनी तांत्रिक तपासणी करुन अंदाजपत्रकानुसार काम योग्य असल्याचा दाखला व त्याची मोजमापे नोंदविणे आवश्यक आहे. परंतु मक्तेदाराच्या बिलासोबतची कागदपत्रे मागणी करुनही उपलब्ध झालेली नाहीत. मुंबई स्थानिक अधिनियम-1930 मधील कलम 4(3) नुसार अभिलेख उपलब्ध करुन देणे ही स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे.

8) मक्तेदाराचे बील प्रदान करण्यापुर्वी विभागीय अधिकारी व सहायक अभियंता यांनी कामाची 20% तांत्रिक तपासणी करण्याचे आदेश आहेत. परंतु त्याचे पालन केलेले नाही. बिल अदा करणेपुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून त्रयस्थ संस्था म्हणून ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. सदर ना हरकत प्रमाणपत्र न घेता एकूण 439 शौचालय बांधली असून स्थायी समिती ठराव क्र.1041 दि.02/01/2012 नुसार दर निश्चित केलेले आहेत. त्यानुसार रु.5542814/- या रक्कमेचे प्रदान केलेले आहे. सदर प्रदान नियमबाह्य दिसून येते.

9) कंत्राटदारास नोंदणीकृत असल्याचे मुल्यवर्धित कराचे प्रमाणपत्र नाही. मक्तेदारास रु.5542814/- रक्कमेचे प्रदान केलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांच्या दि. 3 मार्च 2006 च्या शासन निर्णयानुसार नोंदणीकृत ठेकेदाराकडून 2% व अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 4% मुल्यवर्धित कर देयकामधून वसुल करणेचे आदेश आहेत. त्यानुसार 4 % प्रमाणे रु.47160/- वसुल केलेले आहेत. उर्वरित रक्कम रु.174533/- वसुल करण्यात यावी.

10) उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.बीसीए 2009/ प्र.क्र.108/कामगार-6 दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकाराची 1 % रक्कम कपात करणे बंधनकारक आहे पुर्वगणक पत्रकामध्ये 1% कामगार कल्याण उपकर व विम्याची तरतुद केली आहे, परंतु ठेकेदाराच्या देयकातून उपकर वसुल केला नसून शासनाचे रु.55428/- चे नुकसान झाले आहे. त्याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.तरी उपकरापोटी रु.55428/- वसुली करुन शासन खाती भरणा करावी.

11) मक्तेदाराने कामाचा व कामगाराचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतु त्याचे पालन केलेले नाही. वित्त विभाग शासन निर्णय क्र.1098/प्रक्र 2289/ शासन हमी दि.19/08/1998 व नगरविकास विभाग क्र.जीईएन-1998/1356 दि.3/11/2003 व विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार अंदाजपत्रकीय रु.20220000/- या रक्कमेच्या 1% विम्याची रक्कम रु.202200/- वसुल करण्यात यावी.

12) निविदा अटी व शर्तीनुसार मक्तेदाराच्या बिलामधून सुरक्षा अनामत रक्कम म्हणून 2% प्रमाणे कपात करणे आवश्यक आहे. त्यापैकी रु.23580/- वसुल केली असून उर्वरित रक्कम रु.87276/- वसुल केलेली

नसल्याने वसुल करण्यात यावी.

13) फेज-4 मधील 439 शौचालये कामाचे बिल प्रदान केले आहे. दि.23/10/2008 च्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थी हिस्सा 10% प्रमाणे रु.2626/- वसुल करुन महानगरपालिका निधीत जमा करणे आवश्यक होते.तसा दि.23/10/2008 च्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेमध्ये समावेश आहे. लाभार्थी हिस्साची लाभार्थ्यांनी परस्पर रक्कम मक्तेदारास अदा केले असलेने सदर रक्कम रु.1152814/- या रकमेवर आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 सी नुसार 2% प्रमाणे रु.23056/- आयकर वसुल करता आला नाही.त्यामुळे शासनाचे रु.23056/-इतक्या आयकर रक्कमेचे नुकसान झालेले आहे तरी सदर रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

14) सर्वसाधारण सभा ठराव क्र.222 दि.27/09/2010 नुसार योजनेत प्रति शौचालय रु.10000/- पेक्षा जास्त होणारी रक्कम रु.1472/- व रु.1000/- लाभार्थी हिस्सा अशी एकूण रु.2472/- प्रति लाभार्थीकडून भागविणेची हमी घेत असले बाबतचा ठराव महानगरपालिकाने मंजुर करुन मा.उपसचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांना दि.01/07/2010 रोजी पाठविलेचे नस्ती मध्ये नमुद आहे. परंतु सेप्टिक टँक व सोकपीट बांधावयाची सर्वसाधारण वित्तीय आकृतीबंधापेक्षा जादा होणारी रक्कम तसेच ड्रेनेज लाईन अस्तित्वात असलेल्या 4756 शौचालयांचा प्रति शौचालय जादा खर्च रु.64 प्रमाणे रु.304384/- व सोकपीट व सेप्टीक टँक सह एकूण 9710 शौचालय बांधणेचा प्रति शौचालय जादा खर्च रु.1472/- प्रमाणे रु.14293120/- इतका खर्च अशी एकूण रु.14597504/-वित्तीय आकृतीबंधापेक्षा जादा होणारी रक्कम महानगरपालिकाचे निधीतून खर्च करणेचा ठराव करुन शासनाकडे पाठविला आहे. पुन्हा स्थायी समिती ठराव क्र.1041 दि.02/01/2012 ने शौचालय बांधकामासाठी प्रति युनिट रु.11626/-व प्रिकॉस्टसाठी (तयार संडाससाठी) प्रती युनिट रु.11501/- दर स्विकृत करुन लाभार्थींचा हिस्सा(रु.1000) आणि 10000/- पेक्षा जास्त होणारी रक्कम (रु.1626 व रु.1501) ठेकेदाराने लाभार्थीकडून वसुल करुन घेण्याचे अटीवर अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये आयुक्त यांचे टिपणीने मान्यता दिली आहे. सदर बाब धोरणात्मक असलेने पुन्हा सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन ठराव शासनाकडे पाठविणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता स्थायी समितीने नियमबाह्यपणे निविदा मंजुर केली आहे.

15) निविदेपेक्षा जादाची रक्कम लाभार्थीकडून महानगरपालिकेने घेऊन ठेकेदारास देणे आवश्यक असता, लाभार्थ्याकडून उर्वरित रक्कम ठेकेदाराने परस्पर वसुल करणे नियमबाह्य आहे.

16) ठेकेदाराने शौचालय बांधकाम केलेनंतर प्रति शौचालय रु.9000/- लाभार्थी प्रमाणे रक्कम ठेकेदारास रक्कम अदा केली आहे. परंतु शौचालय सेप्टिक टँक सहित तसेच ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन आहे त्यास जोडलेबाबत तांत्रिक तपासणी केलेचा दाखला संबंधित अधिका-यांनी दिलेला नाही. तसेच रितसर ड्रेनेज कनेक्शन चार्जेस आकारणीची पावती सोबत न जोडता देयके नियमबाह्यरित्या अदा केली आहेत.

17) देयकासोबत शौचालयाचे फोटो आहेत. परंतु सेप्टिक टँक वा ड्रेनेजलाईन कनेक्शन जोडलेचे फोटो जोडणेत आलेले नाहीत.

18) लाभार्थी अर्जाचे अटी/नियम 5 नुसार शौचालय बांधकामाची मंजुरी विभागीय कार्यालयाकडून घेतलेनंतरच

बांधकाम करणे आवश्यक आहे. परंतु बांधकाम परवानगी न घेताच ठेकेदाराने बांधकाम केलेचे दिसून येते.

19) धनादेश क्रमांक.945225,दि.03/03/2012,रु.468000/धनादेश क्रमांक.945660, दि.26/03/2012, रु.549000/- तसेच धनादेशक्र.945574,दि.26/03/2012,रु.540000/-अशी एकूण रक्कम रु.1557000/- ची बीले तसेच सर्व कामाची मोजमाप पुस्तके मागणी करुनही उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे रक्कम रु.1557000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

20) प्रमाणक क्र.20019 ते 2062, रु.792000/- तसेच प्रमाणक क्र.10774 दि.06/03/2012 ने रु.630000/- अशी रक्कम ठेकेदारास प्रदान केली आहे परंतु एकूण 158 शौचालयाच्या बांधकामाचे फोटो नस्तीत उपलब्ध नसल्याने निविदेतील वर्णनानुसार व अटीनुसार बांधकाम पुर्ण झाल्याची खातरजमा करता आली नाही. त्यामुळे रक्कम रु.1422000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

आक्षेपाधिन रक्कम रु.5542814/-

वसुलपात्र रक्कम रु.542293/-

DATDDZM6901 (Ref No : 144, Hmm No : 184)

## *116 कमी खर्चाचे शौचालय प्रकरणी निवड केलेले लाभार्थी व वैयक्तिक बांधलेल्या शौचालयाच्या कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधार केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 16636247.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 54000.00/-

***पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचा शासन निर्णय क्र.करवयो-2008/प्रक्र.133/वै.शि./पापू-21, दि.23/10/2008, मधील अक्र 7 नुसार बांधकाम व देखभाल दुरुस्तीचे कामाकरिता महानगरपालिका स्तरावर संस्थाची निवड करुन त्यांचेमार्फत शौचालय बांधुन घेणे आवश्यक असताना वैयक्तिक लाभार्थींना शौचालयाच्या बांधणीसाठी मार्च-2012 अखेर रु.13015600/- चे नियमबाह्य रकमा प्रदान केल्या आहेत.***

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 16922 ते 23 | 27/12/2011 | 600000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 16924 ते 25 | 27/12/2011 | 328500/- |
| 3 | 16926 ते 27 | 27/12/2011 | 393600/- |
| 4 | 17133 ते 34 | 30/12/2011 | 600000/- |
| 5 | 17135 ते 36 | 30/12/2011 | 218750/- |
| 6 | 17137 ते 38 | 30/12/2011 | 600000/- |
| 8 | 17139 ते 40 | 30/12/2011 | 464400/- |

घर तेथे शौचालय कमी खर्चात बांधणे या योजनेसाठी पात्र लाभार्थींची निवड करणे बाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शा.नि.क्र.करवयो-2008/प्रक्र.123/पापू-21, दि.04/11/2008 नुसार अशासकिय सेवाभावी संस्था ( NGO) निवड करुन शा. नि.क्र.करवयो-2008/प्रक्र.133/वै.शि./पापू-21,दि.23/10/2008 मधील निकषानुसार लाभार्थी निवड करणेचे काम देण्यात आले आहे. सदर लाभार्थी निवड प्रकरणी निदर्शनास आलेल्या उणीवा खालील प्रमाणे.

1. अशासकिय सेवाभावी संस्थेने (NGO) लाभार्थींची निवड केल्यानंतर महानगरपालिका कार्यालयातील प्रकल्प संचालक नागरी समुदाय प्रकल्प विभागामार्फत दि.23/10/2008 च्या शासन निर्णया मधील निकषानुसार स्वतःच्या मालकीची घरे आहेत. उत्पन्न दाखला प्रतिमहा रु.3300/- पेक्षा जास्त नाही व लाभार्थींचा हिस्सा 10% म्हणजे रु.1000/- वसुल करुन महानगरपालिका निधी जमा केली असल्याची कागदपत्रे विचारात घेऊन शॉर्ट लिस्ट तयार करणे व तदनंतर अशासकिय संस्थेने विहित नमुन्यातील अर्ज भरुन घेऊन ते प्रत्यक्ष जागेवर तपासणी करुन तपासणीपत्रक बनविणे अशी कार्यपध्दती विहीत आहे परंतु लाभार्थी निवडीसाठी सदर कार्यपद्धतीचा अवलंब केला नाही.

2. स्वतःच्या मालकीचे घर झोपडपट्टीत येत नसल्याचे बाबत जागेचा पुरावा म्हणून कागदपत्रे जोडलेली नाहीत तरीही अशासकिय सेवाभावी संस्था (NGO) यांनी लाभार्थींची निवड करण्यासाठी सर्व्हे करताना यांच्या नावाचा समावेश केला आहे. योजनेच्या विहित नमुन्यातील अट क्र.11 नुसार आय.एच.एस.डी.पी/ झोपडपट्टी/रस्ता रुंदीने बांधीत/ कोर्ट केसेस असणा-या घरासाठी/ जागेसाठी योजना लागू राहणार नाही. त्यामुळे झोपडपट्टीमधील लाभार्थी या योजनेस पात्र ठरत नाही. तपासणीसाठी उपलब्ध अभिलेख पहाता खालील लाभार्थी हे झोपडपट्टी मधील रहिवासी असूनही त्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे, हे नियमबाह्य आहे.

वॉर्ड - 73 भारतरत्न इंदिरानगर 59 लाभार्थी x रु.9000/ = 531000/-
वॉर्ड - 58 लालनगर झोपडपट्टी 20 लाभार्थी x रु.9000/ = 180000/-
वॉर्ड - 71 शास्त्रीनगर झोपडपट्टी 57 लाभार्थी x रु.9000/ = 513000/-
वॉर्ड - 37 क्रांती झोपडपट्टी 22 लाभर्थी x रु.9000/ = 198000/-
वॉर्ड - 38 कुपनगर झोपडपट्टी 8 लाभार्थी x रु.9000/ = 72000/-
वॉर्ड - 56 गलिच्छ वस्ती सुधारणा 28 लाभार्थी x रु.9000/ = 252000/-

भाग 1-झोपडपट्टी

3. या योजनेकरिता तपशीलवार प्रकल्प अहवाल बनविताना व लाभार्थी निवड करताना जागेचा पुरावा व उत्पन्नाचे दाखले जोडणे या वस्तूस्थितीचा विचार केलेला नाही. सदर अहवाल योग्य असल्याची तपासणी करण्यासाठी योग्य यंत्रणा असल्याचे दिसून आले नाही.लाभार्थ्याकडुन विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन घेवुन त्या सोबत उत्पन्नाचा दाखला, जागेचा पुरावा, हमीपत्र व झोपडपट्टी येत असल्यास नावे वगळण्यात यावी असे दि.07/06/2011 च्या आयुक्त यांच्या नियोजन बैठकीचे आदेश आहेत. याची पूर्तता अशासकिय सेवाभावी संस्थेने (NGO) करणे आवश्यक होते, तसेच विभागाने सर्व कागदपत्रांची पुर्तता केली आहे असे प्रमाणित केलेले नसताना NGO यांना रु.3620647/- प्रदान केलेले आहे.लाभार्थीने वैयक्तिक शौचालय बांधले असून प्रति लाभार्थी रक्कम रु.9000/- प्रमाणे धनादेशाद्वारे प्रदान केलेले आहे. शासनाच्या मार्गदर्शक सुचनामध्ये व तपशीलवार प्रकल्प अहवालामध्ये लाभार्थीने वैयक्तिक शौचालय बांधावे असा उल्लेख नाही. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचा शासन निर्णय क्र.करवयो-2008/प्रक्र.133/वै.शि./पापू-21, दि.23/10/2008, मधील अक्र 7 नुसार बांधकाम व देखभाल दुरुस्तीचे कामाकरिता त्यांचे स्तरावर संस्थाची निवड करणे आवश्यक असताना लाभार्थींना शौचालयाच्या बांधणीसाठी मार्च-2012 अखेर रु.13015600/- चे नियमबाह्य रक्कमा प्रदान केल्या आहेत. याबाबत केंद्र शासनाकडून सुधारीत तपशीलवार प्रकल्प अहवालास मान्यता घेतलेली नाही.वैयक्तिक लाभार्थी यांनी स्वतः बांधलेल्या शौचालयाचे विहित नमुन्यातील अर्ज, कागदपत्रे, फोटो यांची छाननी केली असता त्यामध्ये बांधकाम मंजुरी, उत्पन्नाचा दाखला, जागेचा पुरावा, हमीपत्र ही कागदपत्रे नसतांनी 173 लाभार्थ्यांना अनुदान वाटप केलेले आहे. सोबत परिशिष्ट क्र. 26 जोडले आहे. वॉर्ड क्र.32 मधील डीपीआर क्र.274 मल्लिकार्जुन परमण्णा ठणकेदार व डीपीआर क्र.279 सिद्धम्मा मल्लिकार्जुन ठणकेदार हे पती पत्नी असून त्यांनी एकच जागेचा पुरावा (इंडेक्स-II) दोन्ही प्रकरणांना जोडला आहे. तसेच रेशनिंग कार्ड क्र.37222 हे एकच असून त्यामध्ये एकत्रित नावे असून दोन्ही अर्जास तोच पुरावा जोडलेला आहेत. असे असताना धनादेश क्र.945067 व धनादेश क्र.945068, दि. 13/03/2012 नुसार प्रत्येकी रु.9000/- रक्कम प्रदान केली आहे. सदर रक्कम रुपये18000 वसूलपात्र करण्यात येत आहे.

4. वॉर्ड क्र.31 मधील डीपीआर क्र.459 नुसार कलावती शंकर नंदर्गी असे नाव असताना नंदर्गी शांताबाई रघुनाथ यांना अनुदान रु.9000/- रक्कम प्रदान केली. वाटप केलेले आहे. डीपीआर क्र.507 विश्वनाथ हनुमंत काटवे यांचे ऐवजी अंबुबाई शाम काटवे यांना रक्कम प्रदान केलेली आहे. डीपीआर क्र.676 मध्ये रेणूका हनुमंता जटला हे लाभार्थी असून अनुदान कल्पना अंबादास आरकेला यांना अदा केले आहे.

5. वॉर्ड क्र.97/98 मधील डीपीआर क्र.2378 खडाखडे महादेव रेवण्णा हे व्यवसायाने नोकरी करीत असून वार्षिक उत्पन्न रु.130000/- असे दाखविले आहे. अर्जासोबत उत्पन्नाचा सक्षम प्राधिका-याचा दाखला जोडलेला नाही. असे असताना त्याची लाभार्थी म्हणुन निवड केली असुन त्यांना अनुदान रक्कम प्रदान केली आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.

6. वैयक्तिक लाभार्थीने बांधलेल्या शौचालयाचे विहित नमुन्यातील अर्ज, कागदपत्रे फोटो, हमी इत्यादी कागदपत्रांचे अभिलेख उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास क्र.193 दि.29/01/2014 अन्वये सूचना देऊनही

खालील विभागाने अभिलेख उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

वॉर्ड क्र.68- 50 लाभार्थी, वॉर्ड क्र.14-436 लाभार्थी,

वॉर्ड क्र.12-141 लाभार्थी, वॉर्ड क्र.33-53 लाभार्थी,

वॉर्ड क्र.32- 60 लाभार्थी, वॉर्ड क्र.88-22 लाभार्थी,

वॉर्ड क्र.96-51 लाभार्थी, वॉर्ड क्र.85-14 लाभार्थी,

वॉर्ड क्र.77- 67 लाभार्थी, वॉर्ड क्र.49- 14 लाभार्थी,

वॉर्ड क्र.88-22 लाभार्थी, वॉर्ड क्र.78-48 लाभार्थी.

योजनेतील अटी व शर्तीनुसार लाभार्थीने पुढील टप्प्याप्रमाणे फोटो सादर केल्यानंतरच अनुदान वितरित करण्यात येईल.

टप्पा 1- जोता लेव्हल पर्यंत बांधकाम रु.3000/-

टप्पा 2- स्लॅब लेव्हल पर्यंत बांधकाम रु.4000/-

टप्पा 3- फिनिशिंग लेव्हलपर्यंत रु.3000/-

7. कनिष्ठ अभियंता, विभागीय अधिकारी व सहाय्यक अभियंता यांनी तांत्रिक तपासणी केल्यानंतरच अनुदान वितरित करणे योग्य होते. त्यांचे पालन न करता रु.9000/-प्रमाणे 1360 लाभार्थ्यांना रु.12240000/- व रु.2500/- प्रमाणे 271 लाभार्थ्यांना रु.677500/-तसेच रु.6500/-प्रमाणे 15 लाभार्थ्यांना रु.97500/-असे एकुण रु.13015600/-प्रदान केले आहेत. त्यामुळे शौचालयाचे काम नव्याने व योग्य प्रकारे झाल्याची किंवा जुनेच बांधकाम दाखवून फोटो जोडले नसल्याची खातरजमा न करताच प्रदान केले असल्याने सदर रक्कम रु.13015600/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.193 दि.29/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATDDZM6901 (Ref No : 151, Hmm No : 193)

## *117 स्टेशनरी खरेदी निविदा प्रक्रिया न राबविता तूकडे पाडून केल्याने झालेली अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : संगणक महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 447968.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र.भाखसं-1093/2635/उद्योग-6, दि.16/07/1993नुसार वार्षिक खरेदी ही रु.50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवून करणे***

***आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र.भाखसं-1088/2512/उद्योग-6, दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तू खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दर करार करणे आवश्यक असताना रु.3000/- या रकमेच्या आतील संगणक साहित्य व स्टेशनरी खुल्या बाजारभावाने खरेदी केलेली आहे. त्यामुळे सदर खरेदी नियमबाह्य ठरते.***

2011-12 या वित्तीय वर्षात संगणक विभागामार्फत खरेदी केलेल्या साहित्य स्टेशनरी ची बीले व नोंदवही तपासली असता रु.3000/- या रक्कमेच्या आत असे खरेदीचे तुकडे पाडून रु.93118/-इतक्या रक्कमेचे साहित्य खरेदी केल्याचे निदर्शनास आले. रोकडवही नुसार निवडक 34 प्रकरणाचे परिशिष्ट क्र. 25 सोबत जोडले आहे.

1) उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र.भाखसं-1093/2635/उद्योग-6, दि.16/07/1993नुसार वार्षिक खरेदी ही रु.50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवून करणे आवश्यक आहे त्याचे पालन केलेले नाही.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई-32 शासन निर्णय क्र.भाखसं-1088/2512/उद्योग-6,दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तू खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दर करार करणे आवश्यक असताना रु.3000/- च्या आत असे तुकडे पाडुन संगणक साहित्य व स्टेशनरी खरेदी खुल्या बाजारभावाने केलेली आहे. त्यामुळे सदर खरेदी त्यामुळे नियमबाह्य ठरते.

3) सारंग इंटरप्रायजेस प्रिंटेड स्टेशनरी प्रमाणक क्र.16895, दि.20/12/2011, रु.354850/- सदर प्रकरणी मूळ प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.189 दि.23/01/2014 अन्वये सुचित करुनही उपलब्ध झालेली नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 मधील कलम 4(3) नुसार अभिलेख उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. सदर अभिलेख उपलब्ध झाले नसल्याने रु.354850/- इतक्या रक्कमेचे लेखापरीक्षण करता आलेले नाही. त्यामुळे सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.447768/-

अर्धसमास ज्ञापन क्र.189 दि.23/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATDDZM6901 (Ref No : 147, Hmm No : 189)

## *118 जनन व मृत्युच्या नोंदीच्या कामामध्ये विलंब होवुनही दंडात्मक कार्यवाही केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : जन्म-मृत्यु महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम  : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 130756.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 62500.00/-

***मक्तेदारास नेमुन दिलेले काम विहित मुदतीत पुर्ण न केल्याने निविद अटी- शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करुन दंड वसुली करण्यात आलेली नाही.***

प्रमाणक क्रमांक 3836,  दि.27/06/2011, रु.130756/-

संगणक विभागामधील 2011-12 चे लेखापरिक्षण करताना निविदा नस्त्या व प्रमाणक क्रमांक 3836 दि.26/06/2011 ची तपासणी केली असता. अभिलेखापाल कार्यालयाकडील जनन व मृत्युच्या नोंदी ह्या 2001 पासून प्रलंबित असल्याने त्या पूर्ण करुन नागरिकांना दाखले वेळीच मिळण्याच्या दृष्टीने स्थायी समिती ठराव क्र.462, दि.17/01/2006 च्या ठरावाने काम तात्काळ होणेसाठी निविदा प्रक्रिया न राबविता मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील कलम 5(2) 2 नुसार शिथिलता दिलेली आहे.

सदर कामाचे आदेश क्र.सआस/साप्र-1/35, दि.11/07/2006 नुसार आठ महिन्यात काम पुर्ण करण्यात यावे असे आदेश जाईजुई विचारमंच या संस्थेस दिलेले आहेत. सदर संस्थेने कार्यादेशामधील  विहीत अटी व शर्तीनुसार दिनांक 10/03/2008 पर्यंत काम पूर्ण करणे आवश्यक होते, तसेच वेळेत काम पुर्ण करण्यासाठी कामाचा बारचार्ट करुन त्याप्रमाणे कामावर देखरेख करण्याची जबाबदारी संगणक विभागाची होती. परंतु विभागाने कामाची मुदत संपल्यानंतर 8 महिने विलंबाने जावक क्र.9/संगणक/289, दि.24/11/2008 ने जाईजुई विचारमंच या संस्थेकडून खुलासा मागविला आहे व त्यानंतर संस्थेने त्यांचे बिपीओ सेंटरचे नुतनीकरण चालू असल्याने काम पूर्ण करणेस मुदतवाढीसाठी विनंती अर्ज केला आहे. त्यास अनुसरुन प्रशासनाने आठ महिने विलंबाने अर्ज प्राप्त होऊनही स्थायी समिती ठराव क्र.1309, दि.20/12/2008 रोजी दि.31/08/2009 पर्यंत विनादंड मुदतवाढ दिलेली आहे.

संस्थेच्या स्वतःच्या अडचणीमुळे काम करणेस विलंब झाला असल्याने दंड आकारणी करणे आवश्यक होते. त्यामुळे दि.10/03/2008 ते दि.20/12/2008 या 250 दिवस विलंबाकरीता  कार्यादेशामधील अटी व शर्ती क्र.9 नुसार रु.250/दिन प्रमाणे रु. 62500/-  दंडाची रक्कम वसुल करणे  अथवा सहाय्यक आयुक्त ( स) महानगरपालिका जो दंड ठरवतील त्याप्रमाणे संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 5(2)2 चा केलेला वापर संयुक्तिक कारणासाठी केला नसल्याचे दिसते.

आक्षेपाधिन रक्कम रु.130756/-

वसुलपात्र रक्कम रु.62500/-

अर्धसमास ज्ञापन क्र.190 दि.23/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATDDZM6901 (Ref No : 148, Hmm No : 190)

## *119 टॅबलेट पी.सी. खरेदीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : संगणक साहित्य खरेदी महानगरपालिका निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 199500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 15250.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई-32, शासन निर्णय क्र.भाखसं-1093/2635/उद्योग-6, दि.16/07/1993 नुसार रु.50000/- पेक्षा जास्त रकमेची खरेदी निविदा प्रक्रिया राबवून करणे आवश्यक आहे. परंतू त्याचे पालन न करता व खरेदीची कोणतीही पुरेशी कारणे नमूद न करता स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 5(2) (2) नुसार निविदा न मागविता टॅबलेट पी.सी. खरेदीस नियमबाह्यपणे मान्यता दिलेली आहे,***

प्रमाणक क्रमांकः 12816, दि.01/12/2011, रु.49875/-

प्रमाणक क्रमांकः 17784, दि.05/01/2012, रु.149625/-

संगणक विभागाची 2011-12 या वित्तीय वर्षामधील टॅबलेट पी.सी. खरेदीची नस्ती तपासली असता टॅबलेट पी.सी.खरेदीबाबत दरपत्रके न मागविता केलेल्या कार्यवाहीमध्ये निदर्शनास आलेल्या उणीवा बाबत अर्धसमास ज्ञापन क्र.188 दि.23/01/2014 अन्वये खुलासा मागविला असता लेखा परिक्षण कालावधीपर्यंत अनुपालन प्राप्त झालेले नाही त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

262) टॅबलेट पी.सी.खरेदी करणे पूर्वी स्थानिक अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागविणेत आलेली नाहीत.परंतु नस्तीमध्ये ई.मेल द्वारे तीन दरपत्रके प्राप्त झालेचे नमुद आहे. ई.मेलच्या प्रतीवर ई.मेल पाठविलेचा दिनांक नमुद नाही. तीन प्राप्त निविदा Apple IPAD या मॉडेलसाठी आल्या असुन सर्वात कमीचे दरपत्रक Zeal Trade यांचे प्रती टॅबलेट रु.51900/- आले आहे. परंतु त्यांना खरेदीचे आदेश न देता नेटकॉम या कंपनीने त्यांना दि.31/05/2011 रोजी विलंबाने दिलेल्या I-PAD-2 या मॉडेल साठीचे दरपत्रकास रु.47500+ व्हॅट मान्यता दिली आहे. दि.30/03/2011 रोजी तीन पुरवठाधारकाने दर दिलेले आहे. परंतू त्यावर कोठेही "E" मेलचा क्रमांक व दिनांक नाही, दरपत्रके कोणत्या दिनांकापर्यंत येणे आवश्यक आहे, याबाबत कोणताही पत्रव्यवहार नाही. दि.31/05/2011 नेटकॉम यांनी टॅबलेट पी.सी.चे

दर दिलेले आहे. एवढ्या विलंबाने दर का स्विकारले याची कारणमिमांसा नसल्याने खरेदीच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकतेचा अभाव दिसून आला.

263) आयपॅड-1 बाबत फक्त एकाच पुरवठा धारकाचे दर प्राप्त आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा महानगरपालिकेस झालेला नाही. दर बाजारभावाशी सुसंगत असल्याबाबत कोणतेही अभिप्राय दिलेले नाहीत.

264) उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई-32, शासन निर्णय क्र.भाखसं-1093/2635/उद्योग-6, दि.16/07/1993 नुसार रु.50000/-पेक्षा जास्त रकमेची खरेदी निविदा प्रक्रिया राबवून करणे आवश्यक होते. परंतू त्याचे पालन न करता मुंबई महानगरपालिका प्रांतिक अधिनियम-1949 मधील प्रकरण 5(2)2 नुसार निविदा न मागविता खरेदीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये तात्काळ खरेदीसाठी पुरेशी समर्पक कारणे नमूद केलेली नसताना स्थायी समितीच्या ठराव क्र.713 दि.23/9/2011 नुसार तात्काळ खरेदीची कोणतेही कारण नमूद न करता रुपये 199500/- चे 4 नग दर रु.49875/- प्रमाणे टॅबलेट पी.सी.ची खरेदीस नियमबाहयपणे मान्यता दिलेली आहे, त्यामुळे रक्कम रु.199500/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

265) नेटकॉम यांना पुरवठा आदेश क्र.780, दि.05/10/2011 अन्वये 30 दिवसात साहित्य पुरविणेचे आदेश दिलेले आहेत. परंतु डिलिव्हरी चलन क्र.222, दि.07/01/2012 रोजी 3 नग दर 49875/- रोजी पुरविले असून जडसंग्रह नोंदवही पान क्र.14 तशी नोंद आहे.कमाल दि.04/11/2011 अखेर पुरवठा होणे आवश्यक असताना दि.07/01/2012 रोजी झाल्याने 61 दिवस विलंब झालेला आहे. पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार प्रतिदिन रु.250/- दंडात्मक कार्यवाही करणेचे आदेश आहेत. तसेच पुरवठाधारका सोबतचे करारनाम्यातही तशी अट क्र.3 आहे. तरी 61 दिवस विलंबासाठी प्रतिदिन रु.250/- प्रमाणे रुपये 15250/- वसुल करण्यात यावी.

धनादेश क्र.472126 व प्रमाणक क्र.17784, दि.05/01/2012 रु.149625/- तसेच प्रमाणक क्र.12816, दि.01/12/2011 रु.49875/- नुसार पुरवठा धारकास रक्कम प्रदान केलेली आहे. सदर रक्कम 199500/- ही नियम बाहय खरेदी म्हणून आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.199500/-

वसुलपात्र रक्कम रु.15250/-

## *120 नगरसेवक,पदाधिकारी यांचे दुरध्वनी व लेटरपॅड छपाईवर करणेत आलेल्या नियमबाह्य खर्चा बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नगरसेवक मानधन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2048268.00/-

***महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दि.24 जानेवारी2005 व शासन निर्णय दि. 22/01/2010 नुसार नगरसेवकांना मानधन म्हणून दर महा रुपये 7500/- ( दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल) या बाबीवरील खर्चा देणेत येतात. असे असताना या बाबींवर महानगरपालिका निधीतुन स्वतंत्रपणे रु. 2048268/- इतका खर्च करणेत आला आहे.***

नगरसचिव विभागाकडे अर्धसमास ज्ञापन क्र.125 दि.20/11/2013 ने मागील तीन वर्षात नगरसेवक, पदाधिकारी यांचे दुरध्वनी व लेटरपॅड छपाईवर करणेत आलेल्या खर्चाची माहीती मागविणेत आली होती. नगरसचिव विभागाने जा.क्र.नस/18अ/631 दि.22/11/2013 ने खालील प्रमाणे माहिती दिली आहे.

| सन | स्टेशनरी खर्च | दुरध्वनी खर्च |
|---|---|---|
| 2009/10 | 472668 | 194884 |
| 2010/11 | 506398 | 242284 |
| 2011/12 | 479123 | 152861 |

खालील आक्षेप घेणेत येत आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/ नवि-20 दि.24 जानेवारी 2005 नुसार नगरसेवकांना दरमहा मानधनासोबत रुपये 4000/- ( दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल ) या बाबीवरील खर्चाकरीता देणेत येतात. तसेच शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र.148/नवि-26 दि.22 जानेवारी 2010 ने नगरसेवकांना दरमहा रुपये 7500/- मानधन अदा केले आहे. नगरसेवकांना दरमहा मानधनासोबत दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्चाकरीता प्रदान केले असल्याने त्या बाबींवर मागील तीन वर्षात बिल रजिस्टर प्रमाणे केलेला एकुण खर्च रु.2048268/- संबंधिताकडून वसुल करणेत यावा.

अर्धसमास ज्ञापन क्र.192 दि.24/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 150, Hmm No : 192)

# कलम ९ क खालील आक्षेप

## ***121 गलिच्छ वस्ती सूधारणा विभागाने वसुलीच्या रक्कमा कमी जमा केल्याने झालेल्या अपहाराबाबत व इतर अनियमितताबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधारणा महानगरपालिका निधी निधी*

*अनियमितता कलम : 9क*

वसूलपात्र रक्कम रु. 258962.00/-

***नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 41 अन्वये कार्यालयात जमा झालेले सर्वच्या सर्व पैसे जमा झाल्याच्या दिवसाच्या पुढच्या दिवसाच्या आत बँकेत भरणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी गलिच्छ वस्ती सूधारणा विभागाने दि.05/4/2011, दि.12/01/2012 व 22/03/2012 रोजी वसुल केलेली रक्कम रु.258962/- दि.15/02/2014 पर्यंत बँकेत भरणा केली नसल्याने सदर रक्कमेचा कायमस्वरुपी अपहार झालेचे दिसुन आले आहे. याबाबत विभागाने राष्ट्रीय लेखासंहिता नियमावली 2005 मधील परीच्छेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपद्धतीनुसार दरमहा रोखवही बँक पासबुक व बँक विवरणपत्र यांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.तथापि संबंधित विभागाने विहित मुदतीत ताळमेळ घेतलेला नसलेने कायमस्वरुपी अपहारास वाव मिळाला असुन रु.258962/-चा अपहार झालेचे स्पष्ट झाले आहे.***

सोलापुर महानगरपालिकेच्या गलिच्छ वस्ती सूधारणा विभागाच्या दि.1/04/2011 ते दि.31/03/2012 या कालावधीतील जमेचे लेखा परीक्षण केले असता खालील प्रमाणे नमुद दिनांकांस रोजकिर्द, एकत्रित भरणाकिर्द व चलनानुसार भरण दर्शविलेल्या रक्कमा आणि बॅक खाते क्र.019905850028 (आय.सी.आय.सी.आय.बँक) मध्ये प्रत्यक्षात जमा रक्कमात लेखापरिक्षणात तफावत आढळुन आली आहे, याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.137 दि.28/11/2013 अन्वये कळविले होते. त्यानुसार विभागाने दि.09/01/2014 अन्वये दिलेल्या खुलाशा मध्ये संबंधित व्यक्तिवर फौजदारी गुन्हा दाखल केला असुन अपहाराची रक्कम वसुल झाली नसल्याचे नमुद आहे.

बँकखात्यात कमी रकमा जमा केल्या बाबत.

( रक्कम रुपयात)

| अ.क्र. | दिनांक | रोजकिर्दी प्रमाणे भरणा आवश्यक | एकत्रित भरणा किर्दीनुसार आवश्यक भरणा | चलनानुसार आवश्यक भरणा(एकत्रित) | बॅक स्क्रोलनुसार प्रत्यक्ष भरणा केलेली रक्कम | फरक (वसुलपात्र रक्कम) |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम | | | | |
| 1 | 5/4/11 | 51490 | 51490 | 51490 | 50990 | 500 |
| 2 | 12/1/12 | 158462 | 158462 | 158462 | निरंक | 158462 |
| 3 | 22/3/12 | 127872 | 127872 | 127872 | 27872 | 100000 |
| | | | | | एकुण | 258962 |

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

266) नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 78 (3) अन्वये नमूना क्र. 13 प्रमाणे चलन तयार करुन करसंकलन निरीक्षकाकडे अथवा मुख्य कार्यालयास,लेखाशाखेकडे संकलनाचा भरणा केला पाहिजे. तसेच चलनामध्ये त्याने फक्त प्रत्येक कराची एकूण जमा वसुली व एकूण संकलनाची बेरीज दर्शविली पाहिजे. परंतु संबंधीत विभागाने चलनाप्रमाणे बँकेमध्ये रक्कमा जमा केलेल्या नाहीत.

267) नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 41 अन्वये कार्यालयात जमा झालेले सर्वच्या सर्व पैसे जमा झाल्याच्या दिवसाच्या पुढच्या दिवसाच्या आत बँकेत भरणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी दि.05/4/2011, दि.12/01/2012 व 22/03/2012 रोजी वसुल केलेली रक्कम रु.258962/- दि.15/02/2014 पर्यंत बँकेत भरणा केली नसल्याने सदर रक्कमेचा कायमस्वरुपी अपहार झालेचे दिसुन आले आहे. याबाबत विभागाने राष्ट्रीय लेखासंहिता नियमावली 2005 मधील परीच्छेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपद्धतीनुसार रोखवही बँक पासबुक व बँक विवरणपत्रानुसार दरमहा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.तथापि संबंधित विभागाने विहित मुदतीत ताळमेळ घेतलेला नाही.

268) नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र.55 नुसार जेव्हा नगरपालिकेच्या/महानगरपालिकेच्या पैशाचे वा मुल्यवान वस्तू/मालाचे अपहरण व अफरातफर, पैशाची व वस्तूमालाची निष्काळजीपणामुळे वा इतर कारणांनी झालेली हानी/तोटा आढळून येईल तेव्हा वस्तूस्थितीचा अहवाल मुख्यलेखापरीक्षक, नगरप्रशासंचालक, नगराध्यक्ष इत्यादींना कळविणे आवश्यक आहे. तथापि याबाबत विभागाने संबंधितांना कळविल्याचे नस्तीची तपासणी केली असता दिसुन आलेले नाही.

269) दिनांक 05/04/2011 रोजी किर्दीनुसार रु.51490/- एवढी जमा करणे आवश्यक असताना फक्त रु.50990/- एवढीच रक्कम वसुली अधिकारी याने बँक खात्यात जमा केलेली आहे. त्यामुळे बँकेत 500/- रुपये कमी जमा केल्याचे लेख्यावरुन दिसुन आले आहे.

270) दि.12/01/2012 रोजी गलिच्छ वस्ती सुधारणा विभागाने रोजकिर्दीमधील एकत्रिकरणाच्या बेरजेनुसार व त्यानुसार तयार केलेल्या चलनानुसार एकूण रु.158462/- एवढी रक्कम ही नियमाप्रमाणे बँकेत जमा होणे आवश्यक आहे. तथापि सदर रक्कम बँकेत जमा झालेली दिसत नाही. दि.11/01/2012 ची जमा रु.117099/- दि.12/01/2012 रोजी जमा केली आहे. परंतु दि.12/01/2012 ची एकूण जमा रक्कम रु.158462/- बँकेत जमा करणे आवश्यक असता बँकस्क्रोलशी ताळमेळ घेता ती रक्कम बँकेत

जमा झाली नसल्याचे दिसून आले. सदर रक्कम एक वर्ष उलटूनही शासकिय लेख्यात जमा केलेली नाही.

271) दिनांक 22/03/2012 रोजी गलिच्छ वस्ती सुधारणा विभागाने एकत्रित किर्दीनुसार रु.127872/- एवढी रक्कम दि.23/03/12 रोजी बॅकेत जमा करणे आवश्यक असता ती दि. 24/03/2012 रोजी आय.सी.आय.सी.आय.बॅकेत खाते क्रं.019905850028 मध्ये भरणा केली आहे. व बॅक काउंटर स्लीपचे झेरॉक्स प्रतीवर रु.127872/-भरणा केलेचे अक्षरी व अंकी नमुद आहे. तसेच बॅकेचा शिक्का व तारीखही नमुद आहे. सदर बँक काउंटर स्लीप व एकत्रित चलन गवसू विभागाने लेखा शाखेकडे दि.26/03/2012 रोजी जमा केले आहे. व त्यास लेखा शाखेने 26/03/2012 ची पोच दिलेली आहे. परंतू आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या बँकस्क्रोलशी ताळमेळ घेतला असता दि.24/03/2012 रोजी संबधीत चलनाने फक्त रु.27872/- एवढीच रक्कम बँकेत जमा केली असल्याची नोंद आहे. तसेच लेखा शाखेकडील मुळ चलन व बॅक काउंटर स्लीपची पडताळणी केली असता त्यावर रु.27872/- ची नोंद आहे. याचा अर्थ गवसू विभागाकडे असलेल्या बँकेच्या झेरॉक्स काउंटर स्लीप वर उपरीलेखन केल्याचे दिसुन आले आहे. त्यामुळे रु.100000/- एवढी रक्कम बँकेत कमी जमा केल्याचे आढळून आले आहे.

272) मुद्दा क्र. 1 ते 6 बाबत एकूण रु.258962/- एवढी रक्कम शासकीय लेख्यात (बँक खात्यात) जमा न केल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले आहे. सदर प्रकरणी संबंधित कर्मचा-यांनी अपहार केल्याचे आढळून येते. प्रस्तुत प्रकरणी संबंधित कर्मचा-यांकडून 2011-12 या वर्षात बँक खात्यात कमी जमा केलेली रक्कम संबंधिताकडून वसुल करणेत यावी.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 137 दि.28/11/2013 अन्वये दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

DATSBWM6801 (Ref No : 132, Hmm No : 137)

## *122 श्री.बी.बी.इंगळे - क.श्रे.लि. यांनी घरपट्टी विभागाकडे केलेल्या अपहाराबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9क*

गुंतलेली रक्कम रु. 511017.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 511017.00/-

***श्री.बी.बी.इंगळे यांची कोर्टाने निर्दोष मुक्तता केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेने मुख्यलेखापरीक्षक यांनी जा.क्र.मुलेप/तपा/542 दि.1/10/2001 ने सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालामध्ये नमूद रक्कम रू.5,11,017/- कोणाकडून वसुल करणार आहे याबाबतची माहिती लेखापरिक्षणास देणेत आलेली नाही.***

श्री.बी.बी.इंगळे - क.श्रे.लि.यांनी कर आकारणी व कर संकलन कार्यालयात केलेला अपहाराबाबत त्यांचेवर पोलीस स्टेशन मध्ये र.रू.5,11,017/- चे अपहाराचा गुन्हा दाखल करून त्यांना दि.20/3/2002 पासून महानगरपालिका सेवेतून निलंबित करणेत आले आहे. त्यांचेवर कोर्टात दि.23/5/2003 ने केस दाखल करणेत आली असून, त्याचा निकाल दि.30/4/2013 रोजी लागलेला आहे. कोर्टाने श्री.इंगळे यांची निर्दोष मुक्तता केली आहे. व प्रधान विधान सल्लागार सोलापूर महानगरपालिका यांनी जा.क्र.विस/14/I/243 दि.16/7/2013 ने जिल्हा सरकारी अभियोक्ता यांचेकडे शासनातर्फे अपील दाखल केले आहे किंवा कसे, याबाबत माहिती देण्यात यावी असे पत्र पाठविले आहे. याबाबत पुढे काय कार्यवाही झाली याची माहीती लेखापरिक्षणास देणेत आली नाही.

सदर निर्णयाविरोधात अपील दाखल करणेचे सक्षम प्राधिकारी महानगरपालिका असताना अपील का करणेत आलेले नाही, तसेच अपील दाखल करणेची मुदत किती आहे याची माहिती अर्धसमास ज्ञापन क्र.40 दि.21/08/2013 ने मागणी करुनही दिलेले नाही.

श्री.बी.बी.इंगळे(क.श्रे.लि.) यांचे अपहार प्रकरणाबाबत नस्तीचे अवलोकन केले असता, श्री.बी.बी.इंगळे (क.श्रे.लि.), श्री.एन औरादी(व.श्रे.लि.), श्री.बी.एस.भोसले(वश्रेलि) यांचेवर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशाविभागाने दोषारोप पत्र सादर केले आहे. त्यांची खातेनिहाय चौकशी करणेबाबत जाक्र.सआस/कक्ष2/ आस्था5/287 दि.03/8/2002 अन्वये खातेनिहाय चौकशी कामी श्री.ए.के.शेख विभागीय कार्यालयप्रमुख विभाग क्र.2 यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करणेत आली होती. चौकशी अधिकारी यांनी जाक्र.युसीडी/51दि.30/5/2004ने श्री.बी.बी.इंगळे (क.श्रे.लि.) धनादेश आणि रोखीच्या भरण्यामध्ये अपहार केला असण्याची शक्यता एकूण सर्वांचे जाब जबाबावरुन वाटते असा अहवाल सादर केला आहे.परंतु प्रशासनाने त्यावर कोणतीही कार्यवाही केलेचे दिलेल्या नस्तीमध्ये दिसून आले नाही.

श्री.बी.बी.इंगळे यांची कोर्टाने निर्दोष मुक्तता केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेने मुख्यलेखापरिक्षक यांनी जा.क्र.मुलेप/तपा/542 दि.1/10/2001 ने सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालामध्ये नमूद रक्कम रू.5,11,017/- कोणाकडून वसुल करणार आहे याबाबतची माहिती अर्धसमास ज्ञापन क्र.40 दि.21/08/2013 ने मागवुनही दिलेली नाही.

DATASDM5602 (Ref No : 23, Hmm No : 40)

# भाग दोन

## सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

## *123 स्थायी समितीने विहीत केलेल्या लेख्यांचे नमुने सादर केले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 93 अन्वये, मुबई प्राथमिक शिक्षण अधिनियम 1947 च्या कलम 361 च्या तरतुदींच्या व तद्न्वये केलेल्या नियमांच्या अधीन राहून महानगरपालिकेच्या जमाखर्चाचे लेखे स्थायी समिती वेळोवेळी निदेश देईल त्या रितीने व नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. परंतु स्थायी समितीने निदेश दिलेल्या ठरावाची व नमुन्याची प्रत लेखापरिक्षणास देणेत आलेली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 93 अन्वये, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम 1947 च्या कलम 361 च्या तरतुदींच्या व तद्न्वये केलेल्या नियमांच्या अधीन राहून महानगरपालिकेच्या जमाखर्चाचे लेखे स्थायी समिती वेळोवेळी निदेश देईल त्या रितीने व नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे.तसेच कलमातील तरतुदीनुसार एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोग कर्ज निधी आणि जल व मलप्रवाह निधी यांचे लेखे स्थायी समितीने अन्यथा निदेश दिला नसेल तर उपार्जित तत्वावर ठेवणे आवश्यक आहे. परंतु स्थायी समितीने निदेश दिलेल्या ठरावाची व नमुन्याची प्रत लेखापरिक्षणास देणेत आलेली नसलेने लेखा विभागाचे लेख्यांचे लेखापरीक्षण करीत असता महानगरपालिकेचे सध्याचे लेखे स्थायी समितीच्या निदेशानुसार असल्याबाबत तपासता येत नाहीत.
अर्धसमास ज्ञापन क्र.6 दि.10/07/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 3, Hmm No : 6)

## *124 अग्रीमासंबंधी कागदपत्रे सादर न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3434673.00/-

***अग्रीम रकमा अदा केलेल्या प्रकरणांच्या मूळ नस्ती व अग्रिमासंबंधातील कागदपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत.***

लेखा विभागाकडील अग्रीम प्रमाणकांचे रेखांकन केले असता खालील प्रमाणकांनी अग्रीमे अदा केल्याचे दिसुन आले.

1) प्रमाणक क्र.3144 दि.20/12/2011 रू.7,78,442/-
2) प्रमाणक क्र.3367 दि.29/2/2012 रू.10,10,413/-
3) प्रमाणक क्र.3416 दि.15/3/2012 रू.9,96,350/-
4) प्रमाणक क्र.3052 दि.16/12/2011 रू.1,99,300/-
5) प्रमाणक क्र.3200 दि.4/1/2012 रू.1,43,640/-
6) प्रमाणक क्र.3201 दि.9/1/2012 रू.66,636/-
7) प्रमाणक क्र.3263 दि.23/1/2012 रू.66,636/-
8) प्रमाणक क्र.3314 दि.9/2/2012 रू..96,252/-
9) प्रमाणक क्र.2935 दि.25/11/2011 रू.77,004/-

एकूण रक्कम रु.3434673/

अग्रीम देण्याचे प्रयोजन व किती रकमेच्या अग्रीमाचे समायोजन करणेत आले या बाबींच्या लेखा परीक्षणासाठी अग्रीम प्रकरणाची मुळ नस्ती व संबंधीत कागदपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत त्यामुळे रु. 3434673/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.07 दि.11/07/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 4, Hmm No : 7)

## *125 मुदतबाह्य व न वटलेले धनादेशाची माहिती सादर केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेने दि.31/3/2012 अखेर न वटलेले धनादेश व मुदतबाह्य धनादेशांची यादी/नोंद वही***

***लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.***

उपरोक्त विषयानुसार 2011-12 ह्या आर्थिक वर्षातील दि.31/3/2012 अखेर न वटलेले धनादेश व मुदतबाह्य धनादेशांची यादी / नोंद वही लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 46 (5)नुसार कोणताही धनादेश आहरण केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी अनुज्ञेय असणार नाही. आणि हा कालावधी संपलेनंतर आदात्याने असा धनादेश आहर्त्याच्या स्वाक्षरीनिशी पुन्हा विधीग्राह्य करवून घेण्यासाठी परत पाठविणे जरुरीचे असेल व असा मुदतबाह्य धनादेश पुर्नविधीग्राह्य केल्याची टीप सामान्य रोकडवहीतील मूळ नोंदी समोर लिहीणे आवश्यक आहे.परंतु लेखाशाखेने न वटलेल्या व मुदतबाह्य धनादेशाची माहीती न दिलेने नियमाप्रमाणे कार्यवाही होत नसलेचे स्पष्ट होते. तसेच न वटलेल्या व मुदतबाह्य धनादेशापोटी महानगरपालिकेवर किती रकमेचे दायीत्व आहे ते समजून येत नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.8 दि.23/07/2013 चे उत्तर दिलेले आहे परंतु माहिती देणेत आलेली नाही.

DATASDM5602 (Ref No : 5, Hmm No : 8)

## *126 अदा बील नमुन्याप्रमाणे देयके सादर न करता प्रदान केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 9362500.00/-

***नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 174 नमुना क्र.131 अन्वये देयके तयार करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे केल्याचे दिसून येत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84 नुसार बँकेने मुख्यलेखापाल किंवा उपलेखापाल किंवा उपलेखापालाची जागा नसेल तर अशा मुख्यलेखापालाच्या प्रत्यक्ष हाताखालील अधिकारी आणि आयुक्त किंवा उपायुक्त किंवा सहा.आयुक्त यांनी सही केलेला धनादेश मिळाल्याशिवाय महानगरपालिका निधीतून कोणतेही प्रदान करता कामा नये.महानगरपालिकेच्या अदा बिल नमुन्या प्रमाणे देयक मुख्यलेखापाल व सहा.आयुक्त यांचे स्वाक्षरीने पारित होणे आवश्यक असताना सदर प्रमाणके प्राधिकृत आधिका-यांच्या स्वाक्षरीने मंजुर करण्यात आलेली नाहीत.***

खालील प्रमाणके अर्धसमास ज्ञापन क्र.15 दि.24/07/2013 अन्वये मागणी केल्यावर उपलब्ध झाली आहेत.

दि.1/3/12 ते दि.30/3/12 पर्यंतची प्रमाणके नगर सचीव विभागाची अल्पोपहाराच्या खर्चाची आहेत.

| दिनांक | प्रमाणक क्रमांक | | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| 01/3/2012 | 19874 | ते 19887 | 14 |
| 12/3/2012 | 20186 अ | | 01 |
| 12/3/2012 | 20307 | ते 20338 | 32 |
| 14/3/2012 | 20523 | ते 20535 | 13 |
| 14/3/2012 | 20582 | ते 20617 | 49 |
| 21/3/2012 | 20809 | ते 20820 | 12 |
| 22/3/2012 | 20869 | ते 20891 | 35 |
| 22/3/2012 | 20997 | ते 21028 | 67 |
| 26/3/2012 | 21102 | ते 21124 | 23 |
| | 21139(1) | | 01 |
| 30/3/2012 | 21691 | ते 21714 | 24 |
| 31/3/2012 | 21915 | ते 23390 | 1476 |
| | | एकुण | 1747 |

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.13 नुसार मनपा निधीतुन देण्यात येणा-या प्रदानाचे देयक वा प्रमाणक यावर नियम क्र.16 मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रदान करावयाची रक्कम आकड्यात व अक्षरात लिहिलेले प्रदान आदेश असले पाहिजेत, आणि या बाबतीत सक्षम प्राधिका-याचे मान्यता आवश्यक असेल त्याबाबतीत मान्यता मिळाल्यावर अशा प्रत्येक प्रदान आदेशावर सक्षम प्राधिका-याने स्वाक्षरी केली पाहिजे, व नियम क्र.17 नुसार निरनिराळ्या प्रदान शिर्षाकरिता वेगवेगळी प्रमाणके तयार करावी, प्रमाणकातील व आदेशातील प्रदानार्थ मंजुर या आदेशावर स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकारा व्यतिरिक्त इतर अधिका-याची स्वाक्षरी असेल तर ते प्रदान करण्यात येवू नये अशी तरतुद असताना प्रमाणक क्र.21915 ते 23390 ही प्रमाणके उपरोक्त तरतुदीप्रमाणे सदरची देयके नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 174 नमुना क्र.131 अन्वये तयार करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे केल्याची दिसून येत नाहीत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84 नुसार बँकेने मुख्यलेखापाल किंवा उपलेखापाल किंवा उपलेखापालाची जागा नसेल तर अशा मुख्यलेखापालाच्या प्रत्यक्ष हताखालील अधिकारी आणि आयुक्त किंवा उपायुक्त किंवा सहा. आयुक्त यांनी सही केलेला धनादेश मिळाल्याशिवाय महानगरपालिका निधीतून कोणतेही प्रदान करता कामा नये. महानगरपालिकेचे अदाबिल नमुन्याप्रमाणे देयक मुख्यलेखापाल/सहा.आयुक्त यांचे स्वाक्षरीने पारित होणे आवश्यक असताना सदर प्रमाणाके प्राधिकृत अधिका-यांच्या स्वाक्षरीने मंजुर करण्यात आलेले नाही. तपासणी करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली प्रमाणके हि " अदाबिल" नमुन्यात नसल्यामुळे मुळ प्रतीत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. त्यावर रोकड वहीतील प्रमाणक क्रमांक व

दिनांक नमुद करण्यात आलेला नसुन सदरच्या प्रमाणकावर धनादेश क्रमांक नमुद करण्यात आलेले आहेत. सबब सदरच्या प्रमाणकांची तपासणी करण्यात आलेली नाही. एकूण रक्कम रु.9362500/- ही आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATASDM5602 (Ref No : 10, Hmm No : 15)

### *127 भविष्य निर्वाह निधीमधील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भ.नि.नि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.134(2) नुसार कर्मचा-यांना मार्च महिन्यानंतर लगेच त्यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यावर किती रक्कम जमा आहे याची भविष्य निर्वाह निधी स्लीप (गोषवारा) देणे आवश्यक असताना 2011-12 या आर्थिक वर्षात स्लीप देणेत आलेली नाही.***

भविष्य निर्वाह निधी खात्यांचे महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम 1998 नुसार लेखा परिक्षण केले असता, खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)आस्थापना विभागाकडून वेतन देयक तयार करताना कर्मचा-याची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम कपात करणेत येते व त्याचे चलन तयार करून लेखा शाखेकडे कर्मचा-यांचे भविष्यनिर्वाह खात्यामध्ये नोंद करण्यासाठी पाठविले जाते. परंतु चलनावर कर्मचा-याच्या भविष्यनिर्वाह खात्याचा क्रमांक नमूद केला जात नाही. किंवा चुकीचा क्रमांक लिहिला जातो.उदा.दिलिप पांडुरंग सुरवसे विभाग मंडई जून 2011,निवास ना. यंगल आरोग्य, व्ही.एम.मावरंग,आरोग्य, एल.आर.शिखरे,आरोग्य यांचे जून 2011चे कपातीचे चलनावर भविष्यनिर्वाह निधी क्रमांक लिहिणेत आला नसलेने कपात केलेली रक्कम कोणत्या खात्यावर वर्ग करावयाची याबाबत भविष्यनिर्वाह निधी खात्याचे कर्मचा-यापुढे संभ्रम निर्माण होवुन अचूक रक्कमेचे लेखांकन कर्मचा-यांचे खात्यावर होत नसलेचे दिसून आले.

संगणक विभागाकडून वेतन देयकामध्ये रक्कमा भरत असताना या गोष्टीची शाहनिशा केली जात नाही.

भ.नि.नि. विभागाचे अजूनही संगणकीकरण केलेले नाही. लेखे, वर्गणी व व्याजाची गणना हातानेच केली जाते. शासनाने शासकीय कर्मचा-यांचे भ.नि.नि. लेख्यांचे संगणकीकरण 10 वर्षापूर्वी केलेले आहे. परंतु महानगरपालिकाचा संगणक विभाग अस्तित्वात असताना व ई गव्हर्नन्स अंतर्गत महानगरपालिकेस

वेळोवेळी अनुदान देवून अजूनही महानगरपालिकेचे भविष्यनिर्वाह निधी लेखे संगणकीकृत करणेत आलेले नाहीत.

अंतर्गत लेखापरिक्षकाकडून वेतन देयकांचे लेखापरिक्षण करताना नगरपरिषद लेखासंहिता,1971 चे नियम क्र.194(2)(ड) नुसार अंतर्गत लेखापरिक्षकाने सर्व जमा व प्रदानांचे अचूक वर्गीकरण केले आहे हे पाहणे कर्तव्याचा भाग आहे.परंतु वेतन देयकात कर्मचा-यांचा भविष्यनिर्वाह निधी खाते क्रमांक अचूक लिहिणेत आला आहे किंवा नाही हे व्यवस्थित तपासले जात नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र.134(2)नुसार कर्मचा-यांना मार्च महिन्यानंतर लगेच त्यांचे भ.नि.नि. खात्यावर किती रक्कम जमा आहे याचा भविष्यनिर्वाह निधी स्लीप (गोषवारा) देणे आवश्यक असता 11/12 या आर्थिक वर्षात स्लीप देणेत आलेली नाही.

आस्थापना, संगणक, अंतर्गत लेखापरिक्षक व लेखा विभागामध्ये ताळमेळ नसल्याने कर्मचा-याना भ.नि.नि. लेखा बिनचूक ठेवला जात नसलेचे स्पष्ट होते.

अर्धसमास ज्ञापन क्र.18 दि.26/07/2013 दिलेल्या उत्तरामध्ये लेखे व्यवस्थित ठेवण्यात आले नसल्याचे मान्य करणेत आले आहे.

DATSBKM7201 (Ref No : 13, Hmm No : 18)

## *128 सुरक्षा, अनामत व इसारा रक्कम नोंद वहीतील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 17507934.00/-

***महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.190 नुसार रोखीत मिळालेल्या व महानगरपालिकेने परत केलेल्या ठेवी,नमुना क्र.147 प्रमाणे ठेवलेल्या पुस्तकात ठेवणेत आलेल्या नाहीत.***

सुरक्षा, अनामत व इसारा रक्कम नोंद वहीचे लेखा परिक्षण केले असता, खालील प्रमाणे त्रुटी दिसून आल्या आहेत.

सुरक्षा, अनामत व इसारा रक्कमेची रोकड वही महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नमुना क्र.147 प्रमाणे ठेवण्यात आलेली नाही. तसेच बँकेमध्ये स्वतंत्र खाते ठेवण्यात आलेले नाही. बँक खाते व रोकड वही स्वतंत्र न ठेवल्याने 2011-12 मध्ये किती इसारा रक्कम व सुरक्षा ठेव जमा झाली व किती

रक्कम ठेकेदारास परत केली याचे लेखापरिक्षण करता आले नाही. 2011-12 ची आरंभिची शिल्लक व अखेरची शिल्लक दाखविण्यात आलेली नाही.

2011-12 ची आरंभिची शिल्लक व अखेरची शिल्लक दाखविण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.190 नुसार लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.190(3) नुसार सुरक्षा अनामत रक्कम तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी प्रत्येक वर्ष अखेर महापालिकेकडे व्यपगत होतील व त्या महापालिका निधीतील संकीर्ण इतर बाबी व्यपगत ठेवी या शिर्षाखाली जमाखाती स्थानांतरीत करणे आवश्यक असता 08/09 अखेर रु.17507934/- इतकी रक्कम संकीर्ण इतर बाबी व्यपगत ठेवी या शिर्षाखाली स्थानांतरीत केलेली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.20 दि.29/07/2013 ला दि.19/10/2013 रोजी तीन महिने विलंबाने उत्तर दिलेले आहे. ठेवी व्यपगत करणेची कार्यवाही ठेवणेत येत आहे असे नमुद करणेत आले आहे.परंतु ठेवी व्यपगत करुन संकीर्ण इतर बाबी व्यपगत ठेवी या शिर्षाखाली स्थानांतरीत केलेल्या नाहीत.

DPSKGGM6001 (Ref No : 15, Hmm No : 20)

### *129 वेतन राखीव निधीचे स्वतंत्र खाते न ठेवलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : वे.रा.नि. महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.101 नुसार वेतन राखीव निधीचे खाते स्वतंत्रपणे ठेवलेले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेचे वेतन राखीव निधीचे लेखपरिक्षण केले असता, खालील प्रमाणे त्रुटी दिसून आल्या आहेत.

सोलापूर महानगरपालिका यांनी वेतन राखीव निधीचे खाते स्वतंत्रपणे ठेवलेले नाही. तरी महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.101 नुसार वेतन राखीव निधी चे स्वतंत्र खाते ठेवून त्या मध्ये प्रतिवर्षी सरासरी माहे डिसेंबर महिन्याचा वेतना एवढे वेतन राखीव निधीत जमा करणे आवश्यक आहे.वेतन राखीव निधी ठेवल्यास भविष्यात ज्या महिन्यात महानगरपालिकेस कमी उत्पन्न प्राप्त होवुन कर्मचा-यांचा पगार देण्यामध्ये अडचण निर्माण होते त्यावेळी या निधीमधुन वेतन देणे आवश्यक आहे.त्यामुळे

वेतन राखीव निधी ठेवण्यात यावा. अर्धसमास ज्ञापन क्र.22 दि.30/07/2013 ला दि.02/08/2013 रोजी दिलेले उत्तर संयुक्तिक वाटत नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 17, Hmm No : 22)

## *130 जमानत / तारणठेव नोंदवही ठेवली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : वे.रा.नि. महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.191 नमुना 148 नुसार जमानत / तारण ठेव नोंद वही ठेवलेले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.191नुसार नमुना 148 नुसार जमानत तारण ठेवी नोंद वही ठेवण्यात येवुन त्यात सर्व कर्जरोखे,व महानगरपालिकाला रोखीत न दिलेल्या इतर ठेवी म्हणजेच बचत बँक ठेवी,शासकीय वचनचिठ्या,इतर ऋणपत्रे इत्यादींची नोंद केली पाहिजे.या पुस्तकात दर्शविलेली सर्व कर्जरोख्याची शिल्लक,दरवर्षी पडताळून पाहण्यात आली पाहिजे.परंतु सोलापूर महानगरपालिकेने , नियम क्र.191नुसार नमुना 148 नुसार जमानत/ तारण ठेवी नोंद वही ठेवलेली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र. 23 दि.30/07/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 18, Hmm No : 23)

## *131 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नि.वे.नि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्णय क्र.अंनियो/1005/126/सेवा-4 दि.31/10/2005 नुसार 1 नोव्हेंबर 2005 अ.क्र.3(इ) नुसार मूळ वेतन, ग्रेडपे, अधिक महागाई भत्ता या रक्कमेच्या 10% इतके मासिक अंशदान किती कर्मचा-यांचे वेतन देयकातून कपात करून शासन निर्णय क्र.अंनियो/1007/18/सेवा-4 दि.7/7/2007 नुसार उघडलेल्या खात्या मध्ये जमा केले आहे त्याचा तपशील लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिका कर्मचा-यांचे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे लेखापरिक्षण केले असता, खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

273) शासन निर्णय क्र.अंनियो/1005/126/सेवा-4 दि.31/10/2005 नुसार 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-याना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्यात आलेली आहे. सोलापूर महानगरपालिका यांनी 2011-12 मध्ये एकूण 20 कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. उपरोक्त शासन निर्णयातील अ.क्र.5(ब) नुसार कर्मचारी सेवेत नियुक्त होताच त्यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणे क्रमप्राप्त होते. सोलापूर महानगरपालिकने दि.31/10/2005 नंतर नियुक्त झालेल्या किती कर्मचा-याना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे त्याचा तपशील लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिलेला नाही.

274) शासन निर्णय क्र.अंनियो/1005/126/सेवा-4 दि.31/10/2005 नुसार 1 नोव्हेंबर 2005 अ.क्र.3(इ) नुसार मूळ वेतन, ग्रेडपे, अधिक महागाई भत्ता या रक्कमेच्या 10% इतके मासिक अंशदान किती कर्मचा-यांचे वेतन देयकातून कपात करून शासन निर्णय क्र.अंनियो/1007/18/सेवा-4 दि.7/7/2007 नुसार खात्या मध्ये जमा केले आहे त्याचा तपशील लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिलेला नाही.

275) तसेच महानगरपालिकेने तेवढेच अंशदान कर्मचा-यांचे खाती जमा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे किती अंशदान महानगरपालिकेच्या वतीने कर्मचा-यांचे खाती जमा करणेत आलेले आहे.त्याचा तपशील लेखा परिक्षणास अर्धसमास ज्ञापन क्र.26 दि.7/08/2013 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाला नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 19, Hmm No : 26)

## *132 सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन विषयक लाभ वेळेत प्रदान केले नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***2011-12 मध्ये एकूण 138 सेवानिवृत्त कर्मचारी निवृत्त झालेले आहेत.त्यांना निवृत्ती वेतनाचे लाभ 6 महिने ते 2 वर्षापर्यंत उशिराने आदा करणेत आलेले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 च्या प्रकरण 10 मधील नियम क्र.118 ते 125 मध्ये तरतुदी नुसार कार्यवाही झालेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेचे 2011-12 मध्ये निवृत्त झालेल्या 138 सेवानिवृत्त कर्मचा-याना निवृत्ती विषयक लाभ हा वेळेत प्रदान करणेबाबत शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 च्या प्रकरण 10 मधील नियम क्र.118 ते 125 मध्ये तरतुदी नुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982, नियम 118 नुसार प्रत्येक विभाग/कार्यालय प्रमुखाने दर सहा महिन्याने म्हणजे दि.1 जानेवारी व 1 जुलै या तारखेपासून पुढील 24 ते 30 महिन्यामध्ये सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याची यादी तयार करून ती संबंधीत निवृत्ती वेतन प्रकरणे अंतीम करणा-या कार्यालयाकडे दि.31 जानेवारी किंवा 31 जुलै पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. तसेच नियत वयोमानाअतिरिक्त इतर कारणास्तव सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याच्या बाबतीत अशा सेवानिवृत्ती बद्दल माहिती प्राप्त होताच त्याची माहिती संबंधीत कार्यालयास देणे आवश्यक आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नियम क्र.120 नुसार निवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे पूर्ण करताना वरील नियमावलीच्या नियम 121 नुसार सेवेची पडताळणी करणे, सेवापुस्तकातील उणिवा भरून काढणे, सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याकडून आवश्यक माहिती विहीत नमुन्यात भरून घेणे या सर्व बाबींची पुर्तता करून कार्यालय प्रमुखाने परिपूर्ण कागदपत्रे उपलब्ध नियमवलीच्या नियम क्र.122 व 123 नुसार शाकर्मचा-याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी 8 महिन्याचे आत संबंधीत विभागाकडे तपासणीसाठी पाठविणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

2011-12 मध्ये एकूण 138 सेवानिवृत्त कर्मचारी निवृत्त झालेले आहेत.त्यांना निवृत्ती वेतनाचे लाभ 6 महिने ते 2 वर्षापर्यंत उशिराने आदा करणेत आलेले आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.सेनिवे-1094/155/सेवा-4 दि.24/4/1995 नुसार मृत्यू नंतर उपदान मृत्यूच्या तारखेपासून तीन महिन्यानंतर करण्यात आले असेल व कुटुंब निवृत्तीचे प्रदान देय झाल्याचे तारखेपासून 6 महिन्यानंतर प्राधिकृत करण्यात आले नसेल तर 12 % व्याज देण्याची तरतुद आहे. 2011-12 मध्ये एकूण 18 कुटुंब निवृत्ती वेतनधारक आहे. त्यांना वरील शासन निर्णयानुसार कुटुंब निवृत्ती वेतन आदा केलेले नाही. त्यामुळे विलंबाने निवृत्ती वेतन विषयक लाभ दिले असल्याने संबंधीतावर कोणती कार्यवाही करणेत आली याचा खुलासा लेखापरिक्षणास करणेत आलेला नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नियम क्र.121, 123 नमुना क्र.5 कर्मचा-याकडून संपूर्ण माहितीसह भरून घेतलेला नाही. नियम क्र.120, 122, 123 व 127 नमुना क्र.6 निवृत्ती वेतन उपदान याचा निर्धारण करणेकरिता सदरचा नमुना कर्मचा-याकडून परिपूर्ण भरून घेण्यात आलेला नाही. तसेच नमुना क्र.12 चे सहपत्र हे विभाग प्रमुखाने नियमानुसार सेवानिवृत्त कर्मचा-याकडून विहीत नमुन्यात भरून घेण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नमुना 153 नियम परिशिष्ट 1 भाग ब परिच्छेद 25 अ निवृत्ती वेतन लेखापरिक्षा पुस्तक भरण्यात आलेले नाही. नमुना 154 परिशिष्ट 1 विभाग ब परिच्छेद 26 अ निवृत्ती वेतन प्रदान आदेश पुस्तक विहीत नमुन्यात ठेवलेले नाही. परिशिष्ट 1 भाग ब परिच्छेद 27 नमुना 155 उपदान पुस्तक ठेवण्यात आलेले नाही. अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 26, Hmm No : 43)

## *133 रोखवही व बँकपासबुक ताळमेळ जुळत नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 621646074.00/-

***राष्ट्रीय लेखासंहिता नियमावली 2005 मधील परिच्छेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार रोखवही, बँक पासबुक व बँक विवरणपत्रानुसार दरमहा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तथापि लेखा विभागाने ताळमेळ घेतलेला नाही. सदर रकमेचा ताळमेळ पुर्ण होईपर्यंत रक्कम रु. 621646074/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.***

राष्ट्रीय लेखासंहिता नियमावली 2005 मधील परिच्छेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार दरमहा रोखवही, बँक पासबुक व बँक विवरणपत्रानुसार ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तथापि लेखा विभागाने ताळमेळ घेतलेला नाही. सोलापूर महानगरपालिकेच्या लेखा विभागाचे 2011-2012 या वर्षातील रोखवही व बँक खाते निहाय प्रपत्रा नुसार दि.01/04/2012 ची सुरुवातीची शिल्लक व दि.31/03/2012 ची अखेरची शिल्लक रक्कमांचे लेखा परीक्षण केले असता,रोखवहीतील शिल्लक रक्कम व लेखा शाखेने दिलेल्या बँक प्रपत्रानुसार शिल्लक रक्कम यांचा ताळमेळ जुळत नसलेचे लेखा परीक्षणास आढळून आले आहे.

ताळमेळ बाबत सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दि.1/4/11ची रोखवहीतील | बँक खातेनिहाय प्रपत्रा नुसार | फरक रक्कम |
|---|---|---|---|

| | सुरवातीची रक्कम | शिल्लक रक्कम | |
|---|---|---|---|
| 1 | निरंक | 206274615.64 | 206274615.64 |

| अ.क्र. | दि.31/3/12रोखवहीतील रक्कम | बँक खातेनिहाय विवरणपत्रानुसार शिल्लक रक्कम | फरक रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | निरंक | 621646074 | 621646074 |

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.194, दि.29/01/2014 अन्वये कळविले होते, तथापि विभागाकडील खुलासा अप्राप्त आहे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 मधील (3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोकडवहीतील नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदीची बँक पासबुक मधील नोंदीबरोबर बाबवार तुलना करून जर काही फरक असेल तर तो विहित नमुन्यात जुळवून दाखविणे आवश्यक आहे. रोखवही व लेखा शाखेने दिलेल्या बँक खातेनिहाय विवरणपत्रानुसार दि.31/03/12 अखेर शिल्लक रक्कम रु. 621646074/- ची तफावत आहे. लेखा विभागाने बँकच्या शिल्लकेबरोबर दरमहा रोखवहीमध्ये ताळमेळ नोंदविलेला नाही. लेखा विभागाने दीड वर्षाचा कालावधी होऊन देखील तफावतीचा ताळमेळ घेतलेला नाही. सदर रकमेचा ताळमेळ पुर्ण होईपर्यंत रक्कम रु. 621646074/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.194 दि.29/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBWM6801 (Ref No : 152, Hmm No : 194)

## *134 सर्वसाधारण सभेकडे प्रलंबित असलेल्या विषयावर निर्णय न घेतलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नगरसचिव महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र शासन राजपत्र,नगर विकास विभाग दि.20 मे2011 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 12 नुसार अधिनियम 1949 अनुसूची ड मधील प्रकरणदोन मधील(क) नियम 1 मध्ये (स) नुसार आयुक्ताच्या कोणत्याही प्रस्तावास महानगरपालिकेच्या मान्यतेची आवश्यकता असेल त्या बाबतीत महानगरपालिका,नगरपालिका सचिवाकडे तो प्रस्ताव प्राप्त झालेनंतर,महानगरपालिकेच्या लगतच घेणेत आलेल्या सभेच्या दिनांकापासून नव्वद दिवसाच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील मग अशा***

***प्रस्तावाशी निगडित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर असो किंवा नसो तसे न केल्यास,अशा प्रस्तावास महानगरपालिकेने मान्यता दिली असे मानण्यात येईल,आणि तशा आशयाचा प्रस्ताव आयुक्ताकडून शासनाकडे पाठविणेत येईल आणि तो शासनाच्या निदेशानुसार पुढील कार्यवाही करील अशी स्पष्ट तरतुद आसताना नगरसचिव विभागाने आयुक्त यांचेकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते व आयुक्तानी पुढील कार्यवाही करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आली नाही.***

1.सर्वसाधारण सभेकडे 11/12 या आर्थिक वर्षात सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे एकूण 43 विषय प्रलंबित असलेचे दिसुन येते. महाराष्ट्र शासन राजपत्र,नगर विकास विभाग दि.20 मे2011चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 12 नुसार अधिनियम 1949 अनुसूची ड मधील प्रकरण दोन मधील(क) नियम 1 मध्ये (स) नुसार आयुक्ताच्या कोणत्याही प्रस्तावास महानगरपालिकेच्या मान्यतेची आवश्यकता असेल त्या बाबतीत महानगरपालिका,नगरपालिका सचिवाकडे तो प्रस्ताव प्राप्त झाले नंतर,महानगरपालिकेच्या लगतच घेणेत आलेल्या सभेच्या दिनांकापासून नव्वद दिवसाच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी निगडित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर असो किंवा नसो तसे न केल्यास अशा प्रस्तावास महानगरपालिकेने मंजुरी किंवा मान्यता दिली आसल्याचे मानण्यात येईल व तशा आशयाचा प्रस्ताव आयुक्ताकडून शासनाकडे पाठविणेत येईल आणि तो शासनाच्या निदेशानुसार पुढील कार्यवाही करील अशी स्पष्ट तरतुद आसताना नगरसचिव विभागाने आयुक्त यांचेकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते व आयुक्तानी पुढील कार्यवाही करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आली नाही

अर्धसमास ज्ञापन क्र. 83 दि.08/10/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 9, Hmm No : 83)

## *135 सर्वसाधारण सभेकडे प्रलंबित असलेल्या विषयावर निर्णय न घेतलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नगरसचिव महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र शासन राजपत्र,नगरविकास विभाग दि:20 मे2011 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 12 नुसार अधिनियम 1949 अनुसूची ड मधील प्रकरण दोन मधील(क) नियम 1 मध्ये (स) नुसार आयुक्ताच्या कोणत्याही प्रस्तावास महानगरपालिकेच्या मान्यतेची आवश्यकता असेल त्या बाबतीत***

***महानगरपालिका,नगरपालिका सचिवाकडे तो प्रस्ताव प्राप्त झालेनंतर,महानगरपालिकेच्या लगतच घेणेत आलेल्या सभेच्या दिनांकापासून नव्वद दिवसाच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी निगडित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर असो किंवा नसो तसे न केल्यास,अशा प्रस्तावास मनपाने मान्यता दिली असे मानण्यात येईल,आणि तशा आशयाचा प्रस्ताव आयुक्ताकडून शासनाकडे पाठविणेत येईल आणि तो शासनाच्या निदेशानुसार पुढील कार्यवाही करील अशी स्पष्ट तरतुद आसताना नगरसचिव विभागाने आयुक्त यांचेकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते व आयुक्तानी पुढील कार्यवाही करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आली नाही.***

1.सर्वसाधारण सभेकडे सन 11/12 या आर्थिक वर्षात सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. 20 प्रमाणे एकूण 43 विषय प्रलंबित असलेचे दिसुन येते. महाराष्ट्र शासन राजपत्र,नगरविकास विभाग दि.20 मे2011चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 12 नुसार अधिनियम 1949 अनुसूची ड मधील प्रकरण दोन मधील(क) नियम 1 मध्ये (स) नुसार आयुक्ताच्या कोणत्याही प्रस्तावास महानगरपालिकेच्या मान्यतेची आवश्यकता असेल त्या बाबतीत महानगरपालिका,नगरपालिका सचिवाकडे तो प्रस्ताव प्राप्त झालेनंतर,महानगरपालिकेच्या लगतच घेणेत आलेल्या सभेच्या दिनांकापासून नव्वद दिवसाच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी निगडित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर असो किंवा नसो तसे न केल्यास,अशा प्रस्तावास मनपाने मान्यता दिली असे मानण्यात येईल आणि तशा आशयाचा प्रस्ताव आयुक्ताकडून शासनाकडे पाठविणेत येईल आणि तो शासनाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करील अशी स्पष्ट तरतुद आसताना नगरसचिव विभागाने आयुक्त यांचेकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते व आयुक्तानी पुढील कार्यवाही करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.
अर्धसमास ज्ञापन क्र. 83 दि. 8//10/13 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 109, Hmm No : 83)

## *136 मलेरिया विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मलेरिया विभागाकडील क्षेत्र कार्यकर्ता यांची सेवापुस्तके पडताळणी केली असता, कर्मचा-याना कालबध्द / आश्वासित प्रगती योजनेचा लाभ सुमारे तीन वर्ष विलंबाने दिलेचे दिसून येते. कोणत्याही कर्मचा-याचा रजा***

***लेखा सेवापुस्तकात लिहिण्यात आलेला नाही.***

मलेरिया विभागाकडील क्षेत्र कार्यकर्ता यांची सेवापुस्तके पडताळणी केली असता, खालील त्रुटी दिसून आल्या आहेत.

| अ. नं. | सेवकांचे नांव | नेमणूक दिनांक | कालबध्द पदोन्नती दिनांक | कालबध्द मंजूरी दिनांक | शैक्षणिक अर्हता | जात पडताळणी प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सु.आ.ताडमारी | 1/5/91 | 1/5/03 | 19/10/05 | 10 वी नापास | - |
| 2. | भि. द. रोकडे | 23/6/89 | 23/6/01 | 25/10/05 | 6 वी पास | नाही |
| 3. | विष्णू जा. भालेराव | 4/7/92 | 4/7/04 | 19/7/10 | अशिक्षित | नाही |
| 4. | नामदेव सा. हावळे | 1/5/91 | 1/5/03 | 10/3/06 | अशिक्षित | - |
| 5. | सिद्राम तु. वाघमारे | 1/1/91 | 1/1/03 | 6/8/06 | 4 थी | नाही |
| 6. | स्रिदाम.भा.बेटकर | 23/6/89 | 23/6/01 | 25/10/05 | 6 वी पास | - |
| 7 | ला.दौ.भडकवाड | 14/2/91 | 14/2/03 | 10/3/06 | 6 वी पास | नाही |
| 8 | भा.प.डोळसे | 22/6/89 | 22/6/01 | 10/3/06 | अशिक्षित | नाही. |
| 9 | स.शि.तळभंडारे | 26/4/94 | 26/4/06 | 19/11/07 | अशिक्षित | नाही. |
| 10 | श्रीमती सा.द.पवार | 10/9/96 | 10/9/08 | 10/2/09 | 1 ली | - |
| 11 | शु.रा.सावंत | 10/2/90 | 10/2/02 | 10/3/06 | 4 थी | - |
| 12 | शाम नि.मिसाळ | 24/12/93 | 24/12/05 | 14/10/06 | अशिक्षित | - |
| 13 | अशोक को.खरात | 1/2/03 | - | - | 10 वी नापास | नाही |
| 14 | सु.सा.खुणे | 1/10/03 | - | - | 8 वी | नाही. |
| 15 | दत्तात्रय अ. कदम | 14/7/01 | - | - | अशिक्षित | - |
| 16 | सि.मु.सावंत | 29/1/03 | - | - | 10 वी नापास | नाही |
| 17 | परमेश्वर ना.कसबे | 14/7/01 | - | - | 10 वी नापास | नाही. |
| 18 | दि.सी.सोनकांबळे | 12/6/02 | - | - | 9 वी | नाही. |
| 19 | वि.रा.कांबळे | 14/7/01 | - | - | 1 ली | नाही. |
| 20 | बा.सो.टोणपे | 10/12/08 | - | - | 10 वी नापास | नाही |
| 21 | कै.ज.गायकवाड | 10/12/08 | - | - | 4 थी | नाही. |

उपरोक्त कर्मचा-याना कालबध्द / आश्वासित प्रगती योजनेचा लाभ सुमारे तीन वर्ष विलंबाने दिलेचे दिसून येते.

कोणत्याही कर्मचा-याचा रजा लेखा सेवापुस्तकात लिहिण्यात आलेला नाही. सदर कर्मचा-याचा रजा लेखा न लिहिणे ही गंभीर बाब आहे.

कोणत्याही कर्मचा-याची जातपडताळणी प्रमाणपत्रे न घेताच वेतनवाढी काढणेत आल्याने वेतनवाढीची रक्कम परिगणना करुन वसूल करण्यात यावी.

अप्पा नागनाथ कदम व राम ज्ञानदेव लोंढे (क्षेत्र कार्यकर्ता) यांना 5 व्या वेतन आयोगाप्रमाणेच वेतन चालु असल्याचे दिसून येते. त्यांना 6 व्या वेतन आयोगाचे लाभ देण्यात आलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.50 दि.26/08/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 32, Hmm No : 50)

## *137 नगरसचिव विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नगरसचिव विभागाकडील कर्मचा- यांचे सेवापुस्तके,हजेरीपत्रक व वेतन बिले तपासली असता, खालील त्रुटी आढळून आल्या आहेत.***

नगरसचिव विभागाकडे कर्मचा-यांचे सेवापुस्तक , हजेरीपत्रक व वेतन बिले तपासली असता, खालील त्रुटी आढळून आल्या आहेत. त्याची पुर्तता करणेत आलेली नाही.

| अ. | सेवकांचे नांव | सेवापुस्तकातील त्रुटी |
|---|---|---|
| 1. | एस.व्ही. शावंतूल - शिपाई | जातपडताळणी प्रमाणपत्र नाही. |
| 2. | एम.एस.कस्तुरे - | रजा लेखे लिहिलेले नाही. 10 वी बोड सर्टिफिकेट नाही. नॉमिनेशन नाहीत. |
| 3. | द.च.भंडगर - शिपाई | जातीचा दाखला व जातपडताळणी प्रमाणपत्र नाही. |
| 4. | प.भि.चाबुकस्वार - शिपाई | जातीचा दाखला व जातपडताळणी प्रमाणपत्र नाही. |
| 5. | आ.ना.लिंगमपेठ - जमादार | जातीचा दाखला व जातपडताळणी प्रमाणपत्र नाही. |
| 6. | दि.द्वा.तिवारी - ड्रायव्हर | 10 वी बोर्ड सर्टिफिकेट नाही. 2005 ला एक जादा वेतनवाढ कोणत्या नियमान्वये देण्यात आली आहे ? |
| 7. | वि.ग्या.सगर - क.श्रे.लि. | जात पडताळणी प्रमाणपत्र नाही. 1/2/89 पासून हंगामी |

| | | |
|---|---|---|
| | | स्वरूपात नियुक्ती. कायम नियुक्ती ठराव नसताना वेतनवाढी देण्यात आलेल्या आहे. हिंदी मराठी टायपींग प्रमाणपत्र नाही. |
| 8 | सा.द.दळवी - व.श्रे.लि. | जात पडताळणी प्रमाणपत्र नाही. दि.2/9/88 हंगामी स्वरूपात नियुक्ती. कायम नियुक्ती ठराव नसताना वेतनवाढी व सेवा नियमितीकरण लाभ देण्यात आलेल्या आहे.तसेच पदोन्नती देण्यात आलेली आहे. हिंदी व मराठी टायपींग प्रमाणपत्र नाही. |

DATSBKM7201 (Ref No : 33, Hmm No : 53)

## *138 सोलापूर महानगरपालिका कर्मचा-याच्या सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिका झोन क्र.1 मधील कार्यरत कर्मचा- याची सेवापुस्तके तपासली असता, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 नियम क्र.37 नुसार कार्यालय प्रमुखांनी कर्मचा- याना दुय्यम सेवापुस्तक देणे क्रमप्राप्त आहे. परंतु झोन क्र.1 मध्ये कर्मचा- याना दुय्यम सेवापुस्तक दिलेले नाही. यापुढे कर्मचा- याना दुय्यम सेवापुस्तक देण्यात यावी. व सदर पुस्तक वर्षातून एकदा मूळ सेवापुस्तकातील नोंदी घेण्यात येऊन सांक्षाकित कराव्यात.***

सोलापूर महानगरपालिका झोन क्र.1 मधील कार्यरत कर्मचा-याची सेवापुस्तके तपासली असता, खालील त्रुटी लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आलेल्या आहेत.

276) श्री.सिकंदर अब्बास शेख यांनी उपभोगलेली रजा वगळून दि.14/8/2013 रोजी शिल्लक रजा 257 असणे आवश्यक होते. परंतु रजा लेखांमध्ये शिल्लक रजा 271 दिवस दर्शविणेत आली आहे. म्हणजे 14 दिवस अर्जीत रजा जास्तीची दर्शविणेत आली आहे. .तसेच सुरेश धों. गुंड, सफाई कामगार यांच्या खाती दि.30/6/2013 रोजी अर्जीत रजा 261 दिवस असणे आवश्यक आहे. परंतु रजा लेखा तपासला असता, त्यांच्या खाती अर्जीत रजा 276 दिवस दर्शविण्यात आली आहे. म्हणजेच 15 दिवस जादा अर्जीत रजा दर्शविली आहे.

277) श्री.तुकाराम पेंटय्या पिडगूलकर, सफाई कामगार यांची प्रथम नियुक्तीची तारीख दि.15/9/1995 अशी आहे म्हणजेच त्यांची वार्षिक वेतनवाढ तारीख 1/9 अशी असणे आवश्यक आहे. त्यांना कोणत्याही प्रकारची पदोन्नती मिळालेली नाही. पिडगूलकर यांची सेवापुस्तक तपासली असता, त्यांची वार्षिक वेतनवाढीची तारीख 1/1/2001 अशी मुख्यलेखापरिक्षक कार्यालयाकडून बदलण्यात आली आहे.

278) श्री.सिध्दार्थ श्रीमंत सुरवसे, झाडूवाला यांना कार्यालयीन आदेश क्र.1 आअ/आस्था-1/29 दि.1/4/2002 नुसार दि.2/4/2002 ते दि.30/9/2002 पर्यंत हंगामी नियुक्ती देण्यात आलेली आहे. तद्नंतर कार्यालयीन आदेश क्र.1 आअ/आस्था-1/302 दि.6/8/2003 नुसार दि.1/10/2002 पासून पुढील आदेशापर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. श्री.सिध्दार्थ श्रीमंत सुरवसे यांची मुदत दि.30/9/2002 रोजी संपल्यानंतर लगेच पुढील मुदतवाढीच्या आदेश काढणे क्रमप्राप्त होते. परंतु तसे न करता आस्थापना विभागाने तब्बल एक वर्ष चार महिन्यांनी मुदतवाढीचे आदेश निर्गमित केले. तसेच श्री.सिध्दार्थ श्रीमंत सुरवसे यांची मुदत दि.30/9/2002 रोजी संपलेली असताना ही सदर कर्मचा-याला कोणतेही आदेश नसताना आस्थापना विभागाने दि.5/8/2003 पर्यंत वेतन व इतर सेवेचे लाभ दिलेले आहेत. तसेच श्री.सिध्दार्थ श्रीमंत सुरवसे यांचे दि.1/10/2002 पासून दि.5/8/2003 पर्यंत कोणतेही मुदतवाढीचे आदेश नसताना अंतर्गत लेखापरिक्षक यांनी एक वर्ष चार महिन्याचे वेतन देयके कशी मंजूर केली, कोणत्या नियमान्वये देयके मंजूर केली याचा खुलासा लेखापरिक्षणास करण्यात आलेला नाही. तोपर्यंत श्री.सिध्दार्थ श्रीमंत सुरवसे यांच्या वेतनावर झालेला खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DPSKGGM6001 (Ref No : 37, Hmm No : 59)

## *139 अग्निशमन विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***खालील कर्मचा-यांची सेवापुस्तके तपासली असता, संबंधीत कर्मचा-याना त्यांचे सेवेची 12 वर्षे पूर्ण झाल्यावर कालबध्द पदोन्नती देण्यात आलेली आहे. मात्र कोणत्याही कर्मचा-याची जातपडताळणी प्रमाणपत्रे न घेताच कालबध्द पदोन्नती देण्यात येऊन नियमित वेतनवाढी काढणेत आल्याचे दिसून येते***

अग्निशमन विभागाकडील फायरमन व शिपाई यांची सेवापुस्तके पडताळणी केली असता, खालील त्रुटी दिसून आल्या.

| अ.क्र. | सेवकाचे नाव | नेमणुक दिनांक | कालबध्द दिनांक | शैक्षणिक अर्हता | जात पडताळणी प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|
| 1 | रेवणसिद्ध एस मायनाळे | 1/4/97 | 1/4/09 | 7 वी | - |
| 2 | केराप्पा एस हुलसुरे | 1/4/97 | 1/4/09 | 10 वी | नाही |
| 3 | जिवनदास पी हलसगी | 17/8/98 | 17/8/10 | 10 वी | नाही |
| 4 | बिराजदारी बि.एम. | 14/4/05 | ------ | 10 वी | नाही |
| 5 | कासिमअली एम. कुरेशी | 1/4/97 | 1/4/09 | 8 वी | - |
| 6 | विश्वनाथ एस. मसन कर | 1/4/97 | 1/4/09 | 8 वी | - |
| 7 | विनायक एम.पतंगे | 2/6/03 | ---- | 2 री | नाही |
| 8 | विठ्ठल बी.हिरासकर | 16/9/92 | ----- | 9 वी | नाही |
| 9 | अप्पासाहेब आर.पांढरे | 16/9/92 | 12/10/07 | 10 वी | - |
| 10 | काटकर प्रल्हाद विठ्ठल | 16/9/92 | 11/10/07 | 10 वी | नाही |
| 11 | ईराण्णा रामचंद्र जाबा | 16/9/92 | 16/9/04 | 10 वी | - |
| 12 | शामराव मल्लपा कोरे | 1/2/03 | ---- | 10 वी | - |
| 13 | भिमसिंग एल.फट्फटवाले | 1/4/97 | 1/4/09 | 7 वी | - |
| 14 | खैरुनबी ओ.शेख | 1/7/89 | 1/7/01 | अशिक्षित | - |
| 15 | सिद्धराम एस. अडगळे | 1/4/97 | 1/4/09 | 9 वी | - |
| 16 | जोगदंड बी.बी. | --- | ---- | 11 वी | - |
| 17 | वाघमोडे एस.डी. | 18/11/95 | 18/11/07 | 10 वी | - |
| 18 | काळजे ए.के. | 9/1/89 | 9/1/01 | 6 वी | - |
| 19 | स्वामी एस.एस. | 16/9/92 | 14/7/94 | 8 वी | - |
| 20 | गावडे टी.जी. | 24/12/94 | 24/12/06 | 7 वी | नाही |
| 21 | मदनावाले एस.के. | 1/7/88 | 16/11/02 | 11 वी | - |
| 22 | कट्टीमनी डी.एस. | 2/9/02 | ----- | 9 वी | नाही |
| 23 | दुपारगुडे डी.के. | 29/4/95 | 29/4/07 | 7 वी | नाही |
| 24 | कोळी बी.टी. | 1/5/86 | 30/4/98 | 6 वी | नाही |

279) उपरोक्त कर्मचा-याची सेवापुस्तके तपासली असता, संबंधीत कर्मचा-याना त्यांचे सेवेची 12 वर्षे पूर्ण झाल्यावर कालबध्द पदोन्नती देण्यात आलेली आहे. मात्र कोणत्याही कर्मचा-याची जातपडताळणी प्रमाणपत्रे न घेताच कालबध्द पदोन्नती देण्यात येऊन नियमित वेतनवाढी

काढणेत आल्याने वेतनवाढीची परिगणना करुन रक्कम वसूल करण्यात यावी..

280) श्री.विश्वनाथ एस.मसन कर, श्री.भिमसिंग लक्ष्मण फटफटवाले यांचे शिक्षण 7 वी पर्यंत असताना त्यांना कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आला व श्रीमती खैरूनबी ओ. शेख यांची शैक्षणिक पात्रता काही नसताना कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिलेला आहे. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-1095/प्र.क्र.1/95/12 दि.8/6/1995 परिच्छेद 2(ब) नुसार कालबध्द पदोन्नती देतना वरिष्ठ पदास असलेली शैक्षणिक अर्हता नसलेस कालबध्द पदोन्नतीचा लाभ देता येत नसलेचे नमुद असतानाही वरिष्ठ पदास असलेली शैक्षणिक आहर्तता न तपासता लाभ दिलेला आहे.

281) श्री.काळजे एस.के., श्री.गावडे, श्री.दुपारगुडे आणि श्री.कोळी यांना प्रथमत: फायरमन म्हणून नियुक्ती करणेत येऊन वाहनचालक पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरची पदोन्नती देताना वाहन चालक पदास असलेली आवश्यक शैक्षणिक अर्हता तपासण्यात आली किंवा नाही हे समजुन येत नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.62 दि.02/09/2013 चे उत्तर दि.30/09/13 रोजी दिलेले आहे .दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

DATASDM5602 (Ref No : 38, Hmm No : 62)

### *140 श्री.मल्लिकार्जून भिमा गजधाने, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकातील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***श्री.मल्लिकार्जून भिमा गजधाने हे मार्च 1996 पासून ते डिसेंबर 2012 पर्यंत एकूण 1744 दिवस वैयक्तिक कारणासाठी अनुपस्थित आहेत. याबाबत त्यांचेवर कोणतीही कारवाई केलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका, विभागीय कार्यालय क्र.1 मधील कार्यरत सफाई कर्मचारी श्री.मल्लिकार्जून भिमा गजधाने यांचे सेवापुस्तके तपासले असता, खालील त्रुटी लेखापरिक्षणास आढळून आले आहेत.

श्री.मल्लिकार्जून भिमा गजधाने, सफाई कामगार यांचा 2001 पासूनचा रजा लेखा तपासला असता, दि.1/7/2010 ते 30/6/2013 पर्यंत रजा लेखा खतविण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर कर्मचा-यानी किती रजा उपभोगल्या व किती शिल्लक राहिल्या याचा ताळमेळ घेता आलेला नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 रजा प्रकरण 4 कलम 57 अन्वये अनुपस्थित रजा मंजुर करणेचे अधिकार आयुक्त यांना असताना विभागीय अधिकारी यांनी सलग दोन ते तीन महिने संबंधीत कर्मचा-याला अनुपस्थित राहण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री.मल्लिकार्जून भिमा गजधाने यांनी मार्च 1996 पासून ते डिसेंबर 2012 पर्यंत एकूण 1744 दिवस अनुपस्थित असल्याचे सेवापुस्तकामधील नोंदीवरुन दिसुन येते . परंतु सदर अनुपस्थित कालावधीबाबत प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाची नोंद सेवा पुस्तकात आढळुन आली नाही.

शासन निर्णय क्र.वेतन-1999/प्र.क्र.2/99/सेवा-3 दि.20/7/2001 व सोलापूर महानगरपालिका आदेश क्र.सआस/कक्ष-1/आस्था-2/184 दि.10/5/2005 अ.नं.9 अ.4 सतत गैरहजर राहणा-या कर्मचा-याला कालबध्द पदोन्नती किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देऊ नये असे स्पष्ट आदेश असताना विभागीय अधिकारी क्र.1 व आरोग्याधिकारी यांनी श्री.मल्लिकार्जून गजधाने यांना कालबध्द पदोन्नती देण्यासाठी शिफारस केलेली आहे. तसेच आरोग्याधिकारी व विभागीय अधिकारी यांनी सदर कर्मचा-याला कालबध्द पदोन्नती मिळविण्यासाठी कर्मचा-याची वर्तणूक चांगली व काम समाधानकारक आहे तसेच त्याची दीर्घकालीन विनापरवाना गैरहजेरी नाही असे प्रमाणपत्र दिले आहे. तसेच सदर अनियमिततेबाबत विभागीय अधिकारी क्र.1 व आरोग्याधिकारी यांनी लेखापरिक्षणास खुलासा सादर केलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.67 दि.16/09/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 40, Hmm No : 67)

### *141 श्रीमती सिध्दम्मा कोंडय्या येनमूल, सफाई कामगार यांच्या विनापरवाना गैरहजेरीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***श्रीमती येनमूल यांच्या दि.13/8/2010 ते दि.4/8/2012 पर्यंतच्या एकूण 722 दिवसांच्या अनुपस्थितीबाबत प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाची नोंद सेवा पुस्तकात आढळुन आलेली नाही. तसेच 2011 मध्ये 365 दिवस आणि 2012 मध्ये 216 दिवस गैरहजर असल्याचे त्यांच्या हजेरी पटाची तपासणी केली असता दिसून येते. परंतु सदर गैरहजेरी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाही.***

विभागीय कार्यालय क्र.2 च्या प्रभाग क्र.2 मधील श्रीमती कोंडय्या येनमूल, सफाई कामगार ह्या

दि.26/6/2007 पासून विनापरवाना गैरहजर होत्या. त्यानंतर त्यांनी दि.11/1/2008 रोजी पुन्हा सेवेत रूजू करून घेण्याबाबत महानगरपालिकेस कळविल्याने त्यांना दि.19/6/2008 रोजी त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई न करता जा.क्र.1/आअ/आस्था-8/1/ नअ/11 दि.18/6/2008 अन्वये पुन्हा सेवेत रूजू करून घेण्यात आले. परंतु त्या पुन्हा दि.13/8/2010 पासून विनापरवाना गैरहजर राहिल्या. त्यानंतर त्यांनी दि.25/6/2012 रोजी कामावर घेणेबाबतचा अर्ज सादर केला. त्यानुसार म.न.पा.ने जा.क्र.1/आअ/आस्था-1/171 दि.5/7/2012 अन्वये त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन दि.4/8/2012 पासून पुन्हा सेवेत रूजू करून घेतले. श्रीमती येनमूल यांच्या दि.13/8/2010 ते दि.4/8/2012 पर्यंतच्या एकूण 722 दिवसांच्या अनुपस्थितीबाबत प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाची नोंद सेवा पुस्तकात आढळुन आलेली नाही.

श्रीमती येनमूल यांना वार्षिक वेतनवाढ देताना त्यांच्या अनुपस्थितीच्या कालावधीचा विचार न करता नियमित वेतनवाढ दिली असल्याने या कालावधीच्या वेतनाची परिगणना करुन वसुली करणेत यावी. श्रीमती येनमूल, सफाई कामगार यांनी सन 2008 मध्ये 206 दिवस गैरहजर, सन 2009 मध्ये 169 दिवस गैरहजर आणि सन 2010 मध्ये 31 गैरहजर दिवसांची नोंद सेवापुस्तकात घेतली असून, मात्र सन 2011 मध्ये 365 दिवस आणि सन 2012 मध्ये 216 दिवस गैरहजर असल्याचे त्यांच्या हजेरी पटाची तपासणी केली असता, दिसून येते. परंतु सदर गैरहजेरी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र. 72 दि. 21/09/13 चे अनुपलन सादर केलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 79, Hmm No : 72)

## *142 सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडील लेखे/नोंदवह्या नियमानुसार न ठेवणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भांडार खरेदी महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 145 नुसार व राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) जोडपत्रातील एसटी 1 ते एसटी 3 अन्वये भांडार लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.***

सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेमार्फत मुख्यालय तसेच अन्य प्रशासकीय विभाग व

विभागीय कार्यालये यांचेकरीता वर्ग 4 कर्मचा-यांचे गणवेश, झेरॉक्स पेपर, फाईल कव्हर्स व तत्सम दैनंदिन उपभोग्य भांडार साहित्याची खरेदी केली आहे. नोंदवहया/लेखे ठेवण्याबाबत पुढील अनियमितता आढळुन आल्या.

282) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 145(1) नुसार नोंदवही नमुना क्र. 116 व 117 मध्ये उपभोग्य भांडार साहित्याच्या नोंदी ठेवणे आवश्यक असताना सदर नमुन्यात नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नाहीत. तसेच जरुरीप्रमाणे प्रत्येक प्रकारच्या वस्तुमालाकरीता स्वतंत्र पृष्ठे वापरण्यात आलेली नाहीत.

283) नियम क्र. 145(2) अन्वये प्रत्येक महिनाअखेरीस लेखा पुर्ण करुन वस्तुमालाची शिल्लक पडताळणी करुन पुढील महिन्याची प्रारंभिक शिल्लक म्हणुन नोंद घेतली पाहिजेत. अशी कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.

284) महानगरपालिकेकडे ठेवण्यात आलेल्या नोंदवहयांमध्ये पुरवठा प्राप्त वस्तुंची फक्त संख्या नोंदविण्यात येते. अशा वस्तुंची नोंद घेताना त्याचा चलन क्रमांक, बीजक क्रमांक, वस्तुची प्रतिनग किंमत, बीजकाची एकुण रक्कम नोंदविणे आवश्यक आहे. तसेच वस्तुचा वापर नोंदविल्यावर हाती शिल्लक नोंदविणे आवश्यक आहे. तथापि अशा पध्दतीने नोंदी घेण्यात येत नाहीत.

285) शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि. 6/7/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील ( National Municipal Accounts Manual) जोड्पत्रातील एसटी 1 ते एसटी 3 या नमुन्यात भांडार लेखे ठेवणे आवश्यक आहे. ही कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.

DATSCDM5901 (Ref No : 101, Hmm No : 56)

## *143 मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाचे मंजुर कर्मचारी आकृतीबंध व लेखापरिक्षण अहवालाबाबत .*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सा.प्र.वि. महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 3 मधील दोन नुसार मुख्यलेखापरिक्षकाने 5 (1)***

***प्रमाणे महानगरपालिकेची लेखा परिक्षा करणे आवश्यक आहे तसेच 5 (3) व (4) प्रमाणे 11/12 चा अहवाल तयार केलेला नाही.***

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 51(1) अन्वये स्थायी समितीने मुख्यलेखापरिक्षक यांचे अधिनस्त काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांची संख्या, पदनाम, श्रेणी, वेतन, फी व भत्ते कलम 51 चे पोटकलम (4) च्या तरतुदीच्या अधिन ठरविलेचा ठराव लेखापरिक्षणास देणेत आलेला नाही.

2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (2) नुसार स्थायी समितीच्या मान्यतेने मुख्य लेखापरिक्षक कार्यालयात नेमणुक केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची यादी लेखापरिक्षणास सादर करावी. नियमाप्रमाणे यादी नसलेस 2011-12 या वर्षात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची नेमणुक कोणामार्फत करणेत आली तसेच सदर कर्मचारी कोणत्या विभागातून मुख्य लेखापरिक्षक कार्यालयात कोणत्या कालावधीसाठी बदलीने कार्यरत आहेत याबाबतची माहिती लेखापरिक्षणास दिलेली नाही.

3) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे प्रकरण 3 मधील दोन नुसार मुख्यलेखापरिक्षकाने 5 (1) प्रमाणे महानगरपालिकेची लेखा परिक्षा करणे आवश्यक आहे व 5 (3) व (4) प्रमाणे लेख्या संबंधीचा अहवाल तयार करुन स्थायी समितीस सादर करणे आवश्यक असता 11/12 या अर्थिक वर्षाचा अहवाल स्थायी समितीस तयार करुन सादर केलेला नाही.

4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे कलम 105 (1) नुसार नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने 11/12 या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी व लेखापरिक्षा करुन अहवाल स्थायी समितीकडे पाठविलेला नाही.

5) मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाने दिलेल्या माहितीप्रमाणे 09-10 चे वार्षिक लेखापरीक्षण अहवालाप्रमाणे एकूण 3714 आक्षेप प्रलंबित आहेत.

6) अर्धसमास ज्ञापन क्र.84 दि.08/10/2013 ला दिलेल्या उत्तरामध्ये स्थायी समितीने 9 आक्षेपांच्या अनुपालनास मान्यता दिली आहे.

DATSBKM7201 (Ref No : 110, Hmm No : 84)

## *144 अग्निशामन विभागाकडील जमा रक्कमांच्या तपासणीत आढळलेल्या त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : आग प्रतिबंधक शुल्क महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

***महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मध्ये अग्निशामक सेवा सुधारणेसाठी उंच इमारतीमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक सुधारणा करणे,आग प्रतिबंधक शुल्क फी आकारणीचे दर इ.बाबत नियमावली तयार करणेत आली आहे.त्यानुसार अग्निसुरक्षा फंड फीच्या रक्कमा धनादेशाने स्विकारण्यात आल्या असून, नियमानुसार धनादेश वटण्यापूर्वी कच्ची पावती देण्यात येऊन धनादेश वटल्यावर पक्की पावती देणे अपेक्षित असता पक्क्या पावतीनेच धनादेश घेण्यात आलेले आहेत.***

अग्निशामन दल विभागातील जमा रक्कमाची तपासणी केली असता, खालील नमूद केलेल्या अग्निसुरक्षा फंड फीच्या पावत्यांचा रक्कमा धनादेशाने स्विकारण्यात आल्या असून, नियमानुसार धनादेश वटण्यापूर्वी कच्ची पावती देण्यात येऊन धनादेश वटल्यावर पक्की पावती देणे अपेक्षित असता पक्क्या पावतीनेच धनादेश घेण्यात आलेले आहेत.

| पावती क्रमांक | दिनांक | रक्कम | धानदेश क्रमांक | दिनांक | बँकेचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| 0047316 | 12/5/11 | 20000 | 013373 | 12/5/11 | व्यापारी सह.बँक |
| 0047322 | 8/6/11 | 20000 | 515482 | 2/6/11 | लोकमगल बँक |
| 0047328 | 24/6/11 | 1113 | 196803 | 23/6/11 | ब्रम्हदेवमानेसह.बँक |
| 0047335 | 6/7/11 | 20000 | 148608 | 6/7/11 | व्यापारी सह.बँक |
| 0047344 | 13/7/11 | 35000 | 867985 | 13/7/11 | समर्थ सह.बँक |
| 0047345 | 14/7/11 | 20000 | 867630 | 14/7/11 | समर्थ सह.बँक |
| 0047349 | 26/7/11 | 172020 | 037890 | 26/7/11 | अलाहाबाद बँक |
| 0047371 | 5/10/11 | 20000 | 942172 | 5/10/11 | इंडियन बँक |
| 0047380 | 11/10/11 | 2809 | 000030 | 8/9/11 | बँक ऑफ इंडिया |
| 0047400 | 30/11/11 | 20000 | 333785 | 30/11/11 | बॉम्बे मर्कंटाई बँक |
| 0096004 | 8/12/11 | 3555 | 157492 | 1/12/11 | आयएनजी वैश्य बँक |
| 0096006 | 14/12/11 | 40000 | 230982 | 14/12/11 | विकास बँक |
| 0096012 | 22/12/11 | 20000 | 182212 | 20/12/11 | व्यापारी सह.बँक |
| 0096014 | 2/1/12 | 30000 | 522710 | 24/12/11 | कॅनरा बँक |
| 0096022 | 17/1/12 | 20000 | 026685 | 17/1/12 | बँक ऑफ इंडिया |
| 0096064 | 14/3/12 | 50000 | 016377 | 14/3/12 | लक्ष्मी को.आपॅ.बँक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 0096075 | 30/3/12 | 25000 | 967606 | 30/3/12 | आयएनजी वैश्य बँक |

सदरच्या रक्कमा स्विकारताना संबंधीत विकासकांना आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपकरणे उंच इमारतीमध्ये बसविणेच्या अटींच्या अधीन राहून बांधकाम परवाना देण्याबाबत अग्निशामन विभागामार्फत ना हरकत दाखला देण्यात येतो. अर्धसमास ज्ञापन क्र.63 दि.2/9/2013 ला विभागाने दि.30/09/13 रोजी उत्तर दिलेले आहे.दिलेले उत्तर संयुक्तिक नाही. दिलेल्या उत्तरामध्ये सर्व धनादेश वटल्याचे लेखा विभागाने पत्र दिले आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 प्रकरण 2(3 )नुसार मालक किंवा भोगवटादाराने आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना बाबतची तरतुद केली आहे या बाबतचे प्रमाणपत्र मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.परंतु या अटीची पुर्तता केलेबाबतची प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नाहीत.

DATASDM5602 (Ref No : 39, Hmm No : 63)

## *145 महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमांच्या उल्लंघनाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : वृक्षांचे संरक्षण व संवर्धक वनमहोत्सव महापालिका निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 नियम क्र.8(5) अन्वये अर्जदाराने झाड तोडल्याच्या जागी अथवा अन्य योग्य जागी त्याच जातीचे अथवा स्थानिक जातीचे झाड लावणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे नविन वृक्ष न लावल्यास वृक्ष अधिकारी निर्देश देतील ऐवढी रक्कम दंडा दाखल अर्जदारास भरावी लागेल. अशा प्रकारची दंडात्मक रक्कम सन 2011-12 मध्ये जमा केल्याबाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे लेखापरिक्षण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

286) उपरोल्लेखित अधिनियमाच्या नियम 3(1) अन्वये कमीत कमी 5 आणि जास्तीत जास्त 15 व्याक्तिंची एक वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.4/6/2007 रोजी

एकूण 6 सदस्यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. नियम क्र.4(1) अन्वये सदर समितीची बैठक प्रत्येक महिन्यात मा. अध्यक्ष ठरवतील अशा ठिकाणी व वेळी घेण्यात येणे आवश्यक आहे. परंतु सोलापुर महानगरपालिकेच्या सदर वृक्ष प्राधिकरण समिती च्या बैठका दर महिन्याला होत असल्याबाबतची कागदपत्रे/नोंदवह्या लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाहीत.

287) वृक्षतोड परवाना नोंदवही पडताळली असता सन 2011-12 मध्ये एकूण 12 वृक्षतोड परवानगी प्रकरणामध्ये एकूण 13 वृक्ष तोडण्याची परवानगी प्राधिकरणातर्फे देण्यात आल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी नियम क्र.8(5) अन्वये अर्जदाराने झाड तोडल्याच्या जागी अथवा अन्य योग्य जागी त्याच जातीचे अथवा स्थानिक जातीचे झाड लावणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे नविन वृक्ष न लावल्यास वृक्ष अधिकारी निर्देश देतील ऐवढी रक्कम दंडा दाखल अर्जदारास भरावी लागेल. झाडे तोडलेच्या ठिकाणी एकूण नविन झाडे किती लावणेत व जगविणेत आली याची नोंदवही तसेच झाडे न लावलेने दंडात्मक रक्कम सन 2011-12 मध्ये जमा केल्याबाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

288) नियम क्र.8(3) (ख) अन्वये झाड तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा अहवाल वृक्षप्राधिकरण समितीने महानगरपालिकेस 6 महिन्यातुन एकदा सादर करणे आवश्यक आहे. याबाबतचा अहवाल सादर झाला नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसुन येते.

289) नियम क्र.7(च) अन्वये फुले, फळे, भाज्या, झाडे किंवा रोपे यांची प्रदर्शने (वर्षातुन किमान एकदा) आयोजित करणे व अशी प्रदर्शने आयोजित करण्यासाठी खाजगी व सार्वजनिक संस्थाना सहाय्य करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची प्रदर्शने आयोजित केल्याबाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध होऊ शकली नाही. यापुर्वी शेवटचे प्रदर्शन सन 1992 मध्ये आयोजित करण्यात आल्याचे प्रदर्शन अहवाल पुस्तिकावरुन समजते.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 116, दिनांक 12.11.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 50, Hmm No : 116)

## *146 अन्न व परवाना विभागाच्या नर्सिंग होमच्या नोंद वहीतील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : परवाना शुल्क महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 13400.00/-

***मुंबई नर्सिंग होम्स नोंदणी कायदा, 1949 मधील सेक्शन 5 अन्वये 10 बेड असलेल्या नर्सिंग होमकडून रू.100/-***

***आणि 10 बेड पेक्षा अधिक बेड असणाऱ्या नर्सिंग होम्सकडून रू.200/- या शासकीय दराने नुतनीकरण करणे आवश्यक आहे. नर्सिंग होम नोंदवहीनुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील एकूण 246 नर्सिंग होम पैकी खालील 27 नर्सिंग होम्सकडे 2011-12 मधील नुतनीकरणाचा आकार रु. 13400/- वसुल करणेत यावा.***

आरोग्य खात्याअंतर्गत असलेल्या अन्न व परवाना विभागामधून नर्सिंग होमच्या नोंदवही तपासली असता सदरच्या नोंद वही मध्ये घेतलेल्या नर्सिंग होमच्या नुतनीकरणाच्या नोंदी आरोग्य विभागातील संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांने प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही.

1. मुंबई नर्सिंग होम्स नोंदणी कायदा, 1949 मधील सेक्शन 5 अन्वये ,10 बेड असलेल्या नर्सिंग होम कडून रू.100/- आणि 10 बेड पेक्षा अधिक बेड असणाऱ्या नर्सिंग होम कडून रू.200/- असा शासकीय दराने नुतनीकरण आकार आकारला जातो. त्यानुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील एकूण 246 नर्सिंग होम्सपैकी खालील 27 नर्सिंग होम्सकडे 2011-12 मधील नुतनीकरणाचा आकार रु. 13400/- प्रलंबित आहे.

| अ.नं. | डॉक्टरांचे नांव | नोंदवही क्र. व पृष्ठ क्र. | एकूण बेडची संख्या | प्रलंबित आका |
|---|---|---|---|---|
| 1. | डॉ.शांता के.हिरेमठ | 13/9 | 10 | 100 |
| 2. | डॉ.कमल आर.अवरेकर | 13/11 | 6 | 100 |
| 3. | डॉ.कांता बसवंती | 13/13 | 4 | 100 |
| 4 | डॉ.राठी | 13/17 | 10 | 10400 |
| 5 | डॉ.के.बी.चंडोक | 13/25 | | 200 |
| 6 | डॉ.सी.व्ही.किनीकर | 13/26 | 10 | 100 |
| 7 | डॉ.कोठाडीया | 13/30 | 40 | 200 |
| 8 | डॉ.तलकोकुल | 13/33 | 9 | 100 |
| 9 | डॉ.बोल्ली | 13/43 | 6 | 100 |
| 10 | डॉ.गुल्लापल्ली | 13/53 | 6 | 200 |
| 11 | डॉ.पिरजादे | 13/61 | 4 | 100 |
| 12 | डॉ.पटवेकर | 13/68 | 5 | 100 |
| 13 | डॉ.घोष | 13/78 | 5 | 100 |
| 14 | डॉ.ईरण्णप्पा | 13/91 | 10 | 100 |
| 15 | डॉ.हफीस शेख | 13/98 | 12 | 200 |
| 16 | डॉ.गांधी | 13/124 | 7 | 100 |
| 17 | डॉ.जमादार | 13/130 | 4 | 100 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 18 | डॉ.एच.एच.शेख | 13/136 | 7 | 100 |
| 19 | डॉ.जोग | 13/148 | 5 | 100 |
| 20 | डॉ.ए.जी.पाटील | 13/152 | 10 | 100 |
| 21 | डॉ.अनागिरे | 13/163 | 10 | 100 |
| 22 | डॉ.राजकुमार पाटील | 13/176 | 5 | 100 |
| 23 | डॉ.के.सी.कडापा | 13/197 | 5 | 100 |
| 24 | डॉ.इम्तियाज शेख | 13/ए/2 | 10 | 100 |
| 25 | डॉ.राजगोपाल कोरवा | 13/ए/9 | 5 | 100 |
| 26 | डॉ.मनिषा भोसले | 13/ए/16 | 5 | 100 |
| 27 | डॉ.तृप्ती खटावकर | 13/ए/37 | 5 | 100 |
| | | | एकूण | 13400 |

2. मुंबई नर्सिंग होम नोंदणी कायदा, 1941 च्या सेक्शन 6 अन्वये एखाद्या नर्सिंग होम ने तीन वर्षामध्ये नुतनीकरण करणे आवश्यक आहे. जर त्यांनी तीन वर्षामध्ये नुतनीकरण केले नाही तर सदर संस्थाधारकास सहा महिन्याचा तुरूंगवास किंवा रू.10000/- पर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. म.न.पा.च्या वरील थकीत नर्सिंग होम्स पैकी अ.क्र. 4 मधील डॉ. राठी यांनी सन 2008-09 नंतर त्यांच्या नर्सिंग होमचे नुतनीकरण न केल्याचे नोंदवहीवरून दिसून येते. वरील कायद्यानुसार श्री.राठी यांचे विरूध्द दंडात्मक कारवाई करणेत आलेली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र. 76 दि. 30/09/13 चे उत्तर दिलेले नाही.

DATRADM5901 (Ref No : 80, Hmm No : 76)

## *147 नगर अभियंता, भांडार (मुख्यालय) विभागाकडील सिमेंट खरेदीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भांडार महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता नियम 10.2.21 च्या (ए) नुसार ठेकेदारास आगाऊ रक्कम देण्यावर प्रतिबंध असताना नियमबाह्यरित्या आगाऊ रक्कम रू. 28000/- देण्यात आली आहे.***

नगर अभियंता भांडार विभागाकडुन विभागीय कार्यालय क्र. 1 ते 6 व मुख्य कार्यालयाकरीता दैनंदीन देखभाल दुरुस्तीच्या कामाकरीता प्रत्येक खेपेस 100 पोतीप्रमाणे बाजारभावाने सिमेंट खरेदी केली आहे. याकरीता सर्वसाधारणपणे प्रत्येक तिमाहीकरीता बाजारातुन दरपत्रके मागविण्यात आली आहेत व कमी दराच्या दरपत्रक धारकाकडुन खरेदी करण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष 2011-12 मधील सिमेंट खरेदी प्रक्रियेची नस्ती तपासली असता पुढील अनियमितता आढळुन आल्या.

290) अधिकृत पुरवठादाराकडुन दरपत्रके मागविणेकामी मागणीपत्र पाठविलेचे नस्तीमध्ये निदर्शनास आले नाही. दि.29/7/2011 रोजी 3 दरपत्रके प्राप्त असुन ती उघडण्यात आली व कमी दरपत्रक धारक मे. लोणावत असोसिएट्स यांना आगाऊ रक्कम रु. 28000/- अदा करणेकरीता आदेश निर्गमित करण्यात येऊन दि. 18/8/2011 रोजी सदर रकमेचे प्रदान करण्यात आले. मे. लोणावत असोसिएट्स यानी चलन क्र. 5105 दि. 19/8/2013 अन्वये वस्तुमालाचा पुरवठा केला आहे. मे. लोणावत असोसिएट्स यानी कोणतेही बिजक/इन्व्हॉइस सादर केलेले नसताना व वस्तुमाल प्राप्त होण्यापुर्वी संबंधितास आगाऊ रक्कम प्रदान करण्यात आली.

291) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता नियम 10.2.21 च्या (ए) नुसार ठेकेदारास आगाऊ रक्कम देण्यावर प्रतिबंध असताना नियमबाह्यरित्या रु. 28000/- आगाऊ रक्कम देण्यात आली आहे.

292) पुरवठादार उत्पादक कंपनीचा अधिकृत पुरवठादार असल्याचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

293) दरपत्रके सिमेंटच्या ग्रेडनुसार आय.एस.आय. चिन्हांकित असलेल्या कंपनीकडुन मागविणे आवश्यक असताना आय.एस.आय. चिन्हांकित नसलेल्या अल्ट्राटेक कंपनीची मागविण्यात आली आहेत. खरेदी करण्यात आलेले सिमेंट किती ग्रेडचे व कंपनीचा विक्रीचा दर किती होता याबाबतची माहिती बिजकाअभावी उपलब्ध नसताना देयके पारीत करण्यात आली आहेत.

294) प्रत्येक तिमाहीकरीता 100 पोतीप्रमाणे खरेदी केली असल्याने वार्षिक खरेदी रु. 50000/- पेक्षा अधिक होत असल्याचे निदर्शनास येते. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6 दि. 2 जाने. 1992 मधील परिच्छेद क्र. 8.3(फ) नुसार एखाद्या वस्तुची वार्षिक खरेदी रु. 50000/- पेक्षा अधिक होत असल्यास राजपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन खरेदी प्रक्रिया राबविणे बंधनकारक असताना दरपत्रके मागवुन खरेदी करण्यात आली.

295) विभागीय कार्यालयीन स्तरावरुनही या बाबीची आवश्यकतेनुसार स्वतंत्ररित्या खरेदी केली आहे. याबाबतचे प्राधिकार प्रदान केल्याबाबतचे प्राधिकारपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही, त्यामुळे विभागीय कार्यालयास किती रकमेपर्यंत खरेदीच्या शक्ती प्रदान करण्यात आल्या

आहेत याचा बोध होत नाही. अशा शक्ती प्रदान केल्या असल्यास त्याची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.44 दि. 26/8/2013 अन्वये कळविण्यात आले होते तथापि प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

296) एकाच बाबीची, मुख्यालयासह सर्वच विभागात आवश्यकता असताना प्रत्येक विभागाने स्वतंत्रपणे सदर बाबीची खरेदी करणे, हि बाब नियमबाह्य आहे. एकत्रितरित्या खरेदी करण्याचा महानगरपालिकेस फायदा झाला नाही. जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन एखाद्या संस्थेसोबत वार्षिक दर करार करुन त्या संस्थेकडे आवश्यकतेनुसार वेळोवेळी दरकरारानुसार मागणी नोंदविणे शक्य आहे. अशा पध्दतीची कार्यवाही केली नाही.

297) सिमेंटचा वापर ज्या कामांकरीता करण्यात आला त्या कामांची मोजमापे, अंदाजपत्रके मोजमाप पुस्तिका व देयके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

DATSCDM5901 (Ref No : 100, Hmm No : 44)

## *148 बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील अभियंत्यांनी मोजमाप पुस्तिकेमध्ये नियमानुसार मोजमापे नोंदविली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेच्या बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील कामांच्या मोजमाप पुस्तिकांची तपासणी केली असता सहाय्यक अभियंता यांनी 20%, उपअभियंता यांनी 10% व नगर अभियंता यांनी 5% एवढीच कामाची तपासणी बाबवार न दाखविता अंतिम मोजमाप तपासले म्हणून दाखविणेत आली आहे.***

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट 24 खालील नियम 11 मध्ये उल्लेखिलेल्या मोजमाप नोंदणीच्या अधिकारांच्या अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याबाबत सां.बां.वि.महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकिर्ण/1097 सी आर/622 इमारती 2-दिनांक 1999.29.06 नुसार निर्गमित करणेत आला आहे. त्यानुसार ज्या कामाचे मुल्य 1.50 लाखापेक्षा अधिक परंतु 2.50 लाखापेक्षा कमी नसेल त्यावेळी 50 टक्के तपासणी ही सहायक अभियंता/उप अभियंता/उपविभागिय अभियंता /उपविभागिय अधिकारी या दर्जाच्या अधिकारी यांनी केली पाहिजे. तथापि प्रत्यक्ष मोजमापांची शतप्रतिशत तपासणी वरील अधिका-यांनी केली पाहिजे. ज्या प्रकरणी कामाचे एकुण मुल्य 2.50 लाखापेक्षा अधिक असेल अशा प्रकरणी अंतिम मोजमापे

ही सहायक अभियंता/उप अभियंता/उपविभागिय अभियंता/उपविभागिय अधिकारी या दर्जाच्या अधिकारी यांनी स्वत: नोंदवावी किंवा त्याने कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहा अभियंता हयांनी नोंदविलेल्या अशा मोजमापांची शतप्रतिशत तपासणी केली पाहिजे. निविदेवर, दरसूचीवर केलेल्या किंवा फुटकळ कामासाठी एका महिन्यात प्रदान केलेल्या देयकापैकी 5 टक्के देयकांची तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करावी. तसेच अशा प्रत्येक देयकातील केलेल्या कामाच्या 5 टक्के मुख्य कामांची तपासणी करावी. हया व्यतिरिक्त ज्या कामातील एका बाबीचे अंदाजीत मुल्य रु.1.50 लाखापेक्षा अधिक असेल अशा बाबतीत त्याने किमान 5 टक्के तपासणी करावी. इतर सर्व प्रकरणी ज्यावेळी अंतिम देयकाची एकुण रक्कम रु 2.50 लाखपेक्षा अधिक असेल त्या प्रकरणी 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी केलीच पाहिजे. वर दिलेल्या परिमाणात अंतिम मोजमापे ही कार्यकारी अभियंता यांनी अंतिम प्रदान करणे पुर्वी तपासलीच पाहिजेत. परंतु महानगरपालिकेच्या बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील कामांच्या मोजमाप पुस्तिकांची तपासणी केली असता सहाय्यक अभियंता यांनी 20%, उपअभियंता यांनी 10% व नगर अभियंता यांनी 5% एवढीच कामाची बाबवार तपासणी न दाखविता अंतिम मोजमाप तपासले म्हणून दाखविणेत आली आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.196 दि.04/02/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 155, Hmm No : 196)

## *149 नगर अभियंता, भांडार विभागाकडील लेखे/ नोंदवहया नियमातील तरतुदीनुसार न ठेवणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भांडार खरेदी महनगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 145 नुसार व राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) जोड्पत्रातील एसटी 1 ते एसटी 3 अन्वये भांडार लेखे ठेवण्यात येत नाहीत.***

नगर अभियंता, भांडार विभागाकडील लेखे/ नोंदवहयांची तपासणी केली असता पुढील अनियमितता आढळुन आल्या.

298) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 145(1) नुसार नोंदवही नमुना क्र. 116 व 117 मध्ये उपभोग्य भांडार साहित्याच्या नोंदी ठेवणे आवश्यक असताना सदर नमुन्यात

नोंदवह्या ठेवण्यात आलेल्या नाहीत. तसेच जरुरीप्रमाणे प्रत्येक प्रकारच्या वस्तुमालाकरीता स्वतंत्र पृष्ठे वापरण्यात आलेली नाहीत . नियम क्र. 145(2) अन्वये प्रत्येक महिना अखेरीस लेखा पुर्ण करुन वस्तुमालाची शिल्लक पडताळणी करुन पुढील महिन्याची प्रारंभिक शिल्लक म्हणुन नोंद घेतली पाहिजे. अशी कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.

299) महानगरपालिकेकडे ठेवण्यात आलेल्या नोंदवह्यांमध्ये पुरवठा प्राप्त वस्तुंची फक्त संख्या नोंदविण्यात येते. अशा वस्तुंची नोंद घेताना त्याचा चलन क्रमांक , बीजक क्रमांक, वस्तुची प्रतिनग किंमत, बीजकाची एकुण रक्कम नोंदविणे आवश्यक आहे . तसेच वस्तुचा वापर नोंदविल्यावर हाती शिल्लक नोंदविणे आवश्यक आहे. तथापि अशा पध्दतीने नोंदी घेण्यात येत नाहीत.

300) शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि. 6/7/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) जोड्पत्रातील एसटी 1 ते एसटी 3 या नमुन्यात भांडार लेखे ठेवणे आवश्यक आहे. ही कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.

याबाबत देण्यात आलेल्या अर्धसमास ज्ञापनास दि . 27/09/2013 रोजी उत्तर प्राप्त असुन त्यात अर्ध समासात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे नमुद करण्यात आले आहे. कार्यवाही अद्याप प्रलंबित असल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATSCDM5901 (Ref No : 157, Hmm No : 39)

## *150 सुवर्ण जयंती रोजगार योजनेच्या रोकड वहीतील अनियमिततेबाबत.*

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती रोजगार राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2870283.00/-

***महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहीता 1971 नियम क्र.32 नमुना 11 नुसार सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची रोकडवही ठेवणेत आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे लेखा परिक्षण केले असता, संबंधित विभागाने महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.32 नमुना 11 नुसार रोकडवही ठेवलेली नाही, त्यामुळे रोकड वहीतील शिल्लक व पास बुकामधील शिल्लक याचा ताळमेळ घेता आला नाही. तसेच वर्षा

अखेरीस खर्चाचा गोषवारा घेऊन ताळमेळ घेतलेला नाही.

सुवर्ण जयंती रोजगार योजनेचा 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये एकूण खर्च रोकडवही मध्ये रु.18165283/- एवढा दर्शविलेला आहे. परंतु शासनास एम.आय.एस.द्वारे खर्च रु.15295000/- एवढा कळविला आहे. त्यामुळे दोन्ही खर्चामध्ये रु.2870283/- एवढ्या रकमेची तफावत लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे सदरची रक्कम रु.2870283/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र. 169 दिनांक 30/12/2013 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 117, Hmm No : 169)

## *151 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमधील अनियमिततेबाबत.*

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती रोजगार केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 17809279.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2467720.00/-

***शा.नि.क्र.सुजयो-2001/690 प्र.क्र.28 नवि 33 दि.10/5/2002 नुसार प्रकल्प अधिकारी, समुह संघटक यांची पदे कंत्राटी पद्धतीने 1 वर्षासाठी भरणे आवश्यक असताना 2011-12 मध्ये एक प्रकल्प अधिकारी व दोन समूह संघटक कार्यरत होते, व त्यांना वेतनापोटी रु.2467720/- अदा करण्यात आली आहे. पदे मंजूर नसताना स्थायी पदाप्रमाणे नियमित वेतन अदा केले असल्याने रु.2467720/- वसूलपात्र करणेत येत आहेत.***

सोलापूर महानगरपालिका राबवित असलेल्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

नगरपरिषद संचालनालय यांचे परिपत्रक नप्रस लेखा परिक्षण प्र.क्र.380/04/15 दि.24/06/2004 अ.क्र.1,2,3 नुसार योजनेचे लेखापरिक्षण सन दी लेखापाल यांचे कडून प्रतिवर्षी करणे आवश्यक असताना तसे लेखा परिक्षण सोलापूर महानगरपालिकेने केलेले नाही.

शासन निर्णय क्र.सुजयो 2001/690 प्र.क्र.28 / नवि-33 दि.10/05/2002 प्रमुख समुह संघटक व समुह संघटक यांची नेमणूक कंत्राटी पद्धतीने जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीसाठी करणे आवश्यक आहे. परंतु सोलापूर महानगरपालिका आस्थापना कक्ष 1 यानी समूह संघटक यांना योजना सुरु असेपर्यंतच्या कालावधीसाठी नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत, त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाचे पालन करण्यात झालेले नाही.

नगरपरिषद प्रशासंचालनालयाचे परिपत्रक क्र.सुजयो 102003/259/ प्र.क्र.23/14 दि.17/05/2004 अनु.क्र.30 नुसार प्रकल्प अधिकारी, समूह संघटक यांच्या कामाचे मुल्यांकन दर तीन महिन्यांनी घेणे अपेक्षित आहे तसेच त्यांना मुदतवाढ जिल्हाअधिकारी यांचे मान्यतेने देणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आलेले नाही.

301) 2011-12 या आर्थिक वर्षात स्वयंरोजगारासाठी रु.6930529/- व महिला ॲक्वागट साठी रु.8792750/-तसेच बचत गटासाठी रु.2086000/- असे एकूण रु.17809279/- एवढे अनुदान वाटप करण्यात आले आहे, परंतु लाभार्थीने त्याला मिळालेल्या अनुदानाच्या रकमेच्या विनियोगाची उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतलेली नसल्याने लाभार्थीच्या आर्थिक स्तरामध्ये बदल झाल्याची व अनुदानाचा उपयोग विहित कारणासाठीच केला आहे किंवा कसे याबाबतची खात्री करता येत नाही.

302) 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये एकूण अनुदान वाटप रु.17809279/- एवढे करण्यात आले आहे. परंतु सदर अनुदान वाटप करतेवेळी मूळ प्रस्ताव तयार करण्यात आला होता. त्याची कार्यालयीन प्रत अर्धसमास ज्ञापन क्र.160 दि.13/12/2013 नुसार मागणी करुनही लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, त्यामुळे सदरचे प्रस्ताव हे शासनाच्या मार्गदर्शक सुचना नुसार तयार केले आहेत किंवा कसे याची लेखापरिक्षणास खात्री करता आलेली नाही. म्हणून सदर रक्कम रु.17809279/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

303) सुवर्ण जयंती रोजगार योजनेचा निधी 31/03/2012 रोजी रु.51539741/- एवढा शिल्लक होता. सदर निधीवर 2011-12 मध्ये बँकेच्या बचत खात्यावर व्याज रु.1913466/-एवढे मिळालेले आहे. सदर निधी मुदतबंद ठेवी मध्ये ठेवला नसलेने वर्षाला 8.75% दराने रु.4509727/- एवढे व्याज प्राप्त झाले असते. म्हणजे रु.2596261/- एवढ्या रकमेचे नुकसान झालेले आहे. सदरची रक्कम रु.2596261/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

304) नागरी समुदाय विकास प्रकल्प ( यु.सी.डी.) आस्थापना मध्ये प्रकल्प संचालक, प्रकल्प अधिकारी, समूह संघटक ही पदे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53(1) नुसार व महापालिका ठराव क्र.141 दि.03/08/1994 नुसार 6 महिन्यांसाठी भरण्यात आली होती. सदर पदांना शासनाची मंजूरी मिळावण्यासाठी प्र.क्र. नआ 1 आस्था 1/459 दि.15/10/1994 नुसार प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. परंतु दि.19/12/2013 पर्यंत सदर पदांना शासनाने मंजूरी दिलेली नाही. तरीही सदर पदे कार्यरत असून सदर पदावर काम करणा-या कर्मचा-यांना स्थायी पदाप्रमाणे नियमित वेतन अदा करण्यात आले आहे. पदे मंजुर नसताना नियमाबाह्यपणे वेतन अदा केले आहे.

305) महानगरपालिका ठराव क्र.92 दि.30/12/1999 नुसार सदर पदांना सहा महिन्याची मुदत दिलेली आहे. व पुन्हा मुदतवाढ आवश्यक असल्यास पुनश्च स्थायी समिती मार्फत प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर करावे अशा सुचना आहेत, तसेच ठराव क्र.92 दि.20/12/1999 नंतर महानगरपालिकेची मान्यता न घेताच सामान्य प्रशासन विभागाने सदर पदाना वेळोवेळी

नियमबाह्यपणे मुदतवाढ दिली आहे.

306) शासन निर्णय क्र.सुजयो-2001/690 प्र.क्र.28 नवि 33 दि.10/5/2002 नुसार प्रकल्प अधिकारी, समुह संघटक यांची पदे कंत्राटी पद्धतीने 1 वर्षासाठी भरणे आवश्यक असताना 2011-12 मध्ये एक प्रकल्प अधिकारी व दोन समूह संघटक कार्यरत होते, व त्यांना वेतनापोटी रु.2467720/- अदा करण्यात आली आहे. पदे मंजूर नसताना स्थायी पदाप्रमाणे नियमित वेतन अदा केले असल्याने रु.2467720/- वसूलपात्र करणेत यावेत.

अर्धसमास ज्ञापन क्र.168 दि.08/01/2014 चे उत्तर दिलेले नाही.

DPSKGGM6001 (Ref No : 118, Hmm No : 168)

## *152 एस्कॉर्ट विभागाकरिता पावतीपुस्तकांच्या छपाई निविदेमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पथकर मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 211600.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 मधील संविदा नियम क्र.2(1) नुसार निविदा कालावधी नियमानुसार कमीत कमी 7 दिवस आवश्यक असताना तो तीनच दिवसांचा देण्यात आला असुन एकाच वर्तमानपत्रात निविदा प्रसिद्ध केलेने दोनच निविदा प्राप्त झाल्या त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या एस्कॉर्ट विभागाने वसुलीसाठी खालीलप्रमाणे पुस्तके आवश्यक असल्याबाबत भांडारविभागाकडे मागणी केल्याचे नस्तीमध्ये नमूद आहे

| | |
|---|---|
| एस्कॉर्ट पावती पुस्तके | 18000 नग |
| एस्कॉर्ट फी किर्द | 200 नग |
| एस्कॉर्ट सील | 20000 पॅड |
| नोटांचे बंडल सील | 500 पॅड |

उपरोक्त प्रमाणे लागणारे साहित्य छपाई करुन घेण्याकरिता वार्षिक निविदा काढण्यात याव्यात असा प्रस्ताव दि. 25/05/2011 रोजी आयात कर विभागामार्फत सह आयुक्त (सा) यांना सादर करण्यात आला. 2011-12 ची एस्कॉर्ट वसुली 01/04/2011 पासून सुरु होत असल्याने त्या अनुषंगाने आवश्यक असलेले साधनसामुग्री विहित

मुदतीत उपलब्ध होणेकरिता निविदा प्रक्रिया विहित कालावधीत सुरु करणे आवश्यक असता आर्थिक वर्ष सुरू झालेनंतर छपाई प्रस्ताव सादर केला आहे.

दिनांक 25/05/2011 च्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दिनांक 15/06/2011 रोजी मान्यता देऊन दोन वर्तमान पत्रात निविदा प्रसिद्ध करण्यास मान्यता दिली.त्या अनुषंगाने दि.18/06/11 रोजी "सुराज्य" या एकाच वर्तमान पत्रात निविदा प्रसिद्ध करण्यात येऊन दि.22/6/11 पर्यंत निविदा फॉर्म उपलब्ध होऊन दि.23/6/11 पर्यंत दुपारी 1 वाजेपर्यंत स्विकारले जाऊन निविदा 24/6/11 रोजी उघडण्यात येतील असे प्रसिद्ध करण्यात आले.

1. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 मधील संविदा नियम क्र.2(1) नुसार निविदा कालावधी नियमानुसार कमीत कमी 7 दिवस आवश्यक असताना तो तीनच दिवसांचा देण्यात आला असुन एकाच वर्तमानपत्रात निविदा प्रसिद्ध केलेने दोनच निविदा प्राप्त झाल्या त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नाही. निविदा कालावधीत खालीलप्रमाणे एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदाकार | निविदेतील अ.क्र. | पुस्तके | रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश प्रिंटर्स | अ.क्र.1 करिता | 8000 | 936000/- |
| 2 | स्वस्तिक प्रि.प्रेस | अ.क्र.2 करिता | 200 | 39000/- |
| 3 | स्वस्तिक प्रि.प्रेस | अ.क्र.3 करिता | 20000 | 301000/- |
| 4 | स्वस्तिक प्रि.प्रेस | अ.क्र.4 करिता | 500 पॅड | 6600/- |

उपलब्ध निविदाकारास वाटाघाटीकरता दि.14/07/2011 रोजी बोलविले असता महेश प्रिंटर्स यांनी निविदादरामध्ये 4% कमी किमतीस व स्वस्तिक प्रिंटींग प्रेस यांनी निविदा रकमेच्या 1% कमी किमतीस काम करणेचे मान्य केले आहे.

2. दि.01/04/2011 ते दि.20/09/2011 या कालावधित आवश्यक असलेली एस्कॉर्ट पुस्तके किरकोळ छपाई लेखाशिर्षांतर्गत महेश प्रिंटर्स यांचेकडून वेगवेगळ्या आदेशान्वये प्रति आदेश 60 पुस्तके प्रमाणे पुस्तके छापून मागविण्यात आली असून त्यांचा पुरवठा 1) दि.09/06/2011 रोजी 1500 पुस्तके, 2) दि.13/07/2011 रोजी 900 पुस्तके,3) दि.30/07/2011 रोजी 1200 पुस्तके, 4) दि.26/08/2011 रोजी 800 पुस्तके, अशी एकूण 4400 पुस्तके छपाई करुन घेण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया उशिरा सुरु केल्याने दरपत्रके/निविदा न मागविता छपाई करुन घेण्यात आलेली असून त्याकरिता झालेला खर्च रु.215600/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 163, दिनांक 16.12.2013 चे उत्तर दिलेले नाही.

DATASDM5602 (Ref No : 119, Hmm No : 163)

## *153 महिला व बालकल्याण विभागाने अर्थसंकल्पीय तरतूद खर्च केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : म.बा.कल्याण महापालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

***2011/12 या आर्थिक वर्षामध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी शासनाच्या नगरविकास विभागाने आदेशित केलेली महापालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पित महसुल उत्पन्न रु.344.25 कोटी मधून बांधिल खर्च रु.93.94 कोटी वजा जाता उर्वरीत रक्कम रु.250.31 कोटीच्या 5% रक्कम रु.12.51 कोटी रक्कम राखीव ठेवणे आवश्यक होते, परंतू महानगरपालिकेने रु. 2 कोटी रक्कम राखीव ठेवल्याने शासन महिलांसाठी राबवित असलेली धोरणे प्रभावी पणे महिला व बालकल्याण समितीकडून राबविली गेली नसल्याचे दिसून येते.***

2011-12 या आर्थिक वर्षात सोलापूर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पित महसूली रक्कम रु.344.25 कोटी पैकी रु.2 कोटी रक्कम महिला व बालकल्याण विभागासाठी तरतूद करण्याबाबत सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.380, दि.31/3/2011 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

307) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे आदेश क्र.जीईएन-1093/1198/नवि-14, दि.14 जुलै 1993 अन्वये महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधिल खर्च वजा जाता, उर्वरित रकमेच्या 5 % रक्कम महिला व बालकल्याण विभागा साठी राखीव ठेवणे आवश्यक होते. परंतू महानगरपालिकेने त्यानुसार 12.51 कोटी रक्कम राखून ठेवण्या ऐवजी 2 कोटी राखून ठेवून 10.51 कोटी इतक्या कमी रकमेची तरतुद केली आहे.

308) उपरोक्त 2 कोटी रु. तरतूदीपैकी नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक नि.क्र.संकिर्ण 2005/प्र.क्र. 156/05/नवि.20, दि.30/12/2006 अन्वये अ.क्र.1 नुसार मुली आणि महिलांच्या विविध प्रकारच्या प्रशिक्षणांसाठी 48 लाखांच्या तरतूदीपैकी रु.1685128/- तर उर्वरित अ.क्र.2 ते 29 विविध बाबींकरिता रु.1 कोटी 32 लाख 55 हजार एवढ्या तरतूदीपैकी रु.5548429/- आणि महिला व बालकल्याण समितीच्या व्यवस्थापनासाठी रु.19 लाख 45 हजार एवढ्या तरतूदींपैकी रु.1461262/- एवढी रक्कम खर्ची पडल्याचे महिला व बालकल्याण विभागाने सादर केलेल्या 2011-12 मधील अर्थसंकल्पिय तरतूद आणि खर्चाच्या विवरणपत्रावरुन आढळुन येते.

309) उपरोक्त तरतूद आणि खर्चाचे विवरणपत्र पहाता एकूण तरतुद रु. 2 कोटीपैकी रु.8694819/- एवढी रक्कम खर्ची पडली असून रु.1 कोटी 17 लाख, 30 हजार 181 एवढी रक्कम शासनाने आदेशित केलेल्या मुली व महिलांसाठीच्या विविध योजनांवर खर्ची न पडता ती व्यपगत झाल्याचे दिसून येते. यावरुन सोलापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभाग आणि तिची समिती शासनाचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गरजू मुली आणि महिलांच्या कल्याणासाठी राबवित असलेल्या ध्येय व धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे राबवित नसल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी महिला व बालकल्याण विभागास अर्धसमास ज्ञापन क्र.172 दि.8/1/2014 अन्वये विचारणा करण्यात आली आहे. परंतू त्यांचा अनुपालन अहवाल अप्राप्त आहे.

### *154 अतिक्रमण विभागाचे आस्थापनेवर झालेल्या अनावश्यक खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : वेतन महानगरपालिका निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 55006474.00/-

***अतिक्रमण विभागाने संपूर्ण वर्षभर अनधिकृत बांधकामे शोधून त्यांचे विरुद्ध कार्यवाही करणे आवश्यक आहे. व शासन निर्णय 12 मे 1998 नुसार महानगरपालिका कर्मचा-यांनी अतिक्रमण विरुद्ध कारवाईच्या वेळी पोलिस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस दलाची आहे. परंतु अतिक्रमण विभागाने वर्षभरात अनधिकृत बांधकामावर अगदी नगण्य कारवाई केली आहे मात्र पोलिस आस्थापनेवर रु.50694807/-इतका अनावश्यक खर्च झाला आहे. सदर खर्चाचा हेतु साध्य झाला नाही.***

सोलापूर महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे लेखापरिक्षण केले असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

1. शासन निर्णय क्र. ए.पी.ओ. 3297/3112 प्रक्र.64 पोल 3 दि.12/05/1998 नुसार सोलापूर महानगरपालिकेने अतिक्रमण विभागासाठी स्वतंत्र पोलिस पथक निर्माण केलेले आहे.सदर शासन निर्णयानुसार खाली नमुद केल्याप्रमाणे पदे मंजुर आहेत.

| अ.क्र | पद व वेतनश्रेणी | मंजुर पदे |
|---|---|---|
| 1. | पोलिस निरिक्षक 2200-75-2800 द.रो.100-3500 | 1 |
| 2. | सहा. पोलीस निरीक्षक 2000-60-द.रो.2300-75-3200 | 3 |
| 3. | पोलिस शिपाई 950-20-द.रो.-1150-25-1400 | 30 |

सध्या कार्यरत कर्मचारी व अधिकारी

| अ.क्र | पद व वेतनश्रेणी | मंजुर पदे |
|---|---|---|
| 1. | पोलिस निरिक्षक 2200-75-दरो-2800-100-3500 | 1 |
| 2. | सहा. पोलीस निरीक्षक 1640-60- 2600द.रो.75-2900 | 5 |
| 3. | पोलिस हवालदार 1320-30-द्रो.-1560-40-2040 | 10 |
| 4. | पोलिस नाईक | 5 |

2. वरील मंजुर पदे व सध्या कार्यरत असलेली पदे यांचा ताळमेळ घेतला असता सहा. पोलिस निरीक्षक पदाची तीन पदे मंजुर असताना पच पदे कार्यरत आहेत व पोलिस हवालदार, पोलिस नाईक ही पदे मंजुर नसताना कार्यरत आहेत. तसेच कार्यरत पदाची वेतनश्रेणी व मंजुर पदाची वेतनश्रेणी यामध्ये मोठी तफावत असल्याने महापालिकेला जास्तीची रक्कम अदा करावी लागत आहे. तसेच शासनाने मंजुर केलेल्या पदाव्यतिरिक्त सहाय्यक पोलिस निरीक्षकाची 2 पदे जास्त आहेत. शासनाच्या मंजुरी शिवाय सदर पदावर केलेला खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3. शासन निर्णय क्र. ए.पी.ओ. 3297/3112 प्रक्र.64 पोल 3 दि.12/05/1998 नुसार पदाची मुदत प्रथमतः कार्यभार स्विकारल्यापासून 1 वर्षासाठी आहे. सोलापूर महानगरपालिका यांनी सदर पदे दि.01/04/2001 पासून वापरण्यास सुरुवात केली आहे. म्हणजेच सदर पदांना दि.31/03/2002 पर्यंत मुदत होती. सदर पदांना मुदत वाढ घेतली नसल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले आहे. म्हणून दि.01/04/2002 ते 31/03/2012 पर्यंत वेतनापोटी झालेला एकूण खर्च रु.50694807/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4. शासन निर्णयानुसार सोलापूर महानगरपालिकेसाठी एकूण 34 पदे मंजुर आहेत. सद्यस्थितीत महापालिकेमध्ये 21 पोलिस कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत. म्हणजे 13 पदे ही पोलिस आयुक्त सोलापूर हे वापरत आहेत. सदर पदे वापरण्यासाठी शा. नि. अ.क्र.4 (ड) नुसार मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. नस्ती तपासली असता लेखापरिक्षणास मान्यतेचे कार्यालयीन आदेश उपलब्ध झाले नाहीत.

5. शासन निर्णयातील अ.क्र.4(अ) नुसार मंजुर पदावर पुर्णपणे नियंत्रण महापालिका आयुक्त यांचे असणे आवश्यक आहे. लेखापरिक्षण केले असता उपरोक्त कर्मचा-यांवर नियंत्रण हे पोलिस आयुक्त सोलापूर यांचे असल्याचे निदर्शनास आले. तरी यापुढे पोलिस कर्मचारी व अधिकारी यांचेवर नियंत्रण मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांचे असणे आवश्यक आहे.

6. सोलापूर महानगरपालिका अतिक्रमण विभाग हा शहर अभियंता यांना अतिरिक्त कार्यभार देऊन चालविण्यात येत आहे. शापरिपत्रक क्र.जीईएन-1096/45/प्र.क्र.15/नवि-27 मंत्रालय, मुंबईः400032 दि.04/03/1996 नुसार महानगरपालिकेने प्रत्येक अनधिकृत विभागासाठी क्षेत्रीय अधिकारी नेमणे आवश्यक असताना तसे केल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आलेले नाही.

